
□ जयवंत दळवी □ प्र. ना. परांजपे □ चंद्रकांत दीक्षित
□ डॉ. श्रीराम लागू □ प्रा. राम बापट □ सतीष कामत
□ अन्नदाशंकर राय □ वा. दा. रानडे □ चंद्रशेखर पुरंदरे
□ सुभाष अवचट □ रतनलाल भंडारी □ डॉ. वि. म. दांडेकर

# माणूस

जनविराट विशेषांक : दोन । १२ ते २५ मार्च ७७ । चार रुपये



**साप्ताहिक माणूस**

वर्ष सोळा - अंक एकेचाळीस-बेचाळीस

१२ मार्च १९७७

मूल्य चार रुपये

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशाची वर्गणी : पंचावन्न रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९

# तमसो मा ज्योतिर्गमय

निवडणूक जवळ आली की अनेक पत्रके निघतात. त्यांतील अनेक पत्रके एकदा वाचून टाकून देण्यासारखी असतात. ज्याच्यावर विचार करावा असे पत्रक एखादेच असते. या निवडणुकीच्या संदर्भात असे एक पत्रक गोखले अर्थशास्त्र संस्थेचे संचालक प्रा. वि. म. दांडेकर, मद्रास येथील मद्रास ख्रिश्चन्स कॉलेजचे डॉ. सी. टी. क्यूरीयन, मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. डी. टी. लाकडावाला राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. अलू दस्तूर व याच विभागातील डॉ. उषा मेहता व आणीबाणीच्या सुरुवातीस रिझर्व्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणारे डॉ. एम्. एल्. दांतवाला या विचारवंतांच्या सह्यांनी निघाले आहे. हे पत्रक 'इंडियन एक्सप्रेस'च्या दिनांक ८ मार्चच्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. मात्र इतर वर्तमानपत्रांत या पत्रकाला फारशी प्रसिद्धी मिळाल्याचे दिसत नाही. म्हणून या पत्रकाचे स्वैर मराठी रूपांतर पुढे दिले आहे.

काही लोक आणीबाणीच्या लाभांची वर्णने गौरवाने करीत आहेत, परंतु त्यामुळे आपण सर्वसामान्य राजकीय प्रक्रियांच्या द्वारे राज्य करण्यास असमर्थ आहोत हे स्पष्ट होते, हे त्यांच्या लक्षात आलेले दिसत नाही. लोकशाहीच्या रक्षणासाठी सर्व मूलभूत हक्कांचा संकोच करणे आवश्यक आहे, असे सांगणे हा लोकशाहीचा सर्वांत मोठा उपमर्द आहे.

थोड्याच दिवसांच्या अवधीत भारताचे नागरिक लोकसभेतील त्यांचे प्रतिनिधी म्हणजे पर्यायाने नवे सरकार निवडतील. त्यांच्या निर्णयावर या देशाचे भवितव्य व त्यांच्या जीवनातील आर्थिक व राजकीय परिस्थिती अवलंबून आहे, असे म्हणण्यात काहीही अतिशयोक्ती नाही. यावेळी योग्य निर्णय घेतला नाही तर या राष्ट्राचे अपरिमित नुकसान होईल.

अशा वेळी शिक्षणक्षेत्रातील आम्हा लोकांची विशेष जबाबदारी असून आम्ही जनतेपुढे त्यांचे प्रतिनिधी निवडण्यासाठी आवश्यक असणारी माहिती व मुद्दे मांडले पाहिजेत असे वाटते. हे पत्रक हा कोणत्याही पक्षाच्या बाजूचा किंवा विरुद्ध असा जाहीरनामा नसून, देशात लोकशाही व समाजवादी स्वरूपाचे राज्य निर्माण करावयाचे असेल तर, ज्या मुख्य गोष्टींचा विचार करावा लागेल त्या स्पष्ट करणारा जाहीरनामा आहे. समाजवाद व लोकशाही यावर भावी समाजव्यवस्थेचा पाया रचला जाणार असून, दोन्ही गोष्टी अविभाज्य आहेत असे स्पष्ट गृहीत या जाहीरनाम्यात धरण्यात आले आहे.

गेल्या १९ महिन्यांतील घटनांचा विचार करणाऱ्या लोकांच्या मनात येणारी सर्वांत खळबळजनक घटना म्हणजे आणीबाणी होय. या घटनेचे सखोल विश्लेषण न केल्यास ही घटना फारशी उपद्रवी वाटत नाही. म्हणून तिचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झालेल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक विकासाचेही विश्लेषण करून या विकासाला प्रतिबंध करणाऱ्या कृती स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आणीबाणीची आवश्यकता का भासली? सार्वजनिक जीवनाच्या अनेक क्षेत्रांत बेशिस्त व समाजविघातक प्रवृत्ती निर्माण झाल्या होत्या, हे मान्य केले तरी या सर्वांचे खापर राजकीय विरोधकांवर फोडणे उघड उघड अन्याय्य आहे. एक तर या सर्व बेशिस्त व गैर प्रवृत्तींचे मूळ राजकीय नव्हते व दुसरे म्हणजे या गोष्टींची विरोधकांएवढाच राज्यकर्ता

पक्षही संबंधित होता. साठेबाजी, काळाबाजार व तस्करी मोठ्या प्रमाणावर पसरण्याचा दोष विरोधकांपेक्षा राज्यकर्त्या पक्षाकडे अधिक आहे. या गोष्टींना पायबंद घालण्याची सत्ता असूनही राज्यकर्त्यापक्षाने ती योग्य प्रकारे वापरली नाही. राजकीय विरोध व आर्थिक गुन्हे यांची गल्लत करणे योग्य नाही. त्याचबरोबर या प्रवृत्तींच्या व त्या मागील राजकारणाचा बीमोड आणीबाणीसारखा कठोर उपाय योजूनच करता येईल हे म्हणणेही योग्य नाही.

यावरून आणीबाणीची घोषणा व त्यानंतर झालेली दडपशाही व सर्व-प्रकारच्या मतभेदांची मुस्कटदाबी यांचा उद्देश वेगळा होता असा निष्कर्ष काढणे अटळ आहे. आणीबाणी जाहीर झाल्याची वेळ व तिची अंमलबजावणी या गोष्टी भीती व सत्तेवर टिकून राहण्याचा निकराचा प्रयत्न दाखवितात. आणीबाणीचे समर्थन सरकारची नेहमीच्या साधनांनी राज्य करण्याची असमर्थता दाखविते आणि यामुळे या समर्थकांची दया वाटते. लोकशाहीच्या रक्षणासाठी घटनात्मक नव्हे तर नैतिक दृष्टयाही मूलभूत असणारे हक्क हिरावून घ्यावे लागतात, हजारो लोकांना खटले न भरता कैदेत ठेवावे लागले व लोकसभेमधील कामकाजाचे वृत्तान्तदेखील प्रसिद्ध करू नयेत येथपर्यंत वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करावी लागते याहून लोकशाहीची अधिक बदनामी ती कोणती ?

श्री. तारकुंडे यांनी म्हटल्याप्रमाणे घटनेतील मूलभूत हक्क हिरावून घेतल्यास व्यक्तीचे स्वातंत्र्य व जीवित यांचे न्यायालयीन संरक्षण नष्ट होते व शासनाला अनिर्बंध व उघड उघड अयोग्य सत्ता प्राप्त होते.

आणीबाणी ही एक तात्पुरती घटना आहे, असे नाही. अनिर्बंध राजकीय सत्ता सरकारला कायम चालविता येईल, अशा स्वरूपाच्या घटनादुरुस्त्या आणीबाणीच्या अंधारात करण्यात आल्या आहेत.

आणीबाणी शिथिल झाल्यामुळे स्वातंत्र्याचा उषःकाल झाला आहे, अशी खोटी कल्पना करून घेता कामा नये. गेल्या २० महिन्यांतील राष्ट्राला हादरे देणाऱ्या घटना पुन्हा घडू देणार नाहीत, असेच प्रतिनिधी लोकांनी निवडायला हवेत.

चैनबाजीला मान देणाऱ्या व त्यावर स्वतःची राजकीय सत्ता अवलंबून ठेवणाऱ्या लोकांच्या गरिबी हटविण्याच्या घोषणांवर विश्वास ठेवण्यात काही अर्थ नाही. प्रस्थापित हितसंबंध व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण यांना धक्का दिल्याशिवाय दुबळ्या घटकांचा विकास करणारा कोणताही कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात आणता येणे शक्य नाही. या दृष्टीने चैनबाजीचा विनाश करणाऱ्या आर्थिक कार्यक्रमावर भर देणे आवश्यक आहे. ही गोष्ट केवळ कायद्यांच्या द्वारे होणार नाही. त्यासाठी समता, साधेपणा व अनावश्यक गरजांना फाटा देणे यांसारखी मूल्ये अंतर्भूत असणारे शिक्षण दिले पाहिजे. समाजवादी समाजाच्या स्थापनेसाठी समाजवादी अर्थशास्त्राइतकेच समाजवादी नीतिशास्त्रही आवश्यक आहे. त्याचबरोबर एका वेगळ्या पद्धतीने आर्थिक विकासाची गती वाढवली पाहिजे. या विकासात गरिबांच्या जीवनमानात शक्य तितक्या लवकर सुधारणा झाली पाहिजे. उत्पन्नातील वाढीबरोबरच त्यांचे आरोग्य व शिक्षण यात सुधारणा झाली पाहिजे. त्या दृष्टीने आजच्या उत्पादनात बदल झाले पाहिजेत व भरड धान्ये, स्वस्त कापड, स्वस्त घरे, शिक्षण, ग्रामीण आरोग्य व वैद्यकीय सेवा यांवर भर देण्यात आला पाहिजे.

वीस कलमी (किंवा २५ कलमी) कार्यक्रमात अनेक चांगल्या गोष्टी आहेत. हा कार्यक्रम आणीबाणीच्या धूसर वातावरणात पुढे आला, हे दुर्दैव आहे. हा कार्यक्रम हा एका अर्थाने या आधीचे कार्यक्रम फसल्याची कबुली आहे आणि गरिबी हटाव घोषणेला विश्वासार्हता मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. एका रात्रीत ग्रामीण कर्जबाजारीपणा व बांधील श्रम नाहीसे झाल्याच्या दाव्यांवर विश्वास ठेवणे शक्य नाही. जन्मभर बाळगले जाणारे कर्जाचे ओझे वा बांधील श्रम ही आत्यंतिक गरिबीची व बेरोजगारीची लक्षणे आहेत. लक्षणे घालविणे म्हणजे मूळ रोग बरा करणे नाही. प्राथमिक शुश्रूषा म्हणून या उपायांचे स्वागत केले तरी खरे उपाय अखेरीस आर्थिक समता प्रस्थापित करणे, उत्पादन-वस्तू संच बदलणे, शोषण नष्ट करणे व लोकांना काम मिळवून देईल, असे उत्पादनतंत्र वापरणे हेच आहेत, हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

थोडक्यात, या देशात लोकशाही टिकवायची असेल तर लोकांनी जागृत राहिले पाहिजे. व्यक्तिगत व सार्वजनिक जीवनात काही आचारसंहिता पाळली पाहिजे. श्रीमंतीच्या प्रदर्शनाविषयी तिटकारा बाळगला पाहिजे आणि तळच्या ७० टक्के लोकांच्या जीवनात सुधारणा होईल, अशा स्वरूपाच्या जहाल सामाजिक व आर्थिक कार्यक्रमाला पाठिंबा दिला पाहिजे. त्याचबरोबर सर्व प्रकारच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय अन्यायाला विरोध करण्याचा वसा घेतला पाहिजे. □

---

लागोपाठ दोन विशेषांक निघाल्यामुळे 'माणूस' साप्ताहिकाचा यापुढचा, दिनांक १९ मार्च १९७७ हा अंक प्रसिद्ध होणार नाही. दि. २५ मार्चला अंक नेहमीप्रमाणे निघेल.

---



# नागरिक


सुभाष अवचट

अंतरा अंतरावर लोक थांबले
माझ्या परतण्याच्या वाटेवर
आश्चर्य सर्वांवर, माझ्या घरापर्यंत
मला अचानक फुटलेल्या कुबडावर.
उपरण्यात गुंडाळून मी नदीत सोडून
आलो माझे लाचार अस्तित्व,
येताना सुरक्षित जपून आणली,
कुबडातून माझी सभ्य शरम.
मी नागरिक सोफिस्टिकेटेड
मला गांडू म्हणवून घेता येत नाही,
कमरेत वाकले तरी गुडघ्याला कपाळ
टेकत नाही.
मला बास्टर्डही म्हणवून घेण्याचा धीर नाही,
आई वारली तेव्हा रजेअभावी मला
जाता येत नाही.
कडक इस्त्रीचा चेहरा ठेवून
नागरिक म्हणवून घेता येत नाही,
म्हणवून घेतले तरी
या शहराची सोयरिक नाही.
ही झाडी मी वाढविली
आणि शहराचे रस्ते
थुंकीने जेव्हा बेजार झाले
तेव्हाही मीच धुतले.
त्या रस्त्यांवर मी चालताना
माझे पाय बेशरम झाले.
रस्त्याकडेचे व्यवस्थित घर
पाऊस नसताना कोसळले.
गुलमोहरांच्या फांद्याही अवेळी वृद्ध झाल्या.
दुकानांच्या पाटयांनी आपणहून माफी मागितली,
त्यांच्यावरचे अनुभवी रंग त्याच दुकानात विकायला आले.
हलगर्जी दिवे रस्त्यावर
खाली माना घालून उभे राहिले,
हे पाहून प्रकाशाला उभे आयुष्य बुटके झाले.

भेळवाला दाढी वाढवून,
शहराला ही भेळ विकतोच आहे.
समोर उभे राहून, भेळखाऊ नागरिक
त्यालाही हवेच आहेत.
उगवतेय माझ्या पायांवर आता
परकीय लव
आणि मावळतायेत सूर्य माझ्या बुटात.
अप्रस्तुत झालोय मी
बुटाच्या नाड्या सोडताना.
पायाने दडपून ठेवलेल्या बुटातल्या
अंधाराचीही भीती साचत चाललीय
माझ्या मनात.
नागरिक, शहर मला म्हणत नाही
की मी शहराला ?
अंगावर शहारा येतो
नांगरून पडलेल्या जमिनींचा.
पळत सुटावे शहर,
बिथरून जावा माझ्यातला नागरिक.
रस्त्यांना मी विसरावे,
झाडांनाही,
अंधाराचा धूर व्हावा माझ्या बुटात
आणि माझ्या शरीराची चिमणी व्हावी
ह्या प्रख्यात शहराची.



हवा होईलही अशुद्ध थोडी,
पाखरेही विचार करतील उडण्याचा,
सायंकाळी फिरतही जाईल
हा धुराचा ढग ह्या शहरावरून
त्यावेळी पश्चिम गेलीही असेल
झाकाळून.
असे झाले म्हणून हे शहर
व्हिस्कीचे आचमन करेल.
पोलिसासारखा ह्या शहराच्या
स्वास्थ्याचा विचारही करेल.
आणि पश्चिमेला विरत निघालेल्या
ढगाच्या श्वासाविषयी काळजीही घेईल,
बेशरम.
कमरेत का वाकतायेत ह्या फांद्या ?
प्रसन्न का होत नाहीत ही झाडे ?
पानांची अस्वस्थ पानगळ
आणि जमिनीतून नुकतेच उकरून
काढलेले भांडण.
ही नवीनच उच्छ्वासांच्या
परतफेडीची सम्मेलनं
आणि मघा काचांच्या तुकड्यांनी
फुटलेला हा वयातला रस्ता.
खुर्च्याही गृहातल्या बेशरम
आणि रंगमंचावर ओकारी करून
लटपटत विंगेला धरून,
दबून बसलेलं हे असं सोवळं नाटक :
मानाही टाकलेल्या ह्या खुल्या दरवाज्यांनी
आणि जागा सोडून दारवानांनी नाचवलेल्या
बेहोष नाचांचा झुलता प्रयत्न.
पुस्तकांतून निघावी बाहेर
म्हाताऱ्या उंटाची पेटलेली तृप्त तहान.
पेलवता येत नाही
म्हणून पुस्तके जाळून उभे केलेले
अशिक्षित स्मशान.
पाठही थोपटतात हे
वेश्या उपभोगून बाहेर आल्यावर
लिहिलेल्या लाळेच्या दुःखाची.
झोपडपट्टीत वसूल करून पै पै मडक्यातली,
हे उभारतात ताबूत दारूचे,
म्हणत स्वतःला नागरिक, आम्ही भुकेचे.
नागरिकांच्या घोरण्याच्या आवाजात
झोपलेल्या शहराची अपरात्रदेखील बेइमान
फुटपाथदेखील विचार करतो,
जागून दमलेल्यांचे अशिक्षित इमान.



शिकले की वाचता येते, दुःखाने रडता येते
भोंगा वाजला की आत जायचे
परत वाजला की बाहेर यायचे
राहून राहून राहिले की शहर आपले होते
जास्तच राहिले की नागरिकही होता येते.
लक्षात आलेच तर मतदानही करता येते.
असेही जगता येतेच !
नको वाटले, शहर बदलता येते.
बदलताना थोडे कठीण जाते पुढे सवय होते.
बेवकूफ.
रहाता राहिले जे काही,
त्यालाही आता इलाज नाही.
आम्ही असे का झालो
हेही सांगायला सोय नाही.
उठावे म्हणतो आता,
चूळ फेकून तयार व्हावे.
गनीम म्हणून मरण्यापेक्षा
सामोरे जाऊन नागरिक व्हावे.

वाचा जेव्हा फुटल्या होत्या
आणि घराबाहेर आले नागरिकत्व,
होरपळून घरात तेव्हाच जळाले होते
आमचे अतृप्त सत्त्व.
आम्ही तत्त्वहीन, समंजस नागरिक ह्या शहराचे.
पोट आणि तोंड दाबले,
डोके फोडून विचार बंद केले
तरीही आम्ही संरक्षक नसबंद देहाचे.
आम्ही गांडू, अशक्त म्हणवत
तयारही केले आम्ही नवीन तत्त्वज्ञान
पाणी घातले तरीही उगवते
शिस्तीमध्ये नवे उद्यान.
फिरते शहर, मांडून ठेवलेल्या ह्या बागांमध्ये
मोजत झाडांची पाने आणि
उलगडत इतिहास उद्ध्वस्त झालेल्या नबाबासारखे.
फेकून दिलेल्या जनान्यालादेखील
अब्रू असते
पान खाऊन फेकलेल्या पिचकारीतही
स्वतःचे तत्त्व असते.
दारू पिऊन गटारात पडलेल्या माणसालाही बेहोष
विश्व असते.
सर्कशीतल्या विदुषकाला, नको म्हटले
तरीही आयुष्य असते.



# इये मिसाचिये नगरी

## □ अम्हा तो 'शंकर' सुखकर हो!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण यांनी विलेपारले येथे 'जनता' लाटेचे स्वरूप स्पष्ट केले. ते म्हणाले–

'विपर्यस्त आणि दिशाभूल करणाऱ्या असत्य बातम्या छापून कॉंग्रेसविरोधी लाट निर्माण झाल्याचा पुकारा वृत्तपत्रे करीत आहेत. परंतु विकृत वृत्तांनी आमच्यावर काहीच परिणाम होणार नाही. त्रयस्थाची भूमिका सोडून वृत्तपत्रे चुकीच्या मार्गाने जात आहेत.'

शंकररावजी अगदी आमच्या मनातले बोलले! आणीबाणी सैल होण्यापूर्वी वृत्तपत्रे वाचल्यावर कसे अंगावर साबुदाण्याची खीर ओतल्यासारखे वाटायचे. सगळे कसे छान बुळबुळीत होते. कारण वृत्तपत्रांना वठणीवर आणण्याचे चोख काम शंकररावांच्या वतीने पोलीस खाते, आणि सेन्सॉर खाते करीत होते. त्यांच्या कार्याची माहिती जर शंकररावांनी लोकांना दिली तर वृत्तपत्रांना उठता 'लाथ' आणि बसता 'बुक्की' मारणाऱ्या या सरकारी अंमलदारांविषयी कमालीचा आदर निर्माण झाला असता, आणि वृत्तपत्रांनी काय पथ्ये पाळायची असतात, याचे ज्ञान जनतेला झाले असते. निरनिराळ्या वेळीं आणीबाणीच्या काळात वृत्तपत्रांना सरकारने कसकसे मार्गदर्शन केले, याचे दर्शन मोठे मनोज्ञ आहे. हे बघा त्यांचे काहीं हुकूम–

९ सप्टेंबर १९७५ : दिल्लीमधील झोपडपट्टया पाडण्यात आल्या. त्यासंबंधीचे फोटो, अथवा वृत्त छापू नयेत.

१० सप्टेंबर १९७५ : बांगला देशात जे घडते आहे त्यासंबंधी वृत्त छापू नये.

८ ऑक्टोबर १९७५ : तिहार जेलमध्ये जी दंगल झाली त्याचे वृत्त छापण्याची गरज नाही.

२९ ऑक्टोबर १९७५ : दिल्ली हायकोर्टाने मिसा राजबंद्यांच्या मुलाखती घेण्यास लोकांना मुभा असावी, असा जो निर्णय दिला आहे तो जनतेला कळण्याची गरज नाही.

८ जाने. १९७६ : करुणानिधी यांची वक्तव्ये छापू नका.

१५ जाने. १९७६ : जयप्रकाशांच्या प्रकृतीची बातमी पूर्वपरवानगीशिवाय छापू नका.

२२ जाने. १९७६ : बोनस प्रश्नावर राज्यसभेत जो सभात्याग झाला ते वृत्त लोकांना देऊ नका.

१७ मार्च १९७६ : लोकसभेत, सेन्सॉरशिपबद्दल, वृत्तपत्रांवरील खटल्याबद्दल जी प्रश्नोत्तरे झाली ती छापू नका.

२३ मार्च १९७६ : गुजराथ हायकोर्टाने 'भूमिपुत्र' या वृत्तपत्रासंबंधी जो निर्णय दिला, तो जनतेला कळता कामा नये.

१ एप्रिल १९७६ : कम्युनिस्ट पक्षाचे सचीव राजेश्वरराव यांनी भोपाळ येथे जी वृत्तपत्र–परिषद घेतली, त्याचा वृत्तान्त वर्तमानपत्रांत येता कामा नये.

२६ एप्रिल १९७६ : संजय गांधी यांच्या सत्कारासाठी झालेल्या एका सभेतून त्यांना पळ काढावा लागला याचे चित्र वा वृत्त छापू नये. त्याचप्रमाणे दिल्ली दूरचित्रवाणी केंद्राला आग लागली, ही गोष्ट जनतेला कळवू नका.

२८ मे १९७६ : नर्गिस या नटीला लंडनमध्ये अटक झाली ही बातमी छापू नये.

२ जून १९७६ : आचार्य भावे ११ सप्टेंबरपासून अनिश्चित काल उपास सुरू करीत आहेत, ही बातमी छापू नये.

१६ जून १९७६ : इंदिरा गांधींनी देऊ केलेली, डायलासिस खरेदीसाठी आलेली रक्कम ही पंतप्रधानांच्या सरकारी फंडातील असल्यामुळे जयप्रकाश नारायण यांनी परत केली, याबद्दल त्यांनी लिहिलेले पत्र छापू नये. काही छापायचे असेल ते 'समाचार' वृत्तसंस्थेतून येणाऱ्या वृत्तांतून तेवढे घ्यावे.

१६ जुलै ७६ : श्री. जयप्रकाश नारायण हे कोठून कोठे गेले वगैरे बातम्या छापू नये. कारण यामुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात येते!

५ ऑक्टोबर ७६ : 'डायनामाईट' खटल्यात मुख्य आरोपी जॉर्ज फर्नांडीस यांनी जे निवेदन कोर्टात केले ते छापू नका.

२० डिसेंबर १९७६ : कॉंग्रेसमधील भांडणे अथवा युवा कॉंग्रेस व कॉंग्रेस संघटना यांच्यातील तंटे याबद्दल काहीही छापता कामा नये.

ही नुसती वानगी आहे. असे असंख्य हुकूम आहेत. निवडणुका घेण्याचे ठरवून इंदिराजींनी आणीबाणी सैल करताच वृत्तपत्रांच्या हिताकरता सरकारी अधिकारी जो त्रास घेत असत, तो आता थांबला आहे. परिणामी वृत्तपत्रे शहरात अथवा गावात जे जे घडते ते ते जसेच्या तसे आपल्या वृत्तपत्रातून छापू लागली आहेत. ही काय रीत झाली? वृत्तपत्रे ही मुख्यतः इंदिरा गांधी व संजय गांधी मातापुत्राचे स्तोम माजवण्याकरता वापरायची असतात. ज्या वृत्तामुळे कॉंग्रेस संघटना अथवा कॉंग्रेस राज्यसरकार, जनतेच्या मनातून उतरेल, अशी वृत्ते वृत्तपत्रांत छापावयाची नसतात, ही गोष्ट वृत्तपत्रे लगेच कशी काय विसरली, हे आम्हास कळत नाही.

हल्ली पाहावे तो वृत्तपत्रांतून कॉंग्रेस सरकारवर झोड उठवणाऱ्या वक्त्यांची छायाचित्रे आणि त्यांच्या सभेला लाखा-लाखांनी गर्दी करणाऱ्या श्रोत्यांची चित्रे प्रसिद्ध होतात. कॉंग्रेसची सभा असली तर व्यासपीठाचा फोटो आणि जनता पक्षाची सभा असली तर समोर जमलेल्या सागरासदृश जनलाटेचा फोटो ही वृत्तपत्रे देतात. नुसता दुरून फोटो पाहिला तरी ही कोणत्या पक्षाची सभा आहे, हे वाचकांना कळू लागले आहे. छे छे! हे काही ठीक नाही. निवडणुकीचा कालखंड संपताच, एकदा या वृत्तपत्रकारांना वठणीवर आणण्याचे काम शंकररावांनी हाती घ्यावे. जे ऐकणार नाहीत, त्या पत्रकारांना गोळ्या घालाव्या. पण वृत्तपत्रे पुनः आणीबाणीच्या अस्सल काळाप्रमाणे, सुतासारखी सरळ येतील, अशी व्यवस्था शंकररावांनी करावी. जाहीर कंठ फुटलेले सुखासीन साहित्यिक मग पुनः आपआपल्या

पृष्ठ ८० वर

# आपण कितीही ' वल्गना ' केल्या तरी....

## मुलाखत : जयवंत दळवी

प्रश्न : २५ जून १९७५ रोजी आणीबाणी आणि सेन्सॉरशिप यांची कुऱ्हाड कोसळली तेव्हा तुम्हाला मनातनं काय वाटलं ?

दळवी : काय वाटलं हे सरळ एखाद्या दुसऱ्या शब्दात किंवा वाक्यात सांगणं कठीण आहे. संताप आला. भीती वाटली. असहाय्यता जाणवली. आता यापुढं विचार करण्यात अर्थ काय असं वाटलं. बऱ्याचशा प्रमाणात स्वतःची व इतरांची अधिक ओळख झाली. आपण कितीही वल्गना केल्या तरी आपण आतून किती भेकड, स्वार्थी, गांडू वगैरे असतो याची खात्री पटली.

प्रश्न : तुमच्या लेखनस्वातंत्र्याचं काय ?

दळवी : मी ' एकाकी यात्रा ' नावाचे नाटक लिहिले होते. आणीबाणी जाहीर होण्यापूर्वीच मी हे नाटक लिहिलं व गोवा हिंदु असोसिएशनकडे ते दिलं. निवडणूक प्रचारासाठी अर्थव्यवस्था कशी वेगळी निर्माण केली जाते, भाववाढ, जनतेचा आरडाओरडा याची फिकीर न बाळगता उमेदवार कशी निवडणूक लढवीत असतात आणि अशा परिस्थितीत जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या व्यक्तीचा कोंडमारा कसा होतो हे मी या नाटकात दाखवलं होतं. गोवा हिंदु असोसिएशन हे नाटक करणार होतं, परंतु २५ जूनला आणीबाणी जाहीर झाली. या परिस्थितीत हे नाटक होणंच अशक्य होतं. आणीबाणीत विलअरथिंकिंग करायला काही वावच नाही. लेखकांचा कोंडमारा होतो. यातूनच गुप्त बुलेटिन्स निघाली.

प्रश्न : त्या अंधःकाराच्या काळात तुम्ही काय केलं ?

दळवी : काय करणार ? काही करता येत नाही हे समजून घेण्यात काळ घालवला. आम्ही सर्व दृष्टीने सामान्य असतो. मला वाटतं, विवाहित माणूस हा अधिकच भित्रा असतो. काहीही करण्याआधी त्याला आपली बायको–मुलं यांचा विचार करावा लागतो. आणि मग आपल्या हातून काही फारसं होत नाही.

प्रश्न : तुमच्या ' संध्या–छाया ' नाटकाला सरकारी पारितोषिक मिळालं होतं ते तुम्ही परत केलंत तेव्हा काय घडलं ?

दळवी : फार काही घडलं नाही. ते पारितोषिक जाहीर झालं तेव्हा मी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांना पत्र लिहिलं. आणीबाणीच्या आणि सेन्सॉरशिपच्या काळात लेखकाला मोकळेपणाने श्वास घेणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत मी हे पारितोषिक स्वीकारू इच्छित नाही !

प्रश्न : त्यांचं काय उत्तर आलं ?

दळवी : काहीही उत्तर आलं नाही. नंतर मला समारंभाचं आमंत्रण आलं नाही. पण प्रत्यक्ष समारंभाच्या वेळी मात्र माझं नाव जाहीर करून मी आलेलो नाही म्हणून पारितोषिक दिलेलं नाही, असं सरकारतर्फे भासवण्यात आलं.

प्रश्न : तुम्ही ते परत केलं हे लोकांना कळावं म्हणून तुम्ही काय केलं ?

दळवी : तसं काही करणं शक्य नव्हतं. पण ज्यांनी मला वृत्तपत्रांतली पारितोषिकाची बातमी वाचून अभिनंदनाची पत्रं पाठविली त्यांना मी पारितोषिक नाकारल्याचं कळवलं. ' साधने 'त शरश्चंद्र बडोदेकर यांनी पत्र लिहून मी पारितोषिक नाकारल्याचं जाहीर केलं होतं.

प्रश्न : त्या काळात तुम्ही आणखी काय केलं ?

दळवी : स्थानबद्धांच्या कुटुंबियांना मदत.

प्रश्न : सरकारी प्रचारयंत्रणांवर बहिष्कार ?

दळवी : होय. आकाशवाणी, टी. व्ही., ' किशोर ' मासिक... जेथे मंत्री असतील अशा सभा यांवर मी बहिष्कार घातला होता.

प्रश्न : या बहिष्कारानं काय साधतं ?

दळवी : आपली चीड व्यक्त करण्याचा तो एकमेव मार्ग आहे. स्वत्व टिकविण्याची शिस्त त्यामुळे लागते. रेडिओ, टी. व्ही. ही सरकारी प्रचाराची माध्यमे आहेत. त्यावर तुम्ही जाणे म्हणजे त्या माध्यमाला तुम्ही प्रतिष्ठा देता. म्हणून हा बहिष्कार घालणे आवश्यक आहे.

प्रश्न : परंतु बहुतेक प्रमुख लेखकांनी, नाट्य कलावंतांनी बहिष्कार घातला नव्हता ?

दळवी : ते आपलं दुर्दैव दुसरं काय म्हणणार ? टी. व्ही. रेडिओवर बहिष्कार घातल्याचं आवाहन केलं गेलं होतं. त्याला दुर्गाबाई भागवत, मी, पु. ल. देशपांडे, बाळ गाडगीळ, इत्यादींनी फक्त प्रतिसाद दिला.

प्रश्न : विशेष म्हणजे ज्यांनी पूर्वी सेन्सॉरशिपबद्दल–विशेषतः रंगभूमीवरील सेन्सॉरशिपबद्दल–बऱ्याच कल्पना केल्या त्यांनी काय केलं ?

दळवी : रेडिओ–टीव्ही यांची कंत्राटं घेऊन कामं केली.

प्रश्न : याबद्दल तुम्ही काय म्हणाल ?

दळवी : काय म्हणणार ? त्यांना पुनः त्या जुन्या स्वातंत्र्यांच्या पोकळ वल्गना करता येतील अशी परिस्थिती निर्माण होवो !

प्रश्न : कुटुंबनियोजन प्रचार साहित्यासाठी सरकारने लेखकांची समिती नेमली व त्यावर भले भले लेखक आहेत –

दळवी : हा लाचारीचा प्रकार आहे.

प्रश्न : गेलं दीड वर्ष जी भयानक परिस्थिती निर्माण झाली त्याचा साहित्यावर काय परिणाम होईल ?

दळवी : काहीतरी परिणाम निश्चित होईल ! कालान्तरानं आपल्या साहित्यात ते चित्र दिसेल असं मला वाटतं !

प्रश्न : आणीबाणीला तुमचा विरोध होता याचा तुम्हाला समाजजीवनात काही त्रास झाला का ?

दळवी : काहीही त्रास झाला नाही.

प्रश्न : आणीबाणीच्या काळातील अनुभवांवर काही लेखननिर्मिती करणार आहात काय ?

दळवी : आता 'एकाकी यात्रा' हे नाटक मी सेन्सॉरकडे सबमिट करणार आहे. आपली थट्टेगिरी व्यक्त करणारे काही विषय डोक्यात आहेत परंतु ते लिहायला वेळ लागेल.

प्रश्न : आणीबाणीत तुम्हाला लेखक म्हणून कसली जाणीव झाली ?

दळवी : लेखक म्हणून समाजजीवनाची नवी जाणीव निर्माण झाली. ही एक वेगळीच वास्तवता आहे असं जाणवलं. 'चक्र' व 'स्वगत' या माझ्या कादंबऱ्यातही वास्तवताच होती पण वेगळी. आणीबाणीत जाणीव झाली ती राजकीय वास्तवतेची. एखादी राजकीय व्यक्ती तुम्हाला घेऊन टाकते हे आधी स्वप्नातदेखील आलं नव्हतं.

प्रश्न : आणीबाणीत तुम्हाला बोध घडेल असं काय दिसलं ?

दळवी : इंदिरा गांधीच नव्हे, तर संजय गांधीसारखा कुठंच कर्तृत्व सिद्ध न केलेला मुलगासुद्धा मोठमोठ्या नेत्यांना आणि सामान्यांना गुरं हाकल्याप्रमाणे कसा हाकू शकतो ते दिसलं !

प्रश्न : प्रत्यक्षात तुमच्यावर परिणाम काय झाला ?

दळवी : माझा ब्लड प्रेशरचा विकार बराच वाढला ! मला वाटतं, छातीचा विकार वाढणं, केस पिकणं, रक्तदाब वाढणं असले विकारच अशा काळात जास्त वाढणार.

प्रश्न : लेखकांनी काय करावं असं वाटतं ?

दळवी : लेखकांनी बाहेर पडलं पाहिजे. दुर्गाबाई भागवत यांचं नेतृत्व मान्य करून त्यांचं अनुकरण केलं पाहिजे.

प्रश्न : सध्या आणीबाणी आणि सेन्सॉरशिप शिथिल करण्यात आली आहे–

दळवी : मला वाटतं, शिथिल वगैरे काही करण्यात आलेलं नाही. तुम्ही काही प्रमाणात बोललात किंवा तुम्ही काही प्रमाणात काही लिहिलंत तर तुर्त तुमच्याकडे दुर्लक्ष करण्यात येईल अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली आहे. म्हणजेच तुम्ही काही गोष्टी केल्यात तर तुम्हाला पकडण्यात येणार नाही एवढंच !

प्रश्न : पण काही दिवसांत आणीबाणी अधिकृतपणे मागं घेण्यात येण्याची शक्यता आहे !

दळवी : खरं म्हणजे त्याही शक्यतेला काही अर्थ नाही.

प्रश्न : कसा ?

दळवी : बेचाळिसावी घटनादुरुस्ती, वृत्तपत्रांसंबंधी केलेला कायदा, लोकसभेच्या वृत्तान्तांना प्रसिद्धी न देण्यासंबंधी केलेला कायदा अशा बऱ्याच गोष्टी रद्द करून घेतल्या तरच आणीबाणी आणि सेन्सॉरशिप रद्द करण्याला काही अर्थ आहे.

प्रश्न : यासाठी आपण–म्हणजे आम्ही तुम्ही काय केलं पाहिजे ?

दळवी : सध्या निवडणुकीने जी संधी दिली आहे ती शेवटची संधी आहे असं समजून प्रत्येकानं प्रत्येक मत जनता पक्षाच्या पेटीत घातलं पाहिजे. जनता पक्ष, द्रमुक, शेतकरी-कामकरी पक्ष, मार्क्सिस्ट कम्युनिस्ट एवढ्या चौघांना मिळून दोनतृतीयांश जागा म्हणजे ३६१–३६२ जागा आपण मिळवून दिल्या पाहिजेत. नाहीतर पुन: आपलं मरण आहेच. शिवाय मला वाटतं, अशी संधी आलीच-म्हणजे २/३ जागा मिळाल्याच तर, कोणालाही या प्रकारची सेन्सॉरशिप पुन: कधीही लादता येणार नाही अशी तरतूद घटनेत करून घेण्यासाठी आपण झटलं पाहिजे. कारण आणीबाणीला तसा काही अर्थच नव्हता. खरा अर्थ होता तो सेन्सॉरशिपला !

तेव्हा जनता पक्षाच्या मतपेट्या तुडुंब भराव्यात. त्यासाठी घरोघर फिरावं. गावोगांवी मित्रांना, नातेवाईकांना पत्रं लिहावीत. आणि प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदारांना मोठ्या प्रमाणावर मतदान केंद्रावर आणावं. जनता पक्षाचं 'नांगरधारी शेतकरी' हे प्रतीक आहे. ते १६ मार्चपर्यन्त ज्यानं त्यानं अभिमानानं छातीवर मिरवावं ! असं त्यांनी शेवटी सांगितलं. ◻

# 'युवराज' महात्म्य वाढू लागलं नि मग....

## मुलाखत : डॉ. श्रीराम लागू

प्रश्न : आणीबाणी जाहीर झाली तेव्हा आपणास नेमकं काय वाटलं ?

डॉ. लागू : माझी प्रतिक्रिया संमिश्र होती. एक तर असं वाटलं की, हा ! हे चांगलं झालं ! खरं म्हणजे सत्तावीस वर्षांपूर्वीच हे करायला हवं होतं. याबाबत माझं कन्टेन्शन असं की, आमच्या देशात जे लोक राहतात ते लोकशाहीला लायक झालेले नाहीत. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आणि ही लोकशाही जणू लोकांवर लादली गेली. ही लोकशाही राबवायला माणसं लायक आहेत की, नाही हे पाहिलं गेलं नाही. त्यादृष्टीने प्रबोधन करायचा कोणी प्रयत्न केला नाही. लोकशाही आली याचा अर्थ प्रत्येकाला अनिर्बंध स्वातंत्र्य मिळाले अशी कल्पना करून दिली गेली. लोकांचं राज्य आलं अशी कल्पना करून देत असताना हक्काबरोबर तुमच्या काही जबाबदाऱ्या असतात, तुमची काही कर्तव्ये असतात व ती पार पाडणार नसाल तर, लोकशाहीला काही अर्थ नाही हे कोणी जनतेला सांगितले नाही.

प्रश्न : म्हणजे आणीबाणी पुकारली ही तुमच्या मते चांगलीच गोष्ट झाली असंच ना ?

डॉ. लागू : आणीबाणी पुकारली ही घाणेरडी, लांच्छनास्पद

पृष्ठ ४९ वर

# दोस्तहो !

तो दिवस जवळ आहे
जेव्हा किनारे जागे होतील
जयप्रकाशांना साथ देणारी क्रांतीची पावले
उमटलेली दिसतील या पवित्र भूमीवर
जनतेची घोषयात्रा
अक्षांश–रेखांश तुडवीत निघालेली असेल
त्या गतीमान उत्थानातून निर्माण होईल–
प्रकाशाचा प्रलय !
तो दिवस–मतदानाचा दिवस !
दोस्तहो,

या दिवसाची आठवण ठेवताना तोही काळा दिवस तुमच्या लक्षात असू द्या जेव्हा निश्चित उत्तररात्रीच्या काळोखात स्वातंत्र्याचे आकाश चिरडीत या देशात धरपकडी झाल्या, अनेक निरपराध देशभक्तांना विनाचौकशी तुरुंगात डांबले गेले. जनतेचे मूलभूत स्वातंत्र्य, वर्तमानपत्रे व न्यायालये यांवर घाला घालण्यात आला. "प्रकाशाचे उगवणे रोखा" असा सुलताना इंदिरेचा हुकूम होता.

पण ते जमले नाही.

क्रांतीचा अग्नी धुमसतच राहिला. वरवर राख साचलेल्या निखाऱ्यासारखा जनमानसातील असंतोष धगधगत राहिला. आणि आज त्याचे ज्वलंत दाहक दर्शन आपण घेत आहोत.

असे म्हणतात की, प्रत्येक गुन्हेगाराचा पापाचा घडा भरावा लागतो. तो भरेपर्यंत तो गुन्हेगार वैभवाच्या अत्युच्च शिखरावर लोळत असतो. पण या शिखरावरच त्याच्या विनाशाची घंटा वाजत असते.

न्यायालयात निर्विवादपणे गुन्हेगार ठरलेल्या इंदिरा गांधी आणि त्यांचे सरकार संपूर्णपणे किडलेले आहे. या सरकारचे अंतरंग संपूर्णपणे किडलेले असून त्यावर इंदिराराणी, युवराज संजय आणि त्यांचे हुजरे या मूठभर बदमाशांची घट्ट पकड आहे. भारतात सामान्य माणसांच्या आयुष्याला कवडीचीही किंमत राहिलेली नाही. दरिद्री भारतीय जनतेची वंचना, स्वार्थी, बाजारूवृत्ती ही कॉंग्रेस सरकारची प्रमुख वैशिष्टये बनली आहेत. साठ लाखाचे नगरवाला प्रकरण आणि परवाना प्रकरणात अडकलेल्या ललित नारायण मिश्रांचा खून ही दोनच बानगीदाखल उदाहरणे या भ्रष्ट सरकारची लक्तरे वेशीवर टांगण्यास समर्थ आहेत.

या किडलेल्या शासनाच्या मृत्यूची घंटा आज वाजते आहे.

या देशातील गोरगरीब जनतेने कांग्रेसला विचारले पाहिजे की, 'गरीबी हटाव' चे काय झाले ? तुम्ही आम्हाला साधी एकवेळची भाकरी तरी दिली आहे का ? कुठे गेल्या त्या मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून घेतलेल्या शपथा ? आज मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण गोळ्या घालण्याची भाषा वापरताहेत याचा अर्थ दोस्तहो, आपण समजून घ्यालच. जे सरकार अन्न, वस्त्र, निवारा या दैनंदिन गरजेच्या गोष्टी जनतेला पुरवू शकत नाही ते सरकार त्यासाठी खवळून उठलेल्या जनतेवर गोळ्या घालण्याशिवाय अधिक काय करू शकणार आहे ?

या पार्श्वभूमीवर जनता पक्षाचा उदय ही या देशातील एक क्रांतिकारी घटना आहे. पूजनीय जयप्रकाश नारायण यांचे स्वप्न आज साकार होत आहे.

गरिबाला भाकरी पाहिजे त्याचप्रमाणे ती मागण्याचे व मिळवण्याचे स्वातंत्र्य पाहिजे. भाकरी व स्वातंत्र्य दोन्हीसाठी देशातील लोकशाही टिकली पाहिजे, त्यासाठी हुकूमशाही प्रवृत्तीच्या कांग्रेसचा पराभव केला पाहिजे. सर्व गोरगरीब जनतेचे हे ऐतिहासिक कार्य पार पाडण्यासाठी जनता पक्ष वचनबद्ध आहे.

या देशातील नागरिकाला गुलाम करणारी आणीबाणी त्वरित उठवावी ही जनता पक्षाची मागणी आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता या त्रीसूत्रींची पायमल्ली करणारी घटनादुरुस्ती रद्द करणे हे जनता लढ्याचे प्रमुख लक्ष्य आहे. महात्मा गांधींच्या समाजवादी समाजरचनेचा जनता पक्षाने अंगिकार केला आहे. प्रत्येकाला काम करण्याचा हक्क घटनेत अंतर्भूत करावा अशी जनतेची इच्छा जनतापक्षाने स्वीकारली आहे. लोकशक्तीचा उपयोग विकास कार्यासाठी करण्यासाठी जनता पक्षाचा कार्यक्रम आहे. भारतातील व विदेशातील प्रमुख विचारवंतांनी आता हे मान्य केले आहे की, आपल्या निवडणूक जाहीरनाम्यातून जनता पक्षाने आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाचा एक आगळा व वेगळा मार्ग जनतेपुढे मांडला आहे.

उद्याच्या सुखी, संपन्न व सामर्थ्यशाली भारताचे स्वप्न जनतेने हृदयाशी बाळगलेले आहे. आमचे हे स्वप्न आता कुणाही हुकुमशहाला हिरावून घेता येणार नाही. कारण या सुंदर स्वप्नामागे दोस्तहो आपले सामर्थ्य उभे आहे.

–ज्योती गुर्जर, मुंबई

# चक्रम् चक्री पांचवी गिरकी

दीर्घस्मृति विश्वनाथ.

आणीबाणीच्या काळोखीत घडलेले सर्वात काळेकुट्ट प्रकरण कोणते ? स्वाभिमानी नागरिकाला अपमानास्पद जीवन जगायला लावणाऱ्या या काळात सर्वात लाजीरवाणी अशी कोणती गोष्ट झाली ? कोळसा किती उगाळला तरी काळाच असा अनुभव आणणाऱ्या आणीबाणीच्या राजवटीत सापडलेला डांबराचा गोळा कोणता ? महाराष्ट्राला लाजेने मान खाली घालायला लागावी असे काय झाले ?

हरिभाऊ गोखले यांचे वर्तन ! राज्यकर्त्यांच्या बेबंद, लहरी, जुलमी आणि झोटिंगशाही कारभाराला कायदेशीरपणाचा मुलामा चढविण्याचे काम या कुटिलबुद्धि मनुष्याने केले. आणीबाणीचा अंमल जारी झाल्यावर संसदेचे जे पहिलेच अधिवेशन झाले त्यात या माजी न्यायमूर्तीने तीन घटनादुरुस्त्या मांडल्या.

या घटनादुरुस्त्यांचा काय परिणाम झाला ?

पहिली घटनादुरुस्ती आणीबाणीच्या जाहीरनाम्याविरुद्ध कोर्टात जाता येऊ नये अशा अर्थाची होती. गोखल्यांना कोर्टाची आणि न्यायमूर्तींची फार भीती वाटते. माणूस स्वतःवरून जग ओळखतो असे म्हणतात. ते स्वतः मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती होते आणि न्यायमूर्तींना मिळणाऱ्या पगारात आपले भागत नाही म्हणून त्यांनी राजीनामा दिला. ही यांची कर्तव्यनिष्ठा ! त्यामुळे गोखल्यांच्या प्रत्येक घटनादुरुस्तीचा रोख निरनिराळे कायदे न्यायालयांच्या अधिकाराबाहेर ठेवावेत असा असतो.

या घटनादुरुस्तीत काय म्हटलं होतं ?

मूळ घटनेत असा मसुदा होता की, राष्ट्रपतींची अशी खात्री पटली की, देशाला बाह्य आक्रमणाचा किंवा अंतर्गत अशांततेचा धोका आहे, तर राष्ट्रपती आणीबाणी पुकारू शकतात. गोखल्यांना अशी भीती वाटली की, राष्ट्रपतींची खात्री पटावी अशी परिस्थिती होती की नाही, या वादात न्यायालये शिरतील आणि मग सगळेच पितळ उघडे पडेल. म्हणून त्यांनी आपली एक खग्रास घटनादुरुस्ती करून टाकली की, आणीबाणीच्या जाहीरनाम्याला कोणत्याही कारणाने, कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

संसदेने ही दुरुस्ती कशी मान्य केली ?

संसदेला तेव्हा भरली होती हुडहुडी. विरोधी खासदारांनी विरोध केला असणारच. पण वर्तमानपत्रांना ताकीद होती की, फक्त मंत्र्यांची मुक्ताफळेच छापायची. इतकेच काय पण एखाद्या खासदाराने आपले भाषण पुस्तकरूपाने छापून वाटले तर तेही जप्त होत असे. त्यामुळे हरिभाऊ म्हणतील ती दिशा, अशी संसदेची दशा होती. त्यामुळे तर हरिभाऊंची हिंमत झाली पुढच्या निर्लज्ज दुरुस्त्या मांडण्याची ! एका आठवड्यात तीन घटनादुरुस्त्या मांडण्याचा विक्रम या कायदामंत्र्याने केला.

दुसरी घटनादुरुस्ती कशाविषयी होती ?

आधी गोखल्यांनी बाईंच्या रद्द झालेल्या निवडणुकीकडे लक्ष दिले. अलाहाबाद हायकोर्टाने बाईंची निवडणूक, निवडणूक-कायद्यातल्या ज्या कलमांचा भंग झाला असे ठरवून रद्द केली होती, ती कलमेच गोखल्यांनी बदलून टाकली. तीसुद्धा बदल पूर्वीपासून अमलात येतील अशी तरतूद करून. म्हणजे विकेट गेल्यावर अंपायरवर नो-बॉल जाहीर करण्याची सक्ती करायची अशा प्रकारची ही दादागिरी झाली. पण एवढ्याने भागले नाही. गोखल्यांना तरी भीती वाटतच होती की, निवडणूक कायद्यातल्या या दुरुस्त्या कोर्ट मानणारही नाही. त्यामुळे त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी आणखी एक घटनादुरुस्ती मांडली आणि दुरुस्त निवडणूक कायद्याला कोर्टात आव्हान देता येणार नाही असे ठरवून टाकले. पण तितक्यानेही समाधान होईना म्हणून, त्याच घटनादुरुस्तीच्या संधीचा फायदा घेऊन त्यांनी पंतप्रधान झालेल्या व्यक्तीची खासदार म्हणून झालेली निवडणूक रद्द ठरविण्याचा कोर्टाला अधिकार नाही अशीही दुरुस्ती मंजूर करून घेतली.

म्हणजे लहान मुलांच्या गोष्टीत असतं ना की, राक्षसाचा जीव शहामृगाच्या अंड्यात होता, ते अंडं विषारी सापाच्या वेटोळ्यात ठेवलं होतं, त्या सापाच्या राखणीला तलवारीची पाती लावलेलं चाक फिरत होतं आणि चाक मोडू नये म्हणून राक्षस स्वतः पहारा करीत होता, तसंच झालं की हे !

अगदी बरोबर ! आणीबाणीचा जीव सुप्रीम कोर्ट बाईंच्या निवडणुकीचा काय निकाल देणार त्यात अडकला होता; म्हणून तो निकाल दुरुस्त निवडणूक-कायद्याच्या वेटोळ्यात ठेवला, ते वेटोळं शाबूत राहावं म्हणून घटनादुरुस्तीचं षड्यंत्र उभं केलं आणि यंत्र चालू रहावं म्हणून आणीबाणीचा राक्षस खासदारांना भेडसावत उभा होताच. असा हा सगळा व्यूह गोखल्यांनी रचला ! काय, आहे की नाही रासपुटीनसारखी पाताळयंत्री कुशाग्र बुद्धि !

पण या सगळ्या घटनादुरुस्त्या उघड उघड एका व्यक्तीची खुर्ची टिकविण्यासाठी होत आहेत हे माहीत असताना या घटनादुरुस्त्या मांडताना काही अवघडल्यासारखे गोखल्यांना झाले नाही, त्यांना असे वाटले नाही की, या लांगूलचालनाची किळस लोकांना येईल ! एका सार्वभौम लोकशाही राष्ट्राचे कायदेमंत्री असताना आपण एखाद्या जहागीरदाराच्या खुशमस्कऱ्यासारखे वागत आहोत यामुळे लाजल्यासारखे त्यांना झाले नाही ?

हाच तर गोखल्यांचा निगरगट्टपणा आहे. हे सर्व करताना त्यांना स्वतःला लाज वाटण्याचे दूरच राहो, उलट ते खासदारांना उद्देशून म्हणाले की, हे विधेयक मंजूर करताना संकोच वाटण्याचे काहीच कारण नाही: 'We need not be apologetic about this Bill.' जुन्या कायद्यातल्या चुका काढून टाकून आपण तो अधिक चांगला बनवत आहोत.

गोखल्यांची तिसरी घटनादुरुस्ती कोणती?

गोखल्यांची तिसरी घटनादुरुस्ती म्हणजे या सर्व निगरगट्टपणावर कळस चढवणारी होती. राज्यसभेने ती दुरुस्ती मंजूरही केली. या दुरुस्तीचा गाभा असा होता की, राष्ट्रपती, राज्यपाल व पंतप्रधान असणाऱ्या व्यक्तीने त्या पदावर असताना केलेल्या किंवा त्या पदावर येण्यापूर्वी केलेल्या कोणत्याही कृत्याचा जाब, ती व्यक्ती अधिकारपदावरून दूर झाल्यावरदेखील, कोर्टात विचारता

येणार नाही. 'सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति' असं जुन्या स्तोत्रांतून असतं ना, तसं कोणाचेही गळे घोटून पंतप्रधान व्हावं आणि साऱ्या गुन्ह्यांतून पार पडावं असं नवं सूत्र मंत्रिसाहेबांनी बसवलं होतं.

आपले आचार्य अत्रे पूर्वी चितूभटाची गोष्ट सांगत असत. चितूभटाने आयुष्यभर कोणतेही अपकृत्य करण्याचे सोडले नाही. विधवांचे पैसे लुबाडले, अज्ञान मुलांना देशोधडीला लावून त्यांच्या इस्टेटी गिळंकृत केल्या, खोटे कागदपत्र केले. मरणापूर्वी एक जख्खड गाय त्याने ब्राह्मणाला दान म्हणून दिली. ती गाय इतकी म्हातारी होती की, उपकृत ब्राह्मण तिला घरी नेत असतानाच ती मेली. त्याच वेळी चितूभट पण मेला. चित्रगुप्त चितूभटाच्या पापांची यादी वाचताना थकला आणि त्याने चितूभटाला कायमच्या नरकवासाची शिक्षा ठोठावली. तेव्हा चितूभट चित्रगुप्ताला म्हणाला, "चित्रगुप्ता, हिशेब नीट ठेवीत नाहीस तू. अरे, गोदानाचे पुण्य आहे माझ्या गाठी." चित्रगुप्ताने सांगितले की गाय दान दिल्यापासून जितकी मिनिटे जिवंत होती तितकी मिनिटे ती चितूभटाचे हुकूम पाळील. गाय हाती येताच चितूभटाने हुकूम सोडला, चित्रगुप्ताला ढुशी मार. चित्रगुप्ताने चितूभटाचे पाय धरले. चितूभटाने चित्रगुप्ताकडून स्वतःच्या पापपुण्याचा हिशेब बदलून घेतला. त्या चितूभटासारखीच या हरिभटाची कर्तबगारी दिसते आहे!

ही तिसरी घटनादुरुस्ती इतकी उद्वेग आणणारी होती की, आणीबाणीचा अंमल जारी असतानासुद्धा तिला प्रखर विरोध झाला असला पाहिजे. कारण राज्यसभेने मंजूर केलेली ही घटनादुरुस्ती लोकसभेपुढे मांडण्याचा धीर सरकारला झाला नाही. त्यामुळे ही घटनादुरुस्ती अजूनही गुलदस्तातच पडून आहे.

हरिभाऊंची सुप्रीम कोर्टाशीही सतत झटापट चालूच होती. तिचा काय अहवाल आहे?

या कामात गोखलेसाहेबांना सवाई मदतनीस लाभला होता. त्याचे नाव निरेन डे. हरीभाऊंनी घटनेत काहीही दुरुस्त्या केल्या तरी त्या रद्द ठरविण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाने राखून ठेवला होता.

तो कसा काय?

कारण सुप्रीम कोर्टाने पूर्वी "केशवानंद भारती खटल्यात" असा निर्णय दिला होता की, घटनेतील मूलभूत चौकटीला धक्का लावणारी दुरुस्ती संसदेत करता येणार नाही. त्या निर्णयाचा आधार घेऊन हरिभाऊंनी केलेल्या दुरुस्त्या सुप्रीम कोर्टाला डावलता आल्या असत्या. म्हणून गोखल्यांनी डे करवी सुप्रीम कोर्टाला विनंती केली की, सुप्रीम कोर्टाने आपल्या पूर्वीच्या निवाड्याचा फेरविचार करावा. खेरीज, पूर्वी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या खटल्यात सुप्रीम कोर्टाने दिलेला निवाडा चुकीचा होता की काय हे पहावे.

मग काय झाले?

दरम्यान सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांच्या बाबतीत अनेक घालमेली गोखल्यांनी केल्या होत्या. बँकांच्या खटल्याच्या वेळी ११ पैकी १० न्यायाधीशांनी राष्ट्रीयीकरण रद्द ठरवले होते आणि फक्त एकाने ते कायदेशीर ठरविले होते. तो एकमेव न्यायाधीश आता सरन्यायाधीश होता. त्यांनी लगेच १३ न्यायमूर्तींचे बेंच बसवले. तीन दिवस बड्या वकिलांची आणि गोखल्यांचे खास मदतनीस डेसाहेब यांची भाषणे झाली. विरुद्ध बाजूचे वकील पालखीवाला यांनी विचारले की, असा कोणता खटला कोर्टासमोर आहे की, ज्याच्या संदर्भात केशवानंद खटल्याच्या निकालाचा फेरविचार करण्याची पाळी यावी? हा प्रश्न अगदी समर्पक होता.

पालखीवाल्यांना नक्की काय म्हणायचे होते?

सरकारचे म्हणणे असे की, घटनेची मूलभूत चौकट कोणती ते निश्चित करा, नाहीतर मूलभूत चौकटीची कल्पनाच टाकून द्या. त्यावर विरुद्ध पक्षाचे म्हणणे असे की, चौकट कोणती ते सांगण्याची जरूर नाही कारण प्रत्यक्ष घटनादुरुस्ती कोर्टापुढे आली की, कोणाही समंजस न्यायाधीशाला ती दुरुस्ती मूलभूत चौकटीचा भंग करते की नाही हे समजू शकते. कविता म्हणजे नक्की काय हे कोणी सांगू शकत नाही, पण अमुक एक उतारा हा कवितेचा आहे की नाही हे सांगता येते, तसेच मूलभूत चौकटीचे आहे. तेव्हा जोपर्यंत एखादी घटनादुरुस्ती वांध्यात आलेली नाही तोपर्यंत केशवानंद खटल्याचा फेरविचार करण्याची जरूरी नाही. म्हणून पालखीवाल्यांनी मघाचा प्रश्न विचारला.

मग काय झाले?

तीन दिवसांनी मुख्य न्यायाधीशांनी बेंच रद्द केले. ते म्हणाले की बेंचपुढे कोणताच निश्चित कज्जा नाही. त्यामुळे दोन्ही बाजूच्या वकिलांचे युक्तिवाद अर्धांतरी चालले आहेत. सबब बेंच रद्द. एरवी या सगळ्या नाटकावर केवढा गदारोळ माजला असता. पण आणीबाणीचा अंमल असा जबरदस्त होता की, कोठे खुट्टसुद्धा झाले नाही. एवढे मात्र खरे की, गोखल्यांचा एक मोठा डाव फुकट गेला.

पण मी म्हणतो की, घटनेत हरिभाऊंनी केलेल्या दुरुस्त्या कितीही कपटाच्या आणि जहरी असल्या तरी, त्या संसदेने मंजूर केल्या होत्या की नाही? म्हणजे, हरिभाऊंइतका जरी नाही तरी, काही दोष संसदेच्या पदरात येतोच ना. मग बिचाऱ्या गोखल्यांवरच निंदेचा हा वर्षाव कशासाठी!

गोखल्यांनी मांडलेल्या दुरुस्त्या संसदेने मंजूर केल्या हे फक्त वर वर पाहणाऱ्याला. खरी गोष्ट अशी की, आणीबाणीमुळे शासनसंस्था सर्वशक्तीशाली झाली होती. खुद्द गोखल्यांच्या डेसाहेबांनीच सुप्रीम कोर्टात हे सांगितले. ते म्हणाले की, आणीबाणीत नागरिकाला कोणतेही अधिकार उरलेले नाहीत, शासनसंस्था त्याला कारणे न दाखविता तुरुंगात टाकील, त्याची संपत्ती जप्त करील, त्याला गोळीसुद्धा घालेल. खुद्द बाईंच्या अंगावरदेखील शहारे आले, गोखलेसाहेबांच्या खात्याने आणीबाणीचा लावलेला हा अर्थ ऐकून! म्हणून त्यांनी नंतर मुंबईत सांगितले की डेसाहेबांनी कोर्टात काहीहि सांगितले तरी प्रत्यक्षात तसे काही होणार नाही. पण डेंच्या व्याख्यानावरून गोखल्यांच्या खात्याचे विचार किती भयंकर होते, ते कळून येते. तेव्हा अशा परिस्थितीत संसद सदस्य किती भेदरलेले असतील याची कल्पनाच केलेली बरी. आणीबाणीचा राक्षस भेडसावत असताना गोखल्यांच्या प्रत्येक दुरुस्तीला पाठिंबा देणेच त्यांना योग्य नाही, तरी सोईचे वाटले असणार.

सुदैवाने गोखल्यांना त्यांच्या या काळ्या कृत्यांचा जाब विचारण्याची संधी जनतेला मिळाली आहे.

होय; आणि जनता त्यांना तो विचारल्याखेरीज राहणार नाही. गोखल्यांना पुनः निवडून देणे म्हणजे न्यायदेवतेला 'हरे राम' म्हणायला लावणे! न्यायदेवतेचे तेज महाराष्ट्राने रामशास्त्र्यांच्या ठिकाणी पाहिले आहे, तो महाराष्ट्र या हरे-रामशास्त्र्याला त्याच्या कुकृत्यांसाठी शिक्षा दिल्याखेरीज राहणार नाही. □

# चित्त हवे भयशून्य, उंच होवो माथा

अन्नदाशंकर राय

**सत्तरी ओलांडून गेलेले अन्नदाबाबू स्वातंत्र्याच्या आधीच्या काळातले. आय. सी. एस. मित्रमंडळींवर जुलूम करायला लागू नये म्हणून न्यायशाखेत काम करत आलेले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर ते पण नोकरीच्या जोखडातनं मोकळे झाले. गांधींच्या खुनानंतर हिंदू–मुसलमानांत पूल बांधायची शपथ घेऊन लेखणी झिजवत आले. फाळणीबद्दल इतकं मर्मग्राही विवेचन क्वचितच आणखी कुणी केलं असेल. सध्या आघाडीचे प्रबंधकार. वय इतकं होऊनही विचारांवर त्याचा बोजा नाही. अन् विचार तरुणाइतकेच विवाद्य राहिले आहेत.**

गुजराथी प्राध्यापक विषण्ण चेहऱ्यानं म्हणाले, 'मोकळ्या न् निःपक्षपाती निवडणुका आपण पाहिल्या त्याच शेवटच्या. आता परत नाही बघायला मिळणार.'

तरी त्यांच्या मनात आशा होती की, एक ना एक दिवस निवडणुका होतील परत. पण काही महिने गेले न् बंगाली सॉलिसिटर हताशपणे म्हणाले, 'आता निवडणुकाच व्हायच्या नाहीत.'

एवढ्यात ह्या दुसऱ्या गृहस्थाची हताशा दूर झालीय्. निवडणुका होणारायत. लौकरच होणारयत्. तरी अजुनी कुणाकुणाला नाही वाटत विश्वास, की अगदी शेवटच्या क्षणी अचानक एक दिवस निवडणुका घ्यायचा निर्णय नाहीच रद्द होणार म्हणून. सामान्य लोकांच्यात पण तितकासा उत्साह दिसत नाहीय्. उत्साह असामान्य लोकांपुरताच मर्यादित आहे.

ह्याचं काय कारण आहे? कारण बऱ्याच जणांना अशी भीती वाटतेय् की, आपण मत द्यायला जाऊ न् आपल्याला दिसून येईल की, आपलं मत दुसरंच कुणीतरी देऊन गेलंय्. प्रतिवाद करूनसुद्धा ह्याचा प्रतिकार काही व्हायचा नाही. माझ्या धोब्यानं तर साफच सांगून टाकलंन् की, आपण काही मत द्यायला जाणार नाही. गेलं तर म्हणे खूनबीन होऊन जायचा. त्याला जर का सांगितलं की, तू एक नागरिक आहेस, नागरी अधिकारात मत द्यायचा अधिकार पण मोडतो. एवढंच काय पण तोच सर्वांत महत्त्वाचा अधिकार आहे. हा अधिकार वापरूनच सत्ताधारी निवडता येतात. तर तो म्हणेल, आम्ही गरीब माणसं, हे सगळे अधिकारबिधिकार काही समजत नाहीत आम्हाला. ते तुम्ही समजून घ्यायचे. राजा कोण होतो त्याचं आम्हाला काय? आम्ही आपले कर भरूच.

ह्या देशातली माणसं हजारो वर्षांपास्नं आपली कर्तव्ये काय आहेत, याच्याच गोष्टी ऐकत आलीयत. अधिकारांची गोष्ट कोणत्याच शास्त्रात लिहिलेली नाही. अधिकार ज्यात नमूद केलेले आहेत, ते असतं कायद्याचं बाड. कायदा असला की कोर्ट पण असतं. कोर्ट असलं की त्याचं स्वातंत्र्य पण असतं. पण ह्या खेपेला घटनादुरुस्ती करून माझ्या धोब्याची रवानगी परत एकदा अठराव्या शतकातल्या देशी राज्यात करून टाकलेली आहे. त्याच्याबरोबर माझी पण. त्या काळी सगळ्या प्रजेच्या तोंडी ही एकच भाषा. राजा कोण होतो, कोण होत नाही, त्याचं आम्हाला काय? आम्ही आपले कर भरूच.

ही जी मध्ययुगातली पौर्वात्यांची मनोवृत्ती, ही पाश्चात्य देशांत पण होती. पण तीन शतकं आधी कसं बदलून गेलं. इंग्लंडच्या राजानं–पहिल्या चार्ल्सनं–जेव्हा आपल्या ईश्वरदत्त अधिकारानं कर लादले, तेव्हा प्रजेच्या प्रतिनिधींनी जाहीर केलं, 'नो टॅक्सेशन विदाउट रिप्रेझेंटेशन!' प्रतिनिधित्व दिल्याशिवाय कर लादून चालणार नाही. आधी प्रतिनिधींचं मत घे, मग काय कर बसवायचे ते बसव. मत म्हंजे व्होट. तर आधी मतमोजणी व्हायला हवी.

राजा चार्लस काही हे तत्त्व मानायला तयार नव्हता. प्रतिनिधींची सभा पण राजाच्या अधिकाराचं तत्त्व मानायला तयार नव्हती. दोन्ही पक्ष अटीतटीला पडलेले. युद्धं देहि! यादवी युद्ध. राजाचं शिरकाण. प्रजाच जिंकली. पण मग तिनंच परत युवराजाला गादीवर बसवलं न् तेव्हापास्नं प्रजा राजनिष्ठ बनली. राजा पण प्रतिनिधींचं मत घेतल्याशिवाय कर बसवेना. कर बसवायचे ते प्रतिनिधींची सभाच बसवेल. राजा त्याला दुजोरा देईल.

ह्याचंच नाव पार्लमेंटरी डेमॉक्रसी. पार्लमेंटमधे ज्या पक्षाला प्राधान्य असेल, त्याच पक्षाचे नेते राजमंत्री होणार. त्यांच्यात जो प्रधान तोच प्रधानमंत्री. प्रत्यक्षात त्याच्यावरच सरकारच्या कारभाराची जबाबदारी. त्यामुळं त्याचीच सत्ता सगळ्यांच्यापेक्षा जास्ती. पण तरी पण तो काही सर्वशक्तिमान नाही. सर्वशक्तिमान होता प्रजापक्षाचा सेनापती क्रॉमवेल. सर्वशक्तिमान असण्याची भूमिका त्याच्याबरोबरच संपुष्टात आली. त्याचा मुलगा त्याच्या पदावर बसला तरी तितका लायक नव्हता तो. इंग्लंडच्या अलिखित घटनेनं सत्तेचं असं वाटप केलेलं आहे की, तिथं राजा तर नाहीच, पण पार्लमेंटसुद्धा सर्वशक्तिमान नाही. जरी ही अलिखित घटना राजालाच सॉव्हरीन म्हणते अन् सैन्य पण राजालाच एकनिष्ठ असतं.

प्रतिनिधी निवडायचा अधिकार तेव्हाच्या काळी फक्त श्रीमंतांनाच तेवढा होता, गरिबांना नव्हता. मध्यमवर्ग म्हणून तेव्हा कुणी नव्हतंच.

पार्लमेंटरी डेमॉक्रसी हलके हलके पसरली न् श्रीमंत–गरीब भेद न पाडता सगळयांची झाली. तशीच ग्रेट ब्रिटनहून ती पसरलीय् ब्रिटिश साम्राज्यातल्या वेगवेगळया देशांत. ह्याकरता लढावं पण लागलं होतं काही काही देशांना. अमेरिकन स्वातंत्र्यसंग्रामाचा मूळ मुद्दाच होता ! नो टॅक्सेशन विदाउट रिप्रेझेंटेशन '. स्वातंत्र्य मिळवल्यावर अमेरिकनांनी काही परत ग्रेट ब्रिटनची अलिखित घटना अनुसरली नाही. त्यांनी स्वतःजोगती एक लेखी घटना बनवली. त्यात राजाची जागा घेतली प्रेसिडेंटनं, पार्लमेंटची जागा घेतली कॉंग्रेसनं, अन् न्यायाधीशांनी बनवलेल्या सुप्रीम कोर्टाला प्रेसिडेंट न् कॉंग्रेस ह्याच्या जोडीनं तितकीच सत्ता दिली गेली. केंद्राखाली राहिली बरीचशी स्वयंशासित स्टेटस्. त्यांची सत्ता केंद्राइतकीच नसली तरी इतकी जास्ती आहे की, ह्या देशात काही त्याला तोड नाही.

भारताकरता घटना बनवायला सुरुवात इंग्रजांनीच केली होती. १९३५ सालचा भारत शासन कायदा ही त्यांची शेवटची कामगिरी. पण ज्या देशानं स्वातंत्र्याकरता झुंज दिलीय्, तो देश दुसऱ्यानं बनवलेल्या घटनेवर संतुष्ट राहू शकत नाही. म्हणून त्यानं आपल्याजोगती एक लेखी घटना बनवली. तिचा सांगाडा जरी भारत शासन कायद्याचा असला तरी, वैशिष्टचंसुद्धा काही थोडीथोडकी नाहीत. ह्या घटनेनुसार वारंवार निवडणुका घेतल्या गेल्यायत्, केंद्रात न् वेगवेगळया राज्यात. हा नियम काही कायमचा बंद नाही पडू शकत. तरी आणीबाणीच्या काळी स्थगित होऊ शकतो. तसा आणीबाणीच्या परिस्थितीमुळं आता वर्षभर स्थगित होता. अन् आता आणीबाणी असून सुद्धा सार्वत्रिक निवडणुका व्हायच्यायत.

बंगाली सॉलिसिटरचा समज चुकीचा निघाला. पण बंगाली घोबी, गुजराती प्राध्यापकाची भीती काही बिनबुडाची सिद्ध झालेली नाही. कुठं पश्चिम बंगाल न् कुठं गुजरात ? लांडीलबाडीचा आरोप दोन्ही ठिकाणी. मारामारीच्या बातम्या पण कानावर येतात. ' चित्त जिथं भयशून्य ' ते राज्य काही पश्चिम बंगाल नाही. अन् ' उंच जिथं माथा ' तो देश पण काही आणीबाणीतला भारत नाही. आम्हाला सगळयांना मान तुकवावी लागलीय् एका महाप्राज्ञ सेन्सॉरमहाराजासमोर. ' सबार उपरे सेन्सॉर सत्य ताहार उपरे नाइ ' ! मग तुम्ही किती का मोठे लेखक असानात. भांडण लागलं होतं खरं. खरं म्हंजे सत्ताधारी पक्षाशी विरोधी पक्षांचं. राजाराजांत लढाई होते अन् गवताचा जीव जातो. आम्हीच गवत. आम्ही स्वतंत्र लेखक, जे कोणत्याच बाजूला कमिटेड नाहीत. कुणाचा भारतानं जगाच्या सभेत अभिमान बाळगावा, संस्कृतीच्या क्षेत्रात कोण भारताचं प्रतिनिधित्व करणार, जर देशातल्या लेखकांची मान देशातल्या देशातच खाली गेलेली असेल ? फ्रान्समधल्या आणीबाणीच्या काळात सार्त्र किंवा कामूची अशी काही अवस्था कुणी कल्पना तरी करू शकतो का ? निव्वळ मत जुळत नाही म्हणून स्वतंत्र देशातल्या लेखकांना विनाचौकशी अटक करणं हे काही पार्लमेंटरी डेमॉक्रसीचं लक्षण नाही. असल्या गोष्टी पीपल्स डेमॉक्रसीमधे किंवा नुकत्याच स्वतंत्र झालेल्या अर्धवट सभ्य देशातच घडतात. ब्रिटिश कारकीर्दीतसुद्धा कधी कुणा लेखकाला निव्वळ मतप्रदर्शनाकरता विनाचौकशी अटक झालेली नव्हती.

हे सगळं मी एवढ्याकरता म्हणतोय् की, येत्या निवडणुकीत लेखकांनासुद्धा मत–प्रदर्शनाचं स्वातंत्र्य दिलं गेलं पाहिजे. ते सुद्धा नागरिकच आहेत, ते सुद्धा कर भरतात. मत देण्याचा न् मत मागण्याचा अधिकार त्यांनासुद्धा आहे. तो अधिकार ते आपापल्या अकलेनुसार इतर चारचौघांसारखाच वापरतील. कोण कोणत्या पक्षाला मत देईल काही सांगता येत नाही. कुणाला जर तसं वाटलं तर, आपला पाठिंबा असलेल्या उमेदवाराच्या बाजूनं तो मोकळेपणानं लिहील – बोलेल. जसं इंग्लंड वगैरे देशातनं होतं.

आम्ही असा कोणताच असामान्य अधिकार मागत नाही आहोत की जो, निवडणुकीच्या काळात इंग्रज – फ्रेंच किंवा अमेरिकन लेखकांना नसतो किंवा जो अधिकार गेल्या निवडणुकीच्या वेळेला खुद्द आम्हालाच नव्हता. अन् तरी तोंड उघडून मागणी करायची हिंमत आम्हाला होत नाहीय्. कारण आणीबाणी अजून उठलेली नाही. आणीबाणी जर जारीच असेल तर मग, निवडणुकीचं नाटक तरी कशाला ? अन् निवडणूक हाच जर लोकांचा मूलभूत अधिकार असेल तर मग, आणीबाणीची दहशत कशाला ? मोकळचा न् निःपक्षपाती निवडणुकीकरता झंटू घोब्याला अभय मिळालं पाहिजे. गुजराती प्राध्यापकाला पण, बंगाली साहित्यिकाला पण, तोंडी अभयाला काहीच किंमत नाही. कारण विद्यार्थ्यांचं रॅगिंग अन् मंत्र्यांचं रिगिंग आता विषवृक्षासारखी मुळं खोलवर रुजवून मजबूतच आहेत. मुळासकट त्यांना उखडून टाकण्याकरता तशी हिंमत हवी, फुरसत न् इच्छा हवी. कारभाऱ्यांच्या मनात काय आहे, हे त्यांचं त्यांनाच ठाऊक. आम्ही बुद्धिजीवी असाहाय्य आहोत.

जोरदार अफवा आहे की, निवडणुकीनंतर परत एकदा कडक सेन्सॉरशिप येणार. तसं जर का असेल तर मग माझ्या हातात अवघा एक महिना आहे. जे सांगायचंय् ते आत्ताच लगेचच मन मोकळं करून सांगून टाकायला हवं.

माझं पहिलं म्हणणं असं की, भारतासारख्या देशाला पार्लमेंटरी डेमॉक्रसी ही लाइफबोट आहे. सगळयांना माझं हात जोडून सांगणं आहे की, वेळ आहे तेवढ्यातच ही लाइफबोट पकडून धरा. पार्लमेंटरी डेमॉक्रसीची लाइफबोट राहिली नाही तर आपल्यासुद्धा कपाळी बांगला देशासारखी लष्करी राजवट आहेच. ही लष्करी राजवट पण जर का फेल झाली, तर मग रक्तबंबाळ क्रांती. आमच्या क्रांतिवादी मित्रांना कदाचित् वाटत असेल, असं झालं तर मग बरंच की, हीच तर संधी आहे आपल्याला. पण प्रतिक्रांतीमधे ते समूळच नष्ट होऊन जाणार नाहीत, अशी हमी त्यांना कुणी दिलीय? प्रतिक्रांतिवाद्यांचासुद्धा समजा नायनाट करता आला, पण अतिक्रांतिवाद्यांचं काय करणार ? अवघ्या चौघांची अतिक्रांतिवादी चौकडी एकत्र येऊन ऐंशी कोटी लोकांच्या देशात कसला धुमाकूळ घालतेय् ! आमच्या तर कानावर येतय् की, मेलेल्या चॅंग कै–शेकपेक्षासुद्धा चॅंग चिंगही बलाढ्य शत्रू आहे.

पार्लमेंटरी डेमॉक्रसीत हजार दोष असतील, पण निदाननिदान एक तरी गुण आहेच. सत्तेचा खांदेपालट घडवून आणण्याकरता रक्तबंबाळ क्रांतीची जरूर पडत नाही. जरूर पडत नाही अहिंसक बंडाची. ज्याचं दुसरं नाव आहे जनसत्याग्रह. लष्करी कट ! त्याचीसुद्धा काय जरूर आहे ? दर चार वर्षांच्या अंतरानं निवडणुका ह्या

होणारच असा अमेरिकेत नियम आहे. भयंकर संकटाच्या दिवसांत लग्नसुद्धा लांबणीवर टाकता येतं, पण निवडणूक लांबणीवर टाकायची सत्ता कोणत्याच माणसाला दिलेली नाही. आमेरिकन घटना अपौरुषेय आहे. इंग्लंडमध्ये मात्र निवडणुका पुढं पण ढकलता येतात. न् मागं पण ओढता येतात. पण लोक कायम नजर ठेवून असतात हवामानावर. वेदर फोरकास्टसारखंच निवडणुकीचा फोरकास्ट हे सुद्धा रोजचंच पथ्य आहे त्यांच्याकडं. अचानक एक दिवस निवडणुका जाहीर करून अपोझिशनला गांगरून टाकणं अशक्य आहे. हे जातात फांदीफांदीवरनं, तर ते जातात पानापानावरनं. पण हो, हा एक बिनओळखीचा खेळ आहे हे खरंच. सत्तेचा खांदेपालट अवेळी घडवून आणण्याकरता अपोझिशन आरोळी ठोकतेय्. 'पंतप्रधान, गादी सोडा, नाहीतर अमुक तारखेपास्नं जनसत्याग्रह.' अन् नोटीस मिळाल्याबरोबर पंतप्रधान करतायत आधीच आणीबाणीची घोषणा न् अचानक धरपकडी. अन् आम्ही—ज्यांना हे पण पसंत नाही न् ते पण पसंत नाही— निव्वळ भांबावून जाऊन बघतोय् की, एकएक करत आमचे सगळेच्या सगळे अधिकार हरवून जातायत. वर्तमानपत्रं बातम्या म्हणून जे छापतायत ते एकतर्फी शेरे, जे बाहेर पडतंय् ते पण अविकृत नाही. आम्हाला तर कुठंच थारा मिळाला नाही. बुद्धिजीवी मंडळींच्याकरता हा एक ब्लॅकओटच. साधं लिटल मॅगझिन. कितीसे वाचक असणार त्याचे ! त्याचीसुद्धा मुस्कटदाबी. संपादक फरारी, नंतर कैदी.

आणीबाणीची आवश्यकता होती कायदा न् सुव्यवस्था राखण्याकरता. पण कायदा न् सुव्यवस्था राखायचं काम जेव्हा पुरतं होऊन गेलं, तेव्हा कानावर आलं की, देशाच्या आर्थिक अन् सामाजिक प्रगतीकरता आणीबाणीची आवश्यकता आहे. आर्थिक न् सामाजिक प्रगती कुणाला नको असते ? पण ती काय एखाद्या वर्षात उरकणारी बाब आहे ? तिच्याकरता तर दहावीस वर्षंसुद्धा पुरेशी नाहीत. तर मग काय दहावीस वर्षंपर्यंत आणीबाणी जारी राहणार ? ही काळजी वाटण्याजोगीच गोष्ट आहे की. एक दिवस खरोखरीच दिसून आलं की, आणीबाणी कायम करण्याकरता घटनेत दुरुस्त्या करायच्या हालचाली चालल्यायत. कायद्याशी काही संबंध आलेल्या आमच्यासारख्यांनी दुरुस्तीची कलमं तपासून पाहायला वेळ मागितला. कलमांचा आकडा एकूणसाठ. पण आम्हाला एकूणसाठ दिवसांचा वेळसुद्धा दिला गेला नाही. दुरुस्ती कायदा रातोरात पास होऊन गेला.

ह्यानं पार्लमेंटरी डेमॉक्रसी मजबूत करायच्या नावाखाली खिळखिळीच केली गेलीय्. ज्या दिवशी देशातल्या लोकांची झोप संपेल त्या दिवशी त्यांना दिसून येईल की, गोठा रिकामा आहे, बैल चोरीला गेलाय्. जी सिस्टम आशियातल्या दुसऱ्या कोणत्याच देशात नाही, जी जपानमध्ये आणखीच नंतर चालू झाली न् अजून कच्चीच आहे, ती सिस्टम भारतात आहे अन् एका शतकापास्नं चालत येऊन येऊन आता अर्धवट शिजलेली आहे.

अभय मिळालं तर हिंदू धोबी, गुजराती प्राध्यापक अन् बंगाली साहित्यिक कदाचित स्वतंत्रपणानं कोणत्या तरी एका उमेदवाराला मत देऊ शकतील. मला पण स्वतंत्रपणाची हमी मिळाली तरी मनाशी ठरवता यायचं नाही. कारण जर का मी कॉंग्रेसला मत दिलं तर त्याचा अर्थ असा होईल की, घटनेच्या ह्या दुरुस्तीला माझा पाठिंबा आहे. घटनेच्या ह्या दुरुस्तीला पाठिंबा देण्याचा अर्थ आणीबाणीला वेगळ्या रीतीनं कायम करणं. मी काही पार्लमेंटमध्ये नव्हतो. असतो तर त्या दुरुस्तीच्या बाजूनं मी मत दिलं नसतं. तेव्हा आता मतदान केंद्रावर जाऊन ह्या गोष्टीच्या बाजूनंच मी मत देऊ का काय ? कॉंग्रेसनं बरीचशी चांगली कामं केलीयत. मी कायमच कॉंग्रेसचा पक्षपाती आहे. पण अशा तऱ्हेने माझ्याकरवी ह्या घटनादुरुस्तीचं समर्थन करवून घ्यायला लागले तर मी कसा काय कबूल होऊ ?

इकडं विरोधी पक्षाच्या उमेदवारांना मत दिलं तर स्टेबल गव्हर्नमेंट राहील का नाही सांगणं कठीण आहे. ब्रिटिश गव्हर्नमेंट जे इतका काळ होतं, त्याचं कारण ते होतं स्टेबल गव्हर्नमेंट-कॉंग्रेस गव्हर्नमेंटसुद्धा इतका काळ टिकून आहे त्याचं कारण हेच आहे. निवडणुकीचा उद्देश जर का सत्तेचा खांदेपालट घडवून आणायचा असेल, तरी माझी काही त्याला तयारी नाही. तरी बऱ्याच काळापास्नं हे एक मात्र जाणवतंय् की, कॉंग्रेसला एक प्रबळ प्रतिपक्ष असायला हवाय्. विलायतच्या कॉन्झर्व्हेटिव्ह पार्टीचा प्रबळ प्रतिपक्ष जशी लेबर पार्टी आहे, अमेरिकन पार्टीचा प्रबळ प्रतिपक्ष जशी डेमॉक्रॅटिक पार्टी आहे. हरेक प्रकारचे विरोधी पक्ष मिळून अपोझिशनचं काम चालवून नेऊ शकतील, पण गव्हर्नमेंटचं काम नाही चालवून नेऊ शकत. आपल्या पार्लमेंटरी डेमॉक्रसीचा दुबळेपणा इथं आहे की, कॉंग्रेसनं जर का बहुमत गमावलं तर त्याचा पर्याय असेल कोॲलिशन गव्हर्नमेंट. कोॲलिशन गव्हर्नमेंट टिकाऊ व्हायचं नाही. झालं असतं तर अखंड भारत दुभंगला असता. पंतप्रधानांना जे देशाचं ऐक्य नाहीसं व्हायची भीती वाटतेय्, ती भीती काही निराधार नाही. इथं मी त्यांच्याशी एकमत आहे. कोॲलिशन टाळायचं असेल तर, कोणत्या तरी एकाच पक्षानं बहुमत मिळवायला हवं. इतका काळ कॉंग्रेसला हे जमलं होतं. गव्हर्नमेंट बनवायच्या वेळेला कॉंग्रेसला काहीच पर्याय धुंडाळून पण मिळायचा नाही. उलट प्रबळ एक विरोधी पक्ष निपजणंसुद्धा आवश्यक आहे. देशाच्या हिताच्या दृष्टीनं. अन् पार्लमेंटरी डेमॉक्रसीच्यासुद्धा हिताच्या दृष्टीनं. इतिहासाच्या संधिक्षणी हे एक आवश्यक पाऊल आहे. पण त्याची एक अपरिहार्य अट आहे— विरोधी पक्षानं डायरेक्ट ॲक्शनचा त्याग करायला हवा. हिंसक क्रांतीचा तर अर्थातच, पण जनसत्याग्रहाचा देखील. □

( आनंदबाजार पत्रिका २३–२४ फेब्रुवारी १९७७ )

अनुवाद : अशोक शहाणे

# जनता पक्ष, संघकार्य आणि भारतीय राजकारणाची नवी दिशा

लेखक
**प्रा. राम बापट**

२५ जून १९७५ रोजी भारतीय राजकारणाचे एक युग संपले. आगामी काटेरी व गतिशील पर्वाची एक खूण म्हणून की काय, चार पक्षांनी स्वतःचे अस्तित्व विलीन करून 'जनता पक्ष' नावाचा नवा पक्ष स्थापन केला.

तात्त्विक व व्यावहारिक दृष्ट्या या घटनेचा असा अर्थ होतो की, या पक्षात हिंदुत्ववादी व समाजवादी अशा दोन्हीही निष्ठांचे लोक एकत्र नांदू पाहत आहेत. ते तसे नांदू लागले तरी, त्या दोहोंपैकी कोणतीही एक निष्ठा अथवा त्या दोहोंचा कोणताही विशिष्ट समन्वय हे या पक्षाचे गृहीत कृत्य बनलेले नाही. कारावासातील विचारमंथनातून या पक्षांमध्ये समाजवाद, लोकशाही आणि राष्ट्रवाद या तीनही बाबतीत मतैक्य झाले असा स्वाभाविक आग्रह जरी या पक्षाचे श्रेष्ठ प्रतोद करीत असले, तरी व्यवहारात उदारमतवादी लोकशाहीवरील श्रद्धा एवढेच या पक्षाचे तात्त्विक अधिष्ठान आहे, असे आपण निश्चितपणे म्हणू शकतो.

आजवर विरोधात राहिलेल्या दोन विचारप्रवाहांचा संगम होऊन नव्या पक्षाची निर्मिती इतक्या झटकन झाली हा वरकरणी एक अपघात किंवा चमत्कार वाटेल. स्वतःची विचारसरणी, कार्यपद्धती आणि अस्मिता याबाबतीत कडवा आग्रह धरणारे पक्ष आपल्या विचारांतील भेद चटकन ओलांडून एका समान जाणीवेपर्यंत इतक्या सुलभपणे कसे आले याचा बऱ्याच लोकांना खरोखरी विस्मय वाटेल. पण त्यामुळे अनाकलनीय वाटणाऱ्या या घटनेचा उलगडा आणीबाणीची एक तीव्र प्रतिक्रिया एवढ्याच मर्यादित संदर्भात लावण्याचा मोह आपल्याला होईल. तो आपण टाळला पाहिजे.

कारण नीट विचार केला तर, जनता पक्षाची स्थापना हा एक अपघात नाही तर त्या मागे भारताच्या आधुनिक इतिहासाचे एक खोल सूत्र दडलेले आहे असे आपल्याला दिसून येईल. आधुनिक भारतीय राजकारणाच्या प्रेरणा, प्रयत्न व जाणीवा यातील संबंध इतिहासक्रमात नीट समजून घेतले तर आपल्याला या घटनेचा शास्त्रशुद्ध अर्थ लावता येईल आणि मगच जनता पक्षाच्या भावी यशापयशाविषयी काही अंदाज आपण बांधू शकू.

त्या दिशेने विचार करण्याचा हा लेख हा एक अल्पसा प्रयत्न आहे. भारतातील हिंदुत्ववादी व लोकशाही समाजवादी चळवळींच्या विकासक्रमातील वेगवेगळ्या अवस्थांचे, नागमोडी वळणांचे, त्यांच्या बदलत्या भाववृत्तींचे आणि त्यांच्या शब्दकळेत व ध्वन्यर्थात होत गेलेल्या फरकांचे सिंहावलोकन करून त्याचे त्या दोघांच्या दृष्टीने फलित काय व या संदर्भात भविष्य काय आहे, हे जाणून घेण्याची ही एक सुरुवात आहे.

□

आपण या मीमांसेचा प्रारंभ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ह्या चळवळीच्या इतिहासापासून करू. एकतर जनता पक्षाला आज जे काही वजन प्राप्त झालेले आहे त्यामागे प्रामुख्याने या संघटनेची कार्यकुशलता व प्रतिष्ठा आहे हे स्पष्ट आहे. दुसरी गोष्ट म्हणजे संघावरची बंदी उठो वा न उठो, संघविचारांनी भारलेले कार्यकर्ते आज ना उद्या संघटित पायावर वेगळ्या रूपात काम करण्यास सुरुवात करतीलच, याविषयी संदेह वाटण्याला जागा नाही. इतक्या शिस्तीने, त्यागाने, तितिक्षेने व असीम उत्साहाने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची संघटना अशी एकाएकी विरून जात नसते. शिवाय भारतातील प्रतिष्ठित वर्गांनाच, खुद्द आजच्या राजकर्त्यांना संघकार्याची उपेक्षा व्हावी असे खरोखरीच मनातून वाटते का ? हा प्रश्नच आहे. तेव्हा संघापासूनच सुरुवात केलेली बरी.

## संघाचे वैचारिक अधिष्ठान

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेची स्थापना डॉ. केशव बळीराम हेडगेवार ह्यांनी इसवी सन १९२५ साली केली. संघाच्या ह्या पन्नास वर्षांच्या इतिहासाचे तीन कालखंड पडतात. १९२५ पासून १९४८ पर्यंतचा पहिला टप्पा. तेथपासून १९७३ साली दुसरे सरसंघचालक श्रीगुरुजी यांचे निधन झाले तोपर्यंतचा दुसरा टप्पा व श्री. बाळासाहेब देवरस हे तिसरे सरसंघचालक झाल्यापासून १९७५ च्या जूनमध्ये संघावर बंदी घालण्यात आली, तोपर्यंतचा तिसरा टप्पा.

संघाच्या ह्या पहिल्या पर्वाचा इतिहास यापुढे मी शक्यतो श्री. माधव सदाशिव गोळवलकर ऊर्फ श्रीगुरुजी यांच्या शब्दात देणार आहे. त्यानंतर मी माझे निष्कर्ष वेगळे मांडीन.

गुरुजींच्या मतानुसार डॉक्टर हेडगेवार राष्ट्रीय क्षेत्रात नव्याने एका कार्याची सुरुवात करण्यास एकाएकी प्रवृत्त झाले नाहीत. त्याआधी त्यांनी क्रांतिकारक चळवळीत व कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य आंदोलनात मोठाच भाग घेतला होता. पण खोल विचार केल्यावर त्यांना वरील दोन्ही चळवळीत काही दोष आढळले.

ज्यांचा समाजाशी प्रत्यक्ष संबंध येत नाही अशा गुप्त क्रांतिकारक चळवळीतील मूठभर भूमिगत कार्यकर्ते संपूर्ण राष्ट्राला जागृत आणि संघटित करण्याचे कार्य अतिशय मर्यादित प्रमाणावरच करू शकतील, आणि दुसरी गोष्ट म्हणजे अनुशासनबद्ध लोकांची सुदृढ संघटना पाठीशी असल्याशिवाय ब्रिटिशांनी आपल्या देशात उभी केलेली सुसंघटित आणि प्रबळ शासनयंत्रणा तोडणे कोणत्याही क्रांतीला शक्य होणार नाही, असे डॉ. हेडगेवारांना जाणवले.

लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी आणि उगवत्या पिढीचे पंडित नेहरू ह्यांच्या भगीरथ नेतृत्वाखालील काँग्रेस आंदोलनानेही देशातील वातावरण स्वराज्याच्या भावनेने भारून टाकले होते. पण ह्याही आंदोलनात काही गंभीर स्वरूपाच्या उणीवा आहेत व त्या, पुढे या आंदोलनाच्या मूळ उद्दिष्टांनाच मारक ठरतील, अशीही भीती डॉक्टरांना वाटू लागली.

थोडक्यात, वरील दोन्ही चळवळींत डॉ. हेडगेवारांना दोन दोष दिसून आले. ब्रिटिशविरोधी भावना हीच त्या चळवळीमागची मुख्य प्रेरणा होती. राष्ट्रीय स्वातंत्र्याची कोणतीही विधायक दृष्टी त्यामागे नव्हती. त्यामुळे काही काळानंतर त्या चळवळी प्रतिक्रियात्मक दिशेने वाहवत जाणे अगदी अपरिहार्य होते. दुसरी गोष्ट म्हणजे मूठभर परकी लोकांनी गेली बाराशे वर्षे आपल्यावर राज्य केले तरी कसे? आपली असंघटित अवस्था हे जर गुलामीचे कारण असेल तर मग, अशा दहशतवादी व आंदोलनात्मक चळवळींनी तो मूलभूत रोग नाहीसा होऊ शकेल का? सुसंघटित राष्ट्रजीवनाला आवश्यक असलेले भावात्मक व शाश्वत सद्‌गुण समाजाच्या अंतःकरणात खोलवर रुजलेले नसताना केवळ विरोधाच्या आधारावर जनसमूहाच्या भावना उद्दीपित करणे उचित ठरेल काय? असे प्रश्न सूक्ष्म अभ्यासातून निर्माण झाले.

तेव्हा डॉक्टरांनी आपल्या पारतंत्र्याचे मूळ कारण कोणते व ते दूर करण्याचा योग्य व विधायक मार्ग कोणता, यासंबंधी परिपक्व आणि सखोल चिंतन केले आणि संघाची स्थापना केली. समाजाच्या मनोवृत्तीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणे हीच आज सर्वांत निकडीची गोष्ट आहे. शारीरिक क्रांती नव्हे, तर मानसिक क्रांती हाच परकीय सत्तेसकट राष्ट्राच्या सर्व रोगांवर रामबाण उपाय आहे. एकेका व्यक्तीला हाताशी धरून तिच्यावर सुसंघटित राष्ट्रजीवनाचे संस्कार करून संपूर्ण समाजाची मनोवृत्ती, विचार आणि आचार यांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आणावयाचे असेल तर, त्यासाठी प्रचार आणि प्रसिद्धीच्या गाजावाजापासून दूर राहून शांतपणे, चिकाटीने आणि एकाग्र चित्ताने कार्य करण्याची आवश्यकता आहे, हे त्यांना ठाऊक होते. केवळ बाह्य परिस्थितीनुसार समाजाच्या सुसंघटित अवस्थेची आवश्यकता नाहीशी होत नाही. कोणाला तरी विरोध हा समाजाचा चिरस्थायी, नित्यसिद्ध आणि सुसंघटित अवस्थेचा आधार होऊ शकणार नाही.

याचे कारण अगदी उघड आहे. ज्या चळवळी कोणत्या ना कोणत्या बाह्यपरिस्थितीची प्रतिक्रिया म्हणून जन्माला येतात त्या, त्यांच्या विरोधाचे ते कारण दूर होताच कोलमडून पडतात. विरोधाची भावना एकदा मनावर स्वार झाली की, ज्याचा विरोध आपण करतो, त्यांच्याप्रमाणेच आपली मनोरचना व व्यक्तिमत्त्व घडते.

दुर्दैवाने भारतातील बहुतेक थोर विचारवंतांनी व पुढाऱ्यांनी नेमकी हीच चूक केली. गेल्या कित्येक दशकांमध्ये होऊन गेलेल्या ह्या समाजधुरिणांनी आपल्या समाजाची अवकळा पाहून असा निष्कर्ष काढला की, गेल्या एक हजार वर्षांचे पारतंत्र्य हेच या अधःपतित अवस्थेचे मुख्य कारण आहे. त्यामुळे स्वाभाविकपणेच परकीय सत्तेचे ते जोखड झुगारून देण्याच्या दिशेने त्यांनी आपले प्रयत्न सुरू केले. परंतु एवढ्याने मूळ प्रश्न संपत नव्हता. मुळात परकीय लोक येथे येऊन आपली सत्ता प्रस्थापित करू शकलेच कसे, हा प्रश्न शिल्लकच राहिला. पण आपले बहुतेक पुढारी इंग्रज किंवा मुसलमान यांचा विरोध करण्याच्याच भावनेला बळी पडले. या प्रतिक्रियात्मक वृत्तीने ते एक तर इंग्लिश झाले वा मुसलमान झाले, असे डॉक्टरांना आढळले. उदा. ब्रिटिशांना हाकलून लावणे हे एकच उद्दिष्ट काँग्रेसच्या आंदोलनामागे होते आणि त्यालाच राष्ट्रीयत्व समजले जाई. ब्रिटिशविरोध आणि राष्ट्रीयत्व हे समानार्थी शब्द बनले. तसेच एक सुविख्यात आणि विद्वान हिंदू नेता व काही कडव्या हिंदू संघटना मुसलमानांच्या विरोधी अभेद्य हिंदू संघटना बनविण्याच्या नादात हिंदूंनी गोमांस भक्षण केले तर त्यात काय हरकत आहे, असा प्रश्न विचारण्याइतपत प्रतिक्रियात्मक विचार करू लागले. म्हणजेच राजकीय दृष्टीने जरी ते कट्टर हिंदूच राहिले तरी, त्या प्रतिक्रियावादी चिंतनाने त्यांना सांस्कृतिकदृष्ट्या मुसलमान बनविले. असल्या विविध प्रकारांच्या प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनांचा स्वातंत्र्याच्या चळवळीची दिशा व तिचे नेते आणि सर्वसामान्य जनता यांवर फारच घातक परिणाम झाला, असे संघसंस्थापकांना वाटले. म्हणून राष्ट्रीयत्वाच्या यथार्थ, भावात्मक आणि चिरंतन कल्पनेच्या आधारावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करण्याचे त्यांनी ठरविले.

ब्रिटिश आपल्या देशातून निघून गेल्यावर राष्ट्रीय पुनर्रचना करताना आपण कोणती समाजरचना आदर्श म्हणून आपल्यासमोर ठेवावी? मूलगामी राष्ट्रसेवेचे कोणते कार्य करावे? अशा परिस्थितीत समाजाची सेवा करण्याचा उत्कृष्ट मार्ग कोणता? यावर डॉक्टर हेडगेवारांनी पुढील दूरगामी उपाययोजना स्वीकारली. भारतीय समाजाला आत्मविस्मृतीचा आणि असंघटिततेचा रोग जडला आहे. राष्ट्रभावनेचा व राष्ट्रीय एकतेचा अभाव हा मूळ रोग आहे. तो दूर करून समर्थ, सुसंघटित, जागृत आणि आत्मनिर्भर राष्ट्रजीवन उभे करणे हाच तो मार्ग होय. या अत्यावश्यक प्राथमिक गोष्टीची उपेक्षा करून भौतिक प्रगतीसाठी केलेले सर्व प्रयत्न समाजाचे हित साधण्याऐवजी त्याला शापरूप ठरण्याचाच अधिक संभव आहे. हिंदुत्व हा आपल्या कार्याचा मूलाधार आहे. हिंदू समाजाला स्वतःचे असे एक भावात्मक अधिष्ठान आहे. आपले राष्ट्रीय आदर्श आणि आकांक्षा, इतिहास आणि परंपरा यांच्या भूमीमध्ये आपल्या राष्ट्रजीवनाची मुळे खोलवर रुजलेली आहेत, ही जाणीव आपल्यामध्ये पुन्हा एकदा जागृत करणे हाच तो उपाय आहे. म्हणून हिंदू समाजातील प्रत्येक व्यक्ती आदर्श हिंदू बनून समाजाच्या संघटित जीवनाचा एक चैतन्यपूर्ण घटक होऊन राहील, अशी संपूर्ण समाजाची सुसंघटित अवस्था हे संघकार्याचे प्राणरूप व अंतिम स्वरूप असेल

### संघाची अद्वितीय कार्यपद्धती

गुरुजींच्या मताप्रमाणे डॉक्टर हेडगेवारांनी आपल्या मूलगामी सेवाकार्याला पोषक होईल, अशीच आपल्या संघटनेच्या कार्यपद्धतीची रचना अत्यंत सावधपणे व लोकोत्तररीत्या केली. गुरुजी असे मानत की, संघकार्याचे एक वैशिष्टय असे की, संघात साध्य व साधन दोन्ही एकरूप झालेली आहेत. सुसंघटित समाजजीवन-निर्माण करण्याचे साध्य व दैनंदिन संघटित जीवनाचे संस्कार हे साधन. ज्या स्वयंफलरूपतेमुळे संघ वाढला त्याची कारणे डॉक्टरांच्या व संघकार्याच्या पुढील तत्त्वात आढळतात.

१ : संघ एखाद्या व्यक्तीविषयी किंवा संस्थेविषयी नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राविषयी आत्मनिष्ठा निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. अशी अनन्य राष्ट्रनिष्ठा नसेल तर, केवळ एखाद्या संस्थेच्या बाह्यस्वरूपावरील श्रद्धा वा तत्संबंधीचा अभिमान राष्ट्राच्या विघटनेचेच आणखी एक कारण ठरेल. म्हणूनच समाजापासून पृथक अशी संघटना उभारण्याची कल्पना संघाने स्वतःसमोर कधीही ठेवली नाही. समाजाच्या एखाद्या विशिष्ट वर्गाची वा भागाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची घडण करण्याचे लक्ष्य संघाने अगदी सुरुवातीपासून स्वतःसमोर ठेवले आहे.

२ : संघकार्याची उभारणी त्या त्या वेळी घडणाऱ्या विविध परिवर्तनांच्या प्रभावातून मुक्त राहून शांतपणे झाली पाहिजे. म्हणून हे कार्य अखंडपणे, दिवसानुदिवस, वर्षानुवर्षे सतत प्रज्वलित ठेवले पाहिजे. त्याच त्या वाटेने तुम्ही आणखी किती वर्षे चालणार? हे काम संपणार तरी केव्हा? तुम्हाला अभिप्रेत असलेला संपूर्ण समाजाचा कायापालट होणार तरी केव्हा? असे प्रश्न वारंवार विचारले जातील. पण ते प्रश्न खोटे आहेत. त्यांचे उत्तर सोपे आहे. संघकार्यात जवळचा मार्ग म्हणजे शॉर्ट कट् नाही. ते कार्य समाज पूर्ण जागृत व पूर्ण एकात्म होईतो चालणार.

३ : संघाच्या कार्यपद्धतीचे आणखी एक वैशिष्टय असे की, संघटित राष्ट्रजीवन उभे करण्यासाठीच संघाला जे अनुशासन अभिप्रेत आहे, ते केवळ शारीरिक अनुशासन नाही. ते निव्वळ पोलिसांच्या वा लष्कराच्या अनुशासनासारखे नाही.

याबाबतीत श्री. गोळवलकर एक मासलेवाईक संवाद सांगत असत. एकदा त्यांच्या एका मित्राने त्यांना विचारले की, 'तुमची संघटना ही विक्रमादित्याने उभारलेल्या संघटनेसारखी आहे की, शंकराचार्यांच्या संघटनेसारखी?' गुरुजींनी त्याला म्हटले की, 'सध्याच्या परिस्थितीत या दोहोंपैकी कोणत्याही संघटनेचा फारसा उपयोग नाही. तत्कालीन शत्रूला सीमेपार पिटाळून लावणे एवढेच विक्रमादित्याने उभारलेल्या सैनिक संघटनेचे लक्ष्य होते. आणि ते संघटन जेमतेम शंभर वर्षे टिकले. अशा पद्धतीने समाजाचे स्थायी संघटन निर्माण होणार नाही, किंवा त्यांच्यामध्ये चिरस्थायी राष्ट्रीय सद्गुणांचीही निर्मिती होणार नाही. दुसरी पद्धत म्हणजे बौद्धिक वादविवाद व शास्त्रार्थाची चर्चा करून संघटना उभारणे. ही कार्यपद्धती शंकराचार्यांनी अवलंबिली होती, परंतु त्या काळी असलेला बुद्धीचा प्रामाणिकपणा आणि विशुद्ध चारित्र्य या दोन गोष्टी आज कोठे आहेत? प्रारंभी ठरलेल्या अटीनुसार मंडनमिश्र हरल्यावर ते संन्यासधर्माची दीक्षा घेऊन शंकराचार्यांचे पट्टशिष्य झाले. परंतु आज ती परिस्थिती राहिलेली नाही. जी गोष्ट स्वतःच्या बुद्धीला पटली तिचा स्वीकार करून ती लगेच आचरणारे बुद्धिनिष्ठ आणि प्रामाणिक लोक आज फार थोडे आढळतात.'

४ : म्हणून संघाच्या कार्यपद्धतीतील सर्वप्रथम लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे दैनंदिन कार्यक्रम. संघाच्या कार्याला हे शांत व अत्यंत व्यवहार्य स्वरूप डॉक्टरांनी दिले. आपण एका संघटित कुटुंबाचे जिवंत घटक आहोत, यावर दिलेला भर महत्त्वाचा व निर्णायक ठरला. या कार्याचे स्वतःचे असे एक वैशिष्टय व नावीन्य आहे. रोज एका विवक्षित स्थळी, विवक्षितवेळी एकत्र येणे हे संघाच्या कार्यपद्धतीचे अत्यावश्यक अंग आहे; आणि हे काम स्थिर बुद्धीने आजीवन करीत राहावयाचे; या निःशब्द कार्याचा परिणाम फार मोठा होतो.

५ : संघशाखांचे कार्य एका विशिष्ट तंत्राने चालते. आपल्या आदर्शाला अनुरूप असे एक प्रतीक, एक मंत्र, एक प्रतिज्ञा, आणि एक कर्मकांड म्हणजे आचारसंहिता संघाने तयार केली. व्यक्तिप्रामाण्य व ग्रंथप्रामाण्याला बगल देण्याकरता भगवा ध्वज हा गुरू म्हणून समोर ठेवण्यात आला.

६ : संघशाखा हेच समग्र कार्याचे आणि ऐक्यनिर्मितीचे केंद्र निर्माण करण्यात आले. प्रत्येक स्वयंसेवक स्वतःच्या सहजप्रवृत्ती, भावना व वृत्ती यांचा उपयोग, राष्ट्रीय पुनर्रचना कार्याचे प्रभावी साधन म्हणून व्हावा यासाठी, तो या सर्वांचा प्रवाह या एकाच कार्याकडे वळवितो. बहुतेक सारी सामान्य माणसे ध्येयवादाचे आकर्षण असले तरी आपल्या जीवनाचा बहुतेक काळ व्यक्तिगत व कौटुंबिक काम, धनार्जन, मुलांचे संगोपन आदी कार्यातच घालवतात. पण सबंध दिवसात एका ठराविक वेळी व ठराविक काळी त्यांच्या शरीराला गुंतवून ठेवले आणि सहवास व प्रेमातून त्यांच्यावर संस्कार केले, तर आपलेही काम होते व त्यापलीकडे खुषीच्या सक्तीचे किंवा निव्वळ सक्तीचे संघटनात्मक किंवा सामाजिक असे कोणतेच काम त्यांच्याकडून बिलकूल अपेक्षित नसल्याने त्यांनाही ध्येयवादाचा बोजा वाटत नाही व ते खुषीने स्वयंसेवक म्हणून प्रसन्नपणे सर्वत्र वावरतात. म्हणूनच नियमितपणा आणि वक्तशीरपणा यांचा संघात एवढा टोकाचा आग्रह धरण्यात येतो, याचे कारण हेच आहे. संघाचा कमाल व किमान कार्यक्रम एकच आहे. दैनंदिन तपस्येचा कठोर अनुशासनाचा मार्ग. व्यक्तीच्या पातळीवर एकदम अगदी सोपा व प्रभावी ठरतो. शिवाय जाता जाता संघटनेच्या अनुयायांच्या स्वभावाचे कंगोरे या प्रकारात अगदी नकळत घासले जातात. त्याचप्रमाणे त्याच कारणाकरता संघटनेसाठी करावा लागणारा सर्व खर्च प्रत्येक स्वयंसेवक स्वतःच्याच खिशातून करीत असतो.

येथे असा एक प्रश्न स्वाभाविकपणेच निर्माण होतो की, कोटच-वधी बांधवांना संघस्थानावर आणणे, त्यांच्याकडून दैनंदिन कार्यक्रम करवून घेणे हे खरोखरीच शक्य आहे काय? स्त्रिया, वृद्ध, लहान मुले आणि असेच इतर बांधव दैनंदिन कार्यक्रमामध्ये भाग घेऊ शकत नाहीत. मग संपूर्ण समाजाचे संघटन संघ कसे करणार? त्यावर श्रीगुरुजींनी असे उत्तर दिले आहे की, संघाच्या स्थापनेपासूनच संघस्वयंसेवक शाखेवर निरपेक्ष कार्य करतात. त्यामागची अखंड प्रेरणा

स्वयंसेवकांना आनंदाची वा प्रेरणेची अनुभूती देते. त्यातून अधिक प्रयत्नशील होण्याची प्रेरणा त्यांना लाभते. त्यामुळे असे स्वयंसेवक त्यांच्या नेहमीच्या जीवनात, इतर बांधवांच्या सुखदुःखात सहजपणे सहभागी होतात व प्रेमाच्या या अरूप बंधनाने संघ समाजात पोहचवितात. अशी राष्ट्रजीवनाची विविध क्षेत्रे ही संघकार्य पुढे चालविणारी स्वयंचलित केंद्रे बनतात.

७ : संघाच्या कार्यपद्धतीचे शेवटचे वैशिष्ट्य असे की, त्या कल्पनेचे व पद्धतीचे राजकारणातील स्वरूप वारंवार सांगितले जाते. राजसत्तेच्या माध्यमामार्फत राष्ट्रजीवनाची उभारणी कदापि होणार नाही. राजकीय सत्ता हे बाह्य साधन आहे. प्राचीन परंपरेतील आध्यात्मिक प्रेरणेने उत्स्फूर्त झालेल्या लोकांच्या संघटित जीवनाचे सामर्थ्य हाच खरा राष्ट्रधर्म आहे. तेव्हा राजकीय सत्तेच्या मोहपाशातून दूर परंतु त्याचबरोबर सत्ताधिष्ठित लोकांच्या चुकांवर नियंत्रण ठेवण्याबाबत दक्ष व समर्थ अशी संघटना उभी करणे, हेच डॉक्टर हेडगेवार ह्यांनी ध्येय ठरविले, असे श्रीगुरुजी म्हणतात. ज्याप्रमाणे सूर्याचा प्रकाश चंद्र परावर्तित करतो, त्याप्रमाणे राजसत्ता संघाच्या केंद्रस्रोताचा प्रभाव परिवर्तित करेल असे त्यांना वाटले. म्हणून बाहेर कितीही घडामोडी झाल्या, राजकीय प्रलोभनांची वावटळ उठली, तरी जवळच्या वाटा न शोधता राजकारणातीत कार्यच संघ करेल, असे ठरले.

## संघाची राष्ट्रवादाविषयीची भूमिका

अशा रीतीने आद्य सरसंघचालकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची वैचारिक भूमिका व कार्यपद्धती ठरविल्यावर त्यांना व संघाला हिंदुस्थानातील त्या काळातील काही ज्वलंत प्रश्नांविषयी भूमिका ही घ्यावीच लागली. कारण स्थलकालातीत, शाश्वत, नित्य, सनातन कालौघाचे कितीही भान राखले तरी, वर्तमानाचा संदर्भ व आव्हाने टाळून कोणत्याच तत्त्वाला किंवा परंपरेला किंवा संघटनेला सतेज, रसरशीत व सदैव वर्धिष्णू राहता येणार नाही. जरी दैनंदिन जीवनातल्या नानाविध भोवऱ्यात अडकून न पडण्याची काळजी घेतलेली बरी असते; तरी वर्तमानकाळातील तुफानांना तोंड द्यावेच लागते.

८ त्यातील पहिला प्रश्न म्हणजे भारतीय राष्ट्रवादाच्या आशयाचा व अर्थाचा प्रश्न. हा प्रश्न स्वातंत्र्यपूर्व काळात मुख्यत्वेकरून हिंदू–मुसलमान वादाच्या संदर्भात महत्त्वाचा व निर्णायक ठरला होता. यासंबंधी डॉक्टर हेडगेवार व श्रीगुरुजी यांनी पुढील भूमिका घेतली.

ब्रिटिशांच्या साम्राज्यशक्तीसमोर उभे ठाकल्यानंतर कॉंग्रेस नेत्यांना असे वाटू लागले की, तुलनात्मक दृष्ट्या आपली शक्ती फारच कमी आहे. बाकीचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले तेव्हा कॉंग्रेस–आंदोलनाच्या नेत्यांनी जे येथे राहतात त्या सर्वांची मिळून एक संयुक्त आघाडी ब्रिटिशांविरुद्ध उभी करावी, असा विचार केला. प्रतिक्रियात्मक राष्ट्रवादाच्या त्यांच्या कल्पनेला हे धरूनच होते. हिंदूंव्यतिरिक्त येथे ज्यू, पारशी, ख्रिश्चन व मुसलमान असे चार जमातींचे लोक राहत होते. खरा प्रश्न आला मुसलमानांचा. मुसलमान येथे आले ते आक्रमक म्हणून. आपण जेते व राज्यकर्ते आहोत, या भावनेनेच ते गेली बाराशे वर्षे येथे राहत होते. तो गंड अजूनही त्यांच्या मनात कायम होता. इतिहास असे सांगतो की, त्यांचा विरोध केवळ राजकीय स्वरूपाचा नव्हता. तसे असते तर, त्यांना थोड्याच काळात आपलेसे करून घेता आले असते. परंतु त्यांचा तो विरोध इतका खोलवर रुजलेला होता की, ज्या ज्या गोष्टींवर हिंदूंची श्रद्धा त्या सर्वांबाबत त्यांच्या मनात द्वेष असे. धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक सर्वच बाबतीत त्यांचा आपल्या जीवनपद्धतीला कडवा विरोध होता. हे शत्रुत्व त्यांच्या अगदी रोमरोमात भिनलेले होते. त्यांची संख्याही थोडी थोडकी नव्हती. हिंदूंच्या खालोखाल सर्वांत मोठी संख्या त्यांचीच होती. मुसलमानांच्या दुराग्रही वृत्तीचा विशुद्ध राष्ट्रवादी भूमिकेतून सामना करण्यासाठी आवश्यक असलेली प्रबळ इच्छाशक्ती व निष्ठा यांचा आपल्या नेत्यांमध्ये संपूर्ण अभाव असल्यामुळे मुसलमानांच्या तुष्टीकरणाची बीजे पेरली गेली. निर्भयतेच्या बाबतीत कॉंग्रेसचे नेते कमी पडले. नवे ऐक्य व नवे राष्ट्रीयत्व उभे करण्याच्या त्यांच्या या वृथा धडपडीतून आपल्या नेत्यांनी हिंदू–मुसलमान ऐक्याची एक नवीन घोषणा हवेत सोडून दिली. आणि या ऐक्याच्या आड जे जे येत असेल ते विसरून जावे असे आवाहन सुरू केले. मुसलमानांनी आपली फुटीर वृत्ती सोडून द्यावी असे त्यांना सांगण्याची हिंमत या नेत्यांपाशी नसल्याने त्यांनी आपल्या सर्व उपदेशाचा मारा गरीब बिचाऱ्या हिंदूंवर सुरू केला. त्यांनी हिंदूंना त्यांचे हिंदू राष्ट्रीयत्व, संस्कृती, गौरवशाली इतिहास, प्राचीन आदर्श, आकांक्षा, इतकेच नव्हे तर, त्यांच्यावर होणारे अत्याचार यांकडे दुर्लक्ष करण्यास शिकविले व तसे हिंदूंनी न केल्यास त्यांचा उपहास व तेजोभंग केला.

इतकी भयंकर किंमत दिल्यानंतर तरी या नेत्यांचे हिंदू–मुस्लीम एकतेचे स्वप्न साकार झाले काय ? नाही. मुसलमानांना संतुष्ट करण्याचा जसजसा अधिकाधिक प्रयत्न आपल्या नेत्यांनी केला तसतशी त्यांची वेगळेपणाची व आक्रमक वृत्ती उत्तरोत्तर वाढतच गेली. त्यांना राष्ट्रीय शक्तीविरुद्ध उठविण्यासाठी ब्रिटिशांनीही त्यांच्यात वेगळेपणाच्या भावनेला खतपाणी घालण्यास सुरवात केली. त्यामुळे मुसलमानांना असे एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले की, ब्रिटिश व राष्ट्रीय शक्ती या दोघांनाही त्यांची आवश्यकता भासू लागली. त्यामुळे त्यांचा भाव उत्तरोत्तर अधिकच वाढू लागला.

तेव्हा स्वराज्य आले, परंतु स्वराज्याबरोबरच देशाची फाळणीही झाली. त्यामुळे हिंदू-मुस्लीम एकतेशिवाय स्वराज्य नाही, ही घोषणा सरळ सरळ खोटी ठरली आहे. खरे म्हणजे त्या आत्मघाती घोषणेमुळेच हिंदूंच्या आत्मविश्वासाचा जो सतत ऱ्हास होत गेला, त्याचेच ते कटू फळ होते. गेली हजार वर्षे चाललेल्या संघर्षाच्या काळात मुसलमानांचे प्रबळ वर्चस्व असलेल्या भागामध्ये हिंदूंनी सतत प्रतिकार चालू ठेवला होता. त्या भागावर कॉंग्रेसच्या नेत्यांनी पाणी सोडले आणि तिथले हिंदू आपल्या भूमीला मुकले.

ह्याबाबत संघाने म्हणजेच दुसऱ्या सरसंघचालकांनी पुढील अत्यंत महत्त्वाचे निष्कर्ष काढले.

१ : आपल्या समाजातील ज्या वर्गापाशी प्राणभयाने वा सत्तासंपत्तीच्या लोभाने, स्वदेश व स्वधर्म ह्यांच्या रक्षणार्थ ताठ उभे राहण्याचे मानसिक सामर्थ्य वा स्वाभिमानी वृत्ती नव्हती, त्या वर्गाच्या हितसंबंधांमुळे व भ्याडपणामुळे आपण पराभूत झालो.

२ : प्रादेशिक राष्ट्रवादाच्या कल्पनेने आपल्या राष्ट्राचे जणू खच्चीकरण केले. प्रादेशिक राष्ट्रवाद आणि समान संकट या दोन गोष्टींवर राष्ट्रकल्पनेची उभारणी केल्यामुळे, हिंदू राष्ट्रवादाच्या विधायक व स्फूर्तिदायक विचाराला देश व समाज पारखा झाला. स्वातंत्र्य-चळवळ राष्ट्रीय-चळवळ न ठरता फक्त प्रतिक्रियात्मक ब्रिटिशविरोधी चळवळ ठरली.

३ : याबाबतीत श्रीगुरुजींनी आणखी एक गोष्ट संघकार्यात प्रथमपासून बिंबवली गेली असे वारंवार सांगितले आहे. ती गोष्ट फारच महत्त्वाची व संघाच्या खऱ्या अंतरंगावर प्रकाश टाकणारी आहे. त्यांच्या मताप्रमाणे वरील तऱ्हेच्या प्रतिक्रियात्मक वृत्तीने भारलेल्या वातावरणामुळेच बरेच लोक संघाकडे याच दृष्टिकोनातून पाहतात. श्रीगुरुजी म्हणतात की, असे अनेक लोक आहेत की, ते एक जीवनश्रद्धा म्हणून नव्हे, तर प्रतिक्रिया म्हणून स्वतःला हिंदू म्हणवून घेतात. प्रतिक्रियेतून जन्माला आलेले हे नकारात्मक हिंदुत्व आहे. ज्यांना स्वतःचे राजकीय हेतू साध्य करण्याचे एक साधन एवढ्याच अर्थाने हिंदू शब्दाचे महत्त्व वाटते, असेही काही लोक आहेत. कांग्रेस, समाजवादी किंवा अन्य कोणी 'क्ष' संमिश्र संस्कृतीची भाषा बोलू लागतांच हे लोक उभे राहून म्हणतात की, आम्हाला शुद्ध हिंदू संस्कृती पाहिजे. हे केवळ प्रतिक्रियेतून निर्माण झालेले विचार आहेत.

याबाबत श्री. गोळवलकर एक महत्त्वाचे विधान करतात. ते म्हणतात, 'एकदा एका गृहस्थांनी मला विचारले की, 'आपण हिंदूंची संघटना करीत आहात, ती मुसलमानांच्या विविध चळवळींना प्रतिकार करण्यासाठी काय?' मी त्यांना एवढेच म्हटले की, 'महंमद जन्माला आला नसता आणि इस्लाम धर्म अस्तित्वातच आला नसता तरीही--जर हिंदू आजच्यासारखेच असंघटित आणि आत्मविस्मृत अवस्थेत आढळले असते तर--आम्ही आजच्याप्रमाणेच हिंदू संघटनेचे कार्य हाती घेतले असते.' याच संदर्भात गुरुजींनी आणखीही एक आठवण सांगितली आहे. ते म्हणतात, 'एकदा एके ठिकाणी आम्ही संघकार्य सुरू करण्यासाठी गेलो होतो. त्या शहरातील सज्जनांनी आमच्यासमोर असा प्रश्न टाकला की, आमच्या या शहरात संघकार्याची आवश्यकताच कोठे आहे? येथे एकही मुसलमान नाही. यावर मी त्यांना म्हटले, आम्ही येथे हिंदूंची संघटना करण्यासाठी आलो आहोत, मुसलमानांची नव्हे. मला वाटते, आपण सर्वजण हिंदू आहात. येथे मुसलमान आहेत वा नाहीत याच्याशी आम्हाला काहीही कर्तव्य नाही.'

४ : म्हणून ह्या देशात हिंदू समाज हाच खरा राष्ट्रीय समाज आहे. हिंदुत्व हाच राष्ट्रीय कार्याचा मूलाधार आहे, अशी भूमिका सर्वोच्च संघनेत्यांनी सतत १९२५ पासून घेतली. याही बाबतीत त्यांनी कांग्रेस आंदोलनाच्या नेत्यांना व तत्सम विचारसरणीच्या इतर प्रवर्तकांनाही एक मर्मभेदक प्रश्नाला प्रांजळ व सत्यनिष्ठ उत्तर देण्याकरता वारंवार आवाहन केले. तो प्रश्न असा की, तुम्हा तथाकथित धर्मनिरपेक्ष लोकांच्या अंतःकरणातील विचार संघाच्या विचाराहून मूलतःच खरोखरीच भिन्न आहेत काय? संघाचा हिंदू राष्ट्राचा वास्तविक आणि विधायक सिद्धान्त जातीय, प्रतिगामी व संकुचित मानून हे नेते प्रादेशिक राष्ट्रवादाचा 'निधर्मी', 'प्रागतिक', आणि 'व्यापक' दृष्टिकोन असलेला म्हणून मिरवतात. परंतु ही राजकारणाची धुळवड बाजूला सारून आपण बारकाईने पाहू लागलो तर काय आढळते? हे लोक हिंदू शब्दाऐवजी 'भारतीय' किंवा 'इंडियन' असे शब्द वापरतात. संघाच्या मताप्रमाणे ते लोक ज्या विचाराचे प्रतिनिधित्व करीत असतात, त्यांचे अचूक आणि निःसंदिग्ध वर्णन 'हिंदू' शब्दानेच करता येते. भारतीय शब्दाने तोच आशय व्यक्त झाला पाहिजे हे खरे असले, तरी आज आपले पुढारी त्या शब्दाचा ज्याप्रमाणे वापर करीत असतात, त्यामुळे त्या शब्दाने संभ्रम निर्माण होण्याचा आणि सत्यापलाप होण्याचा संभव आहे. या हिंदू राष्ट्रीयत्वाचा ठसा आपल्या सर्वांच्या मनावर स्पष्ट उमटलेला आहे. परंतु काहीजण ही गोष्ट सरळ शब्दात सांगण्याचे टाळतात इतकेच. ते सरळ शब्दात हे विचार बोलून न दाखविता आडवळणाने तेच बोलतात. याचा निष्कर्ष असा की, काही लोकांनी संघाला जातीय वगैरे म्हटले, तरी त्यांचे विचार व संघाचे विचार मूलतः एकच आहेत. त्यांच्यात व संघात फरक एवढाच की, सत्यकथन करण्याचे धैर्य व निःस्पृहता संघापाशी आहे. उलट इतर 'प्रागतिक' विचारवंत अहिंदूंच्या व विशेषतः मुसलमानांच्या भीतीपोटीच आणि अर्थात अनुनयापोटीच 'भारतीय', 'विशाल दृष्टिकोनवादी', 'निधर्मी' राष्ट्रवाद मानतात. त्याऐवजी विविधतेतून एकतेचा अनुभव व प्रचीती देणाऱ्या हिंदू समाजजीवनाचा आपण आपल्या राष्ट्रवादाकरता स्वीकार केला पाहिजे, हे संघकार्याचे धोरण पहिल्यापासून राहिले.

□

## संघाची चातुर्वर्ण्यविषयक भूमिका

आद्यसरसंघचालक व द्वितीय सरसंघचालक यांना ज्याप्रमाणे भारतीय राष्ट्रवाद व हिंदू-मुसलमान प्रश्न यासंबंधी संघाची भूमिका, संघाला जरी राजकारणातीत कार्य करावयाचे होते तरी स्थलकालपरिस्थितीनुसार विषद करावी लागली; त्याप्रमाणेच त्यांना भारतातील जातिवादाविरोधी समतावादी दलित आंदोलनाच्याही संदर्भात संघाची हिंदूंच्या समाजव्यवस्थेविषयीची भूमिका स्पष्ट करावी लागली.

१ : श्रीगुरुजींच्या मतानुसार पृथ्वीवरील जीवनाच्या उत्क्रांतीपथावरचे जास्तीत जास्त विकसित झालेले जीवस्वरूप म्हणजे मनुष्यशरीर हेच आहे. आता मनुष्यशरीराचे निरनिराळे अवयव व त्यांची विविधता हे अपूर्णतेचे वा विभिन्नतेचे लक्षण नसून उलट, अत्यंत उत्क्रांत अवस्थेचे द्योतक आहे. बाह्यतः अवयव जरी परस्परांहून भिन्न असले तरी ते, एकाच शरीराच्या योगक्षेमासाठी कार्य करीत असतात. त्यात परस्परविरोध वा भेद नसतो तर, उलट त्या विविधतेत एकच एक जीवनरस असतो. समाजासंबंधीही असेच आहे. आपल्या प्राचीन समाजव्यवस्थेने यांपैकी प्रत्येक गटाला एकेक विवक्षित कार्य नेमून दिले आणि त्यांच्या स्वाभाविक वाटचालीविषयी मार्गदर्शन केले. समाजरूपी विराट पुरुषाची सेवा करीत असतानाच व्यक्तिविकासालाही जास्तीत जास्त वाव मिळावा अशी रचना त्यांनी केली होती. आपल्या समाजाची रचना ही काहीशी गुंतागुंतीची, वरवर पाहता संभ्रम निर्माण करणाऱ्या फाफटपसाऱ्या-

सारखी वाटली, तरीही ती सुसंघटित व जगातील सर्व समाजव्यवस्थांपैकी सर्वात अधिक उत्क्रांत अवस्थांची द्योतक आहे.

२ : असे सांगितल्यावर द्वितीय सरसंघचालक असे वारंवार बजावतात की, परकीय वादांच्या आहारी गेलेल्या आपल्यातील बऱ्याच लोकांची अशी ओरड चालू असते की, आपल्या जीवनातील विविधता हीच आपल्या फुटिरतेला कारणीभूत आहे, म्हणून ती मुळासकट उपटून काढून, एक वर्गविहीन समाज निर्माण केला पाहिजे. त्यावर संघाचे उत्तर असे की, शरीराचे वेगवेगळे 'वर्ग' समजून, सारे शरीर वर्गविहीन करण्यासाठी ते कापून टाकावयाचे काय? तसे आपण केले तर ती उत्क्रांती होईल की हत्या?

३ : अनेकांतील एकत्व हे हिंदू समाजरचनेचे वैशिष्टय आहे. हिंदू समाज हाच विराट पुरुष आहे. सर्वशक्तिमान परमेश्वराचेच ते अभिव्यक्त स्वरूप आहे. ज्या समाजात पुरुषसूक्ताप्रमाणे चतुर्विध व्यवस्था आहे तो हिंदू समाज हाच आपला परमेश्वर.

४ : आणि म्हणूनच संघाचे सर्वोच्च नेते असे आग्रहाने सांगत असत की, हिंदू समाजाचे दुसरे एक खास ललामभूत वैशिष्टय म्हणजे वर्णव्यवस्था. चातुर्वर्ण्यरूप समाजरचना म्हणजे परमेश्वराचेच चतुर्विध स्वरूप. ही चर्चा पुरोगामीपणाच्या नावाखाली परकीय विचारांच्या प्रभावाखाली जाऊ न देता आपल्या म्हणजे हिंदूंच्या दृष्टिकोनातून व्हावी असे त्यांना वाटे. मुळात चार वर्ण नव्हते व एकच हंसवर्ण होता. पण केवळ एकाच वर्णाने समाजाची धारणा नीट होत नाही, असा अनुभव आला व कर्तव्याची विभागणी झाली. आज वर्णव्यवस्था व्यवहारात दिसत नाही, याबद्दल द्वितीय सरसंघचालकांची तक्रार नाही: ती समाजावर लादावी असाही त्यांचा आग्रह नव्हता. जे शास्त्रीय व शाश्वत सत्य आहे ते नाहीसे होणार नाही असे त्यांना वाटे. आणि म्हणून आज वर्णाचा लोप झाला तरी कालांतराने निसर्गसिद्ध चक्र पुन्हा फिरेल असे त्यांना वाटे. म्हणूनच सांप्रतच्या वर्णलोपाची चिंता त्यांना कधी वाटली नाही.

मग चातुर्वर्ण्याबद्दल एवढा आग्रह का? तर तो हिंदू समाजाचा पाया आहे. श्रीगुरुजींच्या मते धर्म व धर्मरूढी यांची गल्लत करता कामा नये. धर्म म्हणजे धर्माचे मूलभूत व पायाच असलेले तत्त्वज्ञान होय. त्या दृष्टीने अनुशासनबद्ध अशा समाजरचनेसाठी कर्मफलत्यागावर आधारलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था आवश्यकच आहे. चातुर्वर्ण्य ही रूढी नाही: तो धर्म आहे व धर्म बदलत नसतो.

या चातुर्वर्ण्याचा उलगडा श्री. गोळवलकर पुढीलप्रमाणे करतात— (१) श्रुती ईश्वरप्रणीत आहेत. (२) त्यात सांगितलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था हीही ईश्वरनिर्मित होते. (३) चातुर्वर्ण्य पूर्वी गुणकर्माधिष्ठित होते असे म्हणतात. गीतेतही तसे म्हटले आहे. यातील गुण म्हणजे पात्रता नव्हे, तर सत्त्व, रज व तम हे गुण आणि कर्म म्हणजे आवडीनुसार स्वीकारलेले या जन्मातले कर्म किंवा या जन्मातला व्यवसाय नव्हे तर पूर्वजन्मीचे कर्म होय. (४) पशुपक्ष्यांत, दगडात, सृष्टीतील प्रत्येक चीजवस्तूत चार वर्ण आहेत. (५) जन्माने प्राप्त होणाऱ्या चातुर्वर्ण्यात गैर असे काही नाही. मात्र त्यात लवचिकपणा हवा. पूर्वी तसा होता. (६) व्यक्तीला आपल्या आवडीनुसार कर्म निवडण्यास मुभा नाही. यात अन्याय काही नाही. अनासक्त योगाप्रमाणे वागणे म्हणजेच कर्मफलाची आशा न धरणे, हे हिंदुधर्माचे मूलतत्त्वच आहे. त्यामुळे तसे वागायचे ठरल्यावर कर्म बदलण्याची गरजच काय?

चातुर्वर्ण्य म्हणजे समाजात भेदभाव किंवा उच्चनीच भाव निर्माण करणारी पद्धती नव्हे, असे सांगून वर्णधर्माच्या आधाराने एकजीव, एकसंघ समाज संघाने निर्माण करावयाचे ठरविले होते. त्याकरता, अस्पृश्यता दूर करण्याकरता, श्रीगुरुजींनी शुद्धिकरणाहूनही अत्यंत साधा असा एखादा विधी अस्पृश्य मानला जाणाऱ्यांना स्पृश्य करून घेण्यासाठी आखावा असे सुचविले. आपल्या समाजातील काही बांधव अस्पृश्य आहेत व म्हणून हा विधी करावा असे त्यांना मुळीच अभिप्रेत नाही, असा खुलासा करून तरीही अस्पृश्यांनी (आणि स्पृश्यांनी मात्र नव्हे!) तो विधी केल्यास त्यात समाजाचे हितच असे, असे सरसंघचालक सुचवतील. इतकेच नव्हे तर, शहरापासून तो ग्रामीण भागात आणि गिरिकंदरात देखील पसरलेल्या हिंदू समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे अथांग आत्मीयतेने पाहणे व अन्य कोणत्याही गोष्टीचा, म्हणजे जातीपातीचा, गरिबी–श्रीमंतीचा अथवा कमीअधिक शिक्षणाचा विचार न करता सर्वांना एकत्र आणणे, हे संघाचे कार्य आहे असे ठासून सांगून त्यात व्यत्यय येईल अशी कोणतीही भावना त्यांच्या मनात कदापि असणार नाही म्हणून सांगतात, याचाच अर्थ चातुर्वर्ण्य, वर्णधर्म यांच्या पायावरच संघाने संघस्थापनेपासून हिंदू राष्ट्राच्या पुनरुत्थानकार्याला प्रारंभ केला, हे श्रीगुरुजी सुचवतात.

## संघकार्याचे दुसरे पर्व

१९४७ साली हिंदुस्थानची फाळणी झाली. भारत स्वतंत्र झाला. वरकरणी भारतात पंचाऐंशी प्रतिशत हिंदू आहेत म्हणून वस्तुनिष्ठ दृष्ट्या हिंदूंचेच राज्य सुरू झाले आहे, असे मानून कोणी जर श्रीगुरुजींना आता संघकार्य नको असे विचारलेच असते, तर त्यांची दोन तऱ्हेची उत्तरे त्यांनी सतत दिलेली दिसतात. एक तर संघाचे कार्य भावात्मक असल्याने, प्रतिक्रियात्मक नसल्याने व अजूनही हिंदू समाज एकजीव नसल्याने चालूच राहील. आणि दुसरे उत्तर स्थलकालपरिस्थितिसापेक्ष दिसते ते असे की, संघाची सुरुवात झाली त्यावेळेपेक्षाही आज संघाची आवश्यकता किती तरी अधिक आहे. आता आत्मसंतुष्टतेला यत्किंचितही अवकाश नाही. देशाची अंतर्गत व बाह्य परिस्थिती अत्यंत स्फोटक आहे. म्हणून संघाचे मूळ तत्त्वज्ञान व कार्यपद्धती यात तिळमात्र बदल न करता दुसऱ्या सरसंघचालकांनी (महात्मा गांधींच्या वधानंतर संघावरची बंदी उठविल्यापासून त्यांच्या निधनापर्यंत) आपले व संघाचे कार्य सातत्याने व तेजाने चालू ठेवले. या कालावधीत वर्तमानाचे दोन जिवंत प्रश्न म्हणून लोकशाही व समाजवाद यासंबंधी संघाची भूमिका अधिक स्पष्ट व रेखीव अशी त्यांना सादर करावी लागली.

## संघाचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन

१ : आपली राज्यघटना (आपल्या ध्वजाप्रमाणेच) पाश्चात्य देशातील वेगवेगळ्या राज्यघटनांमधील थोडी थोडी कलमे एकत्र जोडून तयार केलेली एक बोजड राज्यघटना आहे. आपले म्हणावे असे त्या घटनेत काहीच नाही. आपल्या राष्ट्रजीवनाचे उद्दिष्ट काय

आहे, आपल्या जीवनाचे मूलाधार तत्त्व कोणते आहे, यासंबंधी घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये एका अक्षराचाही उल्लेख नाही.

२ : आपणा सर्वांच्या ठायी एक समान चैतन्य–तत्त्व वास्तव्य करीत आहे. आपणा सर्वांच्याच अंतर्यामी हे आत्मतत्त्व असते, आणि त्या दृष्टीने सर्व माणसे समान आहेत. व्यक्ती-व्यक्तींमधील ही समानता केवळ या परमतत्त्वाच्या स्तरावरच विद्यमान असते. त्या परमतत्त्वाचा भौतिक पातळीवर आविष्कार होतो तेव्हा मात्र त्या आविष्कारांमध्ये आश्चर्यकारक विविधता आणि विभिन्नता आढळून येते.

हे तत्त्व सांगितल्यावर दुसऱ्या सरसंघचालकांच्या मते ही अंगभूत विभिन्नता केवळ वरवरच्या समानतेच्या आधारे समूळ नष्ट करावयास निघालेली कोणतीही समाजव्यवस्था अयशस्वीच होईल. पाश्चात्य देशात लोकशाही खूप प्रगत झालेली आहे. परंतु तेथेही लोकशाही म्हणजे राजकारणपटुता व जनतेला आपल्या बाजूला वळविण्याचे कौशल्य अंगी असलेल्या काही थोड्या लोकांचे शासन, अशीच लोकशाहीची एकूण अवस्था आहे. लोकांची आणि लोकांमार्फत चालविली जाणारी राज्यव्यवस्था म्हणजे लोकशाही–म्हणजेच राज्यकारभारात सर्वांचा समान वाटा–अशी जी लोकशाहीची कल्पना आहे, ती प्रत्यक्ष व्यवहारात बऱ्याच अंशी निव्वळ मृगजळ ठरली आहे.

'कारण माणसापेक्षा पद्धतीला अधिक महत्त्वाचे स्थान देण्याच्या या मूलभूत गोंधळामुळे लोकशाही देशांमध्ये आज अनेक गंभीर सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यांनी जोपासलेल्या लोकशाही पद्धतीतून आत्मश्लाघा व पक्षनिंदा या दोन अनिष्ट गोष्टी जन्माला येतात. या दोन गोष्टींमुळे माणसाची मनाची शांतता व स्वास्थ्य बिघडते, आणि व्यक्ती व समाज यांमधील परस्पर सुसंवादही नष्ट होतो. निवडणुकीच्या काळात तर या दोहोंचा अगदी स्वैर उपयोग होत असतो.'

(श्री. मा. स. गोळवलकर यांच्या विचारांचे संकलन-संपादन करून प्रकाशित केलेल्या 'विचार–धन' या मराठी पुस्तकाची प्रथमावृत्ती, पान २१).

३ : इतकेच नव्हे तर श्रीगुरुजी पुढे म्हणतात की, संघाने 'आपल्या राष्ट्रीय परंपरेतील विविध पद्धतींची रचना करताना शासकव्यवस्थेच्या बाह्यस्वरूपाची विशेष चिंता न करता माणसाची घडण हेच मार्गदर्शक तत्त्व डोळ्यांसमोर ठेवले, त्याचे कारण हेच आहे. गणसत्तेपासून राजसत्तेपर्यंत अनेक शासनपद्धती आपण येथे राबवून पाहिल्या. आपल्याला असे दिसते की, पश्चिमेत ज्या राजेशाही शासनपद्धतीत पराकोटीचा जुलूम व रक्तरंजित राज्यक्रांत्याही झाल्या, ती राजेशाही आपल्या येथे मात्र अत्यंत हितकारक ठरली. हजारो वर्षे चालत राहिलेल्या त्या शासनव्यवस्थेमध्ये जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्वातंत्र्य होते आणि सर्वत्र शांततेचे, समृद्धीचे साम्राज्य नांदत होते.' (उपरोक्त पान २१)

४ : संघाला अंतिमतः आदर्श समाजात राजसत्तेचे कार्य, धर्मसत्तेचे कार्य, धर्मसत्तेचे संरक्षण एवढेच प्राचीनांप्रमाणे मर्यादित ठेवावयाचे आहे. माणसाची स्वयंप्रेरणा, उत्साह, सहनशीलता म्हणून आपल्या शास्त्रकारांना, शासकांना नेहमी धर्मसत्तेच्या मार्गदर्शनाखाली ठेवले. राजकीय सत्तेच्या मोहपाशापासून दूर, परंतु त्याचबरोबर सत्ताधिष्ठित लोकांच्या चुकांवर नियंत्रण ठेवण्याबाबत दक्ष व समर्थ अशी संघटना उभी करण्याचे जे कार्य आपण हाती घेतले आहे, यातूनच समाजाला हितकारक अशी शाश्वत व्यवस्था निर्माण होऊ शकेल. त्यावेळी प्राचीनांप्रमाणे राजसत्तेला धनोत्पादनापासून आणि धनसत्तेला राजसत्तेपासून दूर ठेवले जाईल.

## संघाचा समाजवादाविषयीचा दृष्टिकोन

लोकशाहीविषयी हा पवित्रा घेतल्यावर दुसऱ्या सरसंघचालकांनी समाजवादाविषयी संघाने स्वीकारलेल्या भूमिकेची मांडणी पुढील प्रमाणे केली.

१ : समाजवादाचा सिद्धान्त या भूमीत जन्माला आलेला नाही. समाजवाद आपल्या रक्तात नाही, परंपरेत नाही. त्याचा आपल्या प्राचीन राष्ट्रजीवनाच्या परंपरेशी व आदर्शांशी यत्किंचितही संबंध नाही. म्हणूनच चारित्र्यसंपन्न व त्यागमय जीवनाच्या प्रेरणेने आपली अंतःकरणे पुलकित करण्याची क्षमता त्यात नाही. याकरता ज्या अगदी प्राथमिक गोष्टी आवश्यक आहेत, त्यादेखील समाजवादामध्ये नाहीत.

२ : समाजवाद म्हणजे प्राथमिक अवस्थेतील साम्यवादच. समाजवाद, साम्यवाद एकच. समाजवादाचा जो फज्जा उडाला त्यावर झाकण घालण्यासाठी आता आपले नेते 'लोकशाही समाजवाद', 'समाजवादी लोकशाही' यासारखे नवे नवे शब्दप्रयोग शोधून काढून त्यांचा प्रचार करीत आहेत. खरे म्हणजे लोकशाही व समाजवाद या कल्पना परस्परविरोधी आहेत. लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याचा गौरव आहे; उलट समाजवादात व्यक्ती एक निर्जीव स्क्रू आहे.

३ : आपल्या देशात साम्यवादाचे संकट वाढत आहे; याची काही कारणे महत्त्वाची आहेत. श्रीगुरुजींच्या मते साम्यवादाविषयीचे आकर्षण नष्ट करण्यासाठी आपल्या या देशात विविध प्रकारे प्रयत्न सुरू आहेत. तेच खरे धोक्याचे आहेत व त्यापासून भारतीय समाजाने – हिंदूंनी आणि संघस्वयंसेवकांनी – दूर राहिले पाहिजे. कारण साम्यवादाला रोखण्यासाठी प्रतिक्रियात्मक भूमिकेतून कार्य करण्यात नेहमी धोकाच आहे. उदाहरण म्हणून अशा एका धोकादायक चळवळीचा श्री. मा. स. गोळवलकर यांनी स्पष्ट उल्लेख केला. ती चळवळ म्हणजे भूदान–चळवळ. ते पुढे म्हणतात, आपल्या देशात वाढणाऱ्या साम्यवादी संकटाचे दुसरेही एक कारण आहे, आणि ते म्हणजे आपल्या सरकारचे सध्याचे धोरण. समाजवाद हेच लक्ष्य असल्याचे सरकारने जाहीर केले आहे. दुसऱ्या सरसंघचालकांच्या मते साम्यवाद व समाजवाद यामध्ये तत्त्वतः काहीच फरक नाही, दोहोंचे मार्ग फक्त वेगळे आहेत इतकेच. आपले नेते असे सांगतात की, आम्ही रशिया वा चीनप्रमाणे बंदुकीच्या साह्याने नव्हे, तर मतपेटीच्या मार्गाने येथे समाजवाद आणणार आहोत. श्रीगुरुजी त्याचे तात्पर्य म्हणून एक इरसाल कारण देतात ते हे की, वर्तमान हिंदूंसारख्या साध्याभोळ्या व नेभळट लोकांच्या बाबतीत थोडीशी साखरपेरणी बंदुकीचे कार्य करू शकते.

४ : आपल्या देशातही जमीनदारी नष्ट करण्यात आली. आता

सतरावी घटनादुरुस्ती पुढे आली आहे. या घटनादुरुस्तीतल्या तरतुदीनुसार अगदी लहानात लहान म्हणजे अर्धा एकर जमीन असलेला शेतकरीही जमीनदार समजला जाणार आहे, आणि त्याची ती जमीन अगदी नाममात्र मोबदला देऊन ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारला प्राप्त होणार आहे.

५ : सरकारी शेती, सामूहिक शेती, बँकांचे व उद्योगांचे राष्ट्रीयीकरण यांसारखे समाजवादी विचारप्रवाह चालूच आहेत. एका अर्थाने, चीनच्या मार्गाने क्रमश: सुरू असलेली ही वाटचाल आहे. या दोहोंमध्ये असलेले साम्य आपण लक्षात घ्यावे, असे श्रीगुरुजी वारंवार बजावितात. परत परत गुलामीचे वा निर्जीव यंत्राचे जीवन जगण्याची पाळी येऊन कोसळण्यापूर्वीच समोर सुस्पष्ट असलेल्या धोक्यांबाबत सावध व्हा व वेळीच उपाययोजना करा म्हणून सल्ला देतात.

६ : साम्यवाद व समाजवाद ह्यांच्या रोगांवर संघाचा तोडगा असा की, त्याकरिता प्रतिक्रियात्मक भूमिकेतून कार्य न करता, योग्य अशा जीवननिष्ठा निर्माण केल्या पाहिजेत, तरच सर्वसामान्य जनता साम्यवादाच्या अनिष्ट आकर्षणातून मुक्त होऊ शकेल. □

# संघकार्याचे तिसरे पर्व

**१९४०** ते १९७३ अशी तेहतीस वर्षे संघासाठी अपार कष्ट करून सतत प्रसन्न व प्रभावी राहिलेल्या श्रीगुरुजींचे निधन १९७३ मध्ये झाले. त्यानंतर तिसरे सरसंघचालक म्हणून त्या कार्याचे दायित्व श्री. बाळासाहेब देवरस ह्यांच्याकडे आले व संघाच्या तिसऱ्या पर्वाला सुरुवात झाली. एव्हाना भारताला स्वातंत्र्य मिळून पुरी पंचवीस वर्षे झाली होती. सारा समाज अंतर्बाह्य घुसळून निघण्याच्या प्रक्रियेची जरी नुकतीच सुरुवात झाली असली तरी तेवढ्यानेही भारतीय अर्थकारणाला व राजकारणाला एक धारदार गती लाभलेली आहे. एकामागोमाग एक येणाऱ्या व अभूतपूर्व वाटणाऱ्या घटनांच्या मालिकेतून एक प्रसाद-चिन्ह सर्व जाणत्यांना दिसू लागले आहे. ते असे की, आता तळागाळापासूनची सारी भारतीय जनता एक भयमुक्त समाज निर्माण करण्याच्या कार्याला लागली आहे. तेव्हा परत एकदा नव्या सरसंघचालकांना देशभर सतत चर्चिल्या जात असलेल्या काही वर्तमान प्रश्नांविषयी समय जाणून संघाची भूमिका अधिकाधिक स्पष्ट करावी लागत आहे. ती पुढीलप्रमाणे—

१ : श्री. बाळासाहेब देवरसांच्या दृष्टीने संघाचे जे दायित्व त्यांच्यावर आले आहे, ते संघाच्या दृष्टीने आणि देशाच्या दृष्टीने देखील जरा कठीण आणि नाजूक परिस्थितीत आले आहे.

२ : देशाची आज दुरवस्था झालेली आहे. देश महागाई, टंचाई, काळाबाजार, सरकारदप्तरी नोकरशाहीची लाल फीत, भ्रष्ट व्यापारी, भ्रष्ट नोकरशाही आणि भ्रष्ट राजकीय नेतृत्व ह्यांनी गांजलेला आहे. अन्नधान्य, रॉकेल, महागाई इत्यादी समस्या सर्वांनाच येऊन भिडल्या आहेत. त्यामुळे देशाची परिस्थिती विपरित दिसते. पण श्री. देवरस ज्यावेळी ही परिस्थिती संघाच्या दृष्टीने कठीण किंवा नाजूक आहे असे म्हणतात, त्याला आणखीही एक खोल अर्थ आहे व संघाचे आजचे स्वरूप जाणून घेण्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा आहे.

३ : त्यांच्या मते संघ सुरू होऊन आज पन्नास वर्षे झाली असल्याने तो आज सर्वांचाच परिचित झालेला आहे. संघाची काही ताकद उभी झाली आहे. साहजिकच संघासंबंधी काही अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. याचाच अर्थ असा की, संघ चांगलाच बळकट झाल्याने देशात आज कुठेही कोणतीही घटना घडली की, संघाचे नाव त्याच्याशी जोडण्याचा प्रयत्न होतो, असे ते म्हणतात. याचाच अर्थ संघ आज सर्वत्र दखल घेण्याइतका बळ घेऊन उभा असल्याने त्यालाही आता अनेक निर्णायक घटनांची दखल घेण्यावाचून गत्यंतरच नाही, असे आपण म्हटले तर त्यात काहीच चूक होणार नाही.

४ : मग संघ आज कोणाची विशेष दखल घेतो? एकतर भ्रष्ट राजकीय नेतृत्वाची व त्यानंतर कम्युनिस्टांची. पहिल्या मुद्द्यांचा उलगडा करताना श्री. बाळासाहेबांच्या मतानुसार आजचे नेतृत्वही जन्मजात नाही, ते समाजातूनच निर्माण होते. वरील सगळे दोष स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निर्माण झाले आहेत. त्याचा दोष काही ना काही प्रमाणात राजकीय नेतृत्वावर टाकलाच पाहिजे.

सत्तेसाठी 'हे राजकारण आहे, त्यासाठी भल्याबुऱ्या गोष्टी कराव्या लागतात,' असे म्हणून राजकीय नेते वागतात. त्यासाठी ते भल्याबुऱ्या युक्त्या व साधने वापरतात. मग त्यांचा तो स्वभावच होतो व त्याचा दुष्परिणाम समाजावर होतो.

५ : पूर्वीही येथील नेतृत्व आणि सामान्य माणसे दोघेही दोषी होते. पण पूर्वीचे नेतृत्व जन्मजात होते. जसा राजा तशी प्रजा, किंवा जसा श्रेष्ठांचा आचार होई तसा इतरेजनांचा होई. म्हणून पूर्वी समाज सुधारताना नेतृत्वाचा विचार केला की, नियोजित काम जवळ जवळ साधल्यासारखेच असे. पण आता नेतृत्वाचा विचार करण्याचे कारण नाही व नव्हते. कारण आता काळ बदलला आहे व होता, म्हणून सामान्य माणसांत परिवर्तन होणे आवश्यक आहे, असा निष्कर्ष नवे सरसंघचालक डॉक्टर हेडगेवारांच्या विचारांचा दाखला देऊन मांडतात. ह्या खुबीदार विश्लेषणाचा ध्वन्यर्थ फारच रोचक आहे, ह्यात शंका नाही. पूर्वीच्या काळाप्रमाणे आता नेतृत्व जन्मजात राहणार नाही व सामान्य माणसांतून ते निर्माण होणार, म्हणून तशा दृष्टीने संघाचा प्रयत्न सुरू होणार म्हटल्यावर सद्य:परिस्थितीत सामान्य माणसात संघाविषयी विश्वास निर्माण करण्याकरता श्री. बाळासाहेब देवरसांना संघाची लोकशाहीविषयक भूमिका देशकालपरिस्थितीनुसार पूर्वीच्या सरसंघचालकांपेक्षा अधिक स्पष्ट करणे भाग पडले, ह्यात शंकाच नाही.

## संघाची लोकशाहीविषयक नवी भूमिका

१ : ते असे म्हणतात की, आपण द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय लोकशाही स्वीकारली आहे. ब्रिटिश पॅटर्न म्हणा, अमेरिकन पॅटर्न म्हणा, पश्चिम युरोपियन पॅटर्न म्हणा, असा स्वीकारला आहे.

२ : विशेष असा की, वरील विधानांमुळे श्रीगुरुजींच्या लोकशाहीविषयक मतांना— म्हणजे लोकशाहीमध्ये मनाची शांतता बिघडते, व्यक्ती व समाजामधील सुसंवाद नष्ट होतो, ती हिंदू जीवनाच्या

मूलाधाराला सोडून आह. इ. इ.–छेद जात नसला तरी नवे सरसंघचालक त्या गोष्टींवर भर न देता उलट लोकशाहीत अनेक पक्ष असतील तरी त्यांच्यातील संबंध मधुर राहतील, हा लोकशाहीचा संकेत आहे, असे आग्रहाने सांगत आहेत.

३ : इतकेच नव्हे तर संघ लोकशाहीच्या विरुद्ध नाही, संघ लोकशाहीच्या बाजूचा आहे, अशी नवी भूमिका समय जाणून ठामपणे मांडतात. श्री. देवरस पुढे म्हणतात की, "श्रीगुरुजींनी एक वेळ असे जरूर म्हटले होते की, लोकशाहीतील एक गोष्ट वाईट आहे. निवडणुकीकरता उभा राहिलेला उमेदवार परनिंदा करतो व आत्मश्लाघा करतो, हे वाईट आहे. केवळ आपल्या पक्षाचे कार्य सांगावे, कार्यक्रम सांगावा. परनिंदा व आत्मश्लाघा ही भारतीय संस्कृतीच्या विरुद्ध आहे. बस्स, एवढेच उचलले आणि श्रीगुरुजी लोकशाहीच्या विरुद्ध आहेत, अशी ओरड सुरू केली. गुरुजी लोकशाहीच्या विरुद्ध नव्हते व जगात आजच्या प्रचलित शासन पद्धतीत लोकशाही चांगली व इष्ट आहे, असे त्यांचे मत होते." (पाहा–पुस्तिका 'ज्ञानाय दानाय च रक्षणाय', देवरस यांनी १६।२।७५ रोजी पुणे येथे केलेले भाषण, प्रकाशक-भारतीय विचार साधना, पुणे, पान २ )

आता वरील उतारा आणि मी वर श्रीगुरुजींच्या 'विचार–धन' ह्या ग्रंथातील पान एकविसावरून उद्धृत केलेला उतारा यांची सर्व जिज्ञासूंनी काळजीपूर्वक तुलना करावी म्हणजे संघ लोकशाहीवादीच हे ठासून सांगण्याकरता आजचा संघ श्रीगुरुजींच्या नेतृत्वाखालील संघाची भूमिका वाकवण्याकरता किती टोकाला जायला तयार आहे, याची कल्पना सर्वांना अचूकपणे येईल. श्रीगुरुजींना समग्र लोकशाही पद्धतीतूनच अनिष्ट गोष्टी जन्माला येतात आणि निवडणुकींच्या काळात त्यांचा अगदी स्वैर उपयोग होत असतो असे म्हणावयाचे आहे. पण श्री. देवरसांच्या अर्थाप्रमाणे श्रीगुरुजींचे वरील विश्लेषण 'लोकशाहीतील एका वाईट गोष्टी' पुरतेच, म्हणजेच निवडणुकीत जन्माला येणाऱ्या प्रमाणापुरतेच मर्यादित आहे; ते समग्र लोकशाही पद्धतीविषयी लागू नाही. कारणे काहीही असोत, नव्या सरसंघचालकांनी माजी सरसंघचालकांच्या लोकशाहीविषयक भूमिकेचा जो नवा अर्थ घटपटादी करून ताणून लावला आहे, तोच यापुढे सर्व स्वयंसेवक प्रमाण मानून चालतील, ह्यात शंका नाही. त्याप्रमाणे संघ लोकशाहीवादीच आहे, अशी संघाची नवी भूमिका आहे, हे आपण मान्य केले पाहिजे.

४ : सामान्य लोकांत संघकार्याचा वाढता प्रसार करण्याकरता श्री. बाळासाहेब देवरस ह्यांना संघाची चातुर्वर्ण्यविषयक भूमिकाही कालोचितरीत्या वेगळ्या प्रकारे मांडावी लागत आहे. ही भूमिका त्यांनी पुणे येथील वसंत व्याख्यानमालेमध्ये गुंफलेल्या व गाजलेल्या व्याख्यानात खूपच तपशीलाने मांडली आहे, त्यावरून संघ आता श्रीगुरुजींची चातुर्वर्ण्यविषयक कडवी भूमिका टाळून तिचे स्तोम न माजवता यापुढे सामान्य जनात काम करणार असे दिसते.

५ : संघाची कार्यपद्धती जरी यापुढे मुळात होती तशीच राहणार असली, तरी श्री. बाळासाहेब देवरस ह्यांच्या कारकीर्दीत संघाबाहेर चालणाऱ्या व्यापक आंदोलनासंबंधीही संघाची भूमिका बदललेली दिसते. श्रीगुरुजींनी १९४२ च्या स्वातंत्र्य–आंदोलनात संघाला उतरू तर दिलेच नाही; पण याउपर ज्या संघबंधूंनी त्याविषयी आस्था दाखविली किंवा त्यात प्रत्यक्ष भाग घेतला त्यांची निव्वळ कठोर उपेक्षा केलीच; पण त्यांच्याबरोबरचे संघाचे असलेले संबंधही तोडले व त्यांचा मर्मभेदक उपहास केला, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. त्या तुलनेने नवे सरसंघचालक कोणत्या दृष्टिकोनातून या गोष्टींकडे पाहावयाला संघाला शिकवीत आहेत, हे पाहण्यासारखे आहे. बिहारच्या विशिष्ट परिस्थितीत जो व्यापक असंतोष आहे, त्यामुळे जयप्रकाशजींचे व्यापक आंदोलन सुरू झाले आहे, अशी आस्थेवाईक नोंद ते घेतात. नंतर वास्तविक संघापुढे तो विषय आला नाही. अधिकृतपणे चर्चाही झाली नाही. कोणताही आदेश स्वयंसेवकांना दिला गेला नाही. तरी पण असे असून संघाचे नाव विनाकारण घेतले जाते, असा खुलासा ते करतात. 'पण त्याचवेळी व्यापक जनसमर्थन म्हणून आंदोलनात काही संघबंधू सामील झाले असतील तेवढेच!' अशी गौरवार्थी नोंद घेतात. मग वरील संघबंधूंचा तेजोभंग करणे किंवा त्यांच्याबरोबरचे संबंध तटकन तोडून त्यांच्याकडे पाठ फिरवणे हे तर दूरच राहते. संघ काही बळ घेऊन राहिला आहे. देशातील महत्त्वाच्या घटनांमध्ये वस्तुनिष्ठपणे गोवला जाणार. पण कुठलेही व्यापक जनआंदोलन असो अनुशासनबद्ध, चारित्र्यवान आणि देशभक्त संघ संघटनेचा त्याच्याशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिसस्पर्श झाला तर, ते आंदोलन मोडतोडवारी न राहता, व्यापक जनसमर्थनवादीच बनेल, असा नवा आत्मविश्वास व धारणा संघाच्या ह्या नव्या भूमिकेत दिसते. म्हणूनच श्री. बाळासाहेब देवरस अशी घोषणा करतात की, संघाच्या स्वयंसेवकांचा प्रयत्न व जनतेचे व्यापक समर्थन असा जर योग आला तर, पाहता पाहता संघाचे काम प्रभावी होईल, समाजात परिवर्तन होईल. असे सामाजिक परिवर्तन संघाच्या माध्यमातून यशस्वी झाले, तर देशाचे चित्र बदललेले अवश्य दिसेल. ◻

# संघकार्याचे मूल्यमापन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेपासून आजच्या घटकेपर्यंत संघकार्याचे तात्त्विक अधिष्ठान, कार्यपद्धती आणि देशातील समकालीन महत्त्वाच्या घटनांसंबंधी स्थलपक्षकालपरिस्थितीनुसार संघाने घेतलेल्या भूमिकांतील स्थित्यंतरे ह्यांचा हा अतिविस्तृत परिचय शक्यतो संघनेत्यांच्या शब्दात मी सहेतुकपणे दिला आहे. कारण त्यामुळे आजवरच्या संघकार्याचा अर्थ लावून संघ भविष्यकाळात कोणत्या दिशेने वाटचाल करण्याचा संभव आहे व त्याचा भारतीय राजकारणावर कोणता परिणाम होईल, यासंबंधीचे माझे निष्कर्ष मला थोडक्या शब्दांमध्ये मांडता येतील.

### संघकार्याच्या विस्ताराची कारणमीमांसा

संघकार्याचा १९२५ पासून सतत विस्तार होत आहे. दोन भिन्न प्रकारची कारणे त्याला कारणीभूत आहेत. पहिल्या प्रकारची कारणे सापेक्षतः स्थिर स्वरूपाची आहेत तर दुसऱ्या प्रकारची कारणे पूर्ण तात्कालिक आहेत.

पहिल्या प्रकारातील पहिले कारण म्हणजे संघाची कार्यपद्धती. जनसमूहांविषयीचे एक मानसशास्त्र संघाला प्रथमपासून चांगले उमगले आहे. सर्वसामान्य माणसाला ध्येयवादाचे व समाजकार्याचे आकर्षण असते. पण त्याचे ओझे प्रमाणाबाहेर पडणार असेल तर त्याचा काच वाटू लागतो. मग तो थोडा निरस होऊनही का होईना, अलगदपणे अशा कामापासून बाजूला होतो. संघाने हे नीट ओळखले. त्यामुळे शाखेतील दैनंदिन उपस्थिती हेच संघाच्या सभासदांकडून अपेक्षित असलेल्या कमीत कमी व जास्तीत जास्त कामाचे व आपल्या कार्यपद्धतीचे सूत्र बनवून टाकले. त्यामुळे संघकार्यात भाग घेण्यामुळे आपल्याला देशकार्यात भाग घेता येतो, आपल्या कोंडलेल्या भावनांना नीट वाट करून देता येते. पण त्यापायी आपल्यामागे फारशा उपाधी चिकटत नाहीत असा अनुभव येऊन अनेक माणसे संघात वाढत्या संख्येने जाऊ लागली. या पद्धतीचा संघाला दुहेरी फायदा झाला. दैनंदिन उपस्थितीपलीकडे बाह्य अपेक्षा नसल्याने स्वयंसेवक प्रत्यक्षात अधिक मोकळ्या मनाने आपले तनमनधन संघाला देतात. आणि संघही परत एकदा त्यांचा उत्साह दैनंदिन उपस्थितीतच गुंतवायला सांगतो. याउप्पर जर काही विशेष कर्तृत्वाचे स्वयंसेवक संघाबाहेर संघ-संस्कारांना धरून कार्य करू लागले तर अशा स्वयं-चलित केंद्रांच्या लौकिकाचा सर्व लाभ संघाला मिळतो. पण संघ त्या कामाविषयी काहीच सोयरसुतक न बाळगल्यासारखा वागत असल्याने जर असल्या कामामुळे संघाला काही बाधा पोहचण्याची शक्यता दिसली तर संघ केव्हाही हात झटकून टाकायला मोकळा राहतोच. असल्या विश्वामित्री पवित्र्यामुळे श्रेयही साधते व प्रेयही साधते ! थोडक्यात, संघकार्यात अनायासाने काम करायची संधी मिळत असल्याने संघाला नवेनवे सभासद सतत मिळत गेले.

ह्या पहिल्या प्रकारातले दुसरे कारण म्हणजे भारतातील सर्व सेक्युलर व्यक्ती, पक्ष व अन्य संघटना हिंदू संस्कृतीच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाच्या आशयाबाबत जोपर्यंत संदिग्ध, गुळगुळीत, ओशाळलेली व द्व्यर्थी भूमिका घेत राहतील तोपर्यंत संघाच्या वैचारिक भूमिकेतील एका भागाबद्दल अनेक सामान्य माणसांना नेहमीच खोल आकर्षण वाटत राहील. अशी माणसे संघाला वारंवार मिळत गेली आहेत.

यापुढचे कारण म्हणजे अनेक लोकांना आधुनिक पद्धतीने कालोचित हिंदू संस्कार करणारी एक संस्था म्हणून संघाविषयी सक्रीय आस्था वाटते. हिंदू धर्मात कालमानानुसार स्वधर्मीय संस्कार करण्याकरिता व धर्मरक्षणाकरता सतत धडपडेल अशी चर्चसारखी संघटना नाही. ज्या काही परंपरागत संस्था आहेत, – (उदा. शंकराचार्यांची पीठे, मठ किंवा आश्रम, यात्रा–जत्रा इ. इ.)– त्यांनी एकतर असे काम करण्याचे केव्हाच सोडून दिले आहे. शिवाय आधुनिक जीवन किंवा विज्ञान यांची ओढ असलेल्या हिंदूंना या कामी तसल्या संस्थांचा आश्रय नको आहे. याकरता ज्यांना पारलौकिकात रस नाही व इहलोकाविषयी मात्र भरपूर रस आहे, असे 'आधुनिक' हिंदू, हिंदू–संस्कार व्हावेत, ह्याकरिता अशा आधुनिक संघटनेच्या सतत शोधात असतात. त्यांच्यातील बऱ्याच लोकांची गरज संघ नेमकी भागवितो.

ह्याच संदर्भात संघाच्या शिस्तीची लोकांना का भुरळ पडते, या गोष्टीचा उलगडा होईल. देशभक्त व जबाबदारीची जाणीव असणाऱ्या आणि सामूहिक जीवनाची सवय असणाऱ्या लोकांच्या अनुशासनबद्ध सामाजिक, किंवा राजकीय संघटना आपल्या समाजात तुरळकपणेच सापडतात. शिस्तबद्ध सामूहिक जीवनाची, कार्याची किंवा संघटनेची जीवनमरणाचा प्रश्न वाटण्याइतपत मनोमनीची गरज व टोकाची निकड हजारो लोकांना जाणवते. पण कळते पण वळत नाही, असा प्रकार असल्याने संघाच्या अनुशासनबद्ध, चारित्र्य-कर्मामुळे लोक चकित होतात व हळूहळू स्वतःला संघकार्यात गुंफून घेतात.

संघाचा आजवर सतत विस्तार होत गेला, ह्याची ही तुलनेने स्थिर स्वरूपाची कारणे. पण संघकार्याला काही काही कालखंडात जो बहर आला, त्याची काही तात्कालिक कारणेही आहेत. ती पुढीलप्रमाणे :–

## काही तात्कालिक कारणे

काँग्रेस–आंदोलनाच्या नेत्यांनी १९२० पासून १९४७ पर्यंत व काँग्रेस आणि तत्सम सेक्युलर पक्षांनी १९४७ नंतर निवडणुकीच्या राजकारणाच्या संदर्भात सतत किंवा अधूनमधून मुसलमानांच्या तुष्टीकरणाचे राजकारण सतत खेळले. त्याचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे तत्त्व किंवा डावपेचाच्या नावाखाली हिंदूंचा जो एकतर्फी तेजोभंग सतत होत राहिला तो न सहन झालेले अनेक हिंदू अधिकाधिक मोठ्या संख्येने संघात दाखल झाले.

हा मुद्दा प्रा. नरहर कुरुंदकर ह्यांनी 'गोळवलकर गुरुजी आणि चातुर्वर्ण्य' ह्या त्यांच्या एका उत्तम निबंधात फार उत्तमपणे मांडला आहे. ते म्हणतात, 'वर्णव्यवस्थेचे खोटेपण सिद्ध करणे, जातिव्यवस्थेचा प्रतिगामीपणा मांडणे, यामुळे गोळवलकरांचा पराभव करता येईल अशी जर कुणाची समजूत असेल तर, तो भोळेपणाचा कळस मानला पाहिजे. संघाजवळ कनिष्ठ वर्गीयांचे हितसंबंध रक्षण करणारे तत्त्वज्ञान आहे. पण कनिष्ठ अगर वरिष्ठ मध्यमवर्गीय लाखो तरुण जे संघात जातात, ते जमीनदारी आणि भांडवलशाहीच्या रक्षणासाठी जात नाहीत. गुरुजींचे खरे सामर्थ्य स्वतःभोवती सुशिक्षित हिंदू तरुण उभा करण्यात आहे. हा सुशिक्षित हिंदू तरुण एका आणीबाणीने पछाडलेला आहे. त्याला असे वाटते की, या देशातील सरकार दुबळे आणि मुसलमानधार्जिणे आहे. या सरकारच्या हातात बहुसंख्यांक हिंदूंचे जीवित सुरक्षित नाही; म्हणून हा तरुण संघाच्याभोवती जमत असतो. सर्व सेक्युलर पक्षांनी सुधारणाद्रोही, राष्ट्रद्रोही, आक्रमक मुस्लीम जातीयवादाविषयी नेहमीच जे शरणागतीचे, तडजोडीचे, मूक पाठिंब्याचे धोरण स्वीकारले आहे, त्याची चीड म्हणून सुशिक्षित हिंदू संघात जातो. ही लाखोंची फौज मग गुरुजी त्यांना योग्य वाटणाऱ्या राजकारणासाठी वापरू शकतात. गोळवलकरांचा विजय हा हिंदू समाजातील आधुनिकतावादाचा पराजय आहे. मुस्लीम जातीयवादाच्या प्रश्नाबद्दल स्पष्ट व न्याय्य भूमिका घेतल्याशिवाय आणि मुस्लीम समाजातील कर्मठपणाच्या भिंतीला तडे गेल्याशिवाय गोळवलकरांचा पराभव होऊ शकणार नाही.'

प्रा. कुरुंदकरांचे हे विवेचन अतिशय यथार्थ आहे. काँग्रेसच्या

स्वातंत्र्य–आंदोलनाच्या काळात मुस्लीम लीगच्या अनुयायांचे हिंसात्मक, जातीय, काँग्रेस व राष्ट्रविरोधी राजकारण जसजसे उफाळत गेले; हिंदू–मुसलमान दंग्यांचे प्रमाण वाढत गेले, तसतसे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मनुष्यबळ वाढत गेले. फाळणीच्या वेळेस रक्ताचा जो प्रचंड सडा पडला, त्यामुळे तर संघाच्या छावणीत हजारो नव्या स्वयंसेवकांची भरती झाली. त्यानंतरच्याही काळात १९५० मध्ये त्यावेळच्या पूर्व पाकिस्तानात हिंदूंचे जे जवळ जवळ शिरकाण झाले, त्यावेळेसही संघाला परत एकदा मोठ्या संख्येने माणसे मिळाली.

संघाच्या अनुयायांत व हितचिंतकांत असलेल्या कट्टर प्रतिक्रियावादी हिंदूंचाच भरणा जास्त होता, यात नवल नाही. तो दोष संघाचा म्हणजे संघनेत्यांचा नव्हता. ती एक वस्तुस्थिती होती. ( A fact of life.) १९२०–४७ पर्यंत महात्मा गांधींच्या समग्र तत्त्वज्ञानावर म्हणजे त्यांच्या रामराज्य, चातुर्वर्ण्य, अहिंसा, चरख्याचे अर्थशास्त्र, किंवा ब्रह्मचर्य इत्यादी विषयींच्या विचारांवर काडीमात्रही विश्वास वा श्रद्धा नसलेले हजारो लोक महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य–आंदोलन अत्यंत परिणामकारक, वास्तव व प्रभावी आहे, हे जाणून काँग्रेसच्या ध्वजाखाली उभे राहिले. त्यासारखीच ही एक गोष्ट आहे.

पण असे प्रतिक्रियावादी हिंदू, हिंदुमहासभेत किंवा रामराज्य–परिषदेत का गेले नाहीत, हा प्रश्न विचारला जाईल व गेला. त्याचे दुसऱ्या सरसंघचालकांनी दिलेले उत्तर असे की, 'स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या हिंदुत्व या पुस्तकातील हिंदू राष्ट्रवादाचा विशुद्ध सिद्धान्त हाच हिंदुमहासभेने आपल्या कार्याचा आधार मानला. परंतु आपल्या नासिक अधिवेशनात हिंदूमहासभेने असा ठराव संमत केला की, 'मुस्लीम लीगबरोबर बोलणी करून काँग्रेसने आपली 'राष्ट्रीय' भूमिका सोडू नये. ते काम तिने हिंदुमहासभेवर सोपवावे.' याचा अर्थ असा की, त्यांच्या मते काँग्रेसचा संमिश्र राष्ट्रवाद हा शुद्ध राष्ट्रवाद आणि हिंदुमहासभा ज्या हिंदुराष्ट्रवादाचे प्रतिनिधित्व करते, तो आत्यंतिक जातीयवाद व राष्ट्रविरोधी मुस्लीम लीगची प्रतिक्रिया म्हणून उभा राहिलेला राष्ट्रवाद ही अशी विकृत धारणा का निर्माण झाली ? कोणत्याही वेळी, अगदी स्वप्नात देखील–' होय, हे हिंदू राष्ट्र आहे' असे खणखणीत उत्तर यावे इतकी दृढमूल श्रद्धा त्यांच्या ठिकाणी नव्हती, हेच त्याचे कारण आहे.'

श्रीगुरुजींचे उत्तर काही अंशी सत्य आहे. पण प्रतिक्रियावादी हिंदू, हिंदुमहासभेत गेले नाहीत याची काही अन्य कारणेही आहेत. एकतर हिंदुमहासभेचे राजकारण अतिचंचल व बेभरवशाचे होते. दुसरे म्हणजे हिंदुमहासभा हा एक थंभुमेळा होता. त्यातील स्वातंत्र्यवीर सावरकर आणि अशाच काही मूठभर व्यक्तींचा अपवाद केला तर, बाकीच्या मंडळींचे सार्वजनिक कार्य कार्याला शोभा आणण्याइतपतच बेताचे होते. तिसरे म्हणजे सावरकरांचे व्यक्तिमत्त्व इतके प्रखर पण स्वयंकेंद्रित होते की, शांत व सुसंघटित लोकसंग्रह करणे त्यांना जमले नाही. ती त्यांची वृत्तीच नव्हती. परिणामी हिंदुमहासभा एकजीव, शिस्तबद्ध, कडवी संघटना अशी प्रतिमा निर्माण करू शकली नाही. चौथी गोष्ट म्हणजे सावरकरांची धर्मविषयक मीमांसा फारच उथळ होती. बहुसंख्य प्रतिक्रियावादी आधुनिक हिंदुत्ववाद्यांना जरी त्यांच्या विज्ञानवादी, आक्रमक हिंदुसुधारणावादाविषयी कुतूहल व रुची वाटली तरी, उलट टोकाला जाऊन सावरकरांचा कोरडा, भावशून्य व एकाटलेला नास्तिकवाद स्वीकारण्याइतपत त्यांची वृत्ती शुष्क व रॅशनॅलिस्ट नव्हती. हिंदुमहासभेकडे हे लोक वळले नाहीत, याचे शेवटचे पण निर्णायक महत्त्वाचे कारण म्हणजे, स्वातंत्र्यवीर सावरकरांपाशी सर्वसामान्य प्रतिक्रियावादी, हिंदुत्ववाद्यांना सांभाळू शकणारी कार्यपद्धती नव्हती, हे आहे. उदाहरणार्थ, वीर सावरकर व श्रीगुरुजी दोघेही रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले इत्यादी तत्त्वांचा पुरस्कार करून गांधीप्रणीत अहिंसावादाचा उपहास करत. पण त्याचवेळी आपल्या तेजस्वी अनुयायांनी जात्यंध, अत्याचारी मुस्लीम लीगच्या अनुयायांवर उद्याचा वायदा न करता, 'याचि देही याचि डोळा' शस्त्रांनिशी तुटून पडावे असे सावरकरांना तळमळीचे वाटे. हे जमले नाही तर, आपल्या कुवतीनुसार निदान निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग तरी, आपल्या शिष्यांनी चोखाळावा अशी चेतना ते वारंवार देत. भागानगरला जाऊन जुलमी निजामी राजवटीला आव्हान देणारा सत्याग्रह करण्याची हिंमत, कशी का होईना हिंदुमहासभेनेच दाखविली ही वस्तुस्थिती आहे. त्याचप्रमाणे सावरकरप्रशंसित तत्त्वांना शिरोवंद्य मानून युयुत्सू विचार, शब्द आणि कृती यांमधील अंतर (अत्यंत घोर, विपरित व चुकीचे असे हिंसात्मक व साहसवादी कृत्य करून का होईना) भरून काढण्याचा प्रयत्न ज्यांनी १९४७ च्या आगेमागे केला ती माणसे वीर सावरकरांचीच अनुयायी माणसे होती, ही वस्तुस्थिती कोणालाच नाकबूल करता येणार नाही. सर्वसामान्य माणसांनाही जात्यंध मुस्लिमांचा व त्यांना लोटांगण घालणाऱ्या सेक्युलरवाद्यांचा तिटकारा येई. पण साहजिकच एवढे सावरकरनिर्देशित ओझे त्यांना जमण्यासारखे नव्हते. असे सर्वसामान्य प्रतिकार्यात्मिक हिंदू अर्थातच सरतेशेवटी संघाकडेच वळत राहिले. संघ त्यांच्या क्षोभाला तोंड फोडे आणि त्याचवेळी अकर्मात कर्म या सूत्रानुसार त्यांची धावपळीच्या जीवनातून मुक्तता करीत असे.

## संघ, फाळणी व संघाची तथाकथित निष्क्रियता

ह्याच धोरणाला धरून श्रीगुरुजींनी संघाला १९४२ च्या स्वातंत्र्य-आंदोलनात किंवा १९४७ च्या रणसंग्रामात उतरू दिले नाही. श्रीगुरुजींचे हे धोरण अत्यंत वादग्रस्त बनून राहिलेले आहे. त्या धोरणावर संघाचे विरोधक तर वेळोवेळी तुटून पडत असतातच; पण संघाचे किती एक चांगले कार्यकर्ते त्यामुळे संघ सोडून गेले किंवा संघातच त्या पुढच्या काळात हिरमुसलेपणाने वावरले. देशकाजापेक्षा निव्वळ संघकार्याचाच विचार केला तर दुसऱ्या सरसंघचालकांचे वरील धोरण संघाच्या दृष्टीने फारच शहाणपणाचे व दूरदर्शीपणाचे होते, असे मला वाटते. ह्याची कारणे स्पष्ट आहेत.

भारतीय राष्ट्रवाद्यांनी कितीही निकराची धडपड केली असती तरी हिंदुस्थानची फाळणी अटळच होती, असे काही विचारवंतांचे मत आहे. हा वादग्रस्त प्रश्न यापुढे भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांत अखंडपणे उलटसुलट बाजूने चर्चिला जाईल. पण आपण निदान एवढे म्हणू शकतो की जर फाळणी टाळताच आली असती तर त्या कामाची सुरुवात फार आधीपासून करावयास हवी होती. संघाच्या बाबतीत हा मुहूर्त अर्थातच संघस्थापनेच्याच वेळी साधता

आला असता. तो क्षण एकदा निसटल्यावर तर मग अटळपणे तशी वेळ परत येणार नव्हती.

पण हा कालयोग जाणण्याकरता आद्य सरसंघचालकांना मुळातच एक वेगळा संकल्प व वेगळी भूमिका घ्यावी लागली असती. आपल्या समाजातील ज्या वर्गापाशी प्राणभयाने वा सत्तासंपत्तीच्या लोभाने, स्वदेश व स्वधर्म ह्यांच्या रक्षणार्थ ताठ उभे राहण्याचे मानसिक सामर्थ्य वा स्वाभिमानी वृत्ती नव्हती. त्या वर्गाच्या हित-संबंधामुळे व भ्याडपणामुळे आपण पराभूत झालो, हा आद्य व द्वितीय सरसंघचालकांचा हिंदू इतिहासाचा निष्कर्ष बरोबरच होता. पण मग जर हिंदुस्थानचे संभाव्य विभाजन टाळण्याचे त्यांनी ठरविले असते तर, त्यांना सुसंघटित हिंदू समाज निर्माण करण्याकरता अत्यावश्यक असलेले सूक्ष्म संस्कारकार्य व बिकट होत जाणाऱ्या परिस्थितीच्या आव्हानाला तोंड देण्याचे कार्य एकाच वेळी बजावावे लागणार होते. त्याकरता स्वातंत्र्य-आंदोलनांचे नेतृत्व कांग्रेसपासून खेचून आपणाकडे आणण्याचा अचाट भगीरथ प्रयत्न त्यांना करावा लागला असता. तत्त्वतः ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट साधण्याकरता त्यांना एक मार्ग मोकळा होता. ही गोष्ट आपण गतेतिहासाचे समीक्षक म्हणून सांगू शकतो.

तो मार्ग असा की, विभाजनपूर्व हिंदुस्थानातील साऱ्याच हिंदूंचे हितसंबंध हे सत्तासंपत्तीत अडकून पडलेले नव्हते. सत्तासंपत्तीधारी वर्गाबाहेर अक्षरशः कोटयवधी निर्धन, सत्तावंचित हिंदूंचा एक विशाल सागर ह्या देशात पसरलेला होता. ह्या सर्वहारा हिंदूंपाशी नव्हता जातीचा अहंकार, नव्हता ज्ञानाचा दंभ, नव्हती सत्तासंपत्ती साचविणारी विद्या, आणि वितभर पोट जाळण्याइतपतंही धन त्यांच्यापाशी तर नव्हतेच नव्हते. हिंदूंचा हा वर्ग त्यांच्या वरिष्ठांप्रमाणेच बेशिस्त, असंघटित, लाचार व भ्याड होता ही गोष्ट तंतोतंत खरी होती; पण ह्या स्मृतिभ्रंशित, पददलित हिंदूंच्या मनावरील आत्मविस्मृतीची व तज्जन्य निष्क्रियतेची काजळी जर कोणी पूर्णपणे झटकून टाकली असती, तर ह्या सर्वहारा हिंदूंना बांधणारा जगातला असा कोणताच मोहपाश नव्हता की, ज्याकरता ते आत्मरक्षणार्थ जिवानिशी लढले नसते. नाही तरी एरवी आत्मविस्मृत हिंदूंना जागृत करण्याचे अशक्यप्राय आव्हान आद्यसरसंघचालकांनी स्वीकारून संघाचे काम आपल्या हातात घेतले होतेच ना? म्हणून तत्त्वज्ञ, अशा सर्वहारा हिंदू दलितवर्गाला जागृत करून राष्ट्रवादी स्वातंत्र्य-आंदोलन उभारण्याचा मनोमनीचा प्रयत्न जर कोणी केला असता, तर त्या आंदोलनाने महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील वस्तुनिष्ठरीत्या मुसलमानधार्जिणी बनलेल्या कांग्रेसच्या स्वातंत्र्य-आंदोलनालाही झाकाळून टाकले असते; अशा आंदोलनात कदाचित अहिंदू व विशेषतः मुसलमान समाजातील पददलितांनीही आंदोलनाच्या मूळ हेतूविषयी धास्ती न बाळगता एकजुटीने (मुल्ला-मौलवी किंवा कायदेआझम जिनांसारखे सर्वस्वी सेक्युलर पण जात्यंध पुढारी ह्यांच्यापासून आपल्याला तोडून) भाग घेतला असता व अशा प्रकारे फाळणी कदाचित टाळता आली असती. एका छोटेखानी व्हिएटनामच्या देशभक्त जनतेने स्वातंत्र्य मिळविण्याकरता व देशाची फाळणी होऊ न देण्याकरता सतत पंचवीस वर्षे जगातील सर्वश्रेष्ठ सत्ताधीशांशी कडवा लढा दिला व तो समाज त्यात पूर्ण यशस्वी झाला, तर मग ही गोष्ट हिंदुस्थानातही घडू शकली असती. त्यात अशक्यप्राय असे काय होते !

पण तसे झाले नाही. एक तर सूक्ष्म व स्थूल असे समाजघटनेचे दुहेरी कार्य करणारे दोनच महापुरुष हिंदू समाजाने निर्माण केले. भगवान कृष्ण व महात्मा गांधी. ते दोघेही राजकारण चालवीत आणि धर्मकारणही चालवीत. कदाचित ह्या बाबतीत आपण उणे पडू; एवढी जबाबदारी आपल्याला पेलणार नाही, असा विचार डॉ. हेडगेवारांच्या मनात कुठेतरी येऊन गेला असेल. एका भराला आलेल्या पण चुकीच्या दिशेने जाणाऱ्या स्वातंत्र्य-आंदोलनावर स्वार होणे ही गोष्ट काही साधी नव्हती. डॉक्टरांसारख्या लोकोत्तर पुरुषाला या दोघा महापुरुषाची उंची आपल्याला गाठता येणार नाही, असे वाटले असेल तर मग तो त्यांचा दोष होऊ शकत नाही. उलट खरोखर समाजहितैषी गुणच ठरतो. दलित नेतृत्व-खालील स्वातंत्र्य-आंदोलन डॉक्टरांना उभे करता आले नाही, याचे आणखीही एक कारण आहे. डॉ. हेडगेवार ह्यांनीही एका बाबतीत भगवान श्रीकृष्ण, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधींच्याच पावलावर पाऊल टाकले. तथाकथित गुणकर्मांवर आधारलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था हा डॉक्टरांच्या व नंतर श्रीगुरुजींच्या आकर्षणाचा विषय बनला. शिवाय आपल्या राजकारणाला वजन व बळ प्राप्त करण्याइतपतच उपयोग ज्याप्रमाणे लोकमान्य टिळकांनी तेल्यातांबोळयांचा केला व महात्मा गांधींनी थोडे पुढे जाऊन दरिद्रीनारायण समाजाशी नाते जोडले, तेवढाही प्रयत्न व उपयोग डॉक्टर हेडगेवारांनी व नंतर श्री. मा. स. गोळवलकर ह्यांनी केला नाही. तर मग सर्व हिंदू दलित समाजाला स्वतःच्या पायावर उभे-खडे करून त्यांच्यात असीम आत्मविश्वास व लोकोत्तर नेतृत्व निर्माण करण्याचा तर संकल्प सोडूनच द्या. या अपयशाचे कारणही स्पष्ट आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, जयप्रकाश नारायण किंवा विनोबा ह्यांच्या राजकारणाप्रमाणेच डॉ. हेडगेवारांच्या व संघाच्या कार्याचा परीघ सत्तासंपत्तियुक्त हिंदू जातिवर्गापलीकडच्या हिंदूंपर्यंत व अर्थातच तत्सम अहिंदूंपर्यंत खऱ्या अर्थाने पोहचूच शकला नाही. भारतीय स्वातंत्र्य-आंदोलनात सेक्युलरवादी व हिंदुत्ववादी दोन्ही तऱ्हेचे नेतृत्व भारतातील दलित हिंदू वर्गात व म्हणून-दलित अहिंदू -नवे राष्ट्रीय नेतृत्व निर्माण करू शकले नाही, हीच भारताच्या आधुनिक इतिहासातील एक महान शोकांतिका आहे.

पण असो! एकदा डॉ. हेडगेवार व श्रीगुरुजी यांनी अकर्मातून कर्म साधण्याच्या सूक्ष्म कार्यपद्धतीचा स्वीकार केल्यावर १९४२ च्या आंदोलनात व १९४७ च्या आसपासच्या रणसंग्रामात उडी न घेण्याचा जो निर्णय दुसऱ्या सरसंघचालकांच्या नेतृत्वाखालील संघाने घेतला तो बरोबरच होता, असे मला वाटते. कारण अटळ यशाच्या वाटेपलीकडचे जे हौतात्म्य असते ते निरर्थक, वांझ व कमकुवत मनाचे द्योतक ठरते. असला जोहार आपल्याला क्षणभर दिपवून टाकतो. पण तो शेवटी विनाशालाच कारणीभूत होतो. म्हणून संघाने हा मोह वरील दोन निर्णायक प्रसंगी टाळला, ह्यात संघाचा फायदाच झाला. १९४२ च्या स्वातंत्र्य-आंदोलनाच्या व फाळणीच्या काळात ज्या कारणांकरता भारतीय साम्यवादी पक्षाला

नवी माणसे मिळाली व त्याच्या कार्यांचा विस्तार झाला, त्याच-कारणांमुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही ह्या काळात साम्यवादी पक्षाच्या तुलनेत तर अफाटच माणसे मिळाली व संघकार्याला विलक्षण बहर आला. तिसऱ्या सरसंघचालकांच्या कारकीर्दीत संघाने जनआंदोलनात थोडासा भाग घेताच स्वकीय राज्यकर्त्यांनीच संघावर बंदी घालून जो घाव घातला आहे, तो विचारात घेतला तर हिंदुधर्मसंस्कृतिरक्षणार्थ सतत चिरंतन मूलगामी कार्य करण्याकरता पहिल्या व दुसऱ्या सरसंघचालकांनी संघाच्या कार्यावर व कार्य-पद्धतीवर ज्या मर्यादा घालून घेतल्या, त्याचे रहस्य ध्यानात येईल.

मला वाटते की, हा प्रश्न संघासारखे काम करणाऱ्या जगभरच्या सर्वच काळातील सर्वच संघटनांपुढे वारंवार निर्माण होत असतो व त्याचे खरोखरी ठोकळेबाज उत्तर देता येणार नाही. अगदी भारतातीच आजचे उदाहरण घेता येईल. सर्वोदय सेवा संघाने समग्र भारतीय समाजाच्या कायापालटाचे रचनात्मक कार्य अशाच सूक्ष्म व कुशल दिशेने चालवावे, असा प्रयत्न विनोबाजी त्या संघटनेत सतत करीत राहिलेले होते. पण ज्यांचा धीर सुटला व सद्यःपरि-स्थितीच्या वादळाला आपण वेळीच तोंड दिले नाही तर सर्वनाशच, अशी ज्यांच्या मनाची धारणा झाली ते कसलेले कार्यकर्ते विनोबांच्या कार्यपद्धतीवरच तुटून पडले. परिणाम एवढाच झाला की, त्यात सर्वोदय संघटना विरून गेल्याचेच फलित मात्र हातात आले. देशाला वा समाजाला एक संघटना मेल्याचा फायदा काय झाला हे पुढे दिसावयाचेच आहे.

मात्र हा प्रश्न वरवर वाटतो एवढा सोपा नाही. त्याला एक दुसरी बाजू आहे. काही केले तरी कुठलीही संस्था चिरकाल चांगली राहत नाहीच आणि टिकतही नाहीच. बरं, ती जरी शरीराने टिकली तरी, जीवनहेतूच्या दृष्टीने जर केव्हाच विगतप्राण झाली असेल तर, असली भाकड गाय जिवंत राहिली काय आणि मेली काय, ती असून नसल्यासारखीच असते. संस्था जन्माला येतात आणि मरतात. पण समाजजीवन चालूच राहते व म्हणून मूलगामी परिस्थितिजन्य आव्हानांना तोंड देताना मरण आले तरी, ते वीरोचित व श्रेयार्थीच असते, ही या प्रश्नाची दुसरी बाजू.

आपण कॅथॉलिक चर्चचे उदाहरण घेऊ. आसपासची परिस्थिती कशीही असो, देशामध्ये हिटलरची नाझीशाही असो, मुसोलिनीची फॅसिस्टशाही असो, फ्रँकोप्रमाणे लष्करशाही असो, इंग्लंड–अमेरिके-प्रमाणे लोकशाही असो आणि संधी मिळाली तर पूर्व युरोपीय देशां-तील किंवा चीनमधील कामगारवर्गीय हुकूमशाही असो, कॅथॉलिक चर्च व त्याचे व्हॅटिकनस्थित पोपीय नेतृत्व कॅथॉलिक ख्रिस्ती धर्माचे रक्षण डोळ्यात तेल घालून करीत असते व त्याकरता सर्व तऱ्हेच्या घटपटादी युक्त्या–प्रयुक्त्या लढवीत असते. मुख्य म्हणजे सत्ताधीश कुठल्याही लायकीचे, हीन कर्तृत्वाचे वा जुलमी असोत, चर्च सत्ता-धीश नेतृत्वाला व त्यांना समोरासमोर दुखवत नाही. संघापुढे हा एक मार्ग मोकळा आहे. दुसरा मार्ग स्वतःचे बलिदान करणाऱ्या मूळच्या खालसा पंथाचा व त्यांच्या तेजस्वी गुरूंचा आहे. दोहोंमध्ये फरक करून कोणता श्रेष्ठ तर कोणता कनिष्ठ अशी चर्चा कधीच संपणार नाही. त्या दृष्टीने आपली मूळ प्रकृती लक्षात घेऊन, संघ सूक्ष्म मार्गाचाच स्वीकार करेल व तोच त्याच्या व संघाच्या अंतिम उद्दिष्टांना पोषक ठरेल; असे मला वाटते. कारण दोघांचा तोल सांभाळायला फार तर महात्मा गांधींना जमले. एरवी शुक किंवा जनक, लोकमान्य किंवा विनोबा यांच्या मार्गातील एकाचीच निवड करावी लागते. संघकार्याचा इतिहास पाहिला तर, संघाला महात्मा गांधींचा मार्ग तर सोडाच, लोकमान्यांचा विहंगम कर्मयोगी मार्गही उपयोगी पडणार नाही. त्याचे संरक्षणसंवर्धन विनोबांचा पिपीलिका-मार्गच करेल, यात संशय नाही. कारण कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी, संघ महात्मा गांधींऐवजी विनोबांनाच सर्व दृष्टीने फार फार जवळचा आहे, हे सत्य वरील आवरण दूर करताच नजरेस येते.

## संघविस्ताराचे दुसरे तात्कालिक कारण

१९५० नंतर जात्यंध मुसलमानांच्या तुष्टिकरणाचे, भारतातील सेक्युलर पक्षांचे राजकारण जसजसे मंदावत जात आहे, तसतसे त्या प्रमाणात संघाचे भरघोस माणसे मिळविण्याचे एक क्षेत्र आटत चाललेले आहे. अर्थात अजूनही जोपर्यंत भारतातील सेक्युलर संघटना व विचारवंत व विशेषतः आजचा राज्यकर्ता पक्ष व त्याचे सर्वोच्च नेते हिंदू संस्कृती व भारतीय राष्ट्रवादाचा आशय व अन्वयार्थ ह्यांच्या परस्परसंबंधाविषयी शास्त्रशुद्ध व निर्भीड भूमिका घेत नाहीत; तोपर्यंत संघाच्या कार्याला थोडाफार वाव मिळणारच, हे उघड आहे. त्याचप्रमाणे निवडणुकीच्या राजकारणातील सर्वच पक्ष व विशेषतः राज्यकर्ता काँग्रेस पक्ष जोपर्यंत मुसलमानांची एकगठ्ठा मते मिळविण्याकरता उलटसुलट कोलांट्या उड्या मारत राहतील, तोपर्यंत संघकार्याला थोडा अवसर मिळणार, हे स्पष्टच आहे. विदेश-नीतीच्या बाबतीतही जर कुठे पाकिस्तानधार्जिणेपणाचा भास लोकांना झाला तर, त्याचा काही लाभ संघालाच होणार.

पण वस्तुनिष्ठपणे विचार केला तर, १९५० नंतर हे सर्व संबंधि-तांना दिसून येत आहे की, भारतीय गणराज्यात प्राधान्याने हिंदूंचेच राज्य चालू आहे. (तसा वस्तुनिष्ठ विचार केला तर महात्मा गांधी-प्रणीत स्वातंत्र्य आंदोलनही हिंदू-हितरक्षणार्थच झुकलेले होते. पण गांधींच्या तुष्टिकरणनीतीच्या अतिरेकामुळे ती गोष्ट झाकली जात होती एवढेच.) बांगला देश स्वातंत्र्यनिर्मितीच्या युद्धात श्रीमती इंदिरा गांधींनी जो निर्णायक विजय मिळविला, त्यामुळे तर आजचे भारतीय शासन भारतवर्षातील जात्यंध मुसलमानी आक्रमकांपुढे सदैव पडते घेते व मार खाते, ह्या तक्रारीचा बुडबुडाच फुटून गेला आहे. हिंदू–मुसलमान प्रश्नाच्या संदर्भात संघाच्या पायाखालील वाळू १९५० नंतर घसरत चाललेली होती व आता तर तो प्रश्न जवळजवळ संपलाच आहे. मुळात संघकार्य हे प्रतिक्रियात्मक नसल्याने व ते संथपणे चालतच राहणार असल्याने वरील गोष्टींमुळे संघ संपलाच असता, असे म्हणणे आततायीपणाचे ठरले असते, पण त्याचवेळी संघाच्या विस्ताराला जाणवण्याइतपत आळा बसला असता हे नक्की.

पण हे घडले नाही, ह्याचे कारण भारतातील वाढती साम्यवादी चळवळ व चीनचे आक्रमण. प्रत्यक्षात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात भारतातली साम्यवादी चळवळ आपल्या संघटनाबळामुळे व सतेज मनुष्यबळामुळे इतरेजनांना धाक व धास्ती वाटू लागेल एवढी प्रबळ व रसरसलेली अशी कधीच नव्हती. भारतातील साम्य-वादी चळवळ जोपर्यंत भारतातील दलित व बहुजनसमाजाशी एक-

जीव व एकरूप होत नाही, तोपर्यंत ती अशीच दुबळी राहणार. भारतातील हिंदू, बौद्ध, जैन धर्म, संस्कृती, इतिहास व समाज ह्यांच्या नागमोडी विकासक्रमात गुंफल्या गेलेल्या व सनातन काळापासून भारतवर्षातील बहुसंख्य दलितशोषित वर्गांच्या श्रमांवर पोसत गेलेल्या परंपरेचा आपलेपणाने खोल अभ्यास करून त्यातून मनुष्यमात्राच्या स्वातंत्र्याकांक्षी समानतेचे मुक्तितत्त्व शोधून काढण्याची नितांत, तातडीची व क्रांतिनिष्ठ गरज जोपर्यंत भारतातील साम्यवादी नेतृत्वाला, विचारवंतांना व चळवळीला पडणार नाही व पटणार नाही, तोपर्यंत भारतातील साम्यवादी चळवळ अशीच निस्तेज राहणार. कारण त्याशिवाय भारतातल्या बहुसंख्य दलित वर्गांच्या वाट्याला आलेल्या इतिहासजन्य शोषण, अन्याय व वंचना ह्यांना नाहीसे करून त्यांचे निर्दालन करणाऱ्या व कधीकधी अतिमंदपणे, तर कधीकधी जलदपणे विकसित होत गेलेल्या मुक्तिनिष्ठ श्रेयात्मक साध्यांच्या व आयुधांच्या परंपरेचे ज्ञान व भान साम्यवाद्यांना होणार नाही. दलितांच्या न्यायासाठी व दुरितांच्या विरुद्ध झगडणाऱ्यांना दलितांच्या हातात, आपापल्या परंपरेने घडवत आणलेली अनुभवजन्य हत्यारे द्यावी लागतात. एरवी त्याशिवाय क्रांती होत नसते आणि क्रांतिकारक चळवळ वाढत नसते. हाच अनुभव भारतातील साम्यवादी चळवळीला येत आहे. वैचारिक ठोकळेबाजपणामुळे तिला अजूनही दलित व बहुजनसमाजाच्या अंतरंगात प्रवेश मिळविण्याच्या कामी अपयश मिळत आहे. ही झाली तिच्या बलहीनतेची मूळ कारणे.

पण आपण अगदी वरवर विचार केला तरी, येथल्या साम्यवादी चळवळीने गेल्या पाच सार्वत्रिक निवडणुकांत लोकसभेच्या संदर्भात लक्षात घ्यावी लागतील अशी मते (टक्केवारीने विचार केला तर) गोळा केलेली दिसत नाहीत. त्याचप्रमाणे पश्चिम बंगाल व केरळ ह्यांचा अपवाद सोडला तर, नजीकच्या काळात त्यांच्या हातात किमान राज्यपातळीपर्यंत ही सत्ता येण्याची शक्यता थोडीच दिसते. मुख्य म्हणजे ती चळवळ १९६० नंतर आतून पोखरलेली व दुभंगलेली अशीच राहिली आहे.

असे जर आहे तर भारतातील बहुसंख्य विचारवंत, बुद्धिजीवी वर्ग, वरिष्ठ आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय, सुशिक्षित वर्ग, साम्यवादी विचारसरणीमुळे व चळवळीमुळे एवढे चिंताग्रस्त व भयग्रस्त का झाले आहेत, असा प्रश्न पडतो. उत्तर अगदी सरळ व उघड आहे. हा शहरात व आता हळूहळू ग्रामीण भागात पसरत चाललेला सुशिक्षित मध्यमवर्ग आधुनिकतेचे युग निर्माण करू इच्छितो. त्याला विज्ञानयुक्त औद्योगीकरण हवे आहे. यांत्रिकीकरणाची त्याला ओढ आहे. भांडवलशाहीप्रगत पाश्चात्य देशातील उच्च जीवनमानामुळे तो दिपलेला आहे. तेथील समग्र समाज हा पूर्णपणे भयमुक्त आहे. तेथील प्रत्येक व्यक्ती व्यक्तिस्वातंत्र्याच्या दैनंदिन अनुभवांमुळे मोहरलेली आहे, असा जो प्रचारकी धबडगा त्याच्या कानावर सतत आदळत असतो, त्यामुळे त्याचा तोल गेलेला आहे. मुख्य म्हणजे गेल्या शे-दोनशे वर्षांत प्रथमतःच जरासे बरे असे राहणीमान व थोडीशी शानदार, अभिरुचिस्पर्शित, ऐंद्रिय जीवनशैली त्याच्या वाट्याला येत आहे. साम्यवादामुळे आपले काल्पनिक सर्वांगपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य व नुकतीच गवसलेली इवलेली धनदौलत आपल्यापासून हिरावली जाईल, ह्या भयाने तो पछाडलेला आहे.

असा हा सुशिक्षित मध्यम वर्ग व त्यातील तरुण आज एका कडव्या, साम्यवाद-विरोधी चळवळीच्या शोधात आहे. भारतातील भांडवलशाही रडतखडत का होईना, वाढती संपत्ती निर्माण करीत आहे. त्याचा एक वाटा या वर्गाला मिळत असल्याने त्याचा विस्तार होत आहे. असे हे वाढत्या संख्येचे तरुण आता संघाकडे वळू लागले आहेत. ते संघामध्ये भांडवलशाहीच्या किंवा जमीनदारीच्या किंवा सरंजामशाहीच्या रक्षणासाठी जात नाहीत. उलट त्यांचे मन नंग्या भांडवलशाहीच्या दोषापासून मुक्त व साम्यवादातील उत्पादन-साधनांची सामाईक मालकी व कामगारांची हुकूमशाही, ह्या विकारांपासून मुक्त असे आदर्श समाजजीवनाचे चित्र रंगविण्यात सदैव बुडलेले असते. पण ते चित्र जोवर साकार होत नाही तोवर आपल्या संचिताचे रक्षण करण्याकरता ती सदैव कोणातरी बलदंड पुरुषाच्या व संघटनेच्या शोधात असतो. नेहमी हीच गरज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १९५० नंतर वाढत्या प्रमाणात भागवत आहे.

साम्यवादामुळे घबराट झालेला हा मध्यमवर्ग एरव्ही लोकशाही समाजवादी चळवळीत गेला असता. पण वाढत्या अकर्तेमुळे ती चळवळ भारतात उत्तरोत्तर क्षीण होत आली आहे. शिवाय उत्पादन साधनांच्या सामाईक मालकीमुळे सत्तेचे केंद्रीकरण होऊन अटळपणे लोकशाही जीवन संपुष्टात येते, ह्या ठोकळेबाज व नियतिवादी भीतीमुळे भारतातील लोकशाही समाजवादी चळवळच नेमळट उदारमतवादाच्या दिशेने सतत पांगत राहिली व आता तर ती आपले सत्त्व सोडून एका उदारमतवादी पक्षात विसर्जित झाली आहे. परिणामी येथला मध्यमवर्ग त्या चळवळीकडे आकर्षिला गेला नाही. कॉंग्रेस एक तर भ्रष्ट पक्ष. शिवाय तो सतत राज्यकर्ता पक्ष असल्याने तेथे गूढगुंजनाला जागा नाही व मुख्य म्हणजे तोही समाजवादाचेच ढोल बडवतो. अशा परिस्थितीत भारतातला मध्यमवर्ग हळूहळू भारतीय जनसंघाकडे व त्याच्या संपर्कामुळे संघाकडे मोठ्या संख्येने वळत गेला.

१९६२ साली साम्यवादी चीनने भारतावर आक्रमण केले. त्यात भारतीय जनतेला राज्यकर्त्यांच्या गैंदी धोरणामुळे विनाकारण मानहानी व पराभव सहन करावा लागला. त्यामुळे साऱ्या देशात एक विलक्षण त्वेषाचे व चिडीचे असे वातावरण तयार झाले आहे. आक्रमण करणारा चीन हा साम्यवादी होता की नव्हता, हा प्रश्न पराभवाची मीमांसा करताना खरोखरी गैरलागू होता. स्वतःच्या ताकदीवर बळ कमावलेली सर्वच समर्थ राष्ट्रे – मग ती साम्यवादी असोत किंवा लोकशाहीत घोळलेली कल्याणकारी राज्ये असोत – आपल्या राष्ट्रीय स्वार्थाकरता खुशाल दुर्बळ राष्ट्रांवर आक्रमण करतात हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक प्राथमिक सिद्धान्त आहे. भारतातील कोट्यवधी हात विनाकाम मोकळेच असतात; त्यांना कामाची संधी देऊन केवढी अपार संपत्ती व ताकद स्वराष्ट्राला प्राप्त करून देता येईल; पण भारतात ही साधी गोष्ट अमलात का येत नाही ह्या प्रश्नाचा मूलगामी विचार खरोखरी चिनी आक्रमणाच्यावेळी व नंतर (व अर्थात आधीही) व्हावयास हवा होता. पण ही गोष्ट भारतातील सत्ताधीश जातिवर्गांच्या हिताची नसल्याने त्यांनी आपल्या प्रचाराचा सारा रोख साम्यवादावर व साम्यवादी

चळवळीवर डागला. भारतातली बहुसंख्य जनता व विशेषतः भयगंडाची बाधा आधीच झालेला येथला मध्यमवर्ग ह्यांची ह्या ब्रेनवॉशिंगमुळे पुरती फसगत झाली व त्यांचा साम्यवादाबद्दलचा राग शिगोशिग पोहचला. त्या परिस्थितीत अन्य शिस्तबद्ध, कडव्या संघटनांच्या अभावी प्रतिक्रियावादी माणसांचा हा मोठा लोंढा संघाकडे वळत राहिला. तसे नीट पाहिले तर, १९५० साली एक समर्थ चीनी राष्ट्र तिबेट गिळंकृत करून भारताचे शेजारी राष्ट्र बनल्यापासूनच वरील ट्रेंड देशात दिसून येत होता. पण १९६२ च्या चीनी आक्रमणाने त्याचे टोक गाठले.

समाजाची अर्थनीती कशीही असो, निव्वळ कडव्या, अनुशासनबद्ध संघटनाशास्त्राचा आधार घेतला की, अवसानबळ वाढत जाते हा गूढगुंजनवादी सिद्धान्त जोपर्यंत आमच्या विचारवंतांना मोह पाडेल तोपर्यंत असेच चालणार. दलित बहुजनसमाजाच्या भुकेचा व प्राथमिक जीवनरक्षणाचा प्रश्न त्यांची व साऱ्या समाजाची प्रतिष्ठा व आत्मगौरव राखून करता येतो. त्याचवेळी आपोआप वेगळे प्रयत्न न करता राष्ट्राला सर्व तऱ्हेच्या आक्रमकांना धडा शिकविता येईल एवढे प्रचंड बळ लाभते, हा धडा इतिहास शिकवतो. भोगलोलुप, जडग्रस्त; स्वप्नाळू व कातरमनाच्या मध्यमवर्गाला व त्याच्यातील प्रातिनिधिक विचारवंतांना साम्यवादी राष्ट्रांच्या बळाची महती वाटते. पण त्याची उपासना व्यवस्थित करण्याकरता दलिताविषयी माणुसकीचे जे बंधुप्रेम असावयास हवे ते नसल्याने असे विचारवंत आपल्या उपाययोजनेत साम्यवादी अर्थकारणाला रजा देतात व फक्त शिस्तबद्ध, केवल बलोपासक संघटनाशास्त्राची पूजा बांधतात. हाच प्रकार भारतात आज घडत आहे. या प्रक्रियेतून जन्माला येत असलेले प्रतिक्रियावादी हिंदू आता संघशाखांचा वाढता आसरा घेऊ लागलेले आहेत.

गेल्या काही वर्षांत संघाची प्रचारात्मक भूमिका भारतातील साम्यवादी संकटाविषयी अधिकाधिक टोकदार बनत आहे, हे उगाच नव्हे. तत्त्वतः संघ हा भांडवलशाही व भोगलालसावादी व्यक्तिस्वातंत्र्याचा विरोधक आहे. त्यालाही धर्मअर्थकाममोक्षांचा समवाय साधणारी व्यक्ती व समाज ह्यांच्या शीलवान संतुलनातून निष्पन्न होणारी नवी व्यवस्था अभिप्रेत आहे. पण प्रत्यक्षात साम्यवादाचाच शत्रू अधिक मोठा दिसतो किंवा वाटतो. त्यामुळे संघाने आज साम्यवादाविरोधी कडवी भूमिका अंगीकारलेली दिसते, ती इतकी की सरसंघचालकांना आज काँग्रेस, इतकेच नव्हे तर इंदिरा गांधीही साम्यवादधार्जिण्या वाटतात. भारत–रशिया मित्रत्वाचा करार झाल्यावर तर पाहावयास नको. त्यांना सर्वत्र साम्यवादी षड्यंत्र व रशियाची केजिबी यंत्रणा दिसत आहे. भारतीय इतिहासात सनातन काळापासून कणीकनीती व चाणक्यनीती ह्यांच्या स्वदेशी परंपरेतील युक्त्याप्रयुक्त्या वापरून येथल्या आजतागायतच्या सर्व राजे, राण्या आणि अधिमान्य युवराज व सत्ताकांक्षी राजपुत्रांनी निरंकुश सत्ता हातात आणण्याकरता व राखण्याकरता जी कपटनीती दाखवली आहे त्याला जगात तोड नसेल. आजच्या राज्यकर्त्यांवर तर साम्यवाद्यांच्या संबंधात धार्जिणेपणाचा व तुष्टिकरणाचा आरोप कितपत करता येईल हे सांगायला नकोच. साहसवादी नक्षल साम्यवाद्यांचे व त्यानिमित्ताने त्यांच्या बंधुसंघटनांचे भारतीय शासनाने शिरकाण केले आणि दुसरीकडे संसदीय लोकशाहीचा डावपेचात्मक स्वीकार करणाऱ्या साम्यवाद्यांना पुच्छवादी पवित्रा घ्यावयाला भाग पाडले, ही गोष्ट संघाला समजत नसेल असातला भाग नाही. संघकार्याचा याबाबतीतील स्थलकालपरिस्थितिसापेक्ष आविष्कार यापेक्षा वेगळा काय असणार ?

आपण असे पाहिलेच आहे की, श्रीगुरुजी असे म्हणत असत की, रशिया–चीनमधील लोकांहून आपल्या देशातील समाज वेगळा आहे. बहुधा चीन व रशियामधील लोक जिवंत, जागृत होते आणि त्यामुळे त्यांना दडपून टाकण्यासाठी बंदुकीचा वापर केल्यावाचून गत्यंतर नव्हते. आपल्या देशातील लोक मात्र बिचारे गरीब, आज्ञाधारक, वीरपूजक म्हणूनच बावळट व तेजशून्य असल्याने निर्जीव यंत्राप्रमाणे मते देऊन साम्यवाद किंवा समाजवाद या दोहोंचाही निमूटपणे स्वीकार करतील.

श्रीगुरुजींच्या विधानातील खोल अर्थ स्पष्ट आहे. तो असा की, जर येथले लोक जिवंत व जागृत करण्यात आले तर, ते नेभळटपणे परिस्थितीला शरण न जाता 'इनीशिएटिव्ह' हातात घेऊन साम्यवाद्यांच्या बंदुकीला बंदुकीने उत्तर देतील.

काहीही असो, यापुढे भारतातला सत्तासंपत्तिधारी पाशग्रस्त व भयग्रस्त वर्ग व त्यांचे उदारमतवादी विचारसरणीचे समर्थक यापुढे साम्यवाद्यांना आवरण्यात शासन कमी पडते आहे, असे दिसताच किंवा भासताच साम्यवादविरोधी टोकदार, अनुशासनबद्ध संघटना म्हणून यापुढे संघातच घुसणार, हे भाकित आपण करू शकतो.

## साम्यवादी धोका, समाजवादी धोका व संघाने लोकशाहीचा केलेला स्वीकार

याच संदर्भात समय जाणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने श्रीगुरुजींच्या काळात १९४७ नंतर आपाततः आपद्धर्म म्हणून आणि आता श्री. बाळासाहेब देवरस ह्यांच्या नेतृत्वामुळे तत्त्वतः आणि मनोमनी संसदीय किंवा तत्सम उदारमतवादी लोकशाहीचा का स्वीकार केला आहे, ह्याचा उलगडा होतो. डॉक्टर हेडगेवार आणि श्रीगुरुजी ह्यांच्या कारकीर्दीत संघाने जरी ग्रंथप्रामाण्य व व्यक्तिप्रामाण्य नाकारले तरी अनुशासनबद्धतेचे प्रतीक म्हणून एकचालकानुवर्तित्व ह्या तत्त्वाचा दार्शनिक अंगीकार केला. १९२८ (सालाझारचा उदय) ते १९५३ (स्टॅलिनचे निधन) हा व विशेषत: १९३० ते १९४० हा जागतिक कालखंड असा होता की, इंग्लंड धरून जगभरच्या सर्व देशांत फॅसिस्ट विचारसरणीला ऊत आलेला होता. तत्त्व आणि व्यवहार, विचार आणि कार्यपद्धती, आशय आणि याबाबतीत जगभरच्या संघटनांवर फॅसिस्ट तत्त्वज्ञान आणि कार्यपद्धती यांची दाट छाया पसरलेली होती. संघही त्या बाधेपासून मोकळा राहिला नाही. महात्मा गांधींचे बाकीचे राजकारण सोडा; पण त्यांचा एक समयज्ञ व भविष्याचे गुण जाणणारा ऋषितुल्य गुण आपण मानलाच पाहिजे. तो असा की, भारतीय स्वातंत्र्य-आंदोलनात मानव-प्रतिष्ठा, अहिंसा, सत्याग्रह या लोकशाहीपोषक, मानवतानिष्ठ तत्त्वांचा व साधनांचा त्यांनी पुरस्कार केला. पण त्याच काळात डॉक्टर हेडगेवार आणि विशेषत: श्रीगुरुजींचे काही अदूरदृष्टीचे अनुयायी जगभरच्या या फॅसिस्ट लाटेत बुडून जाऊन श्रीगुरुजींचे व्यक्तिस्तोम व विभूतिपूजा,

लोकशाही, अहिंसा व सत्याग्रह यांची टारगटपणाच्या पातळीवरील कुचेष्टा, तत्त्वमंथन व विचारविमर्ष याबद्दलची उपेक्षा, 'विचारवंतांबद्दल तिरस्कार अनादराची भावना आणि मुख्य म्हणजे हिंसावाद, युद्धज्वर आणि मनगटशाही यांविषयी अपार आस्था इत्यादी कायिक, वाचिक आणि मानसिक महारिपूंच्या तडाख्यात सापडले. त्यामुळे संघाविषयी हिंदुस्थानमधील सर्व उदारमतवादी लोकशाहीवाद्यांची मने साशंक बनली. इतकेच नव्हे तर, संघकार्यातील लाठ्याकाठ्यांचे सूक्ष्म व वस्तुनिष्ठ कार्याकार्य ध्यानात न आलेली बरीच मंडळी संघातील यच्चयावत् सर्वच स्वयंसेवकांना फॅसिस्ट मानू लागून दुसऱ्या टोकाला गेली. खरोखरी कोणत्या आत्मबलनिष्ठ दणकट पुरुषाला संघशक्तीची भीती वाटेल ?

पण असो. कालमहिमा असा की, त्याच संघाला पुढील काळात आपले व आपल्या सहोदर बांधवांचे रक्षण करण्याकरता महात्मा गांधींच्याच साधनांचा आश्रय घ्यावा लागत आहे. खरोखरी एक वेळ चिरंतन पायावर एकरस, सुसंघटित व तेजस्वी हिंदू समाज निर्माण करण्याच्या मूलगामी व चिरंजीव कार्याकरता, संघाने स्वातंत्र्य-आंदोलनापासून आपल्याला दूर ठेवून घेतलें ही गोष्ट आपण समजू शकतो. पण त्या आवेशाच्या भरात सत्याग्रहासारख्या अनेक साधनांची टर उडवण्याची चढाओढ लावलेल्या आपल्या अनुयायांना श्रीगुरुजींनी वेळीच का आवरले नाही, हे मात्र आपण कधीच सहानुभूतीपूर्वक जाणू शकणार नाही. कालचक्राची गती अशी की, श्रीगुरुजींच्या त्याच संघाला संघावरील १९४८ ची पहिली बंदी उठवावी म्हणून आणि आता प्रथमतः जयप्रकाश नारायण ह्यांच्या जनसमर्थनवादी आंदोलनासाठी व विशेषतः संघावर परत बंदी लादणाऱ्या हुकूमशाहीच्या प्रतिकाराकरता म्हणून महात्मा गांधीप्रणीत लोकशाहीचे जणू प्राणतत्त्वच अशा सत्याग्रही साधनांचा व जीवनसरणीचा अंगीकार करावा लागला.

एकदा ही एक गोष्ट झाली म्हणजे साम्यवाद व समाजवाद ह्यांच्या विरोधात प्रतिक्रियावादी भूमिका टाळण्याकरता संघाला उदारमतवादी लोकशाहीवरील भावात्मक निष्ठा किती दूरवर व खोलवर उपयोगी पडणार आहे, याचा अंदाज आपल्याला येतो. मगच एकचालकानुवर्तित्वापासून प्रारंभ झालेला व थबकत थबकत, वळणावळणाने, सुकतरसत, भरतीओहोटीचा अनुभव घेतलेला संघकार्याचा प्रवाह आज 'संघ हा सदैव लोकशाहीनिष्ठच आहे व राहील,' या धारणेपर्यंत कसा पोहोचला याची यथार्थ जाणीव आपल्याला होईल. काहीही असो, श्रीगुरुजींच्या संघाने स्वातंत्र्योत्तर काळात आपद्धर्म म्हणून म्हणा किंवा प्रवाहपतित होऊन म्हणा, स्वीकारलेल्या लोकशाही राजकारणपद्धतीचा स्वीकार आता नव्या सरसंघचालकांच्या प्रेरणेने चालणाऱ्या संघाने मनोमन केलेला दिसतो. मला तरी असे निश्चित वाटते की, ही गोष्ट वस्तुनिष्ठदृष्ट्या देशातील वर्धिष्णू भांडवलशाही व्यवस्थेची आणखी एक खूण असली व वस्तुनिष्टरीत्या आपल्या समाजातील कनिष्ठवर्गीयांचे हितसंबंध अत्यंत मायावीरीतीने, प्रगल्भपणाने व दूरदर्शीपणाने राखणारी असली, तरी श्री. बाळासाहेब देवरस ह्यांनी उद्घोषित केलेली 'संघ हा लोकशाहीनिष्ठच आहे, लोकशाहीप्रेमीच आहे' ही विचारसरणी यापुढे संघकार्याचा स्थिरभाव बनेल. त्यामुळे अहेतूकपणे आणखी एक लाभ संघाला होईल. साम्यवादाविषयी प्रतिक्रियात्मक बुद्धीने विचारआचार करणारे जे उदारमतवादी किंवा लोकशाही समाजवादी यापूर्वी संघाला बिचकत होते ते आता निःशंकपणे संघरूपी स्वयमेव मृगेंद्रावर विश्वास टाकून संघकार्याला उत्तरोत्तर पाठिंबा देतील किंवा त्या प्रवाहात विलीन होतील.

## संघकार्य, दलितवर्ग आणि नव्या सरसंघचालकांनी घेतलेली स्वागतार्ह भूमिका

संघकार्याचा विस्तार १९४० नंतर प्रत्यक्षात जो झाला त्यापेक्षा परिस्थितिजन्य कारणांमुळे तो कितीतरी अधिक व भरघोस झाला असता. परिस्थितीच अशा तऱ्हेने वळत होती की, ती संघकार्याच्या पथ्यावरच पडे. पण तसे झाले नाही, ह्याचे कारण म्हणजे श्रीगुरुजींनी आग्रहाने, वेळीअवेळी कर्मठपणाने पुरस्कारलेली संघाची चातुर्वर्ण्य व्यवस्थेवरील श्रद्धा हे होते. हिंदू समाजाचे सांस्कृतिक व धार्मिक ऐक्य साधून त्यातून हिंदूंचे राजकीय व आर्थिक ऐक्य साधण्याच्या कामात संघाला जे अपयश आले त्याचे कारण म्हणजे श्रीगुरुजींच्या संघकाळातील संघाच्या ते स्वतः धरून उच्चपदस्थ अधिकारी वर्तुळातील अनेक वरिष्ठांचा चातुर्वर्ण्यविषयक कालबाह्य, अविचारी, आडमुठा व सहानुभूतिशून्य दृष्टिकोन हेच होते.

या संदर्भात प्रा. नरहर कुरुंदकर यांनी आपल्या उपरोक्त लेखात मौलिक व मर्मभेदक विवेचन केले आहे. प्रा. कुरुंदकरांच्या म्हणण्याप्रमाणे "शंकराचार्य, स्वामी करपात्रीजी यांच्या नेतृत्वापेक्षा गोळवलकरांचे हे नेतृत्व वेगळे आहे." ही गोष्ट मला मान्य आहे, त्याचप्रमाणे "धार्मिक माणूस आणि धार्मिक राजकारणाचा राजकीय नेता यांच्यात एक मूलभूत फरक असतो. धार्मिक राजकारण करणारा नेता राजकारण धर्माच्या नावे करतो, पण त्याचे हितसंबंध इहलोकात गुंतलेले असतात. धार्मिक, राजकीय नेत्यांना धर्म हा धार्मिक आचरण करून मोक्षाला जाण्यासाठी नको असतो, तर धर्मांचा आधार घेऊन इहलोकातील हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हवा असतो."

आणि "वरिष्ठवर्गीयांचे हितसंबंध सुरक्षित राहावे म्हणजे आपले जगणे सुरक्षित राहते, या वास्तविक पातळीवरील जाणीवेचा 'ईश्वरप्रणीत चातुर्वर्ण्यव्यवस्था व पुनर्जन्माचा सिद्धान्त' हा गोंडस तात्त्विक आविष्कार आहे. वर्णव्यवस्थेचा पुरस्कार, समाजाच्या परिवर्तनाला विरोध करून हितसंबंधियांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी असतो; ती साध्याभोळ्या ईश्वरनिष्ठ धार्मिकतेची बाजू नाही, त्यामागे क्रांतीविरोधी, प्रतिगामी तत्त्वज्ञान उभे आहे." असे ते जे म्हणतात ते बरोबरच आहे. इतकेच नव्हे तर, "गोळवलकर वर्णव्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत, अस्पृश्यतेचे पुरस्कर्ते नाहीत, यातील फरक आपण नीट समजून घेतला पाहिजे. हा धार्मिक नेता आणि धार्मिक राजकारणाचा नेता यातील फरक आहे. दहा कोटी अस्पृश्य हिंदूंना स्वतःपासून दूर ठेवावेत व आपली संघटना कच्ची करून घ्यावी, विरोधकांची शक्ती वाढू द्यावी, हे गोळवलकरांना नको आहे... थोडक्यात म्हणजे, गोळवलकरांना वर्णव्यवस्था हवी आहे म्हणून समाजात शूद्रही हवे आहेत. फक्त शूद्र अस्पृश्य राहावेत, हे त्यांना नको आहे." असे प्रा. कुरुंदकर म्हणतात ते यथार्थच होते. याहीपुढे जाऊन ते बरोबरपणे असे दाखवितात की, "गोळवलकरांना भारतीय

आत्मा नसणाऱ्या अनुकरणाची चीड आहे, म्हणून त्यांना आर्थिक नियोजन नको, त्यांना परदेशी कल्पना म्हणून समाजवाद नको. प्रौढ मतदानावर आधारलेल्या लोकशाहीचा झुंडशाही, हुल्लडबाजी असा उपहास त्यांनी केलेलाच आहे. प्रौढ मतदान, आर्थिक नियोजन व समाजवाद नको, त्याऐवजी भारतीयत्व व वर्णव्यवस्था हवी आहे. या भूमिकेचा अर्थ उघड आहे. जुन्या काळात काय किंवा नव्या काळात काय, उघडच्यानागडच्या स्वार्थांचे हितसंबंध स्पष्ट व्यवहार बोलून टिकवणे शक्य नसते, त्यांना कोणता तरी आडपडदा लागतो." प्रा. नरहर कुरुंदकरांचे वरील सर्व विवेचन खरोखरी मौलिक आहे. ते मला पटते.

याच संदर्भात पुढे प्रा. कुरुंदकर म्हणतात की, "रूढी बदलतात, हे गोळवलकरांना मान्यच आहे. कारण हे मान्य केल्याखेरीज संघाचे शिबिरच चालणार नाही. जुन्या रूढी बदलतात, नव्या रूढी येतात, ही भूमिका घेतल्याशिवाय (शाखास्थानी जमणे) शक्य नाही. फक्त त्यांना रूढी बदलण्याची चळवळ नको आहे. रूढी आपोआप बदलत जातातच, त्या बदलणाऱ्याच असतात. रूढी मोडण्याची चळवळ मात्र करण्याची गरज नाही, ही भूमिका घेतल्याशिवाय सुधारणेच्या सर्व चळवळीं-विषयी तुच्छता दाखवता येत नाही."

"सुधारणेची कोणतीही चळवळ आपण हाती घ्यावयाची नाही, इतरांनी चालविल्यास तिला पाठिंबा द्यावयाचा नाही, हीच संघाची परंपरा राहिली. त्यांनी अस्पृश्यता-निवारण्याच्या आंदोलनात भाग घेतला नाही. ज्यापुळे हिंदू समाजातील सनातनी मन दुखावले जाईल असे काही करावयाचे नाही, ज्यामुळे वरिष्ठ वर्गाच्या हित-संबंधाला बाधा येईल असेही काही करावयाचे नाही. लोकांच्यासमोर विचार ठेवून त्यांना जागृत करावे, ही संघाची पद्धतच नाही. 'सर्व हिंदूंनो, संघटित व्हा आणि संघटित होण्यासाठी संघात या,' यापलीकडे संघ काही सांगण्यास तयार नाही. त्याचा अर्थ संघाजवळ विविध प्रश्नांवर मते नाहीत, विचार नाहीत असा नाही. सर्व प्रश्नांचा अतिशय तपशीलवार विचार संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेला आहे. त्यांच्यातील बुद्धिमान तरुण यज्ञयाग, आश्रम-जीवन यांचा भोक्ता नाही, तो औद्योगीकरणाचा आणि यांत्रिकीकरणाचा समर्थक आहे. फक्त हे करण्यासाठी शेतमजुरांना घेऊन जमीनदारांचे हित-संबंध धोक्यात आणणे संघाला नको. तसेच त्यांना मजुरांच्या संघटना उभारून भांडवलशाहीविरुद्धचा लढाही नको. खाजगी मालकीच्या पवित्र हक्कावर व खाजगी मालकीच्या तत्त्वानेच व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित राहते, यावर संघाचा विश्वास आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात संघ तटस्थतेच्या विरोधी, अलिप्तता-वादाच्या विरोधी असून इस्रेलला त्यांचा पाठिंबा आहे, त्यांचा कम्युनिझमविरोधही प्रसिद्ध आहे. संघाजवळ मते नाहीत असे नाही, मते आहेत, निश्चित आहेत, सुसंगत आहेत, फक्त ते तत्त्वज्ञान घेऊन त्यांना जनतेत उतरावयाचे नाही."

"जनतेसमोर हिंदुत्व, राष्ट्रीयत्व, पूर्वपरंपरा असे फक्त प्रचंड बुके उभे केले तरच आपण वाढू शकू, असे संघाला वाटते. बुद्धिवाद जनतेला सांगून पराभूत होण्याची सावरकरांप्रमाणे संघाची इच्छा नाही. म्हणून गुरुजींच्या भूमिकेतील 'रूढी बदलतच असतात' हे वाक्य संघ काही परंपरेपासून निराळे काम करतो आहे, याचे बोधक आहे व 'रूढीविरुद्ध चळवळी नकोत' हे वाक्य संघाला जनतेची शक्ती वरिष्ठ वर्गाविरुद्ध संघटित व्हायला नको याचे बोधक आहे." प्रा. कुरुंदकरांनी संघाच्या हिंदुसंघटनकार्याचा लावलेला हा अन्वयार्थही अचूक आहे.

पण ते जेव्हा 'मनापासून जर वर्णव्यवस्थेवर श्रद्धा नसणारे कुणी असतील तर ते गोळवलकर आहेत. गोळवलकरांसाठी वर्ण-व्यवस्थेचा स्वीकार व पुरस्कार हा एक धोरणाचा भाग असतो' व 'धार्मिक, राजकीय नेते जन्मभर धर्मावर श्रद्धा जाहीर करत असतात, हे पहिले सत्य आहे, त्यांच्याजवळ खरोखरी धर्मश्रद्धा असतीलच असे नाही, हे दुसरे सत्य आहे,' असे म्हणतात त्या वेळी ह्या विवेचनाचा उत्तरार्ध मला पटतो, पण पूर्वार्ध नव्हे. तसेच 'स्पर्धा-शून्यतेच्या नावावर गुणकर्माचा आधार देऊन वर्णव्यवस्थेची तरफ-दारी केल्याशिवाय राहवतच नाही, हा मनाच्या दर्शनी सनातनत्वाचा भाग आहे, हे खरेखुरे सनातनत्व नव्हे. हा सनातन धर्माचा धोरण म्हणून पुरस्कार आहे...वर्णव्यवस्था हे गोळवलकरांचे बुजगावणे आहे...गोळवलकरांनी स्पष्टच स्वतःला चातुर्वर्ण्य मान्य असल्याचे सांगून टाकले, तो त्यांच्या दर्शनी जीवननिष्ठेचा पवित्रा आहे.' असे सांगतात ते मात्र मला खरे वाटत नाही.

कारण प्रा. नरहर कुरुंदकर आधी जे म्हणतात तेच खरे आहे. ते असे की, 'गोळवलकर म्हणजे कुणी परंपरागत शिक्षण घेतलेला मठाधीश, पीठाधीश नव्हे. गोळवलकरांचे सामर्थ्य ह्या विचारसरणी-साठी ते उभे आहेत त्या विचारसरणीसाठी त्यांनी जोपासना केलेल्या संघटनेत आहे. ही संघटना परंपरागत धर्म मानणाऱ्यांची संघटना नव्हे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात कर्मठ परंपरावादी माणसांचे पटणारही नाही. संघ सार्वजनिक कार्यक्रम म्हणून यात्रा-जत्रा भरवीत नाही, किंवा यज्ञयागही करीत नाही. संघातील तरुणांना हिमालयात जाऊन तप करण्याची किंवा योगसाधना करण्याची प्रेरणा दिली गेलेली नाही. शेंडी, जानवे, संध्या, एकादशी, वैश्वदेव, श्राद्धपक्ष याबाबतीत फार मोठा आग्रह धरणारी ही संघटना नव्हे. आधुनिक सुशिक्षितांची ही संघटना असून, हे सर्व तरुण हिंदुराष्ट्राच्या संरक्षणाच्या प्रतिज्ञेने गोळवलकरांभोवती जमलेले आहेत. संघ हा नुसता हिंदूंचा नाही. तो आजवर सुशिक्षित हिंदू तरुणांचा संघ राहिलेला आहे.'

ही गोष्ट खरी असेल तर संघाच्या ज्या बहुसंख्य आधुनिक सुशि-क्षित अनुयायांना एक तेजस्वी, बलवान हिंदुराष्ट्र निर्माण करावयाचे आहे, त्यांना आपल्या धार्मिक राजकारण करणाऱ्या राजकीय नेत्याचा, चातुर्वर्ण्यव्यवस्थेसंबंधीचा हेकट, आडमुठा व औचित्य-रहित आग्रह आपल्या एकता-कार्यात किती कटुता, गैरसमज व अडथळा आणत असेल याची कल्पनाही करता येत नव्हती, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. नेमकी तीच चूक एरवी संघकार्याचे समतोल विवेचन करणारे प्रा. कुरुंदकर करीत आहेत. अर्थात ते असे म्हणतात की, 'ह्याचे कारण सगळा भारतीय समाज मनाने धर्मश्रद्ध आहे. वर्णव्यवस्थेवर श्रद्धा ठेवणारे मन हे हिंदूंचे परंपरागत मन आहे, अशा हिंदूंची यादी सगळ्या जनगणनेची यादी होईल. संघ वर्णव्यवस्थेचा पुरस्कार वर्णव्यवस्थेच्या प्रेमापोटी करीत नाही; ग्रामीण भागातील धार्मिक माणूस आपल्या ध्वजाखाली गोळा करण्यासाठी करतो.'

पण आजच्या विसाव्या शतकातही चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा (मानभावीपणाने का होईना) आग्रही पुरस्कार केल्याशिवाय आधुनिक सुशिक्षित हिंदूंना व नेत्यांना शहरी व विशेषतः ग्रामीण भागात पसरलेल्या बहुसंख्य अशिक्षित, सनातनी हिंदू जनसामान्यात पोहोचता येत नाही, लोकसंग्रह करता येत नाही व मान्यता मिळत नाही, असे म्हणणे खरोखरी बरोबर ठरणार नाही. हे खरे की, सुधारणेची चळवळ करणाऱ्या व्यक्तींनी व चळवळवाल्यांनी वीर सावरकरांच्या प्रमाणे एक तर्ककर्कश, आक्रमक, तुच्छतेची किंवा तिरस्काराची भावना बाळगून जर आपल्या अडाणी व अंधश्रद्ध बांधवांच्या धर्मसमजुतींवर कडवट हल्ला केला तर भारतातला बहुजन समाज त्या सुधारक व्यक्तींच्याकडे किंवा चळवळींकडे ढुंकूनही बघणार नाही, सामाजिक दोष व अन्याय यांच्यावरील टीका ही जर अनाठायी कठोर, राजकारणी काव्याची व मनातील दुसऱ्यास कोणत्या तरी अंतस्थ हेतूपायी एकतर्फी डिवचणारी असेल तर, देशातील कोट्यवधी अशिक्षित सनातनी हिंदूंना अपमानित, आत्महत व तेजोहत झाल्यासारखे वाटेल व मग असल्या सुधारक व्यक्तींच्या व आंदोलनांच्या वाऱ्याला ते फिरकणार नाहीत. पण त्यावेळी त्यांच्यापर्यंत महात्मा गांधी किंवा श्रीसंत गाडगे महाराज पोहोचलेच ना ? प्रा. नरहर कुरुंदकरांना लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा यांना चातुर्वर्ण्य समाजव्यवस्था आदर्श वाटली एवढ्याच कारणाकरता ते तेल्या-तांबोळ्यांत, हरिजनात किंवा दरिद्रीनारायण समाजात लोकमान्यता मिळाली असे तर म्हणावयाचे नाही ना ? माझी खात्री आहे की, प्रा. कुरुंदकरांसारखे विचक्षक इतिहाससमीक्षक तसे म्हणणार नाहीत.

## श्रीगुरुजींचे गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व

मग असे काय घडले की, ज्यामुळे लोकमान्य टिळक व महात्मा गांधी चातुर्वर्ण्यवादी होते तरी हिंदू जनसामान्यांना त्यांचे आकर्षण वाटले? आता कोणी असे म्हणतील की, हीही गोष्ट खरोखरी किती खरी आहे? ते म्हणतील, महात्मा गांधींचेच उदाहरण घ्या. मिळाला का त्यांना कुठे डॉ. आंबेडकरप्रणीत मूलगामी दलित आंदोलनाचा पाठिंबा, दलितांचा पाठिंबा ? पण मग आपल्याला असे लक्षात येते की, डॉ. बाबासाहेबांच्या दलित अनुयायांना महात्मा गांधींबद्दल ओलावा–जिव्हाळा वाटत नव्हता व नसेल; उलट त्यांच्याबद्दल त्यांना तिटकारा, द्वेष किंवा चीडही वाटली असेल; पण डॉ. आंबेडकरांच्या काही कडव्या, अदूरदृष्टीच्या, मूठभर एकांगी अनुयायांचा अपवाद सोडला, तर दलितांना जशी श्रीगुरुजींची किंवा संघाची चीड वाटली तशी महात्मा गांधींची किंवा काँग्रेसची वाटली नाही. महात्मा गांधींविषयी त्यांना किहीही राग झाला तरी बहुसंख्य दलितांना त्यांची कळकळ व परिवर्तनवादी मोठेपणा जाणवला. म्हणूनच त्यांनी महात्मा गांधींच्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या गूढ गुंजनवादी समर्थनाकडे रागाचे कढ येऊनही उदार व समजूतदार मनाने वेळोवेळी कानाडोळा केलेला दिसतो. पण हे भाग्य श्रीगुरुजींच्या व संघाच्या वाट्याला आले नाही. बहुजन समाज व दलित यांच्या मनात संघाबद्दल एक खोल अढी खोलवर रुजलेली दिसते.

मला वाटते, त्याची कारणे श्रीगुरुजींच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वात शोधली पाहिजेत. श्रीगुरुजी हे खरोखरीचे श्रद्धावान धर्मपुरुष होते असे मला दिसते. ते धोरण म्हणून धार्मिक नव्हते, तर धर्म ही त्यांची जीवननिष्ठाच होती. त्यांचा वर्णव्यवस्थेवरील विश्वासही नितांत दृढ व श्रद्धामूलक होता असे जाणवते. वर्णव्यवस्थेवरील त्यांचा विश्वास हा दर्शनी सनातनत्वाचा भाग किंवा पवित्रा नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होता हे कळते. धर्मश्रद्धा व वर्णव्यवस्थेवरील विश्वास-याबाबतीत ते स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधींइतकेच सच्चे होते. पण श्रीगुरुजींच्या व्यक्तिमत्त्वात एक महादोष कुठेकुठे जाणवतो. एखादा अशांत संन्याशी असावा; त्याच्या विचार–आचार–आचरणात जगाबद्दल व इतर माणसांबद्दल उपेक्षेची एक कडवट व तीव्र तिरीप जाणवावी; अधूनमधून व पारुषतेने वागताना त्याच्या मनाच्या कुठल्या तरी खोल व अबोध कप्प्यातील असुफलित वासनांची असूयायुक्त खळबळ आपल्याला जाणवावी; अधूनमधूनच मर्मस्पर्श करून माणसांना तटकन तोडून त्यांच्या मनात उपेक्षा व वैफल्याची एक सल अभावितपणे रोपणारा त्याचा अलिप्त तुटकपणा जाणतात, पण एरवी आपल्या कर्तृत्वाने व सदाप्रसन्न व्यक्तिमत्त्वाने हजारो शिष्यांची श्रद्धा व भक्ती प्राप्त करणारी त्यांची हातोटीही आपल्याला लगेच उमगावी. असे हे एक गुंतागुंतीचे व्यक्तिमत्त्व ! त्याची आठवण श्रीगुरुजींना समजून घेताना होते. नाहीतर एरवी काळवेळाचे भान सोडून भारताचा जुना अंगलट येणारा इतिहास चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या संदर्भात ते परत परत का उकरून काढत होते हे समजत नाही. त्यांच्या आयुष्याच्या अगदी संधिकालातसुद्धा दगडधोंड्यातल्या व कुत्र्यामांजरातल्या चार वर्णांचा शोध लावून ते बहुजनसमाजाला वा दलितांना वारंवार अकारण का डिवचत होते, हे समजत नाही. विज्ञान व कायदा यांचा हे बुद्धिमान पदवीधर व कुशल संघटक उघडउघडपणे हास्यास्पद वाटणाऱ्या हरदासी विज्ञानाचा वापर करून विचारवंतांची खिल्ली उडविणारी तुच्छता का दाखवीत होते, हे समजत नाही. अस्पृश्यांनी एखादा साधा विधी वापरून आपले शुद्धीकरण करावे व आपल्या अस्पृश्यतेचा निरास करावा, असे परत परत सांगून त्यांना ते का खिजवीत होते, हे कळत नाही. त्यांचा या कार्यनाश करणाऱ्या विकारी मानसिक पैलूचा खोल अभ्यास करण्यासारखा आहे. कारण संघाचे बळ जसजसे वाढत गेले, तसतसे वाढत्या आत्मविश्वासापोटी सरसंघचालक म्हणून श्रीगुरुजींचे भान गेले व त्यातून त्यांनी या चुका केल्या असे म्हणण्याचे धाडस मी करणार नाही. ते तसे एक फार कुशल नेते होते.

पण काही असो. त्यांच्या व विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील सर्वोच्च संघवर्तुळातील काही पेंतबाबादी स्वयंसेवकांच्या संघशाखेपलीकडील दैनंदिन आचरणात जो ब्राह्मणीदर्प व पीळ बहुजनसमाजाला व दलितांना पदोपदी जाणवला, त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशभर हिंदूंच्या त्या वर्गात अगदी आजकालपर्यंत आणि महाराष्ट्रात तर अजूनही पोहचू शकलेला नव्हता आणि नाही, ही गोष्ट सर्वमान्यच होईल.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम ह्यांच्या संतपरंपरेनेही चातुर्वर्ण्याला उचलून धरले आणि दाससंप्रदायातील सत्पुरुषांनीही तीच गोष्ट केली. पण महाराष्ट्रातील रंजलेली, गांजलेली

जनता वारकऱ्यांच्या दिंडीत प्रेमाने सामील झाली; तर दत्तसंप्रदाय उच्चवर्णीयांच्या मठात व सोवळ्याओवळ्यातच अडकला. त्यातलाच हा प्रकार आहे. महात्मा गांधींना प्रेम लाभले तर श्रीगुरुजींच्या वाट्याला कडवट उपेक्षा झाली.

संघाचे बहुसंख्य स्वयंसेवक कर्मठ नसताना व आधुनिक, सुशिक्षित हिंदूंचा मोठा भरणा त्यात असताना श्रीगुरुजींच्या प्रमादापायी संघाची प्रतिमा कशी डागाळली व त्याची किंमत संघाला कशी द्यावी लागली हे आपण पाहिले. त्याचवेळी अन्य कारणांमुळे संघ हळूहळू का होईना कसकसा वाढला हेही आपण पाहिले. संघाची चातुर्वर्ण्यविषयक भूमिका नव्या सरसंघचालकांच्या प्रेरणेने कशी बदलेली आहे व त्यामुळे संघकार्यातला एक मोठा अडसर दूर होऊन, अन्य परिस्थिती वर वर्णिल्याप्रमाणे अनुकूल राहिल्यास, या नव्या भूमिकेच्या संदर्भात यापुढे संघकार्याचे स्वरूप व भविष्य काय राहील, ही गोष्ट आपण आता तपासू.

## श्री. बाळासाहेब देवरस ह्यांची नवी समतायुक्त भूमिका व भावी संघकार्य

स्वातंत्र्य मिळाले. पुरी पंचवीस वर्षे झाली. पण संघातील आधुनिक मताचे बहुसंख्य अनुयायी अजूनही सर्वोच्च संचालकांच्या चातुर्वर्ण्य-विषयक असमर्थनीय चुकांची झळ अवाक्षरही न उच्चारता सोसत होते. पण अर्थातच वस्तुनिष्ठदृष्ट्या त्याची पुरेपूर किंमत संघकार्याला द्यावी लागत होती. आपले अनुयायी व आपण ह्यांच्यातील याबाबतीतले अंतर आपण होऊन दुसऱ्या दिशेने चालत जाऊन भरण्याची संधी संघाच्या वरिष्ठ नेतृत्वाला श्रीगुरुजींच्या निधनानंतर लाभली. नव्यानेच सरसंघचालकपदावर आरूढ झालेल्या श्री. बाळासाहेब देवरसांनी मिळाली ती पहिली संधी साधली. कर्मठांच्या बालेकिल्ल्यातील पुणे या शहरात वसंत व्याख्यानमालेत 'सामाजिक समता व हिंदू संघटन'. ह्या विषयावर ८ मे १९७४ रोजी त्यांनी या समकालीन मूलगामी व कळीच्या प्रश्नावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका उद्घोषित केली. ती इतकी नितळ, स्वच्छ, स्पष्ट व यथोचित आहे की, जर संघाने आपली शक्ती, बुद्धी व शिस्त या कामी यापुढे गुंतविली, तर संघाचा कायापालट झाल्याखेरीज राहणार नाही. समतायुक्त, सुसंघटित हिंदू समाज निर्माण करण्याच्या मूलगामी कार्याला श्री. देवरस-प्रणीत नव्या भूमिकेमुळे (भांडवलशाही समाजजीवनाच्या कठोर मर्यादेत का होईना) संघाला आता सीमांत अवसर मिळणार आहे. संघाच्या शिस्तबद्धतेची खरी कसोटी श्रीगुरुजींच्या चातुर्वर्ण्य-विषयक वाढत गेलेल्या चुकांमुळे लागली होती! त्यावेळी बहुसंख्य स्वयंसेवकांच्या मनाची व कार्याची कुचंबणा झाली. पण संघस्वयंसेवकांच्या अपूर्व अनुशासनप्रियतेमुळे तो काळ निभावला व संघकार्याला निदान पूर्ण आळा बसला नाही. श्री. बाळासाहेब देवरसांच्या ह्या नव्या दृष्टिकोनामुळे संघात पुढील विशाल कार्याच्या वाटेतील सर्वांत मोठा अडसर दूर झाल्याने संघस्वयंसेवकांमध्ये किती हुरूप व चैतन्य उसळून आलेले असेल, त्याची आपण कल्पनाच केलेली बरी. ती भूमिका मी पुढे श्री. देवरसांच्याच शब्दात शक्यतो सादर करीत आहे.

आपापल्या संघटनेच्या मूलभूत कार्याला नवी दिशा देताना कोणताही दक्ष व कुशल लोकनेता नवी भूमिका संघटनेच्या स्वाभाविक विकासक्रमातूनच निष्पन्न होत आहे. आणि तिच्या उभारणीत आजवरच्या नेतृत्वानेच कसा हातभार लावला आहे, हे सहेतुकपणे सांगतो. कारण आपल्या नव्या भूमिकेचा सांधा जुन्या भूमिकेशी बेमालूमपणे जुळवून घेऊन संघटनेतील तणाव व चलबिचल त्याला टाळावयाची असते आणि आपल्या संघटनेची प्रतिमा सदैव उजळलेलीच कशी होती, हे सुचवावयाचे असते. श्री. देवरसांनी स्वाभाविकपणेच ह्या युक्तीची कास धरली व आपल्या नव्या भूमिकेच्या मांडणीला श्रीगुरुजींच्या भाष्यापासून सुरुवात केली.

ते म्हणतात की, 'दिवंगत सरसंघचालक श्रीगुरुजी यांनी चातुर्वर्ण्यासंबंधी जे काही म्हटले त्याचा विपर्यास करण्यात आला. त्यांनी फक्त चातुर्वर्ण्यव्यवस्था ज्या काळात निर्माण झाली, त्या काळाला अनुलक्षून शास्त्रीय चर्चा केली होती. आज ती व्यवस्था आहे अथवा असावी, हा त्यांचा दावा नव्हता. हा वाद गाजला तेव्हा मी त्यांना स्वतः भेटलो होतो. त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, चातुर्वर्ण्य-व्यवस्था आज अस्तित्वात नाही, ती कालबाह्य झालेली आहे व आजच्या काळाला अनुरूप अशी नवी व्यवस्था निर्माण केली पाहिजे. त्यांचे हे शब्द आहेत. तेव्हा उगाच गैरसमज पसरविण्यात अर्थ नाही. हिंदू समाजाचे संघटन करण्यात येणारी प्रत्येक बाधा, समाजघटकांतील कटुतेचे प्रत्येक कारण निपटून काढणे हे तुमचे कर्तव्य आहे. कारण त्याविना आपल्याला भवितव्य नाही.'

अशी प्रस्तावना केल्यावर नवे सरसंघचालक अचूकपणे म्हणतात की; 'एकूण राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने व विशेषतः हिंदू संघटनेचे दृष्टीने या विषयाचे फार महत्त्व आहे. हा विषय नाजूक व सामायिक असल्यामुळे अधिक महत्त्वाचा मानला पाहिजे.'

'आपल्याला सर्व हिंदूंना संघटित करावयाचे आहे. लोकांना संघटनेत आणावे लागते व एकत्र आल्यावर ते एकत्र कसे राहतील व त्यांनी एकत्र कसे राहावे याचाही विचार करावाच लागतो. या एकतेचा आधार कोणता असू शकतो?' असा तलस्पर्शी प्रश्न श्री. देवरस स्वतः संघालाच विचारतात व मग बरोबरच असे उत्तर देतात की,

'एक आधार तर भावनात्मक आवाहन हा राहणारच...परंतु हे पुरेसे आहे काय? या भावनेबरोबरच व्यावहारिक बाजू आवश्यक आहे की नाही? सगळ्यांना आपण एक आहोत याची भावनात्मक जाणीव जशी असायला पाहिजे, त्याचप्रमाणे व्यवहारातही या एकतेचा अनुभव नेहमीच सहजपणे आला पाहिजे. रोजच्या व्यवहारात आपण सर्व समान आहोत असे 'सर्वांना वाटल्याखेरीज हा एकतेचा पाया दृढ व चिरस्थायी होणार नाही, असे जर आपणास वाटत असेल व वाटत असेलच असा मला विश्वास आहे, तर त्या दृष्टीने आपल्यात काय कमी आहे, याचा विचार करणे क्रमप्राप्तच आहे. ज्यांना हिंदू संघटन करावयाचे आहे त्यांना हा विचार डावलता येणार नाही.'

श्री. बाळासाहेबांच्या ह्या निःसंदिग्ध व ठाम विधानाचा अन्वयार्थ स्पष्ट आहे. प्राचीन भारतवर्षात हिंदू समाजाच्या एकतेचा भावनात्मक व व्यावहारिक पाया हा चातुर्वर्ण्यव्यवस्थेने कसा सुरेख घातलेला होता, याचे भूतकालात रमलेले गूढगुंजनवादी समर्थन यापुढे

संघस्वयंसेवकांनी कटाक्षाने टाळले पाहिजे, असेच त्यांना सुचवावयाचे आहे. इतकेच नव्हे तर, एकतेच्या मूलगामी कार्याला एक व्यावहारिक अधिष्ठान असावे लागते, असे सांगून ते भावी संघकार्याला एक वस्तुदर्शी परिमाण लाभवून देत आहेत. व्यावहारिकतेच्या या भानामुळेच ते आता हिंदू इतिहासाचे आत्मसंशोधन मोकळ्या मनाने करतात. ते म्हणतात की,

'समाजावर अनेक परकीयांनी राज्य केले, बाटविले, भेद पाडले, कलह माजविला, याबद्दल केवळ त्यांना दोष देऊन आपल्या पतनाची मीमांसा करता येणार नाही. त्यासाठी अंतर्मुख होऊन विचार करावा लागेल. आपल्या समाजातील उणीवा दूर कराव्या लागतील. परकीयांचा संबंध आल्यामुळे त्यांनी बुद्धिभेद केला व विकृती आल्या, असे म्हणून कसे चालेल? इतर समाजाशी, संस्कृतीशी आज ना उद्या संबंध येणे अपरिहार्यच होते. बर्लिनमध्ये जशी भिंत उभारली तसे होणे शक्यच नव्हते. भिंत ते बांधतात की, ज्यांना दुसऱ्यांच्या तत्त्वज्ञानाचे भय वाटते. त्यांचा आत्मविश्वास कमी पडतो. दोन्ही पद्धती जवळ जवळ एकत्र नांदल्यानेच एखाद्या पद्धतीचे श्रेष्ठत्व ठरते. जी पद्धती भयामुळे आपल्याभोवती भिंत बांधते ती आपले कमीपण मानते. तेव्हा इतरांवर दोषारोप करण्यापेक्षा अंतर्मुख होऊन आमच्यातील कोणत्या दोषांचा त्यांनी फायदा का घेतला याचाही विचार आम्हाला करावा लागेल. सामाजिक विषमता हे आपल्या विघटनेला मुख्य कारण झाले असे आपल्याला मान्य करावे लागेल. वर्णभेद, जातिभेद, अस्पृश्यता हे सामाजिक विषमतेचे काही परिचित आविष्कार आहेत व आजही समाजात वावरतांना या प्रश्नाची आपणास ठोकर लागते हा आपणा सगळ्यांचा अनुभव आहे.'

नव्या सरसंघचालकांची उपरोक्त चर्चा शास्त्रशुद्ध व अचूक तर आहेच, पण यापुढे सर्वच संबंधित माणसे भारतीय किंवा हिंदू गतेतिहास किंवा गतसंस्कृतीची मीमांसा जिव्हाळ्याने, तटस्थपणे व विकारातीत पातळीवर करतील. ह्या मंगल प्रवाहाचे ते प्रसादचिन्ह आहे. त्याच वेळी कवचकुंडले म्हणून जातिसंस्थेचा स्वीकार केल्यानेच मध्ययुगीन काळात हिंदू समाज व संस्कृती ह्यांचे सदैव रक्षण झाले, हा श्रीगुरुजींचा लाडका, अदूरदर्शी व अनैतिहासिक सिद्धान्त श्री. देवरसांनी हळूच इतिहासजमा करून टाकला आहे. ते म्हणूनच यापुढे मुद्दाम सांगतात की,

'जुने ते सर्वच चांगले असा हेका धरून बसणारांना कापुरुष म्हणजे भ्याड म्हटले आहे. परीक्षून, विवेक करून, एखाद्या गोष्टीचा त्याग किंवा स्वीकार व्हावा हेच इष्ट आहे. अधिकाधिक लोक अशा पद्धतीने विचार करण्यास व वागण्यास उद्युक्त होतील, तर इष्ट परिवर्तन घडेल आणि शाश्वत आदर्श कायम ठेवूनही आधुनिक बनता येईल.' जुन्या-नव्याचा विवेक कसा करावा याची ही सर्जनशील जाणीव झाल्यानेच श्री. बाळासाहेब आता यापुढे असे मार्मिकपणे म्हणू शकतात की, 'प्राचीन काळी आपल्या देशातही असे परिवर्तनशील धर्मचिंतन, धर्ममंथन झाले असलेच पाहिजे. आता सगळ्याच ख्रिश्चनांनी बायबलातील सृष्टीच्या उत्पत्तीची कथा अमान्य केली आहे. तरी पण बायबल अमान्य केले नाही. तो त्यांच्या श्रद्धेचा विषय कायम आहे, हे लक्षात घेतले पाहिजे... प्राणतत्त्व जुनेच राहते. कारण ते शाश्वत व सनातन आहे. पण त्याचा आविष्कार, त्याची अभिव्यक्ती बदलणार आहे. या कालोचित बदलाचे आपण स्वागत केले पाहिजे.' त्यानंतर लोपलेल्या वर्णव्यवस्थेतील आवश्यक लवचिकपणा व तोल सावरणाऱ्या काही रचनांचा (उदा. Checks and Balances) उदात्तीकरणवजा परामर्श घेतल्यावर ते पुढे चिकित्सकपणे व डोळसपणे असा निष्कर्ष काढतात की, पूर्णपणे बदललेली परिस्थिती, सभोवतालचे वातावरण, यंत्रयुगाचे आगमन, नवे शोध, नवे विज्ञान, छापण्याची कला, गुरुगृहाऐवजी शिक्षणसंस्थांतून ज्ञानार्जन व गृहोत्पादन, उत्पादनपद्धतीऐवजी नव्याने उदयास आलेली कारखानदारी व्यवस्था ह्यामुळे 'नवीन काळाशी सुसंगत असाच विचार करणे इष्ट आहे.'

त्यानंतर श्रीगुरुजींच्या हरदासी विज्ञानाला यापुढे संघाने जणू काही कायमची रजा दिली आहे, हे वरील संदर्भात सिद्ध करण्यासाठी म्हणून ते आपल्या विवेचनाच्या सहज ओघात असे म्हणतात की–

'निसर्गामुळे म्हणजे आनुवंशिकतेमुळे काही विषमता निर्माण होते हे खरे. पण त्या विषमतेचे शास्त्र बनविणे योग्य होणार नाही. मनुष्याचे प्रयत्न निसर्गनिर्मित विषमतेला कायम करण्यात खर्च झाले, तर त्यात त्यांचा पुरुषार्थ नाही. निसर्गनियमांचाच अभ्यास करून ही नैसर्गिक विषमता कशी दूर करता येईल वा सुसह्य करता येईल, याचा मनुष्याने विचार केला पाहिजे. विषमतेचे तत्त्वज्ञान बनविणे इष्ट नाही. दुर्बल कुटुंबात जन्म घेतलेल्या बालकाला देखील सर्व सोयी उपलब्ध व्हाव्यात, असे जगात सर्व समजदार समाजात प्रयत्न होत असतात. एखाद्या जातीत जन्मल्यामुळेच काही स्वाभाविक उणीवा (Handicaps) निर्माण होत असतील तर, ती व्यवस्था चालू शकणार नाही व ते आनुवंशिक वा नैसर्गिक म्हणून त्यांचा पाठपुरावा करणे चूक होईल. विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाने, प्रशिक्षणाने व इतर व्यवस्थेने पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले गुण बदलू शकतात.' संघाची ही नवी भूमिका विवेकनिष्ठ, समंजस आणि मुख्य म्हणजे मानवाच्या श्रेयार्थी सर्जनशीलतेची जणू आणखी एक पताकाच आहे.

त्यानंतर श्री. देवरस सरळ मान्य करतात की, 'खरे म्हटले तर एकूण परिस्थितीच बदलून गेल्यामुळे समाजधारणेला पोषक व आवश्यक अशी जन्मजात वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था आज अस्तित्वातच नाही. सर्वत्र अव्यवस्था आहे, विकृती आहे. आता तिची व्याप्ती केवळ लग्नसंबंधापुरतीच राहिली आहे. आता त्या जुन्या व्यवस्थेतील 'स्पीरिट' निघून गेले आहे. केवळ 'लेटर' च कायम आहे. भाव गेला, केवळ साचा राहिला आहे; प्राण गेला, कुडी राहिली अशी स्थिती आहे. समाजधारणेशी तिचा काहीही संबंध नाही. निवडणुकीचा संबंध असेल वा अन्य हितसंबंध असतील तिव्हाच ती उकरून काढली जाते. तेव्हा सर्वांनी मिळून जी जाणे इष्ट, जी जाऊ घातली आहे, ती मीट कशी जाईल याचा विचार करावा.'

याबाबतीत संघ नव्या सरसंघचालकांच्या नेतृत्वाखाली केवढी वैचारिक व व्यावहारिक झेप घ्यावयाला सिद्ध झाली आहे, हे जणू प्रकट करण्याकरताच श्री. बाळासाहेब देवरस समतानिष्ठ एकतेच्या व्यावहारिक संदर्भात रोटी–बेटी व्यवहारासंबंधीची संघाची नवी

भावात्मक धारणा पुढीलप्रमाणे व्यक्त करतात. 'समाजजीवनातील वाढत्या अभिसरणामुळे रोटीव्यवहाराची बंधने आता तुटली असून, रोटीव्यवहार आता अटळ झाला आहे,'-असे सांगून ही चांगली गोष्ट घडण्याच्या प्रक्रियेत सहेतुकपणे 'संघाचे काम' या घटकाचा समावेश करतात. मला असे वाटते की, त्यांचा हेतू याबाबतीतले श्रेय संघाला फुकट मिळावे असा हिणकस नसून, असल्या कार्यात संघ यापुढे मोकळ्या मनाने सहभाग घेईल (असोसिएट करेल), असेच सूचित करण्याचा आहे. असल्या उपाययोजनांची जर कोणी यापुढे तिरकसपणे सुधारणावादी ( रिव्हिजनिस्ट ) म्हणून संभावना करणार असतील, तर एक अँटिसिपेटरी उत्तर व विधानही ते प्रांजलपणे करतात. वरील कामामुळे 'जातिभेद बोथट झाले आहेत असेही म्हणा' असे मान्य करून ते पुढे म्हणतात की, 'आता जातीजातीत रोटीव्यवहार पण सुरू झाला आहे व तो अधिक प्रमाणावर झाल्यास जातिभेद दूर करण्यास व सामाजिक अभिसरण होण्यास त्याची मदत होईल हे स्पष्टच आहे. हा विषय रोटीव्यवहाराइतका सोपा नाही हे लक्षात ठेवूनच आदळआपट न करता त्याला अनुकूल व्यवहार ठेवला पाहिजे' असे रास्तपणे म्हणतात. 'ज्या प्रमाणात लोकांच्या वस्त्या सरमिसळ होऊन एकत्र राहणे वाढेल, शिक्षण सार्वत्रिक होईल व सर्वांचा जातिनिरपेक्ष आर्थिक स्तर वाढेल त्या प्रमाणातच हे स्वाभाविकपणे होणार' असे ते मूलगामीरीत्या सांगतात व शेवटी आपापल्या परीने सर्वांनी या सामाजिक अभिसरणाला हातभार लावला पाहिजे, असे आवाहन करतात.-

याबाबतीतला नव्या सरसंघचालकांचा दृष्टिकोन जुन्यापेक्षा किती वेगळा आहे, हे दोघांच्या अस्पृश्यतानिवारणविषयक भूमिकेवरून कळून येते. श्रीगुरुजी म्हणत की, 'हरिजनांच्या अस्पृश्यतेचा प्रश्न हा फार बिकट झाला आहे. तो आपोआप सुटण्याच्या मार्गावर आहेच. पण जितक्या लवकर सुटेल तितके उत्तम होय. तथापि 'अस्पृश्यता निवारण मोहीम' असा डंका पिटत पाऊल टाकण्याने 'निवारण' होण्याऐवजी 'संघर्ष'च माजतो व दुराग्रह निर्माण होऊन इष्ट हेतू साधण्याऐवजी हा प्रश्न अधिकच बिकट बनतो.' पण त्यावर उपाययोजना सुचविताना त्यांनी एक अजब व मासलेवाईक उपाय सुचविला. ते असा प्रयत्न करीत होते की, एखादा 'शुद्धीकरणा'हून अत्यंत साधा असा विधी अस्पृश्य मानल्या जाणाऱ्यांना स्पृश्य करून घेण्यासाठी आखावा. त्यांना असे वाटे की, धर्मगुरूंनी हा विधी स्वीकारला व आखला म्हणजे खुद्द त्यामागे धर्मचिच सामर्थ्य उभे राहून विरोधकांचा पीळ सुटू शकेल. असला विधी गळ्यात माळ घालून नमस्कार व नामस्मरण इतका सुलभही असू शकेल, असे त्यांचे मत पडे. असला सोपा मानसिक उपाय अनुसरण्यास कोणाचा प्रत्यवाय असू नये, असे ते म्हणत. श्रीगुरुजींच्या या अफलातून भूमिकेतील विनोद असा होता की, अस्पृश्यता निर्माण करणाऱ्या स्पृश्यांना प्रायश्चित म्हणून पापक्षालनार्थ असा कोणता तरी सोपा उपाय सुचवावा, असे त्यांना क्षणभरही वाटले नाही.

त्या तुलनेत नव्या सरसंघचालकांची भूमिका अगदी वेगळी दिसते. श्री. बाळासाहेब देवरस म्हणतात की, 'अस्पृश्यता हा आपल्या समाजातील विषमतेचा एक अत्यंत दुःखद व दुर्दैवी प्रकार आहे. अगदी पूर्वीच्या काळात ही अस्तित्वात नव्हती व ती काळाच्या ओघात आगंतुकपणे रूढ झाली, असे अनेक विचारवंतांचे म्हणणे आहे...तेव्हा आपल्या सगळ्यांच्या मनात सामाजिक विषमतेच्या उच्चाटनाचे ध्येय जरूर असले पाहिजे. विषमतेने आपल्या समाजात कशी विघटना आली, दुर्बलता आली आहे, हे लोकांसमोर स्पष्ट केले पाहिजे. ती दूर करण्याचे उपाय सांगितले पाहिजेत व सगळ्यांचा आपापल्या परीने या प्रयत्नास हातभार लागला पाहिजे.' मुख्य म्हणजे याबाबतीत धर्मगुरूंना काय करता येईल, याविषयी श्री. देवरसांची मनाची धारणा श्रीगुरुजींपेक्षा वेगळी दिसते. अर्थातच माजी सरसंघचालकांना सांभाळून घेण्याची दक्षता सोडत नाहीत ! श्रीगुरुजी ह्यांनी विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमाने सर्व प्रकारच्या धार्मिक नेत्यांना एकत्र आणून नव्या दृष्टीने विचार करण्यास प्रवृत्त केले होते अशी नोंद ते अगत्याने करतात. त्याला एक सुदैवी, सुचिन्हही म्हणतात. पण 'कल्याण' मासिकात श्रीशंकराचार्यांनी जो कुत्र्या-मांजरातही चार वर्ण असल्याचा शोध लावणारा लेख लिहिला त्याचे हेकट असे परत परत समर्थन करताना श्रीगुरुजींना जे स्फुरण चढे ते अपूर्व असे. जणू काही हिंदू धर्मातील परंपरागत धार्मिक पीठांवर आरूढ झालेल्या नेतृत्वाच्या सर्व प्रमादांवर पांघरूण घालण्याचे काम ईश्वरनिर्मित श्रुतींनी कलियुगात सरसंघचालकांवरच सोपविलेले होते. पण श्री. बाळासाहेबांच्या मतानुसार या संदर्भात धर्मगुरूंचीही काही कर्तव्ये आहेत. 'धर्मगुरू, संत, महात्मे, विद्वान यांना जुन्या गोष्टींवरील त्यांची श्रद्धा व त्या समाजात कायम राहाव्यात हा त्यांचा आग्रह, यांची मर्यादा नम्रपणे सांगितली पाहिजे. त्यांनी परिवर्तनशील भूमिका घेऊन आपल्या मठातून बाहेर पडून समाज-जीवनात मिसळावे' असे नम्र पण ठाम आवाहन करून श्री. देवरस धर्मपरंपरेविषयीचा आपला डोळस दृष्टिकोन परत एकदा व्यक्त करतात.

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात स्पृश्य व अस्पृश्य या दोघांनीही समजूतपणा व संयम बाळगावा असे म्हणताना श्री. बाळासाहेब देवरस खूपच आर्जव व मनाचा उदारपणा दाखवितात. समजूतदार लोकांनी कटुता आणू नये. सौहार्द, सामंजस्य आणि सहकार्य नांदण्यासाठी आपल्याला समानता हवी आहे, म्हणून कटू बोलणारे आपल्याच उद्दिष्टांना बाधा पोहचवतील. जनमत जागृत करण्यासाठी कठोर भाषेचा उपयोग प्रारंभी होतो व शोभतो; पण सदासर्वकाळ सर्वांनीच तसे करणे आवश्यक नाही. एकांगी कडवटपणा हिंदू समाजाच्या संघटनेत विघ्ने उपस्थित करील. म्हणून हिंदूमधील कोणत्याही वर्गाला ते अगदी, अन्यायाचे, अत्याचाराचे व शोषक प्रवृत्तीचे पुतळे आहेत, असे सांगून त्यांना डिवचत राहणे, अपमानित, आत्महत व तेजोहत करणे योग्य होणार नाही. त्यांचे आत्मबळ कायम ठेवून नव्या प्रकारच्या चांगल्या सामाजिक व्यवहाराची उदाहरणे आणि आदर्श त्यांच्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. अखेर ते हिंदू समाजातीलच असल्यामुळे त्यांचा स्वाभिमान कायम राहील याची पण दक्षता घेतली पाहिजे. त्यांच्यावर तुटून पडण्यापेक्षा व संघर्ष निर्माण करण्याऐवजी काम करण्याचा दुसरा एक प्रकार असू शकतो, असे श्री. बाळासाहेब म्हणतात.

हिंदू समाजातील वितुष्ट, मारामाऱ्या यांची सुरुवात अनेक वेळा

राजकारण किंवा वैयक्तिक भांडण यापासून होते. आपली कातडी बचावण्याकरता किंवा आपला स्वार्थ साधण्याकरता राजकारणी लोक त्याला जातीजातीच्या भांडणाचे स्वरूप देतात. अशा वेळी अनेक सत्प्रवृत्त बंधू व पत्रकारही अजाणता त्याला हातभार लावतात, असे सांगून ते पुढे म्हणतात की, 'हिंदू-मुसलमानांच्या मारामाऱ्यासंबंधी 'एका जमातीची दुसऱ्या जमातीशी मारामारी' असे वर्णन, पण हिंदूंच्या राजकीय व वैयक्तिक कारणाकरता झालेल्या मारामाऱ्यांना भडक व जातीय मथळे दिले जातात. असे होणे योग्य नाही. हितसंबंधाच्या दृष्टीने या प्रश्नाचा विचार होऊ नये. योग्य माहिती घेतली जावी.'

याबाबतीत दलितांनाही एक विशेष अशा आर्जवी जिव्हाळ्याचा सल्ला श्री. बाळासाहेब देतात. ते म्हणतात की, जे दलित वा अस्पृश्य बंधू आहेत त्यांनी खूप हाल व त्रास सोसला आहे. त्यांची चीड समजू शकते. त्यांचा संतापाचा उद्रेक काही अंशी अगदी साभाविक आहे. समाजातील अन्याय व वाईट गोष्टींवर त्यांनी आपलेपणाने टीका करण्यास हरकत नाही. पण आपल्याच ह्या समाजातील दोषांबद्दलच्या वेदनांची त्यात जाणीव असावी. परकीय जसे आपल्याला परकीय समजून आपल्याकडे तुच्छेतेने व तिरस्काराने पाहतात; तसा भाव त्यात नसावा. भूतकाळातील लढाया वर्तमानकाळात आणून भविष्यकाळ धोक्यात येऊ नये, याची सर्वांनीच काळजी घेणे आवश्यक आहे. आम्ही या समाजाचेच आहोत आणि समाजातील इतर घटकांबरोबर राहू असा यथार्थ आग्रह त्यांनी धरला पाहिजे. असे केल्यानेच दलितांबाहेरील फार मोठा समाज व दलित यांची शक्ती एकवटेल आणि त्या बळामुळे सर्वांना इष्ट असलेले सामाजिक समतेचे वातावरण उत्पन्न होईल.'

हिंदू समाजाची एकता साधण्यासाठी वर्गसमन्वयाची भूमिका घ्यावी की वर्गसंघर्षाचा पुरुषार्थी मार्ग स्वीकारावा, याविषयी आपल्यात निश्चित तीव्र व मूलभूत मतभेद आहेत. श्री. देवरसप्रणीत समन्वयी पद्धतीनेसुद्धा बरीच दूरवर मजल मारता येईल, ह्यात मला शंका वाटत नाही. पण त्यापलीकडे जाऊन हिंदू समाजातील मूलगामी सामाजिक विषमतेचा प्रश्न कायमचा सोडवावयाचा असेल तर चातुर्वर्ण्यात्मक मूल्यांचा व व्यवस्थेचा समूळ उच्छेद करावा लागेल. त्याकरता वर्गसंघर्षात्मक भूमिकेचाच अंतिमतः स्वीकार करावा लागेल असे मला वाटते. पण पद्धती समन्वयाची असो, वा संघर्षाची असो, एका मुद्द्यापुरते श्री. बाळासाहेबांचे विवेचन बरोबरच आहे. द्विधा उभयविध कार्यात दलितांनी आपल्याला उर्वरित समाजापासून तोडून घेण्याची भूमिका घेतली. तर प्रत्यक्ष व्यवहारात अशी गोष्ट कृत्रिमपणे साधणे त्यांना जमणार तर नाहीच, पण त्यापायी त्यांचीच व या समाजाचीही कार्यहानीच होईल. हा विचार मला यथार्थ वाटतो.

याविषयी संघाचा पुढील व्यवहार कसा असेल ह्याची कल्पना डॉक्टर हेडगेवारांच्या व्यवहारातून आपल्याला येईल, असे नव्या सरसंघचालकांना वाटते. त्यांच्या विवेचनाप्रमाणे डॉक्टरांनी संघशाखांची व कार्यक्रमांची रचना अस्पृश्यता, जातपात मानावयाची नाही, पाळावयाची नाही अशीच केली. "पण काही निराळा विचार करणारे तेव्हाही होतेच," ही गोष्ट ते प्रांजळपणाने मान्य करतात. "डॉक्टरांना मात्र विश्वास होता की, आज ना उद्या ही कर्मठ मंडळीही आपल्याला सहमत होतील. म्हणून अस्पृश्यता निर्मूलनाचा गाजावाजा न करता, भांडण वा शिस्तभंगाची कारवाईही न करता चूक दुरुस्त करून घेत." पुढे संघाचे जे मोठे अधिकारी झाले, राजस्थानात प्रचारक बनले व अखिल भारतीय जनसंघाचे अध्यक्षही झाले. त्या कै. पंडित बच्छराजजी व्यासांचे सर्वांगीण परिवर्तन डॉक्टरांनी कसे कुशलपणे साधले याचे एक उदाहरणही श्री. देवरस देतात.

सरतेशेवटी श्री. बाळासाहेब देवरस "माझी अशी धारणा आहे की, दलितांनाही करुणा नको आहे. त्यांना समाजात बरोबरीचे स्थान पाहिजे आहे. ते त्यांना पुरुषार्थाने मिळावयाचे आहे," असे सांगून ते अतिमहत्त्वाची घोषणा करतात की –

"एकरस, समतायुक्त, संघटीत हिंदू समाजच हिंदू जीवनविषयक आदर्श कायम ठेवेल व जगास उपकारक होईल. सर्व माणसे ईश्वराची लेकरे आहेत. याही पुढे जाऊन ते ईश्वराचेच अंश आहेत असे मानणाऱ्या हिंदू धर्मात उच्चनीचतेचे भाव यावेत, याबद्दल डॉ. आंबेडकरांनी अतिशय दुःख प्रकट केले आहे. वास्तविक, समानतेचे साम्राज्य स्थापन होण्यात हिंदू तत्त्वज्ञानाने दिला त्यापेक्षा मोठा आधार सापडू शकत नाही. तेव्हा हिंदूंची एकता आवश्यक आहे. एकतेचा आधार सामाजिक समता आहे. असाच विचार सर्व बांधवांनी केला पाहिजे. हे राष्ट्र संघटित व समर्थ करण्यास पुढे सरसावले पाहिजे. याला कोणी हिंदू राष्ट्र म्हणोत की न म्हणोत, पण हिंदू समाजाच्या सुसंघटित व समर्थ स्वरूपावरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, यात शंका नाही."

## संघकार्याचे भावी स्वरूप व त्याच्या यशापयशाचे वस्तुनिष्ठ घटक

एकचालकानुवर्तित्वापासून प्रारंभ करून उदारमतवादी लोकशाहीचा पूर्ण स्वीकार करण्यापर्यंतचा प्रवास संघाने कसकसा केला, हे आपण मागे पाहिले. त्याचप्रमाणे हिंदू समाजातील सामाजिक विषमतेचा प्रश्न सोडवताना आद्य सरसंघचालकांनी जी सावध, अप्रमत्त, उदार व कार्यकुशल भूमिका व पद्धती स्वीकारली त्याचे मर्म न जाणल्याने दुसऱ्या सरसंघचालकांनी संघाच्या उत्तरोत्तर वर्धिष्णू कार्याला स्वतःच्याच चातुर्वर्ण्यविषयक कालबाह्य, दोषास्पद हेकेखोरपणामुळे पदोपदी कशी खीळ घातली ह्याचा वैचारिक इतिहास आपण पाहिला. पण सरतेशेवटी स्थलकालपरिस्थितीच्या अपरिहार्य संदर्भात समतायुक्त एकरस हिंदू समाज घडविणे हेच संघकार्याचे मूलगामी उद्दिष्ट आहे, अशी घोषणा करून नव्या सरसंघचालकांनी केवढे मोठे समयज्ञान व केवढी मोठी वैचारिक झेप घेतलेली आहे, हेही आपण पाहिले.

भांडवलशाही इतिहासकक्षेतच का होईना, भारताच्या सर्वांगीण आधुनिकीकरणाच्या दिशेने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हिंदू समाजसंघटनेच्या बाबतीत ही जी नवी, विज्ञाननिष्ठ, पुरोगामी व उदारमतवादी भूमिका घेतलेली आहे तिचे दूरगामी परिणाम भारतीय लोकशाहीच्या इतिहासावर झाल्याखेरीज राहणार नाहीत.

साम्यवादविरोधी प्रतिक्रियात्मक भूमिका व पवित्रा घेणाऱ्या

सर्व तऱ्हेच्या सेक्युलर वा धर्मनिष्ठ उदारमतवाद्यांची एकजूट होण्याच्या कार्याला या नव्या भूमिकेमुळे आशंकाविरहित असा केवढा मोठा प्रामाणिक व तात्त्विक आधार लाभत आहे, ही खूणगाठ आपण आपल्या मनाशी यापुढे बाळगू शकतो.

मी असे ऐकतो की, नव्या सरसंघचालकांच्या हातात संघाची सूत्रे आल्यावर व विशेषत: आणीबाणीच्या संदर्भात संघावर जो अन्यायी घाला घालण्यात आला आहे त्यानंतर, संघाने यापुढे दलित व बहुजनसमाज यांच्यात संघकार्याचा विस्तार करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकण्याचे ठरविले आहे. कारण काहीही असो, या संकल्पामुळे संघकार्याला एक वेगळेच वळण व विधायक प्रत्ययकारी सामर्थ्य लाभण्याचा मोठाच संभव आहे, असे मला वाटते. कारण संघाने तसे खरोखरच मनात आणले तर कार्यपद्धती, अनुशासनबद्धता आणि संथ, अप्रकट व तितिक्षायुक्त काम करण्याची सर्वांगीण तयारी असलेले स्वयंसेवक याबाबतीत संघाचे सामर्थ्य एवढे मोठे आहे की, संघाने नेट लावला तर, त्याला बहुजन समाज व दलित वर्गात यापुढे खूपच मनुष्यबळ लाभेल. कारण श्री. बाळासाहेब देवरसप्रणीत भूमिकेमुळे संघाविषयी अनेक विकल्प व अनुभव मनात साठवून संघापासून दूर राहिलेल्या ह्या वर्गात संघाविषयी प्रेम निर्माण करण्याच्या कार्यात संघाच्या स्वयंसेवकांना यापुढे मनमोकळेपणाने वावरता येईल.

संघाला कोणत्या प्रकारे याबाबतीत यश मिळेल व त्याच्या मर्यादा काय असतील, ह्याचे विश्लेषण आपण यापुढे थोडक्यात करू.

१ : संघाचे तळागाळाच्या समाजात काम करण्याचे उद्दिष्ट लक्षात घेऊन संघाच्या कार्यपद्धतीत काही बदल घडवावेत का हा प्रश्न अर्थातच संघनेत्यांना पडत असेल. दलितांची संघटना बांधण्याचा कार्यक्रम संघाने प्रत्यक्षपणे आपल्या हातात घ्यावा असे काहींना वाटेल. पण हे कार्य कितीही अत्यावश्यक व विधायक स्वरूपाचे असले तरी एकरस, समतायुक्त हिंदू संघटना हिंदुत्वाचे संस्कार करून निर्माण करण्याचे संघाचे लक्ष्य हे इतके मूलगामी, दूरगामी व सहजसूक्ष्म आहे की वरील दोन भिन्न लक्ष्यांचे कडबोळे करणे संघाच्या दृष्टीने हितावह ठरणार नाही. कारण ही दोन्ही उद्दिष्टे एकत्र आणली तर दोहोंचा नामरूपादी संबंध काय आणि दोहोंमध्ये भेद काय, हे अधिकाधिक स्पष्ट करण्याचा मोह व प्रयत्न इच्छा नसूनही टाळता येत नाही. त्यामुळे वैचारिक अस्पष्टता, चलबिचल वाढते व संघटनेतील अंतराय वाढत जातो.

अ : एकतर संघ ही एक शैक्षणिक संस्था आहे. तिचे वैचारिक कार्य गुरुकुलपद्धतीचे आहे. असल्या आश्रमीय संघटनाकार्यात राजकारण असतेच. किंबहुना तेच असते. पण ते केवळ सत्तेचा लोभ राखणारे अदूरदर्शी, तात्कालिक असे नसते. कोणताही पक्ष किंवा वाद उभा न करता हिंदू संघटनेचे काम करण्याकरता सबंध समाजात मिसळून जाऊन त्याला आपले रूप द्यायची सूक्ष्म कार्यपद्धती अंगीकारली तर 'श्रेष्ठ' राजकारण निर्माण होते. पण ते सर्वांना जोडणारे, सर्वांच्या शक्तींचे वर्धन करणारे असे असते. ते शक्तिक्षयकारी व भेदकारी नसते.

ब : पण दलितांचे संघटन करण्याचे कामच असे आहे की, कितीही सूक्ष्मपणे करावयाचे ठरविले तरी, त्याला संघर्षात्मक राजकारणाची एक कला सदैव राहील. जर कोणी कर्मठपणे किंवा आततायीपणे ती कला अंकुरित होऊ न देण्याचा किंवा ती झाकण्याचा आगाच केला तर, ते कार्यच मुळात उभारले जाऊ शकणार नाही असे मला वाटते. अशा वेळी जी संघटना संस्कारात्मक किंवा विचार–क्रांतीचे अखंड काम करू इच्छिते, तिने संघर्षात्मक राजकारणाची बीजे असलेले सेवाकार्य प्रत्यक्षपणे उभारण्याचा मोह टाळलाच पाहिजे. म्हणूनच संघाची नवी भूमिका व संकल्प ध्यानात घेऊनही संघाने आपल्या मुळातील कार्यपद्धतीचा त्याग केला तर संघाचा विस्तार न होता कार्यहानीच होईल असे मला वाटते.

क : या प्रश्नाची आणखी बाजू आहे. तळागाळाचे दलित संघटन साधावयाचे असेल तर, त्यात दलितांना आर्थिकदृष्टया स्वत:च्या पायावर उभे करण्याचे कार्य क्षणभरसुद्धा टाळता येणार नाही. दलितांच्या भाकरीच्या प्रश्नाला तसूभर गौण स्थान देऊन जर कोणी दलितांच्यामध्ये हिंदू–एकतापूर्तीसाठी संस्कारक्षम संघटना बांधू म्हणत असतील तर तसल्या संघटना म्हणजे औटघटकेची नाटके ठरतील. सत्तानिरपेक्ष व शासननिरपेक्ष असे स्वाश्रयी कार्य दलितांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी करण्याकरता जर कोणी केले तरी, एका विशिष्ट मर्यादेबाहेर त्या कार्याचा व्याप व प्रभाव वाढवू लागताच किंवा पडू लागताच प्रस्थापित हितसंबंधियांचे शत्रुत्व ते ओढवून घेतल्याखेरीज राहणार नाही. तसे झाल्यास असल्या संघटनेला व तिच्या कार्यकर्त्यांना कोणाचा तरी राजकीय आधार घ्यावाच लागेल. जर शासकीय पक्षभ्रष्ट व उन्मत्त असेल तर, त्याकरता विरोधात उभे राहिलेल्या पक्षांचाच आश्रय घ्यावा लागेल. यात राजकारण येते. राजकारण म्हणजे संघर्ष आणि धर्मसंघर्ष म्हणजे पक्षपात. परिणामी कार्य चांगले असले तरी, आपापल्या हितसंबंधांनुसार मूळ संघटनेतही दुहीची बीजे पेरली जातातच. शेवटी मग ती संघटना फुटते.

म्हणून संघाने दलितांत प्रवेश मिळविण्याचा नवा संकल्प केला तरी, ते काम स्वत: संघाने संघ म्हणून करू नये असे मला वाटते.

२ : पण संघाला हे कार्य दुसऱ्या प्रकाराने जरूर करता येईल. विविध प्रकारच्या दलितांच्या संघटना विधायकपणे बांधण्याचे कर्तृत्व व आकर्षण ज्या स्वयंसेवकांशी असेल, ते संघसंस्कारांना धरूनच असले काम आपल्या शक्तीनुसार बाहेर एकटेपणाने किंवा संघटनापूर्वक करू शकतात. अशा संघाने घडविलेल्या स्वयंचलित स्वयंसेवकांच्या स्वयंचलित रचनात्मक काम करणाऱ्या संघटनांचे एक जाळे देशभर पसरू शकते. त्या सर्व संस्था संमीलित होऊ शकतात किंवा वेगळेपणाने आपले काम करू शकतात.

असल्या संस्थांवर जर संघाने आपुलकीची, जिव्हाळ्याची, मायेची झालर सतत पांघरली तर, संघकार्यालाही बाळसे येईल.

अर्थात असल्या कार्यपद्धतीतसुद्धा एक धोका सतत असतोच. मूळ संघटना व तिची ही सेनारूप बालके ह्यांच्यात एक संघटनामूलक तणाव कार्यकुशलतेचे कितीही भान राखले तरी राहतोच. कारण असल्या कार्यकर्त्यांमध्ये सैद्धान्तिक धोरणांमुळे निर्माण होत असलेला व सूक्ष्मपणे व्यक्तिरूप बनत चाललेला तणाव किंवा असल्या सेवाभावी संघटना–संघटनांमध्ये अग्रक्रमाविषयक मतभेदांमुळे अगर शिष्टोपचारविषयक मी-तूपणामुळे (Priorities and Protocol) अटळपणे निर्माण होणारा तणाव हाताबाहेर जाऊ नये म्हणून मातृ-

संघटनेला त्यात कुशल मार्गदर्शकाच्या नात्याने हस्तक्षेप करण्याचा किंवा ढवळाढवळ करण्याचा मोह टाळता येत नसतो. ही गोष्ट जर अती तीव्र संयमाने, अगदी प्रमाणात व शक्यतो नाइलाज म्हणून न केल्यास अपत्यसंघटनेतले सर्व दोष मूळ शरीरात घुसतात, काही वेळ उलटही घडते. अपत्य संघटना व कार्यकर्तेच मार्गदर्शनाकरता मातृसंघटनेच्या अगदी गळयात पडतात व त्याचीही बाधा होते. अर्थात धोका आहे म्हणून परिस्थितीचे व इतिहासाचे आव्हान टाळणे केव्हाही चूकच व आत्मघातकीपणाचे ठरेल.

तेव्हा संघ यापुढे दलितांच्यात वेगवेगळया संघटना उभारून व बहुजनसमाजाचे सेवाकार्य करून संघप्रणीत रचनात्मक संस्थांचे जाळे सर्व देशभर उभारायला लागणार, ह्याविषयी मला शंका नाही. त्याखेरीज आहे या संघकार्याचे रक्षण व्हावे, कठीण प्रसंगी संघ विजनवासात जाऊ नये व त्याला लोकगंगेचा आधार मिळावा, या दिशेने काम करणार यात मला शंका नाही.

३ : पण मग एक प्रश्न इतिहाससमीमांसक म्हणून सहजच आपल्याला पडतो, की ज्या श्रीगुरुजींनी आपल्या कार्यकुशल व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने हजारो स्वयंसेवकांची भक्ती मिळवली आणि ज्यांनी संघकार्याचा ठसठशीत विस्तार केला हे त्यांना का जमले नाही; मला याची दोन कारणे दिसतात.' एक तर त्यांचा चातुर्वर्ण्याच्या पीळ व दुसरे म्हणजे त्यांचे व्यक्तिमत्त्व आपण वर पाहिलेच आहे की, श्रीगुरुजींचे व्यक्तिमत्त्व कमालीचे गुंतागुंतीचे होते. त्यात एक मूलभूत विसंगती होती. एकीकडे समुदायांचा गुंजारव आपल्याभोवती निर्माण करणारे श्रीगुरुजी काही बाबतीत फारच भावनाशून्य रीतीने तुटक वागत. मला असे वाटते की, संघाच्याच संस्कारांना धरून पण संघाबाहेर कालानुरूप संघविस्तार करण्याच्या कार्याला जे माजी संघस्वयंसेवक लागले त्यांच्या वाटयाला, क्षेत्र कोणतेही असो, श्रीगुरुजींची निव्वळ कडवट उपेक्षाच आली. माझ्या ऐकीव माहितीप्रमाणे म्हैसाळला सेवाभावी दलितसंघटन कार्य करणाऱ्या श्री. मधुकर देवलांना श्रीगुरुजींनी हे असेच तोडले. दलित क्षेत्र सोडा. अगदी चांगले शिक्षण 'एलिटिस्ट' पायावर देऊ पाहणाऱ्या श्री. आप्पासाहेब पेंडसे ह्यांनाही तो अनुभव आला. ज्यांनी असली कामे करण्याकरता संघ सोडला त्यांच्यावर दुसरे संघचालक, ह्या स्वयंसेवकांनी जणू काही कधीच दुरुस्ती करता येणार नाही असा अक्षम्य अपराध किंवा पाप केले आहे असे समजून, जणू काही शिस्तभंगाची जालीम कारवाई करीत. उपाय साधा होता. भारतातल्या जुन्या परंपरेप्रमाणे श्रीगुरुजी असल्या माजी स्वयंसेवकांना किंवा त्यांच्या संघटनांना वाळीत टाकत. आता माझी वरील दोन्ही ऐकीव उदाहरणे खरी नसतील, किंवा श्री. देवल किंवा श्री. पेंडसे ह्यांना कदाचित श्रीगुरुजींचा राग अणुमात्रही आला नसेल. पण आपण एवढे निश्चित म्हणू शकती की, दुसऱ्या सरसंघचालकांच्या या थंड व मर्मस्पर्शी उपेक्षावृत्तीमुळे कितीतरी स्वयंसेवकांना संघ मुकला असेल.•

४ : परत एकदा माझे म्हणणे असे नाही की, संघाने किंवा सरसंघचालकांनी भगवान श्रीकृष्ण किंवा महात्मा गांधींची भूमिका वठवावी. शिवधनुष्य उचलण्याचे आव्हान सर्वसाधारणपणे जनसामान्यांनी घेऊ नये. पण संघाचे शुद्ध व सर्वव्यापी सूक्ष्म कार्य सांभाळत असतानाच संघाबाहेर जी मंडळी व संघटना संघ-संस्कारांप्रमाणे काम करतात त्यांना संघ व सरसंघचालक ह्यांनी आपलेपणाने, शहाणपणाने, वडीलकीच्या मर्यादा न सोडता वागविले व त्यांच्या कार्यावर कृपागौरवाची उब पांघरली तर संघाला हा अपरिहार्य पण शरीरपोषक ताण सतत पेलता येईल.

थोडक्यात, संघाने स्वत: लोकसेवक संघ बनू नये. पण लोकसेवक संघापत्यांवर सत्तानिरपेक्ष, धोरणनिरपेक्ष मायेचा हात सतत फिरविला तर, यापुढे संघाचे बहुजनातील कार्य चांगलेच फोफावेल.

५ : समतायुक्त हिंदू संघटन कार्यास्तव दलितात जाण्याच्या कामात संघावर आणखी एक मर्यादा अजूनही पडेल. संघ तत्त्वत: भांडवलशाहीचा विरोधक आहे, हे मला मान्य आहे. पण प्रत्यक्षात साम्यवादविषयक प्रतिक्रियात्मक भावनेमुळे त्याच्या कार्याचा कल आज देशाची अर्थरचना व अर्थविकास ह्याबाबतीत समन्वयवादीसंमिश्र अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा करण्याकडे दिसतो. आता भारतातल्या दलितांचे दैन्य व दारिद्र्य इतके पराकोटीचे आहे की, तत्त्वत: एकरसात्मक समतायुक्त हिंदू संघटना व्यवहारात आणून दलितांना एकतेचा अनुभव सहज व्यवहारात येण्याकरता भारतातल्या यच्चयावत सर्व हिंदूंना भोगलालसा टाकून दरिद्रीनारायणाचे व्रत दोनचार पिढ्या घ्यावे लागेल. आज तरी भारतातल्या सर्वच सेक्युलर किंवा हिंदुत्वनिष्ठ उदारमतवादी विचारवंतांची किंवा संघटनांची अशा तऱ्हेची निदान मानसिक, निदान तात्त्विक तयारी दिसत नाही. तेव्हा भारतातले नवे उदारमतवादी हिंदुत्ववादी किंवा आपल्या दृष्टिकोनातील शेवटल्या अंशमात्र समाजवादी विचारकणांचे शुचिर्भूत विसर्जन करून उभे राहिलेले सेक्युलर उदारमतवादी, भांडवलशाहीच्या चौकटीतच यापुढे आपले काम बजावणार असे दिसते. त्या व्यवस्थेच्या मूळ मर्यादा अर्थातच संघकार्याला निव्वळ वैचारिक झेप घेऊन ओलांडणे अशक्यप्रायच दिसते !

महापूर, दुष्काळ, निर्वासित, पीडितांना राष्ट्रीय आपत्तींच्या वेळी संघ म्हणून न मिरवता काम करणे वेगळे, आणि दलितांत जाऊन शांत व विधायक का होईना, काम करणे वेगळे. त्यात पृथकता येणारच. त्यावर मात करण्याकरता संघाला भारतातील समग्र अर्थव्यवहाराविषयी अधिक स्पष्ट व सुसंगत भूमिका मांडावी लागेल. मानवजातीचे दुर्दैव असे की, जी माणसे काही एका ध्येयवादाकरता तनमनधन समर्पित करावयास मागेपुढे पाहात नाहीत; तीच माणसे प्रत्यक्ष जीवनाच्या दुसऱ्या एका पातळीवर आपल्या लौकिक हितसंबंधाविषयी फारच हळुवार बनताना दिसतात. आता एकरसात्मक, समतानिष्ठ हिंदू समाज निर्माण करण्याकरता हिंदू समाजातील उच्चवर्गीयांना आपल्या धनलोभावर पाणी सोडावे लागणारच, जर त्या कामी त्यांनी कुचराई केली, विरोध केला तर अहिंसात्मक पद्धतीचा का होईना, संघर्ष उभा राहणारच. त्यावेळी संघाच्या आर्थिक दृष्टिकोनाचा प्रश्न निर्णायक बनेल.

संघ दलितांकडे भावनात्मक पद्धतीने जाणार की प्रतिक्रियात्मक पद्धतीने जाणार, हा खरा सवाल आहे. संघ-सामर्थ्य लाभण्याकरता जर फक्त प्रतिक्रियात्मक दृष्टिकोवातून या दलितांकडे वळणार असेल तर, त्यात दलितांची तर हानी होईलच, पण आपल्या संदर्भात हानी होईल. संघ दलितांकडे वळत आहे हे ठीक आहे. संघाला समयज्ञान प्राप्त झाल्याचे ते फार तर लक्षण ठरेल. पण दलितांना

समतेचा प्रत्यय आणून देण्याकरता देशातील आर्थिक नियोजन व उत्पादनपद्धतीची मांडणी व भांडवल गुंतवणुकीचे अग्रक्रम याविषयी समतानिष्ठ भूमिका घ्यावी लागेलच. हे झाले नाही तर, संघाच्या दलितसेवेमुळे काही दलित संघाच्या निशाणाखाली मोठ्या संख्येने येतील. पण अंतिमतः त्यातून एकरसात्मक, सुसंघटित एकतेचा अनुभव त्यांनाही येणार नाही, संघालाही नाही व समाजालाही नाही.

पण भांडवलशाही समाजव्यवस्था आपल्या मरणाने कधीच मरत नसते. तिचा निःपात करू पाहणाऱ्या संघटना जोपर्यंत भारतातल्या दलितांची अनुशासनबद्ध, सुसंघटित व टोकदार अशी सम्यक् दर्शनावर आधारलेली विश्वासार्ह व युयुत्सू संघटना उभारणार नाहीत, तोपर्यंत भांडवलशाही अवस्थेत का होईना, देशाचा विकास कमीजास्तपणे होत राहतोच. अशा परिस्थितीत उदारमतवादी, समतानिष्ठ लोकशाही दृष्टिकोनाचा सर्वांगीण मनमोकळा स्वीकार केलेल्या नव्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आजच्या बेशिस्त, वाचाळ व स्वप्नाळू संघटनांच्या भाऊगर्दीत विस्ताराचे आकाशप्राय क्षेत्र मोकळेच आहे.

सूक्ष्म व स्थूल अशा दोन्ही कार्यांचा एकमेळ महात्मा गांधी स्वातंत्र्याच्या आंदोलनात घालू शकले. त्यांनासुद्धा स्वातंत्र्योत्तर काळात या उभयविध कार्यांचे लोकमान्य वर्धिष्णू असे संचलन कितपत व कशा प्रकारे साधता आले असते, ही गोष्ट ते अकाली कालवश झाल्याने समजू शकत नाही. त्यांचे आध्यात्मिक वारस विनोबाजी व जयप्रकाश नारायण ह्याबाबतीत अपयशाचे धनी झाले आहेत. सर्वोदय-समाज व सर्व–सेवा–संघाचा समवाय घालण्याचा ताण शेवटी त्या दोघांनाही सहन झाला नाही व त्या संघटना आज विकलप्राण झाल्या आहेत. संघासारखी संकटाच्या आगीतून तावूनसुलाखून निघालेली अनुशासनबद्ध संघटना आपल्या नव्या समतानिष्ठ भूमिकेच्या संदर्भात कदाचित काळाचे हे आव्हान स्वीकारू शकेल इतिहासाचा विराट पुरुष या प्रश्नाचे अंतिम उत्तर देईल.

○




लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मतपेटीचे शस्त्र । लेखांक पाचवा

## मार्क्सवादी एकाहत्तरचे यश मिळवतात का बहात्तरची पुनरावृत्ती करतात ?

# पश्चिम बंगाल

वा. दा. रानडे

केरळनंतर कम्युनिस्टांच्या हाती सत्ता गेलेले दुसरे राज्य म्हणजे पश्चिम बंगाल. कॉंग्रेसची पीछेहाट व पुन: उदय या दोन्ही दृष्टिकोनांतून तेथील बदलत्या लोकमताचा-विशेषत: १९६७ नंतरच्या घडामोडींचा-अभ्यास करायला हवा.

१९५२ ते १९६७ पर्यंतच्या चार विधान सभा निवडणुकांत कॉंग्रेसला जागा व मते पुढीलप्रमाणे मिळाली.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुका
कॉंग्रेसच्या जागा व मते

| वर्ष | एकूण जागा | कॉंग्रेस | शेकडा प्रमाण | शेकडा मते |
|---|---|---|---|---|
| १९५२ | २३८ | १५० | ६३·०२ | ३८·२४ |
| १९५७ | २५२ | १५२ | ६०·३२ | ४६·४७ |
| १९६२ | २५२ | १५७ | ६२·३१ | ४७·१९ |
| १९६७ | २८० | १२७ | ४५·३६ | ४१·२० |

पहिल्या तीन निवडणुका व जागांच्या दृष्टीने कॉंग्रेसच्या बळात फारसा फरक पडलेला नाही. मतांच्या दृष्टीने तिला असलेला पाठिंबा वाढत गेलेलाच दिसतो. तरीही ४७ टक्क्यांपेक्षा अधिक मते कॉंग्रेसला एकाही निवडणुकीत मिळाली नाहीत. उत्तर प्रदेश आणि बिहारप्रमाणे पश्चिम बंगाल-मध्ये प्रत्येक निवडणुकीत कॉंग्रेसची सतत घसरगुंडी होत गेलेली नाही तर १९६७ मध्येच कॉंग्रेसला पराभवाचा एकदम जबर हादरा बसला व तिने सत्ता गमावली. कॉंग्रेसला १९६२ पेक्षा ३० जागा कमी मिळाल्या. जागांच्या प्रमाणात १७ टक्के व मतांच्या प्रमाणात ६ टक्के घट झाली. निवडणुकीत डाव्यांची एक आघाडी होऊ न शकल्याने त्यांची मते आपसांत विभागली जाऊन नेहमीप्रमाणे आपण हुकमी बहुमत मिळवू हा कॉंग्रेसनेत्यांचा आडाखा चुकला. कॉंग्रेस राजवटीविरुद्ध असंतोष आणि पक्षात फूट हीच कॉंग्रेसच्या पराभवाची मुख्य कारणे. बिहारमध्ये महामायाप्रसाद सिंहा, ओरिसा-मध्ये हरेकृष्ण मेहताब यांचे गट बाहेर पडले त्याप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये प्रदेश कॉंग्रे-सचे माजी अध्यक्ष अजय मुकर्जी यांच्या नेतृत्वाखाली एक गट बाहेर पडून त्यांनी बंगाल कॉंग्रेसपक्ष स्थापला. या पक्षाने ३७ जागा व १०·०९ टक्के मते मिळविली. डाव्यांची एक आघाडी असती तर कॉंग्रेसचा आणखी मोठा पराभव झाला असता.

डाव्यांच्या दोन आघाड्यांपैकी उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील पीपल्स युनाय-टेड लेफ्ट फ्रंटला ६६ व मार्क्सवादी कम्यु-निस्टांच्या नेतृत्वाखालील युनायटेड लेफ्ट-फ्रंटला ६२ जागा मिळाल्या. मार्क्सवादी आघाडीस थोड्या कमी जागा मिळाल्या असल्या तरी दोन कम्युनिस्ट पक्षांत मार्क्स-वाद्यांनी ४३ व उजव्या कम्युनिस्टांनी फक्त १६ जागा जिंकल्या आणि मार्क्सवाद्यांनाच अधिक पाठिंबा असल्याचे दिसून आले. मार्क्सवाद्यांना १८·२५ टक्के व उजव्या कम्युनिस्टांना ६·६३ टक्के मते मिळाली.

दोन कम्युनिस्ट पक्ष सोडून बाकीच्या डाव्या गटांमध्ये १९६२ च्या तुलनेने विशेष फरक पडला नाही. पुरोगामी गटाला १९६२ इतक्याच १३ जागा १९६७ मध्ये मिळाल्या. क्रांतिवादी समाजवादी पक्षाच्या जागा ७ वरून ६ वर आल्या. प्रजासमाजवादी पक्षास १९५७ मध्ये २१, १९५२ मध्ये ५ आणि १९६७ मध्ये ७ जागा मिळाल्या. या पक्षाला १९६२ मधील घसरगुंडी फारशी भरून काढता आली नाही. संयुक्त समाजवादी पक्षाने सात जागा मिळविल्या.

उजव्या गटांपैकी जनसंघाला १९५२ मध्ये ९ जागा व ५·३३ टक्के मते मिळाली. पण १९६२ व १९६७ च्या निवडणुकांत तो पक्ष एकही जागा मिळवू शकला नाही. त्याला मतेही १९५७ मध्ये ०·९८ टक्के व १९६२ ०·५० टक्के मिळाली. १९६७ मध्ये जन-संघास फक्त एक जागा आणि १·३३ टक्के मते मिळाली. याचा अर्थ जनसंघाचा जो काही थोडासा प्रभाव होता, तो श्यामाप्रसाद मुकर्जींचे नेतृत्व असेपर्यंत होता. त्यांच्या निधनानंतर त्याचे अस्तित्व नाममात्र राहिले. स्वतंत्र पक्षाला १९६७ मध्ये फक्त एक जागा मिळाली.

संयुक्त आघाडीतील घटक पक्षांत मतभेद झाले. बंगला कॉंग्रेसमधील एका गटाला फोडण्यात कॉंग्रेसने यश मिळविले. पी. सी. घोष यांच्या नेतृत्वाखाली एक गट फुटला. संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ गडगडले आणि घोष यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसचा पाठिंबा असलेले मंत्रिमंडळ अधिकारावर आले, पण ते फार काळ टिकले नाही. १९६९ मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या. १९६७ व १९६९ च्या निवडणुकांतील एक महत्त्वाचा फरक म्हणजे डाव्यांच्या दोन आघाड्या १९६९ मध्ये नव्हत्या. दोन्ही आघाड्यांनी एकत्र येऊन चौदा पक्षांची एकच प्रभावी संयुक्त आघाडी स्थापन केली होती. या आघाडीने एकूण २८० जागांपैकी २१४ जागा जिंकून कॉंग्रेसने पूर्वी कधी मिळविले नव्हते, एवढे भरघोस यश मिळविले. कॉंग्रेसला फक्त ५५ म्हणजे १९·६४ टक्के जागा मिळाल्या म्हणजे १९६७ पेक्षा ७२ जागा

काँग्रेसने कमी मिळविल्या. हुकमी बहुमत तर नाहीच पण सर्वात मोठ्या पक्षाचे स्थानही काँग्रेसने गमावले. ते स्थान ८० जागा जिंकून मार्क्सवादी कम्युनिस्टांनी मिळविले. एकच आघाडी केल्याने उजव्या कम्युनिस्टांच्या जागाही १६ वरून ३० पर्यंत, व पुरोगामी गटाच्या १३ वरून २१ पर्यंत वाढल्या १९६७ च्या निवडणुकीत एकही जागा न मिळविलेल्या क्रांतिकारी समाजवादी पक्षाला १२ जागा मिळाल्या. बंगला काँग्रेसला ३३ म्हणजे १९६७ पेक्षा फक्त एक जागा कमी मिळाली. संयुक्त समाजवाद्यांच्या जागा ७ वरून ९ वर गेल्या, तर प्रजासमाजवाद्यांच्या जागा ७ वरून ५ वर आल्या. जनसंघाला एकही जागा मिळाली नाही. आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे विजयी अपक्ष उमेदवारांची संख्या कमी झाली. १९६७ मध्ये ३१ अपक्ष उमेदवार निवडून आले होते. १९६९ मध्ये फक्त ११ आले.

डाव्यांच्या संयुक्त आघाडीने एवढे प्रचंड यश मिळवूनही पश्चिम बंगालला ती स्थिर सरकार देऊ शकली नाही. याचे कारण घटक पक्षात मतभेद व भांडणे होऊन आघाडी भंगली. आघाडीतील सर्वात मोठा घटक पक्ष मार्क्सवादी कम्युनिस्ट या अपयशाला मुख्यत: जबाबदार असल्याचे दिसून येईल. आपली राजकीय उद्दिष्टे साधण्यासाठी एक साधन म्हणून त्यांनी आघाडीचा उपयोग केला. लोकशाही मार्गाने समाजवाद आणता येईल, यावर मार्क्सवाद्यांचा विश्वास नाही. समाजवाद आणण्यासाठी क्रांतीच केली पाहिजे, ही त्यांची विचारसरणी. निवडणुका लढविणे, सरकार बनविणे, ते चालविणे या साऱ्या गोष्टींकडे क्रांतीचे एक साधन किंवा हत्यार याच दृष्टीने ते पाहतात. आपलाच पक्ष तेवढा क्रांतिकारक, इतर सारे पक्ष—डावे पक्षसुद्धा प्रतिगामी, प्रतिक्रांतिकारक ही त्यांची भूमिका. इतर पक्षांच्या सहकार्याने निवडून यायचे, सरकार बनवायचे आणि सत्तेचा वापर आपले पक्षबळ वाढविण्यासाठीच करावयाचा ही त्यांची कार्यपद्धती. मार्क्सवाद्यांच्या भूमिकेसंबंधी त्यांचे एक नेते बी. टी. रणदिवे लंडनमध्ये एका भाषणात म्हणाले होते, " केरळ व पश्चिम बंगालमधील मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या प्रभावाखालील संयुक्त आघाड्यांच्या सरकारांचे कार्य लोकांच्या असंतोषाला मोकळी वाट करून देण्याचे आहे. त्यांच्या मदतीची कामे करण्याचे नाही; मार्क्सवादी मंत्र्यांना असे सांगण्यात आले आहे की, केंद्र सरकार किंवा हायकोर्ट जी बिले फेटाळून लावायाचा संभव आहे, अशाच बिलाबाबत आग्रह धरा. सध्याच्या घटनेच्या चौकटीत मूलभूत स्वरूपाच्या सुधारणा घडवून आणणे अशक्य आहे, हे जनतेला पटवून देण्यासाठी असे झगडे पाहिजेत. "

मार्क्सवादी कम्युनिस्टांची ही एकांगी भूमिका आघाडीतील इतर घटक पक्षांना मान्य होणे शक्य नव्हते. घटनेच्या मर्यादा त्यांनाही माहीत होत्या पण घटनेच्या मर्यादेतसुद्धा अनेक कामे करता येण्यासारखी आहेत. केंद्राशी झगडा न करता पार पाडता येतील अशी कामे प्रथम पुरी करावयाची आणि ती पार पाडल्यानंतर ज्यातून केंद्राशी संघर्ष उद्भवेल, घटना बदलण्याची आवश्यकता भासेल अशा कामाबद्दल आग्रह धरावयाचा, अशी त्यांची भूमिका होती. प्रत्येक बाबतीत संबंध आघाडीच्या दृष्टीने विचार न करता आपल्या पक्षाचे बळ ज्यामुळे वाढेल अशीच भूमिका मार्क्सवाद्यांनी घेतली. भूमिहीनांना जमीनवाटपावर देखरेखीसाठी आघाडीच्या देखरेख समित्या हव्यात ही इतर पक्षांची सूचना त्यांनी मान्य केली नाही व जादा जमीन आपल्या बाजूच्याच भूमिहीनांना मिळावी अशी मागणी केली. शिक्षण खाते मार्क्सवादी मंत्र्याकडे होते. त्याचा फायदा घेऊन अनेक शिक्षणसंस्था त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणल्या. निरनिराळ्या कॉलेजांच्या नियंत्रक मंडळांना सरकारी प्रतिनिधी एकजात मार्क्सवादी नेमण्यात आले. जिल्हा इन्स्पेक्टरांना मदत करण्यासाठी सल्लागार मंडळे नेमली. त्यात सर्व मार्क्सवादी भरले. पोलीसखाते मार्क्सवादी मंत्र्याकडे होते तेही पक्षासाठी राबविण्यात आले. अनेक भागात अगदी खालच्या मार्क्सवादी कार्यकर्त्यांचे सांगण्यानुसार पोलीस वागतात अशा तक्रारी आपल्याकडे आल्याचे मुख्यमंत्री अजय मुकर्जी यांनी सांगितले. मुख्यमंत्री मुकर्जी आणि गृहमंत्री ज्योती बसू यांच्यात अधिकाराचा वाद उपस्थित झाला व त्याचे पर्यवसान अखेर आघाडी फुटण्यात आणि मुकर्जी मंत्रिमंडळाच्या राजीनाम्यात झाले.

पश्चिम बंगालच्या या अनुभवाने संयुक्त आघाड्या कशा टिकतील हा प्रश्न पुन: उपस्थित झाला. आघाडी स्थापताना तिचे धोरण व कार्यक्रमाबाबत सर्व घटक पक्षांचे एकमत झाले पाहिजे. आघाडीने बहुमताने घेतलेले निर्णय सर्व घटक पक्षांनी मान्य केले पाहिजेत. सर्व निर्णय एकमतानेच घेतले पाहिजेत असा आग्रह करणे मात्र चुकीचे होईल. असा आग्रह धरल्याने एखाद्या पक्षास अडवणूक करण्यास मोकळीक मिळते. पश्चिम बंगालची संयुक्त आघाडी मोडण्याचे हे एक महत्त्वाचे कारण होते.

चार विरोधी पक्षांनी एक होऊन जनता पक्ष स्थापन केला असला तरी संयुक्त आघाड्यांची आवश्यकता संपलेली नाही. जनता पक्षास लोकसभेत निर्णायक बहुमत मिळाले नाही किंवा अल्प बहुमत मिळाले तर, स्थिर सरकारसाठी लोकशाहीवादी काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट, द्र. मु. क.' या पक्षांशी संयुक्त आघाडी जनता पक्षास करावीच लागेल. तेव्हा पूर्वीच्या चुका पुन: न करता आघाडी कशी टिकेल याची दक्षता सर्वच घटक पक्षांनी घ्यायला हवी व आघाडीच्या कार्यपद्धतीसंबंधी काही निकोप संकेत निश्चित करून ते पाळले जाण्याबद्दल आग्रह धरण्यात यावा.

१९७१ व १९७२ च्या विधानसभा निवडणुकांत काँग्रेसने आपली घसरगुंडी सावरली. १९७१ मध्ये तिने १०५ म्हणजे १९६९ पेक्षा ५० जागा अधिक मिळविल्या तरी, १९६७ चे स्थान गाठण्याला तिला २२ जागा कमी पडल्या व निर्णायक बहुमतासाठी ३६ जागा कमी पडल्या. काँग्रेसने जागा अधिक मिळविल्या खऱ्या, पण मतांच्या दृष्टीने तिची घसरगुंडी वाढतच गेली. १९६९ मध्ये ४१·२ टक्के व १९७१ मध्ये फक्त २८·२० टक्के मते तिला मिळाली. डाव्यांची संयुक्त आघाडी फुटली असली तरी, लोकमत अजून काँग्रेसकडे झुकले नव्हते. डाव्या पक्षांमध्ये मार्क्सवाद्यांच्या आघाडीस १२३ म्हणजे निर्णायक बहुमतास आवश्यक असलेल्या १४१ जागांपेक्षा १८ जागा कमी मिळाल्या. मार्क्सवाद्यांनी आपले स्वत:चे बळ ८० वरून १११ पर्यंत वाढविले. उजव्या कम्युनिस्टांचे बळ ३० वरून १३ पर्यंत घटले. कोणत्याच पक्षास हुकमी बहुमत नसल्याने पश्चिम बंगालची अस्थिरता १९७१ च्या निवडणुकी-

नंतरही कायम राहिली व एक वर्षाने इतर राज्यांच्या बरोबर तेथे पुनः निवडणुका घेण्यात आल्या.

१९७२ च्या निवडणुकांत कांग्रेसने २८० पैकी २१६ जागा जिंकल्या. डाव्यांच्या संयुक्त आघाडीने १९६९ मध्ये जे यश मिळविले त्यालाही या यशाने मागे टाकले. पण निवडणुका लढविताना आपण निर्णायक बहुमत तरी मिळवू की नाही, याची कांग्रेस नेत्यांना शंका होती, म्हणून कम्युनिस्टांशी समझोता करून त्यांच्यासाठी ४१ जागा कांग्रेसने मोकळ्या सोडल्या होत्या. या समझोत्याचा फायदा दोन्ही पक्षांना मिळाला. कांग्रेसची सभासदसंख्या २१६ पर्यंत, तर कम्युनिस्टांची ३५ पर्यंत वाढली. विधानसभा निवडणुकांत सर्वांत ज्यास्त जागा यावेळी कम्युनिस्टांनी मिळविल्या तर मार्क्सवाद्यांना सर्वांत कमी १४ जागा मिळाल्या. उजव्या कम्युनिस्टांना जागा अधिक मिळाल्या तरी, मतांच्या दृष्टीने मार्क्सवाद्यांनाच लोकांचा अधिक पाठिंबा असल्याचे दिसून आले. त्यांना २६ टक्के तर कम्युनिस्टांना १२ टक्के मते मिळाली. कम्युनिस्टांची मते ४ टक्क्यांनी वाढली तर मार्क्सवाद्यांची ५ टक्क्यांनी घटली. मार्क्सवाद्यांना एवढे मोठे अपयश येण्याचे कारण संयुक्त आघाडी फुटली आणि संयुक्त आघाडीत मार्क्सवाद्यांनी स्वीकारलेल्या धोरणामुळे जनमत त्यांच्या विरुद्ध गेले.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकांसारखेच चित्र लोकसभा निवडणुकांत दिसते काय हे आता पाहावयाचे. १९५२ मध्ये २४, १९५७ मध्ये २३, १९६२ मध्ये २२ याप्रमाणे कांग्रेसच्या जागांत थोडीफार घट झाली, तरी कांग्रेसने बहुमत टिकविले. पण लोकसभा जागांमध्ये झालेली घट विधान सभेतील जागांच्या घटीचे मानाने कमी होती. १९६७ मध्ये विधानसभेप्रमाणे लोकसभेतही कांग्रेसने बहुमत गमावले व ४० पैकी फक्त १४ जागा मिळविल्या. तरी सुद्धा विधानसभेएवढी घसरगुंडी लोकसभा निवडणुकीत कांग्रेसची झालेली नाही. विधानसभेत ४५·३६ टक्के, तर लोकसभेत ३५ टक्के जागा मिळाल्या. १९७१ च्या निवडणुकीत इंदिरा–लाटेचा प्रभाव पश्चिम बंगालमध्ये जाणवला नाही. कांग्रेसला १३ म्हणजे १९६७ पेक्षा एक जागा कमीच मिळाली. इंदिरा–लाट तेथे एक वर्षाने म्हणजे १९७२ च्या विधानसभा निवडणुकांत आली. बांगला देश युद्धातील विजय आणि निर्वासितांना परत पाठविण्यात आलेले यश, हेच मतांचे पारडे कांग्रेसच्या बाजूस झुकण्याचे महत्त्वाचे कारण. बांगला निर्वासितांचा भार पश्चिम बंगाललाच मुख्यतः सहन करावा लागला होता.

विरोधी पक्षांमध्ये मार्क्सवाद्यांनी ४० पैकी २० म्हणजे निम्म्या जागा जिंकल्या. १९६७ पेक्षा त्यांनी आपले बळ चौपट वाढविले. उलट कांग्रेसच्या पाठिंब्याने निवडणुका लढवूनही कम्युनिटांना फक्त ३ म्हणजे १९६७ पेक्षा २ जागा कमीच मिळाल्या. प्रजासमाजवादी पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष, क्रांतिकारी समाजवादी पक्ष आणि संघटना कांग्रेसला प्रत्येकी एक जागा मिळाली. १९७१ च्या इंदिरा–लाटेतही मार्क्सवादी पक्षाने लोकसभेत निम्म्या जागा मिळविल्या हे विशेष होते. पण एक वर्षानंतरच्या विधानसभा निवडणुकांत त्याची वाताहत झाली.

१९७१ चे यश १९७७ मध्येही मार्क्सवादी टिकवतील काय, की १९७२ च्या निवडणुकांत त्यांची वाताहत झाली तशी यावेळी पुनः होईल ? कांग्रेसच्या दृष्टीने परिस्थिती प्रतिकूल आहे. एक तर कांग्रेस पक्षात फूट व गटबाजी आहे. सिद्धार्थ शंकर रे यांना नेतेपदावरून दूर करण्याची एका गटाची मागणी होती, ती मान्य झाली नसली तरी त्यांचे अधिकार बरेच कमी करण्यात आले आहेत. कांग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध दहा बंडखोर उभे आहेत. काही कार्यकर्ते जगजीवनबाबूंच्या नव्या पक्षास मिळाले आहेत. आधीच्या फुटीत ही नवी भर आहे. एका बाजूला कांग्रेसमध्ये फूट तर दुसऱ्या बाजूला विरोधी पक्ष संघटित झाले आहेत. आपसांत मते विभागली जाऊ नयेत यासाठी जनता पक्ष आणि मार्क्सवादी यांनी समझोता केला आहे तर एकट्याच्या बळावर यशाची खात्री वाटत नसल्याने कांग्रेसने कम्युनिस्टांशी समझोता करून त्यांच्यासाठी ८ जागा सोडल्या आहेत. आणीबाणीत झालेल्या लोकशाहीच्या गळचेपीमुळे कांग्रेस राजवटीविरुद्ध वाढता असंतोष आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेता कांग्रेसला १९७१ मध्ये मिळविलेल्या जागा टिकविणेसुद्धा जड जाईल. ☐

## गुजरात

### ' जनता ' आघाडीवर

कांग्रेसमधील फुटीनंतर उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक आणि गुजरात हे संघटना कांग्रेसचे बालेकिल्ले मानले जात होते त्यापैकी पहिले तीन १९७१ च्या लोकसभा निवडणुकांत ढासळले पण गुजरातेत संघटना कांग्रेसचा प्रभाव टिकून राहिला. १९७१ च्या निवडणुकांत लोकसभेच्या २४ जागांपैकी कांग्रेसला फक्त ११ जागा मिळाल्या. संघटना कांग्रेसलाही तेवढ्याच मिळाल्या व २ जागा स्वतंत्र पक्षाने मिळविल्या. गुजरात राज्याची स्थापना १९६० मध्ये झाली. त्यानंतरच्या पहिल्या म्हणजे १९६२ पासूनच्या लोकसभा निवडणुकांचा विचार करता असे दिसते की, १९६२ मध्ये २४ पैकी १६, १९६७ मध्ये ११ व १९७१ मध्येही ११ च जागा कांग्रेसने मिळविल्या. याचा अर्थ १९६२ मध्ये दोन तृतीयांश जागा मिळविणाऱ्या कांग्रेसचे बळ १९६७ मध्ये कांग्रेस अविभक्त असतानाच घटले होते. १९७१ मध्ये त्यात बदल झाला नाही, पण इतर राजकीय पक्षांच्या बळात मात्र बदल झाला. १९६७ मध्ये २४ पैकी १२ म्हणजे निम्म्या जागा स्वतंत्र पक्षाने मिळविल्या. १९७१ मध्ये त्याचे बळ घटून त्यास अवघ्या २ जागा मिळाल्या. संघटना कांग्रेसने ११ जागा जिंकून स्वतंत्र पक्षाची जागा घेतली. हे दोन्ही पक्ष बड्या आघाडीत सामील झाले होते. पण या आघाडीचा फायदा संघटना कांग्रेसलाच अधिक मिळाला.

विधानसभा निवडणुकांत एकूण १६८ जागांपैकी कांग्रेसने १९६२ मध्ये ११३ जागा मिळविल्या होत्या, त्या १९६७ मध्ये ९३ पर्यंत घटल्या, पण बहुमत टिकले. इतर राज्यांप्रमाणे कांग्रेस राजवटीविरुद्ध असंतोष, तसेच कांग्रेस पक्षात फूट व गटबाजी गुजरातेतही होती. पण पक्षाबाहेर पडून स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याइतके मोठे स्वरूप या

फुटीला आले नव्हते. रसिकलाल पारेख गट संबंध निवडणुकीत उदासीन राहिला त्यामुळे काँग्रेसचे पक्षबळ घटले. पण बहुमत गेले नाही. १९७२ च्या निवडणुकांत तर १३९ म्हणजे ८२ टक्के जागा मिळवून राज्यपातळीवर तरी संघटना काँग्रेसचा हा बालेकिल्ला सर केला. पण तिला तो टिकविता आला नाही. एवढे प्रचंड बहुमत मिळवूनही काँग्रेस गुजरातला स्थिर राजवट देऊ शकली नाही. याचे कारण पक्षातील गटबाजी व सत्तास्पर्धा. पंतप्रधानांच्या पसंतीने घनःश्याम ओझा यांची मुख्यमंत्रिपदी निवड झाली. पण काही महिन्यांतच चिमणलाल पटेल गटाने त्यांच्या नेतृत्वाविरुद्ध हालचाली सुरू केल्या. त्याचे पर्यवसान अखेर नेतृत्वात बदल होऊन चिमणभाई मुख्यमंत्री होण्यात झाले. पण गटबाजी व भ्रष्टाचार चालू राहिल्याने चिमणभाई स्थिर सरकार देऊ शकले नाहीत. असंतोष वाढत गेला आणि ही परिस्थिती बदलण्यासाठी विद्यार्थ्यांनी अखेर आमदारांच्या राजीनाम्यांचे व विधानसभा बरखास्तीचे आंदोलन सुरू केले. राजीनामा देणाऱ्या आमदारांची संख्या निम्म्यावर गेली तेव्हा सरकारने अखेर विधानसभा बरखास्त करून राष्ट्रपतींची राजवट जारी केली.

रीतसर निवडून आलेल्या सभासदांचे जबरदस्तीने राजीनामे मागण्यात आले व विरोधी पक्षांपैकी एकाही जबाबदार नेत्याने या लोकशाहीविरोधी आंदोलनाबद्दल शब्दानेही नापसंती दर्शविली नाही, अशी टीका नेत्यांनी केली. राजीनामे जबरदस्तीने घेण्यात आले, या आरोपात कितपत तथ्य आहे, याची सरकारने निःपक्षपाती न्यायमंडळ नेमून चौकशी करायला हवी होती. तसे का केले नाही, याचे समाधानकारक उत्तर सरकारने दिले नाही. सरकारी कारभारातील भ्रष्टाचार सहनशक्तीच्या पलीकडे गेला असेल, लोकप्रतिनिधी आपले कर्तव्य बजावत नसतील तर, विधानसभेची मुदत संपेपर्यंत वाट न पाहता लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा हक्क मतदारांना असला पाहिजे. काही देशांच्या घटनेत अशी तरतूद आहे ती आपल्या घटनेत नाही. अशी तरतूद केली जात नाही तोपर्यंत कर्तव्यच्युकार आमदारांच्या राजीनाम्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करण्याचा हक्क लोकांना असला पाहिजे. गुजरातच्या विद्यार्थ्यांनी केलेले आंदोलन लोकशाहीच्या रक्षणासाठीच होते. आपल्या लोकशाही चळवळीत गुजरातच्या या आंदोलनाला त्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे.

विधानसभा बरखास्त झाली. राष्ट्रपतींची राजवट आली. पण सरकार लौकर निवडणुका घेईना. कारण सत्तारूढ पक्षास विजयाची खात्री नव्हती. अखेर मोरारजीभाईंनी उपोषण केल्यावर सरकारला त्यांची मागणी मान्य करणे भाग पडले. जून १९७५ मध्ये निवडणुका झाल्या. बारा जूनला निकाल जाहीर झाला. निर्णायक बहुमत कोणत्याच पक्षास मिळाले नाही. पण विरोधी पक्षांच्या जनता मोर्चास काँग्रेसपेक्षा अधिक जागा मिळाल्या व त्याने चिमणभाई पटेलांच्या किसान मजदूर लोकपक्षाच्या पाठिंब्याने सरकार बनविले. निवडणुकीत एकूण १८२ जागांपैकी जनता मोर्चास ८७; काँग्रेसला ७५ व किमलोप पक्षास १२ जागा मिळाल्या होत्या. आठ अपक्ष उमेदवार निवडून आले होते. जनता मोर्चामध्ये संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल, समाजवादी आणि नॅशनल लेबर पार्टी हे पक्ष सामील झाले होते. आघाडीला निर्णायक बहुमत मिळाले नाही तरी, काँग्रेसपेक्षा अधिक जागा मिळाल्याने विरोधी पक्षांमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला. विरोधी पक्षांची केवळ संयुक्त आघाडी पुरेशी नाही. स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाचे विसर्जन करून ते एक झाले, तरच काँग्रेसला परिणामकारक पर्यायी पक्ष उभा राहील, या विचाराकडे तेव्हापासून विरोधी पक्षनेते वळू लागले आणि आता १९७७ च्या निवडणुकांच्या वेळी जनता पक्ष स्थापून या विचाराला त्यांनी मूर्त स्वरूप दिले आहे.

जनता मोर्चाचे सरकार अधिकारावर आल्यापासूनच ते पाडण्यासाठी काँग्रेसने दोन दिशांनी प्रयत्न सुरू केले. त्यांपैकी एक प्रयत्न म्हणजे जनता मोर्चात फोडाफोड घडवून आणणे. काँग्रेसप्रवेशाची साथ सुरू झाली. पण जनता मोर्चाचे फक्त दोन आमदार फुटले. किमलोप पक्षाच्या मात्र बहुतेक सभासदांना काँग्रेसने फोडले. याशिवाय पाच अपक्ष सभासदांचा पाठिंबा मिळविला. त्यामुळे जनता मोर्चाच्या सरकारचा पराभव होऊन ते मार्च १९७६ मध्ये गडगडले. गुजरातेत राष्ट्रपतींची राजवट आली. आणीबाणीपूर्वी थोडे दिवस अधिकारावर आलेले हे सरकार इतके दिवस टिकून राहिले, हेच आश्चर्य. या काळात महानगरपालिकांच्या, तसेच जिल्हा व तालुका पंचायतींच्या निवडणुका झाल्या. महापालिका निवडणुकांत जनता मोर्चाने, तर पंचायत निवडणुकांत काँग्रेसने विजय मिळविला. याचा अर्थ शहरामध्ये जनता मोर्चाला पाठिंबा कायम असला तरी ग्रामीण मतदारांचा कल काँग्रेसकडे झुकला होता. पंचायत निवडणुकांत दोन काँग्रेस कार्यकर्त्यांचे खून घडले, त्याचेच निमित्त करून संबंध राज्यात हिंसा व दहशतीचे वातावरण आहे, असा सरसकट आरोप हितेंद्रभाईंनी केला. फोडाफोडीने सरकार खाली आणता आले नाही तर, वरील प्रकारचे आरोप करून राष्ट्रपतींची राजवट आणावी, हा या दुसऱ्या तंत्रामागे उद्देश होता, पण त्याची गरज पडली नाही.

लोकसभा निवडणुका घेण्याचे पंतप्रधानांनी ठरविताच राष्ट्रपतींची राजवट उठवून गुजरातेत काँग्रेस सरकार अधिकारावर आले. वास्तविक काँग्रेसचे बहुमत, इतर पक्षांचे सभासद फोडून झालेले बहुमत होते. इतर पक्षांच्या सभासदांनी राजीनामे देऊन काँग्रेसच्या तिकिटावर निवडून यायला हवे होते. तसे कोणी केले नाही. सत्तेसाठी तत्त्वांचा बळी दिला गेला.

आता १९७७ च्या लोकसभा निवडणुकात गुजरातची जनता काय कौल देईल? पंचायत निवडणुकांचे निकाल लोकमताचे निदर्शक मानता येणार नाहीत, याचे कारण आणीबाणीतील भीतीच्या वातावरणात त्या निवडणुका झाल्या होत्या. दुसरे असे की, पंचायत निवडणुकांत स्थानिक प्रश्नांना प्राधान्य असते, तेव्हा पंचायत निवडणुकांसारखे मतदान लोकसभा निवडणुकातही होईल, असे मानण्याचे कारण नाही.

काँग्रेस आणि जनता पक्षातच मुख्य सामना आहे. दोन्ही पक्ष सर्व २६ जागा लढवीत आहेत. याशिवाय ६० अपक्ष उमेदवार उभे असले तरी या दोन्ही पक्षांवर त्याचा काही परिणाम होणार नाही. आणीबाणीविरुद्ध असंतोषामुळे बहुसंख्य जागा जनता पक्षास मिळण्याची बरीच शक्यता आहे.

## काँग्रेसचे पक्के दुवे

काँग्रेसचे कच्चे दुवे समजल्या जाणाऱ्या राज्यांतील परिस्थितीचा आतापर्यंत विचार केला. आता पक्के दुवे किंवा बालेकिल्ले मानल्या जाणाऱ्या राज्यांतील निवडणूक-चित्र पाहावयाचे आहे.

पूर्वेकडे आसाम आणि दक्षिणेकडे महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक हे काँग्रेसचे बालेकिल्ले आहेत. राजस्थान व मध्य प्रदेशात १९६२ च्या निवडणुकांत काँग्रेसने बहुमत गमावले होते. मध्य प्रदेशात १९६७ च्या निवडणुकांनंतर काँग्रेसमधला एक गट फुटल्याने काही काळ विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीचे सरकार अधिकारावर आले होते, पण या दोन्ही राज्यांत काँग्रेसने आपली परिस्थिती १९७१ च्या लोकसभा निवडणुकांत व १९७२च्या विधानसभा निवडणुकांत चांगलीच सावरली. शेख अब्दुल्लांशी समझोता करून काश्मीरमध्येही काँग्रेसने आपली बाजू बळकट केली आहे. असे असले तरी, आणीबाणीत लोकशाहीची आणि नागरी स्वातंत्र्याची जी गळचेपी झाली, त्यामुळे निर्माण झालेल्या असंतोषाची झळ या राज्यातही काँग्रेसला जाणवेल आणि १९७१ एवढे यश मिळविणे तिला कठीण जाईल.

काँग्रेसचे पक्के दुवे समजल्या जाणाऱ्या या सर्व राज्यांचा सविस्तर विचार करणे जागेअभावी शक्य नाही. फक्त काही महत्त्वाच्या मतप्रवाहांकडे व बदलांकडेच येथे लक्ष वेधीत आहे.

आसाममध्ये काँग्रेसने पाच लोकसभा निवडणुकांत १४ पैकी अनुक्रमे ११, ९, ९, ९ आणि १३ जागा मिळविल्या. १९७१ चे यश सर्वांत मोठे होते. विरोधी पक्ष तेथे प्रभावी नाहीत. काँग्रेस संघटनेतही इतर राज्यांसारखे तीव्र मतभेद किंवा गटबाजी नाही. आणीबाणीच्या परिणामामुळे काँग्रेसच्या थोड्या जागा कमी झाल्या तरी, बहुसंख्य जागा काँग्रेस मिळवील असे दिसते.

राजस्थानच्या २३ लोकसभा जागांपैकी पाच निवडणुकांत काँग्रेसचे बळ ११, १९, १४, १०, १४ असे बदलत गेले. १९६७ मध्ये काँग्रेसला सर्वांत कमी जागा मिळाल्या होत्या. पण १९७१मध्ये पुन: १४ म्हणजे १९६२ एवढ्या जागा मिळविल्या. संस्थानिकांचा संघटित विरोध काँग्रेसला नडेल असे वाटत होते, पण तसे काही घडले नाही. यावेळी काँग्रेस आणि जनता पक्ष यांच्यातच खरी लढत आहे. १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करणारे जनसंघाचे उमेदवार ब्रिजराजसिंग यावेळी काँग्रेसतर्फे उभे आहेत. जनसंघ जनता पक्षात सामील झाला असला तरी, त्याची भूमिका बदललेली नाही, अशी टीका पंतप्रधान व इतर काँग्रेस नेते आपल्या भाषणांतून नेहमी करीत असतात. पण हाच न्याय काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या जनसंघ सभासदांना लावण्याची मात्र त्यांची तयारी नसते. यावेळचा एक महत्त्वाचा बदल म्हणजे संस्थानिकांनी निवडणुकीत भाग घेतलेला नाही. आपण कोणत्याही संस्थानिकास तिकीट देणार नाही, असे जनता पक्षाने जाहीर केले होते. काँग्रेसने झालवाड मतदार संघातून उभे केलेले ब्रिजराजसिंग मात्र कोटा राजघराण्यापैकी आहेत. जनता पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट यांच्यात समझोता झालेला नाही. मार्क्सवाद्यांनी जयपूर व सिकार मतदार संघात आपले उमेदवार उभे केले आहेत. तेथे विरोधी पक्षांची मते विभागली जाऊन त्याचा फायदा काँग्रेसला मिळण्याचा संभव आहे. गेल्या वेळेपेक्षा काँग्रेसला थोड्या कमी जागा मिळण्याची शक्यता आहे.

काश्मीरमध्ये काँग्रेस आणि शेख अब्दुलांची नॅशनल कॉन्फरन्स यांनी समझोता केला असून जागांची सारखी विभागणी केली आहे. जमाते इस्लामीसारख्या जातीय संघटनेशी अनंतनाग आणि श्रीनगर या दोन मतदार संघात त्यांना चुरशीची लढत द्यावी लागणार आहे. अनंतनागमधून रेल्वेचे राज्यमंत्री महमद शफी कुरेशी व श्रीनगरमध्ये बेगम शेख अब्दुल्लांविरुद्ध जमाते इस्लामीने आपले उमेदवार उभे केले आहेत. शेख अब्दुल्लांनी पास करून घेतलेल्या लँड ग्रँटस् बिलाविरुद्ध स्थानिक जनतेत असंतोष आहे. या बिलामुळे काश्मीरच्या खोऱ्याची दारे बाहेरच्या लोकांना खुली होतील. सध्या लीजने जमिनी दिल्या जाणार असल्या तरी, पुढे त्यात दुरुस्ती करून त्या कायमच्या मालकीच्या केल्या जाण्याचा संभव आहे, अशी टीका या बिलावर केली जात आहे. याच प्रश्नावर माजी शिक्षणमंत्री अब्दुल गनी लोन यांनी राजीनामा दिला. तेव्हा या बिलाबाबतचा असंतोष लक्षात घेता या जागा जिंकणे, सत्तारूढ आघाडीस कठीण जाईल व काँग्रेस् नॅशनल कॉन्फरन्स आघाडीस गेल्या वेळच्या काँग्रेस जागांपेक्षा एक-दोन कमी जागा मिळण्याचा संभव आहे.

मध्य प्रदेशात पाच लोकसभा निवडणुकांत काँग्रेसला ३७ पैकी ३२, ३५, २४, २१ अशा जागा मिळाल्या. त्यावरून १९६२ पासून तेथे काँग्रेसचे बळ घटत गेलेले आहे, असे दिसते. मध्य प्रदेश जनसंघाचा बालेकिल्ला समजला जातो. संस्थानिकांच्या पाठिंब्याने व मदतीने राज्याची सत्ता मिळवण्याचा प्रयत्न होता. विधानसभा निवडणुकांत १९५७ मध्ये १०, १९६२ मध्ये ४१ आणि १९६७ मध्ये ७८ असे त्याचे बळ वाढत गेले. पण १९७२ मध्ये ते एकदम ४८ पर्यंत खाली आले. विधानसभा निवडणुकांत १९७२ मध्ये जनसंघाची पीछेहाट झाली पण लोकसभा, निवडणुकांत त्याचे बळ वाढत गेले. १९५२ व १९५७ च्या निवडणुकांत मध्यप्रदेशात जनसंघाला एकही जागा मिळाली नव्हती. १९६२ मध्ये ३, १९६७ मध्ये १० आणि १९७१ मध्ये ११ असे त्याचे बळ वाढले.

आता १९७७ च्या निवडणुकांत पक्षबळात काय फरक पडेल? राजमाता विजयाराजे शिंदे यांचा गट यावेळी विरोधी पक्षांच्या बाजूने नाही. उलट माधवराव शिंदे, रेवाचे नरेश हे संस्थानिक काँग्रेसच्या पाठिंब्याने निवडणुकीस उभे आहेत, असे असले तरी, आणीबाणीतील निर्बंध, कुटुंबनियोजन मोहिमेत झालेली सक्ती यांमुळे जनतेत असंतोष आहे, हे लक्षात घेता काँग्रेसला १९७१ एवढ्याही जागा मिळणे कठीण जाईल.

मध्य प्रदेशाच्या संदर्भात काँग्रेसला हादरा देणाऱ्या पोटनिवडणुकांचाही विचार केला पाहिजे. एक भोपाळच्या गोविंदपुरा विधानसभा मतदार संघाची आणि दुसरी जबलपूर लोकसभा जागेची. १९७५ च्या सुरुवातीला या दोन निवडणुका झाल्या. पोटनिवडणुकांच्या निकालांना मर्यादित महत्त्व असते हे खरे, पण लोकमताचा वारा कोणत्या दिशेने वाहत आहे. याची कल्पना त्यावरून येते. भाववाढ, चलनवाढ, टंचाई यामुळे निर्माण झालेला असंतोष हे काँग्रेसच्या पराभवाचे एक कारण होतेच, पण केवळ तेवढ्यामुळे हा पराभव

झालेला नाही. विरोधी पक्षांच्या एकजुटीचा हा विजय होता. विरोधी पक्षांनी काँग्रेस-विरुद्ध एकच उमेदवार उभा करावा, असे आवाहन जयप्रकाश नारायण यांनी केले होते. ते या दोन्ही निवडणुकांत पाळले गेले. दोन्ही ठिकाणी विरोधी पक्षांनी उमेदवार केला तो कोणत्याही एका पक्षाच्या नावाने नव्हे तर अपक्ष म्हणून. गोविंदपुरातील विजयी उमेदवार वास्तविक जनसंघाचे. तसेच जबलपूरमधील विजयी उमेदवार शरद यादव समाजवादी पक्षाचे. पण पक्षाच्या तिकिटावर उभे राहण्याचा आग्रह दोघांनीही धरला नाही. काँग्रेसविरुद्ध प्रभावी एकजूट करण्यासाठी हे पक्ष निवडणुकांपूर्वी आपली पक्षीय अस्मिता सोडायला तयार झाले, हा त्यांच्या निवडणूकविषयक धोरणातील महत्त्वाचा बदल म्हणावा लागेल. निवडणूक राजकारणातील हा एक नवा प्रवाह होता.

गोविंदपुरा निवडणुकीत मुस्लिमांनी काँग्रेसविरुद्ध मते दिली. काँग्रेसच्या पराभवाचे ते एक प्रमुख कारण होते. मुस्लीम समाजातही काँग्रेसविरोधाची लाट निर्माण होऊ लागल्याचे ते निदर्शक होते.

जबलपूर हा काँग्रेसचा बालेकिल्ला. शेठ गोविंददास स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरच्या सर्व निवडणुकांत गेली पन्नास वर्षे त्या भागातून सतत निवडून आले होते. त्यांचे नातू रविमोहन यांना काँग्रेसने उभे केले. शेठ गोविंददासांच्या घराण्याच्या वजनाचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा, हा त्यामागे उद्देश होता. पण खासदारकी म्हणजे वंशपरंपरा गादी नव्हे, हे रविमोहन यांचा पराभव करून मतदारांनी सिद्ध केले. काँग्रेस पक्ष अंतर्गत गटबाजी व हेवेदाव्यांनी पोखरला होता, हेही त्याच्या पराभवाचे एक कारण होते.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांना विजय मिळाला तर, त्या लाटेची सुरुवात जबलपूर पोटनिवडणुकीतील विजयापासून झाली असे म्हणावे लागेल.

महाराष्ट्र काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर १९६२ पासून तीन लोकसभा निवडणुकांत काँग्रेसचे बळ १९६२ मध्ये ४४ पैकी ४१, १९६७ मध्ये ४५ पैकी ३७ आणि १९७१ मध्ये ४५ पैकी ४२ असे होते. विरोधकांना जास्तीत जास्त ८ जागा १९६७ मध्ये मिळाल्या. यावेळी आणीबाणीतील लोकशाहीच्या गळचेपीमुळे १९६७ पेक्षाही काँग्रेस राजवट अधिक अप्रिय झालेली आहे. विरोधी पक्षांच्या दृष्टीने दुसरी अनुकूल गोष्ट म्हणजे विरोधी पक्ष जनता पक्षाच्या रूपाने एकत्र आले आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी पक्ष, विदर्भातील महाविदर्भ संघर्ष समिती, रिपब्लिकन खोब्रागडे गट हे पक्ष किंवा गट जनता पक्षात सामील झाले नसले तरी, त्यांनी निवडणूक समझोता करून आपसातील लढती टाळल्या आहेत. विरोधकांची मते त्यामुळे यावेळी फारशी विभागली जाणार नाहीत. निवडणूक धोरणाबाबत दलित पँथर आणि शिवसेना यांच्यातही फूट पडली आहे. नेत्यांचा पाठिंबा काँग्रेसला असला तरी, काही ठिकाणच्या या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी आम्हाला हे धोरण मान्य नाही. आम्ही जनता पक्षास पाठिंबा देणार असे जाहीर केले आहे. या साऱ्या गोष्टी लक्षात घेता काँग्रेसला १९६७ पेक्षाही थोडया कमी जागा यावेळी मिळण्याचा संभव आहे.

दक्षिणेमध्ये महाराष्ट्राच्या खालोखाल आंध्र प्रदेश हा काँग्रेसचा दुसरा बालेकिल्ला. तेथे १९५७ पासूनच्या चार लोकसभा निवडणुकांत काँग्रेसच्या ३७, ३४, ३५ व २८ अशा जागा मिळाल्या. १९५७, १९६२ व १९६७ मध्ये काँग्रेसच्या बळात विशेष फरक पडला नाही. पण १९७१ मध्ये १९६७ पेक्षा ७ जागा कमी मिळाल्या तरी दोनतृतीयांश जागा काँग्रेसने मिळवल्या. १९७१ मध्ये काँग्रेसचे बळ थोडे घटले. त्याचे मुख्य कारण म्हणजे आंध्र–तेलंगण संघर्ष. एकूण ४१ पैकी १४ जागा तेलंगण भागात होत्या. तेलंगण प्रजासमितीच्या नेत्यांशी समझोत्याचा प्रयत्न इंदिरा गांधींनी केला, पण त्यात त्यांना यश आले नाही. या समितीने तेलंगण भागातील १४ पैकी १० जागा जिंकल्या. काँग्रेस व तेलंगण प्रजा समिती सोडून बाकीच्या तीन जागांपैकी कम्युनिस्टांना १, मार्क्सवाद्यांना १ व अपक्ष उमेदवारास एक जागा मिळाली. विरोधी पक्ष फारच दुबळे असल्याचे आंध्रमधील १९७१ च्या लोकसभा निवडणुकांवरून दिसून आले.

विरोधी पक्षांच्या बळात यावेळी तरी काही वाढ होईल का ? जनता पक्ष, लोकशाहीवादी काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट हे तिन्ही पक्ष मिळून सर्व जागा लढविणार आहेत. पण अनेक ठिकाणी बहुरंगी लढती आहेत, त्याचा फायदा काँग्रेसला मिळाल्याशिवाय राहणार नाही. माजी मंत्री कोंडा लक्ष्मण बापूजी व आणखी दोन माजी मंत्री काँग्रेसमधून फुटून जगजीवनबाबूंच्या पक्षास मिळाले आहेत, त्याचा थोडासा परिणाम काँग्रेसवर होईल. तसेच आणीबाणीतील निर्बंधांमुळे मध्यमवर्गीयांची मते काँग्रेसविरुद्ध जातील. काँग्रेसच्या दृष्टीने एक अनुकूल घटना म्हणजे यावेळी तेलंगण प्रजासमितीचा विरोध काँग्रेसला नाही. या अनुकूल–प्रतिकूल गोष्टी लक्षात घेता काँग्रेसला १९७१ पेक्षा थोडया कमी जागा मिळण्याची शक्यता आहे.

लोकसभेच्या सर्वच्या सर्व २७ जागा जिंकण्याचा विक्रम कर्नाटकात १९७१ मध्ये काँग्रेसने केला होता. काँग्रेसमधील फुटीनंतर कर्नाटक संघटना काँग्रेसचा एक बालेकिल्ला होता. पण १९७१ च्या लोकसभा निवडणुकांत काँग्रेसने हा बालेकिल्ला सर केला. तिच्या यशाचा हा विक्रम होता. काँग्रेसला १९५७ मध्ये २३, १९६२ मध्ये २५, १९६७ मध्ये १८ व १९७१ मध्ये २७ जागा मिळाल्या. चार निवडणुकांत १९६७ मध्येच काँग्रेसचे बळ घटले तरी, दोनतृतीयांश जागा तिने मिळविल्या होत्या.

१९७१ चा विक्रम यावेळी आपण पुन्हा करू शकणार नाही, हे काँग्रेसनेतेही मान्य करतात. पण तीनचतुर्थांश जागा जिंकण्याचा आत्मविश्वास ते व्यक्त करीत आहेत. राजगोपाल यांच्या नेतृत्वाखाली एक गट काँग्रेसमधून फुटला आणि लोकशाहीवादी काँग्रेसला मिळाला. त्याचा परिणाम काँग्रेसला काही प्रमाणात तरी जाणवल्याशिवाय राहणार नाही. नुकतेच माजी मुख्यमंत्री के. मंजप्पा या पक्षास मिळाले आहेत. पण लोकशाहीवादी काँग्रेसची ज्या पद्धतीने उभारणी केली जात आहे, ती पाहता यातून ध्येयनिष्ठ व शिस्तबद्ध पक्ष कितपत निर्माण होईल, याची शंका वाटते. रचय्या प्रथम फुटले. त्यांनी पक्षाची शाखा स्थापन केली. तिला केंद्रिय नेतृत्वाने मान्यता दिली. काही दिवसांनी राजगोपाल यांच्या नेतृत्वाखाली दुसरा गट फुटला. या गटाने वास्तविक रचय्यांना मिळायला हवे,

पण त्यांनी लोकशाहीवादी कॉंग्रेसची स्वतंत्र शाखा काढली. तिला अधिकृत शाखा म्हणून केंद्रिय नेतृत्वाने मान्यता दिली. रचय्यांना हा निर्णय मान्य झाला नाही. त्यांनी पक्ष सोडला. आता मंजय्या पक्षाला मिळाल्यावर केंद्रिय नेतृत्वाने त्यांना अध्यक्ष नेमले आहे. वास्तविक अध्यक्ष राज्यशाखेनेच निवडायला हवा. कॉंग्रेस सरकारात आणि पक्षात लोकशाही प्रथा पाळल्या जात नाहीत म्हणून जगजीवनबाबूंनी कॉंग्रेस सोडली. पण त्यांच्या नव्या पक्षात तरी लोकशाही कार्यपद्धती पाळली जाणार आहे का? अशी शंका या घटनांमुळे मनात येते.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने चार उमेदवार मागे घेतले असून, त्या मतदारसंघात जनता पक्षाला पाठिंबा देण्याचे ठरविले आहे. जनता पक्षाची बाजू या मतदारसंघामध्ये त्यामुळे बळकट होईल.

एकमेकांविरुद्ध उमेदवार न लढविता एकमेकांच्या बाजूने प्रचार करण्याबाबत कम्युनिस्ट आणि मुस्लीम लीग यांच्यात समझोता झाला आहे. पण या पक्षांनी कॉंग्रेसशी समझोता केलेला नाही. त्यांच्या मतदारसंघातून जनता पक्षाचे उमेदवार उभे आहेतच. त्यामुळे बहुरंगी सामने होऊन फायदा कॉंग्रेसला मिळेल.

आम्ही संसदीय लोकशाहीचे पुरस्कर्ते असल्याचा दावा कॉंग्रेस नेते नेहमी करीत असतात. पण मुख्यमंत्री अरस यांच्या एका भाषणात जो लोकशाहीविरोधी सूर दिसून आला तो विचारात घेण्यासारखा आहे. श्री. अरस एका भाषणात म्हणाले, 'जनता पक्ष दुर्दैवाने सत्तेवर आला आणि त्याने दोनतृतीयांश बहुमताने ४२ वी घटनादुरुस्ती रद्द करून घेतली तर, आम्ही ते चालू देणार नाही. आम्ही क्रांती करू.' ही उघड लोकशाहीविरोधी भूमिका आहे. दोनतृतीयांश बहुमताने तुम्ही घटनादुरुस्ती करू शकता, तर विरोधी पक्ष सत्तेवर आल्यावर त्यालाही तसे करण्याचा पूर्ण लोकशाही अधिकार आहे. लोकशाहीचे सर्व न्याय्य मार्ग बंद झाल्यानंतरच क्रांतीची भाषा करणे योग्य होईल. विरोधी पक्ष सत्तेवर आल्यास कॉंग्रेस पक्ष अशी भूमिका स्वीकारणार असेल तर, लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने ती चिंतेची बाब म्हणावी लागेल. अरस यांच्या या भूमिकेने कॉंग्रेसबद्दलची अप्रियता व असंतोष अधिकच वाढेल. १९६७ एवढ्या जागा टिकविणेसुद्धा कॉंग्रेसला जड जाईल. कारण कॉंग्रेसविरोधाची लाट १९६७ पेक्षाही तीव्र आहे.

असे हे निरनिराळ्या राज्यांतील बदलत्या पक्षबळाचे चित्र आहे. केंद्रशासित प्रदेशांचा येथे विचार केलेला नाही. पण यावेळच्या निवडणुकांच्या संदर्भात एकंदर देशाचे चित्र काय दिसते? जास्तीत जास्त मतदान घडवून आणण्यात विरोधी पक्षांना किती यश येते, यावर निवडणुकीतील त्यांचे यश बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. सरासरी मतदान ६५ टक्क्यांपेक्षा अधिक झाले तर, कॉंग्रेसला निर्णायक बहुमत मिळविणे कठीण जाईल आणि बहुमत मिळालेच तरी ते फार अल्प बहुमत असेल, एवढाच 'वस्तुनिष्ठ अंदाज सध्या बांधता येईल. मतदानाच्या एक-दोन दिवस आधी चित्र अधिक स्पष्ट होईल.

## काही मूलभूत प्रश्न

लोकसभेच्या या सहाव्या निवडणुका. गेल्या पाच निवडणुकांच्या अनुभवावरून आपल्या निवडणूकपद्धतीत कोणते दोष व उणीवा दिसून आल्या, त्या दूर करण्यासाठी काय प्रयत्न झाले? ते समाधानकारक आहेत का? मतदानातून खरे लोकमत कितपत व्यक्त होते? मतदारांवर कोणती दडपणे येतात? ती दूर करण्यासाठी प्रभावी उपाय योजले जात आहेत का? मतपेटीने सरकार बदलता येते, पण समाजपरिवर्तन घडवून आणता येते का? आपल्या पक्षपद्धतीत कोणते दोष आहेत? त्यांचा निवडणुकांवर काय परिणाम होतो? समाजपरिवर्तनाचे उद्दिष्ट गाठताना निवडणुकांना किती महत्त्व द्यावयाचे? या प्रश्नांचा विचार आता करावयाचा आहे.

आपल्या निवडणूकपद्धतीत आढळलेला सर्वांत मोठा दोष म्हणजे जागा व मते यांचे व्यस्त प्रमाण. लोकसभेच्या पाच निवडणुकांत प्रमुख राजकीय पक्षांना मिळालेल्या जागा, त्यांचे शेकडा प्रमाण व शेकडा मते यांची तुलना या दृष्टीने विचारात घेण्यासारखी आहे.

पाच लोकसभा निवडणुका
कॉंग्रेसच्या जागा व शेकडा मते

| वर्ष | जिंकलेल्या जागा | शे. प्रमाण | शे. मते |
|---|---|---|---|
| १९५२ | ३६४ | ७४.४० | ४५ |
| १९५७ | ३७१ | ७५.१० | ४७.७८ |
| १९६२ | ३५८ | ७२.[illegible]० | ४४.७२ |
| १९६७ | २८३ | ५४.५१ | ४०.७३ |
| १९७१ | ३५२ | ६७.९५ | ४३.६८ |

यावरून असे दिसते की, कॉंग्रेसला मतांच्या प्रमाणापेक्षा जागा नेहमीच अधिक मिळत गेलेल्या आहेत. १९६७ च्या निवडणुकांत मतांचे प्रमाण ३.९९ टक्क्यांनी घटले आणि जागांचे प्रमाण १८.३९ टक्क्यांनी खाली आले. उलट १९७१ च्या निवडणुकीत मतांचे प्रमाण ३ टक्क्यांनी वाढताच जागांचे प्रमाण जवळ जवळ १३टक्क्यांनी वाढले.

कॉंग्रेसमधील फुटीनंतर संघटना कॉंग्रेसने १९७१ मध्ये प्रथमच निवडणुका लढविल्या. तिला मते १०.४२ टक्के, पण जागा मात्र फक्त १६ म्हणजे ३ टक्के मिळाल्या. मतांच्या प्रमाणात जागा असत्या तर, संघटना कॉंग्रेस ५२ जागा मिळवू शकली असती. उलट जनसंघाला शेकडा मते ७.३५ टक्के म्हणजे संघटना कॉंग्रेसपेक्षा कमी मिळाली. पण त्याने ६ जागा अधिक मिळविल्या. त्यांच्या जागांचे प्रमाण ४.२४ टक्के आहे. राज्यपातळीवर विचार केला तर, संघटना कॉंग्रेसच्या बाबतीत तामिळनाडूमध्ये ही तफावत अधिकच तीव्रपणे जाणवते. तेथे संघटना कॉंग्रेसला मते ३०.४३ टक्के व जागा फक्त एक मिळाली. उलट सत्तारूढ कॉंग्रेसला मते फक्त १२.५१ टक्के पडूनही जागा मात्र ९ मिळाल्या. केरळमध्ये मार्क्सवाद्यांचे बाबतीत मते व जागांच्या बाबतीत अशीच मोठी तफावत आढळते. मार्क्सवाद्यांना मते २६.५१ टक्के, पण जागा फक्त २ मिळाल्या. उलट कॉंग्रेसला मते १९.७५ टक्के आणि जागा मात्र ६ मिळाल्या. लोकसभेत लोकमताचे खरे प्रतिनिधित्व दिसायला हवे असेल तर, जागा व मते यांच्या प्रमाणात योग्य मेळ हवा. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती म्हणजे मतांच्या प्रमाणात जागा देण्याची पद्धती स्वीकारल्यानेच हा मेळ साधता येईल. एकदा तत्त्व मान्य झाल्यावर

या पद्धतीचा तपशील ठरविता येईल. निवडणुकीत ज्या मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आणि ज्या उमेदवारास ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली, तोच निवडून आला असे समजण्यात यावे. निरनिराळया राजकीय पक्षांना शेकडा मते पडली असतील त्या प्रमाणात लोकसभेतील त्यांच्या प्रतिनिधींची संख्या निश्चित करावी. या संख्येतून विजयी उमेदवार वगळून ज्या जागा उरतील त्या पक्षाच्या यादीतून भरण्यात याव्या. पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळालेला उमेदवारच निवडून येतो, हे एकदा मतदारांना माहीत झाल्यावर मतदानही अधिक मोठ्या प्रमाणावर होऊ लागेल.

मतदानाच्या प्रमाणात जागा हे तत्त्व मान्य झाले तर, निवडणुकीत पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळविण्यास महत्त्व येईल. त्यातून एक अनिष्ट प्रवृत्ती निर्माण होण्याचा संभव आहे ती म्हणजे मतांची टक्केवारी वाढविण्यासाठी उमेदवार मोठ्या संख्येने उभे करणे. जनसंघाने या तंत्राचा अवलंब १९६७ च्या निवडणुकीपर्यंत केला होता. १९६७ च्या निवडणुकीत जनसंघाने महाराष्ट्रात ८·३४ टक्के म्हणजे विरोधी पक्षांमध्ये पहिल्या क्रमांकाची मते मिळविली. पण त्यात तीस टक्के मते अनामत रकमा जप्त झालेल्यांची होती. जनसंघाच्या ११५ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली होती. स्वतंत्रच अनामत रकमा जप्त झालेल्यांची मते वजा केली तर, १९६७ च्या निवडणुकीत विरोधी पक्षांमध्ये शे. का. पक्षाचा क्रम पहिला, रिपब्लिकन पक्षाचा दुसरा व जनसंघाचा तिसरा लागतो. तेव्हा मतांची टक्केवारी फुगविण्यासाठी आपल्या वास्तविक सामर्थ्यापेक्षा जास्त उमेदवार उभे करण्याच्या प्रवृत्तीसही आळा घालायला हवा. राजकीय पक्षांच्या मतांची टक्केवारी काढताना अनामत रकमा जप्त झालेल्यांची मते जमेस धरली जाणार नाहीत, हे तत्त्व स्वीकारण्यात यावे म्हणजे या प्रवृत्तीस आळा बसेल.

मतदारांवर येणारी सत्ता, पैसा, जात यांची दडपणे दूर झाल्याशिवाय तो खऱ्या अर्थाने खुले मतदान करू शकणार नाही. निवडणूक प्रचारासाठी सरकारी वाहनांचा वापर थांबवला पाहिजे. सरकारी कामाचे निमित्त दाखवून मंत्री दौरे करतात आणि सरकारी खर्चाने निवडणूक प्रचार करतात, अशी टीका विरोधी पक्षांनी अनेकदा केलेली आहे. निवडणुका जाहीर होताच सरकारी नोकरांना पगारवाढ, महागाई भत्तावाढ अशा सवलती जाहीर केल्या जातात. तीनपेक्षा अधिक मुले असलेल्या सरकारी नोकरांच्या सवलती काढून घेतल्या होत्या. त्या त्यांना परत देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र सरकारच्या सक्तीच्या नसबंदी बिलातील सक्ती काढून टाकण्यात येईल, असे मुख्य मंत्र्यांनी जाहीर केले. या निरनिराळ्या प्रकारच्या सवलती म्हणजे मते मिळविण्यासाठी दिलेली प्रलोभनेच आहेत. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर अशा प्रकारच्या कोणत्याही सवलती सरकारने जाहीर करायच्या नाहीत, असा संकेत सरकारने पाळायला हवा.

सत्तेइतकेच पैशाचे दडपणही महत्त्वाचे आहे. लोकसभेच्या एकेक मतदारसंघासाठी पाच लाख रुपयांवर खर्च केला जात आहे. सामान्य कार्यकर्ता एवढे पैसे आणणार कोठून ? त्याला निवडणुका लढविणे जवळजवळ अशक्यच झाले आहे. सत्तारूढ पक्षास उद्योगपतींकडून मोठ्या प्रमाणात देणग्या मिळतात. काही विरोधी पक्षांनाही देणग्या मिळत असल्या तरी, सत्तारूढ पक्षाच्या मानाने त्यांचे प्रमाण फार कमी. काळ्या बाजाराचा पैसा निवडणुकीत खर्च केला जातो. कंपन्यांनी राजकीय पक्षांना देणग्या देण्यास बंदी करणारा कायदा करण्यात आला. त्यामुळे पैसा मिळणे बंद झाले नाही तर तो छुप्या मार्गाने दिला जाऊ लागला. त्याला आळा घालण्यासाठी देणग्यांवरील बंदी उठविणारे बिल सरकारने आणले, पण ते अजून पास व्हावयाचे आहे.

मोठ्या प्रमाणावर पैसा बड्या कंपन्याच देऊ शकतात. पण या पैशाच्या मोबदल्यात कंपन्यांना आपले हितसंबंध साधावयाचे असतात. परवाने व सवलती मिळवायच्या असतात. तेव्हा जो पक्ष सत्तेवर येण्याचा संभव आहे, अशाच पक्षास अधिक देणग्या मिळतात. या देणग्यांचा परिणाम सत्तारूढ पक्षाच्या धोरणांवर होतो. ज्यांच्या आर्थिक मदतीमुळे आपण निवडून आलो, त्या वर्गास दुखविण्याचे, त्याच्या हितसंबंधांना बाध


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

राजहंस प्रकाशने

□ सांगत्ये ऐका
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ टॉलस्टॉय एक माणूस
सुमती देवस्थळे

□ श्रीग्रामायन
श्री. ग. माजगावकर

□ शतपावली
रवींद्र पिंगे

□ पुरंदऱ्यांची दौलत

□ पुरंदऱ्यांची नौबत
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

येईल असे निर्णय घेण्याचे शक्यतो टाळले जाते. जाहीरनाम्यात आश्वासने दिली असली तरी, त्यांची अंमलबजावणी लांबणीवर टाकली जाते. कंपन्यांच्या देणग्यांचे हे अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी देणग्या घ्यावयाच्या नाहीत, अशीच ठाम भूमिका राजकीय पक्षांनी घ्यावयास हवी. सर्वात मोठा पक्ष या नात्याने कांग्रेसने याबाबतीत पुढाकार घेऊन १९५२ च्या निवडणुकीपासूनच ठाम भूमिका घेतली असती तर, निवडणुकांच्या राजकारणास एक निकोप वळण लागले असते. पण तसे घडले नाही. निवडणुकीवर अमाप खर्च करायचा आणि तो भरून काढण्यासाठी सत्तेचा गैरवापर करावयाचा, यातून भ्रष्टाचाराची साखळी तयार होत गेली.

निवडणुकीवर उमेदवाराने किती खर्च करावा, याला कायद्याने मर्यादा घातल्या आहेत. पण राजकीय पक्षाने किती खर्च करावा, याला काहीही मर्यादा नाहीत. त्या घालण्याची आवश्यकता आहे. तसेच राजकीय पक्षांनी निवडणुकीसाठी किती पैसा जमविला, कसा जमविला, तो कोणत्या पद्धतीने खर्च केला, याची तपशीलवार माहिती सादर करण्याची त्यांच्यावर कायद्याने सक्ती केली जावी. म्हणजे निवडणूक खर्चाला आणि निवडणूक मोहिमेतील भ्रष्टाचारास काही प्रमाणात तरी आळा बसेल. निवडणूक कायद्यात या दृष्टीने सुधारणा व्हावयास हव्यात.

जातीचा प्रभाव आपल्या मतदारांवर अजूनही आहे. मतदार संघात ज्या जातीचे मतदार अधिक त्याच जातीचा उमेदवार राजकीय पक्ष निवडतात. प्रतिस्पर्धी उमेदवार एकाच जातीचे असतील तर, जातीय प्रचाराला वाव मिळत नाही. पण बहुसंख्य मतदारांची जात पाहून उमेदवार निवडले जातात, तेव्हा इतर जातींचे लायक उमेदवारही डावलले जातात. स्वतःला पुरोगामी म्हणविणाऱ्या राजकीय पक्षांनी तरी, उमेदवार निवडीत ही जातीय दृष्टी निर्धाराने बाजूस सारून लायक उमेदवाराचीच निवड केली पाहिजे, तरच जातीच्या या प्रभावास काही प्रमाणात आळा बसेल.

मतदारांवरील ही दडपणे दूर करण्यासाठी प्रभावी उपाय योजण्यात आलेले नाहीत, त्यामुळे निवडणुकींतून खरे लोकमत व्यक्त होत नाही.

आपल्या निवडणूक पद्धतीत आवश्यक असलेली आणखी एक सुधारणा म्हणजे मतदारसंघ भौगोलिक पायावर न ठेवता, व्यवसायावर ठेवण्यात यावे. भौगोलिक मतदारसंघ एकजिनसी नसतो. अनेक हितसंबंधांचे लोक त्यात एकत्र आलेले असतात. व्यवसायवार प्रतिनिधित्व दिल्यास त्या त्या व्यवसायातील समस्या अधिक चांगल्या प्रकारे मांडल्या जातील.

मतपेटी हे सरकार बदलण्याचे प्रभावी शस्त्र असले तरी, या शस्त्राच्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. १९६७ च्या निवडणुकांत आठ राज्यांत कॉंग्रेसची सत्ता गेली तेव्हा मतपेटीने केलेली क्रांती असे त्याचे वर्णन काही विचारवंतांनी केले. पण त्यांचा लौकरच भ्रमनिरास झाला. केरळ व पश्चिम बंगालमध्ये डाव्या आघाडीची सरकारे काही काळ अधिकारावर होती, पण कॉंग्रेसपेक्षा अधिक चांगल्या सरकारची प्रतिमा ती जनतेपुढे ठेवू शकली नाहीत. ब्रिटनमध्ये मजूर सरकार अनेकदा अधिकारावर आले, पण त्यांचा समाजवाद सुधारणावादाकडे झुकला. इंदिरा गांधींच्या समाजवादाचा तोंडवळा त्यापेक्षा फारसा निराळा नाही. लोकशाही मार्गाने समाजवाद आणता येणार नाही, असा याचा अर्थ नाही. पण आपली सध्याची लोकशाही भांडवलशाहीस अनुकूल आहे. समाजवाद आणावयाचा असेल तर, भांडवलशाहीस चिरस्थायी करणारी ही सदोष लोकशाही बदलून, समाजवादाला अनुकूल अशी लोकशाही येथे आणली पाहिजे. ही नवी लोकशाही म्हणजे रशिया, चीन पद्धतीची एकपक्षीय हुकूमशाही नव्हे. विचारप्रकटनाचे स्वातंत्र्य हे लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचे मूल्य. व्यापक समाजहिताला त्यामुळे बाध येऊ न देता भारताच्या विशिष्ट परिस्थितीस अनुरूप असा आकार येथील लोकशाहीस आपण देऊ शकतो. समाजवादी चळवळीत या प्रश्नावर अधिक खोलवर विचारमंथनाची आवश्यकता आहे.

समाजवादी चळवळींनी निवडणुकांना कितपत महत्त्व द्यावे? निवडणुकांच्या राजकारणात आपण अधिकाधिक गुरफटले जात आहोत. जेथे आपले खरोखर कार्य आहे, तेवढ्याच मर्यादित जागा समाजवाद्यांनी लढवाव्या विधिमंडळातील कार्याचे महत्त्व मी कमी करीत नाही. पण विधायक कार्य आणि अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण लढ्याचे कार्य अधिक महत्त्वाचे आहे. सध्याच्या सत्ताकेंद्रित राजकारणात तिकडे दुर्लक्ष होत आहे.

ज्या लोकशाहीच्या पायावर समाजवादाची इमारत आपण उभारणार, त्या लोकशाहीचीच आणीबाणीमुळे गळचेपी झाली आहे. तेव्हा लोकशाही मूल्ये आणि लोकशाही कार्यपद्धती यांचे रक्षण हाच या निवडणुकांतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असून, लोकशाहीची गळचेपी करणाऱ्या शक्तींना सत्तेवर येऊ द्यावयाचे नाही, हे जागरूक मतदारांचे कर्तव्य आहे. आपल्या लोकशाहीच्या भवितव्याचा हा लढा आहे. त्यात लोकशाहीच्या बाजूनेच जनता कौल देईल, यात शंका नाही.

**समाप्त**

## मुलाखती : पृष्ठ ८ वरून

गोष्ट झाली. परंतु ती अशा अर्थानं की, आणीबाणी पुकारावी लागावी अशी परिस्थिती आपल्या देशात निर्माण झाली होती...

प्रश्न : म्हणजे आणीबाणी समर्थनीय होती असंच ना?

डॉ. लागू : जेव्हा जाहीर झाली तेव्हा 'त्या काळात' आणीबाणी जस्टिफायेबल होती. कारण तेव्हा देशात फक्त गोंधळाचीच निअर केऑटिक...परिस्थिती होती. देशात चाललेली बहुसंख्य आंदोलनं शांततापूर्ण नव्हती. विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यांना दोष देत होते. परंतु या पक्षांचंही सत्ताकारणच चाललेलं होतं. सत्तारूढ पक्षाला खेचून काढून त्या जागी आपण जाऊन बसावं एवढाच त्यांचा हेतू होता. समाजाचं प्रबोधन हे विरोधी पक्ष करत नव्हते. यांच्यातला एकमेव महान नेता जयप्रकाश नारायण तळमळीने घसा फोडून सांगत होता, 'अरे बाबांनो, एकत्र व्हा, एकजूट करा, लोकशाही मार्गानं आंदोलन करा–' परंतु त्याचं त्यावेळी कोणी ऐकत नव्हतं. देशाला कुठंतरी अनार्कीचं स्वरूप येतंय अशी परिस्थिती जेव्हा निर्माण झाली तेव्हा आणीबाणी पुकारली गेली.

प्रश्न : तुम्ही आणीबाणी स्वीकारली का? आणीबाणीत हुकुमशाहीची चाहूल तुम्हाला लागली नाही का?

डॉ. लागू : आणीबाणी जाहीर केली तेव्हा तरी ही हुकूमशाहीच्या दृष्टीनं वाटचाल चालू झाली आहे असं वाटलं नाही. त्यावेळी आणीबाणी मी 'अॅक्सेप्ट' केली. युद्धाच्या वेळी आणीबाणी पुकारली जाते तेव्हा नाही का आपण आणीबाणी स्वखुशीनं स्वीकारत? तसाच मी याहीवेळी आणीबाणीचा खुशीनं स्वीकार केला.

प्रश्न : म्हणजे काय केलंत?

डॉ. लागू : मी माझे हक्क सस्पेंड केले. मी माझ्या आयुष्यावरच सेन्सॉरशिप मान्य केली.

प्रश्न : नाटकावरील सेन्सॉरशिपविरुद्ध तुम्ही आवाज उठवलात. आणीबाणीत जेव्हा सर्व वृत्तपत्रांवरच सेन्सॉरशिप लागू करण्यात आली तेव्हा तुम्ही काय केलंत?

डॉ. लागू : मी मघाच सांगितलं ना की, आणीबाणीत मी आयुष्यावरचीच सेन्सॉरशिप मान्य केली. मी नाटकावरील सेन्सॉरशिपविरुद्ध लढलो तेव्हा देशात लोकशाही होती. लोकशाही असताना अशा हक्कांवर दडपण येणं हे मला मंजूर नाही. परंतु जेव्हा आणीबाणी असते तेव्हा स्वतःच आपले हक्क सस्पेंड करायचे असतात. तेथे नाटकावरच्या किंवा दुसऱ्या कसल्याही सेन्सॉरशिपचं काय?

प्रश्न : आणीबाणीच्या नावाखाली देशात, समाजात प्रचंड ढवळाढवळ चालू असताना कलावंतांनी काय करावं?

डॉ. लागू : कलावंतानं जास्तीत जास्त कलावंत असावं. मला एकदा जाहीर मुलाखतीत एकानं प्रश्न विचारला होता कलावंतानं भाजीविक्या असावं का? तेव्हा मी सांगितलं, त्याला वाटलं तर, त्यानं भाजी विकावी! तेव्हा राजकारणात पडावं की नाही, हा ज्या त्या कलावंताचा प्रश्न आहे. परंतु त्यानं सर्वप्रथम जास्तीत जास्त कलावंत असणं महत्त्वाचं आहे.

प्रश्न : कबूल. परंतु हे त्याचं जास्तीत जास्त कलावंत असणंच जर धोक्यात आलं, त्याच्या कलाविष्काराच्या स्वातंत्र्याची गळचेपी झाली तर त्यानं काय करावं?

डॉ. लागू : त्यानं एकदा विरोध करायचा ठरवला तर, त्यानं अल्टीमेट पनिशमेंट भोगायला तयार राहिलं पाहिजे. मग तडजोड नाही. आणीबाणी जाहीर झाली तेव्हा 'रूपवेध'च्या बैठकीत मी हे स्पष्ट केलं होतं की, हे एक टोक नाही तर थेट दुसरं टोक. मला हौतात्म्याचं आकर्षण नाही, परंतु या काळात मला ते पत्करावं लागलं असतं तर, ते मी डेफिनेटली पत्करलं असतं.

प्रश्न : आणीबाणीच्या काळात सरकारी प्रचारमाध्यमं–म्हणजे रेडिओ, टी. व्ही. यांवर बहिष्कार घालावा असं तुम्हाला वाटलं नाही का?

डॉ. लागू : खरं सांगू का? मी रेडिओ ऐकत नाही व टी. व्ही. पाहत नाही. त्यामुळे ती निव्वळ सरकारी प्रचाराची साधनं म्हणून वापरली जातात, हे मला ठाऊक नाही. लोक तसं बोलतात हे मात्र खरं. आता सरकारी पारितोषिकं नाकारणं किंवा रेडिओ, टी. व्ही. वर बहिष्कार घालणं यांना आपण निष्कारण महत्त्व देतो. हा बहिष्कार घालणं हा निषेधाचा चाइल्डिश मार्ग मला वाटतो.

प्रश्न : आणीबाणीच्या काळात काही फायदे झाले असं तुमचं मत आहे का?

डॉ. लागू : आणीबाणीच्या काळात सुधारणा झाल्या नाहीत असे कोणी म्हणत असेल तर, मी त्याला जितका विरोध करीन तितकाच आणीबाणीत काही हानी झाली नाही असे म्हणणाऱ्याला करीन. आणीबाणीत स्वातंत्र्याची गळचेपी झाली ही मोठीच हानी आहे. सुधारणेच्या बाबतीत म्हणजे औद्योगिक क्षेत्रात आणीबाणीमुळे शांततामय वातावरण होते. संप, मोर्चे, घेराव नव्हते. त्यामुळे यापायी उत्पादन कमी झाले, अशी सबब कारखानदारांना सांगायला उरली नाही. मात्र त्यामुळे उत्पादन वाढायला हवे तेवढे वाढलेले नाही. याचा अर्थ आणीबाणी आणूनही खोलवर रुजलेले भ्रष्टाचाराचे प्रश्न सुटत नाहीत. तसेच मोर्चे किंवा संप करून प्रश्न सुटत नाहीत याचीही जाणीव झाली नाही.

प्रश्न : आणीबाणी शिथील केली आहे हे खरं वाटते का?

डॉ. लागू : आणीबाणी शिथिल केली आहे हे दिसतंच आहे सुमारे ९५ टक्के राजबंद्यांची सुटका झाली आहे. निवडणुका जाहीर केलेल्या आहेत, सभा घ्यायला परवानगी आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या व्यक्तव्यानं वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने भरले जात आहेत. हे सर्व पाहता पंतप्रधानांनी आणीबाणी शिथिल केली आहे याबद्दल मात्र शंका वाटत नाही.

प्रश्न : आणीबाणी पुकारली 'त्यावेळी' मी ती स्वीकारली, 'त्यावेळी' ती समर्थनीय होती असं तुम्ही म्हणता. याचा अर्थ आता आणीबाणी समर्थनीय नाही असं तुम्हाला वाटतंय. तुमच्या मनात हा बदल कशामुळं झाला?

डॉ. लागू : तुमचं म्हणणं बरोबर आहे. मला सुरवातीस आणीबाणी ही प्रामाणिक हेतूनंच जाहीर केली आहे असं वाटत होतं व म्हणून मी 'त्यावेळी' तिचं स्वागतही केलं होतं. परंतु नंतर जेव्हा संजय गांधीला ज्याप्रकारे प्रोजेक्ट केलं जाऊ लागलं, त्यावरून आणी-

आणी जाहीर करण्याच्या पंतप्रधानांच्या हेतूबद्दलच मला शंक येऊ लागली. त्या हुकुमशाहीच्या दृष्टीनं पावलं टाकताहेत असं वाटू लागलं. हे ' युवराज महात्म्य ' जसजसं वाढू लागलं तसतसं मला आणीबाणीचं प्रकरण जरा जादाच स्ट्रेच होतंय असं वाटू लागलं. संजय गांधी राजकीय क्षितिजावर उगवला तेव्हा मला वाटलं बाईच्या अगदी जवळ असलेली तिला पूर्णतया समजू शकणारी व्यक्ती म्हणजे तिचा हा पुत्र संजय. तेव्हा तो आपल्या आईला काय म्हणायचं आहे हे जनतेपर्यंत पोचवायचं काम करणार आहे. परंतु हे अति झालं. संजय गांधी जेथे जेथे जाई तेथे तेथे तेथील मुख्यमंत्री व त्यांचा सारा लवाजमा त्याच्या स्वागताला, त्याच्या दिमतीस जाई. हा माणूस येतो काय, पाच कलमीसारखा फालतू कार्यक्रम सांगतो काय आणि पुढारी, नेते त्याच्यामागे धावतात काय ? मला काही समजेचना. इतकं काही तो महत्त्वाचं सांगून राहिला नव्हता की, अधिकृतपणे त्याची प्रतिमा प्रोजेक्ट केली जावी !

प्रश्न : या एकाच कारणासाठी तुम्हाला आणीबाणीमागील हेतूचा संशय झाला का ?

डॉ. लागू : हे झालं एक कारण. दुसरं कारण म्हणजे राजकीय स्थानबद्धांना महिनेन महिने बाईनं तुरुंगात का डांबून ठेवावं ? ' गोंधळ केलात तर मी तुम्हाला तुरुंगात ठेवू शकते. तेव्हा आता तुम्हाला सोडून देते. यापुढं नीट वागा. ' असं फारतर सांगून तिनं स्थानबद्धांना सोडून द्यायला हवं होतं. परंतु तसं झालं नाही; महिनेन महिनें हजारो कार्यकर्ते तुरुंगात खितपत पडले. दुर्गाबाई भागवत या जबाबदार नागरिक आहेत, साहित्यिक आहेत. त्या काही पुढारी नव्हेत. त्यांना सत्ता, खुर्ची मिळवावंची बिलकुल लालसा नाही. अशा दुर्गाबाईंना कशासाठी अटक करण्यात आली ? याचा अर्थ पॅनिक- निर्माण होतंय यांचीच ही सूचना होती. घाबरलेला माणूस वाटेल त्याला मारायला लागतो तसं बाईचं (दिल्लीवाल्या) झालं असावं असं मला वाटू लागलं. मग मला आणीबाणी जाहीर करण्यामागील हेतुचाच संशय येऊ लागला. आणीबाणी ही बाईनं केवळ आपली सत्ता टिकवण्यासाठीच जाहीर केलेली होती याची खात्री पटली.

हा सत्ताकारणाचाच मुद्दा घेऊन डॉ. लागू म्हणाले, आपल्या देशात गेली २७–२८ वर्षे चाललंय ते सत्ताकारणच आहे. राजकारण नव्हे. मग ते कोठल्याही पक्षाचे असो. सत्ता हस्तगत करणं हाच विरोधी पक्षाचा मोटिव्ह आहे. खरं राजकारण केलं ते फक्त महात्मा गांधी व पंडित नेहरू यांनीच. त्यानंतर साऱ्यांनी केलं ते फक्त सत्ताकारणच. काही ठिकाणी विरोधी पक्षांची मंत्रिमंडळं आली त्यांनीही केलं सत्ताकारण, ती कोसळवण्याचा प्रयत्न केला तेही सत्ताकारणच. आता जगजीवनराम कॉंग्रेस पक्षातून बाहेर पडले हेही सत्ताकारणच आहे.

प्रश्न : सर्वचजण सत्ताराजकारण करतात असं तुमचं मत असेल मग नव्यानं स्थापन झालेल्या जतता पक्षाबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

डॉ. लागू : जनता पक्ष अधिकारपदावर आला तर सध्यापेक्षा काही वेगळं होईल असं मला वाटत नाही. परंतु जनता पक्षाची स्थापना, सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येणं या ' कन्सेण्ट 'ला माझा संपूर्ण पाठिंबा आहे. या पक्षाच्या स्थापनेत मला लोकशाहीची खरी जाण दिसते आहे व त्याचा मला आनंद होतो. गेली २८–२९ वर्षे कॉंग्रेस निरंकुशपणे सत्ता उपभोगीत आली आहे. आपल्या खुर्चीला कोणी हात लावू शकत नाही ही त्यांची भावना डळमळीत झाली. इथं मला लोकशाहीचा उगम दिसतो. खरं तर फार पूर्वीच विरोधी पक्षांची एकजूट होऊन जनता पक्ष स्थापन व्हायला हवा होता. हे पूर्वीच झालं असतं, प्रभावी विरोधी पक्ष असता तर आणीबाणी ओढवलीही नसती. नाक दाबले की, तोंड उघडते तसे आता विरोधकांचे झाले आहे. तेव्हा ते एकत्र आले याचे क्रेडिट मी देतो बाईलाच.

जनता पक्षाच्या बाजूने आज हवा आहे. वृत्तपत्रे त्यांच्या बाजूने आहेत. शहरात जनता पक्षाचे उमेदवार निवडून येतील. खेड्यापाड्यांपर्यंत ते पोहचलेत की नाही हे मला ठाऊक नाही. संसदीय लोकशाही पद्धतीवर माझा विश्वास आहे व तेथे सत्तारूढ पक्षावर वचक ठेवील असा बलशाली विरोधी पक्ष असला पाहिजे, द्विपक्षीय लोकशाही असली पाहिजे.

प्रश्न : जनता पक्ष सत्तेवर आला तर काही विशेष करणार नाही असं तुम्ही कसं म्हणता ?

डॉ. लागू : जयप्रकाश नारायण सोडले तर, स्वच्छ राजकारण करील, ज्याच्या हाती देशाचं भवितव्य सोपवावं असा एकही नेता मला विरोधी पक्षात दिसत नाही. जनता पक्ष जरूर विजयी व्हावा

महाराष्ट्रात प्रथमच प्रसिद्ध होत आहे
प्रत्येक ग्राहकाने वाचलेच पाहिजे असे दर्जेदार

ग्राहक

मासिक

- ग्राहकांची लुबाडणूक करणाऱ्या योजनांचा दंभस्फोट.
- खरेदीच्या वेळी घ्यावयाची काळजी, वस्तूंची किंमत यांचे परखड विश्लेषण.
- ग्राहक चळवळीची भरपूर माहिती. या शिवाय
- दर्जेदार ललित साहित्य.

□ मुखपृष्ठावर शि. द. फडणीस यांचे आकर्षक चित्र.

वार्षिक वर्गणी फक्त ६ रुपये.

आजच वर्गणी भरून सभासद व्हा.

पहिला अंक

रामनवमी, दि. २९ । ३ । ७७ रोजी प्रसिद्ध होणार.

ग्राहक मासिक □ ग्राहक भवन □ टिळक मार्ग □ पुणे ३०

असं मला वाटतं यांचं कारण लोकशाहीची जाण जनतेला येत आहे याचं मी ते चिन्ह मानतो. त्यासाठी जनता पक्ष विजयी व्हायला हवा. परंतु या पक्षाने खरोखर काही वेगळा कार्यक्रम दिलेला नाही. मोरारजी वगैरेंशी आमचे मतभेद राहिलेले नाहीत असे त्यांचे नेते सांगतात. मी त्यांच्यावर विश्वास ठेवतो. परंतु स. का. पाटील यांनी आपल्याला तिकीट मिळालं नाही. म्हणून आताच ओरडा सुरू केलाय...

तेव्हा खरा प्रश्न आहे तो समाज प्रबोधन करण्याचा; समाजाला कार्यप्रवण करण्याचा, जनतेला लोकशाहीसाठी तयार करण्याचा. ते राजकीय पक्षांनी केलं पाहिजे.

काँग्रेसच्या मक्तेदारीला तोडलं पाहिजे, जनतेने त्यांना धडा शिकवला पाहिजे. फॉर अ चेंज जनता पक्ष सत्तेवर आला पाहिजे असेही डॉ. लागूंनी मुलाखत संपवताना सांगितले. □

# हजारीबाग तुरुंग आणि मेरी टायलर

## भारतात आणीबाणी जारी असताना 'द न्यूयॉर्कर' या परदेशी नियतकालिकात प्रसिद्ध झालेला लेख (४ ऑक्टोबर १९७६)

### लेखक : वेद मेहता । अनुवाद : प्र. ना. परांजपे

गेल्या वासंतिक अंकात या पृष्ठांमध्ये मी नोंदविल्याप्रमाणे, २६ जून १९७५ च्या मध्यरात्री भारतामध्ये पोलिसांनी अनेक ठिकाणी अनेक नागरिकांना झोपेतून उठवले. कुठल्याही वॉरंट किंवा आरोपाशिवाय तुरुंगात टाकले. त्या दिवशी पुकारण्यात आलेल्या राष्ट्रीय आणीबाणीचा एक भाग म्हणून, पंतप्रधान इंदिरा गांधींच्या शासन-संस्थेने सुरु केलेल्या, दारावर थाप मारून राजकीय विरोधकांना पकडण्याच्या सत्राचा हा प्रारंभ होता. सर्व मतभेद निपटून टाकण्याच्या दीर्घकालीन मोहिमेशी जुळतील अशी संक्षिप्त कारणे देऊन केल्या जाणाऱ्या धरपकडी आजतागायत सुरू आहेत. आणि काही व्यक्तींची सुटका झाली तरी, राजबंद्यांची संख्या वाढण्याचे कधीही थांबलेले नाही. केवळ भूमिगत पत्रिकांचे मुद्रण व वितरण याबद्दल पकडण्यात आलेल्यांची संख्या ७ हजार असल्याचे श्रीमती इंदिरा गांधींच्या गृहखात्याने गेल्या मे महिन्यात सांगितले. अधिकाऱ्यांचा मात्र असा आग्रह आहे की, या कैद्यांपैकी अनेकजण श्रीमती इंदिरा गांधींचे राजकीय विरोधक ('सद्सदविवेक-बुद्धीचे कैदी') नसून अशा धरपकडीविरुद्ध यापूर्वी जे घटनात्मक हमींचा फायदा घेत असत, असे गुंड, साठेबाज व काळाबाजारवाले ('समाजशत्रू') आहेत.

तरीही, त्यांच्याविषयी कोणतीही माहिती देण्यास, त्यांची नावे गावे, त्यांना ठेवलेले तुरुंग, तेथील परिस्थिती, त्यांची प्रकृती, त्यांना तुरुंगात टाकण्याचा काळ इ.— अधिकारी नकार देतात. हे सर्व शासकीय गुपित, आहे असे ते म्हणतात. कुटुंबियांना कैद्यांबद्दल चौकशी करण्यास, न्यायालयांना त्यांचे खटले चालवण्यास, सुनावणी करण्यास किंवा, आता तर त्यांचे हेबिअस कॉर्पसचे अर्ज दाखल करून घेण्यासही, त्यांनी बंदी केली आहे. एवढेच नव्हे तर, श्रीमती इंदिरा गांधींच्या गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. ओम् मेहता यांच्या सांगण्यानुसार, "आणीबाणी परिणामकारकपणे अंमलात आणण्यासाठी ज्यांची अटक आवश्यक आहे, असे जाहीर करण्यात आले आहे त्यांच्या बाबतीत अटकेची कारणे शासकीय गुपितात मोडतील; ती उघड करणे हे सार्वजनिक हिताविरोधी ठरेल, आणि अटक झालेल्या व्यक्तीलाही ती कळविण्यात येणार नाहीत." राजबंद्यांच्या छळाच्या व त्यांना देण्यात येणाऱ्या वाईट वागणुकीच्या वार्ता सातत्याने येत असून 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनल' व इतर स्वतंत्र संघटनांनी अशा वार्तांची चौकशी करण्याच्या विनंत्या वारंवार केल्या आहेत. परंतु श्रीमती इंदिरा गांधींच्या शासनाने त्या अमान्य केल्या आणि राजबंद्यांना भेटण्यास किंवा त्यांची मुलाखत घेण्यासही संमती नाकारली. 'ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या' अमेरिकी शाखेचे अध्यक्ष स्वर्गवासी इव्हान मॉरिस यांनी 'टाईम्स'ला लिहिलेल्या एका पत्रात फार पूर्वीच नोंद केली आहे की, "मानवी अधिकारांच्या तत्त्वांबाबत श्रीमती इंदिरा गांधींची शासन व्यवस्था चिली, तैवान, रशिया, इंडोनेशिया, व दक्षिण कोरिया यांसारख्या पोलिशी राज्यांइतकीही संवेदनाक्षम नाही."

राजबंद्यांच्या संख्येबाबत तीस हजारांपासून अडीच लाखांपर्यंत अनेक अंदाज करण्यात आले आहेत. काही महिन्यांपूर्वी नक्की आकड्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला असता, श्रीमती गांधी म्हणाल्या " ती संख्या लहान आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या संदर्भात फार लहान आहे "— जणू काही तुरुंगातील लोकांची संख्या एकूण लोकसंख्येच्या (सुमारे ६० कोटी) लहान हिस्सा असल्याने तिला काहीच महत्त्व नाही, आणि जणू काही या दोन संख्यांमध्ये काही प्रत्यक्ष संबंध आहे !

श्रीमती गांधींनी आणीबाणीच्या सर्वस्पर्शी अधिकारांच्या केलेल्या उपयोगामागे अलिकडच्या काळातील भारतीय इतिहासातील अनेक पूर्व— उदाहरणांची मालिका आहे. आपल्या शासनाच्या राजकीय विरोधकांची

विनाखुलासा धरपकड करण्यासाठी ब्रिटिशांनी तथाकथित भारत संरक्षण कायद्याचा नियमित उपयोग केला. १९६२ मधील चीन–भारत युद्धाचे वेळी अनेक साम्यवादी पुढाऱ्यांना विनाखुलासा अटक करण्यासाठी नेहरूंच्या शासनाने त्या कायद्याच्या सत्तेची आराधना केली. १९६७–६८ मध्ये उत्तर-पूर्वसीमेवरील नागालँड व मिझो टेकड्या येथील गनिमी युद्धाच्या आणीबाणीच्या वेळी स्वतः श्रीमती गांधींच्या शासनाने अनेक खेड्यांचे कच्च्या लष्करी तुरुंगात रूपांतर करून त्यांना शांत केले.

या सर्व वेळी, व विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, आणीबाणीच्या अधिकारांच्या अशा वापराची नैतिकता व कायदेशीरपणा यांबद्दल भारतात प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सर्व नागरीस्वातंत्र्ये व मानवी अधिकार तात्पुरते रद्द करण्याचे समर्थन एखाद्या लोकशाहीत कसे करता येईल? आणि जर कधी असे समर्थन करता येत असेल, तर ते अधिकार खरोखर आवश्यक असल्याचा निर्णय शासनाने कसा घ्यावा? जोपर्यंत भारतीय शासन आणीबाणीच्या अधिकारांचा उपयोग समाजातील छोट्या वर्गांविरुद्ध– (साम्यवादी, नागा, मिझो इ.) करीत होते तोपर्यंत या प्रश्नांकडे बहुतेक वेळा दुर्लक्ष केले गेले. परंतु सध्याच्या राष्ट्रीय आणीबाणीमध्ये हे अधिकार अशा धाऊक पद्धतीने वापरण्यात आले की, शेवटी गेल्या हिवाळ्यात भारतीय सर्वोच्च न्यायालयाला या प्रश्नांचा निकाल देण्यास सांगण्यात आले. सात राज्यांतील हायकोर्टांमध्ये चार लोकसभासदस्य धरून एकूण त्रेचाळीस राजकीय कैद्यांनी दाखल केलेल्या हेबिअस कॉर्पसच्या अर्जांमध्ये राज्य सरकारे प्रतिवादी होती आणि ती हे सर्व खटले हरली. सुप्रीम कोर्टाकडे केलेल्या अर्जांचा शासनाने असा युक्तिवाद केला की, घटनेच्या आणीबाणीविषयक, तरतुदीनुसार आपण राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली असून, परिणामतः घटनेच्या इतर तरतुदीमध्ये हमी दिलेले नागरी अधिकार– जीवित व स्वातंत्र्य यांचे अधिकार, कायद्यासमोरील समानतेचा अधिकार, आणि हेबियस कॉर्पसचा अधिकार– स्थगित करता येतात. राजबंद्यांचा युक्तिवाद असा होता की, हे अधिकार इतके 'मूलभूत' आहेत की, 'कायद्याचे शासन' या संकल्पनेत त्यांची मुळे आहेत? आणि घटनेच्या कोणत्याही कार्यवाहीसंबंधीच्या तरतुदींनी ते स्थगित करता येत नाहीत.

२८ एप्रिलला सुप्रीम कोर्टाने चार विरुद्ध एकमताने शासनाचा युक्तिवाद मान्य केला. कायदेविषयक दोन निरुंद बाबींच्या आधारावर निर्णय झाला : राष्ट्रीय आणीबाणीच्या वेळी राजबंद्यांना हेबिअस कॉर्पसचा अर्ज करता येईल का? आणि त्यांना अर्ज करता आल्यास त्यांना अटक करण्यासाठी शासनाने दिलेल्या कारणांची कोर्टाला किती मर्यादेपर्यंत चिकित्सा करता येईल? हे ते दोन प्रश्न. श्रीमती इंदिरा गांधी यांनी नेमलेले प्रमुख न्यायमूर्ती ए. एन. रे यांनी बहुमतातील निकालपत्रांपैकी एक लिहिले होते. त्यांनी म्हटले, 'स्वातंत्र्य अनिबंध नसते, त्याला कायद्याची चौकट असते. (घटनेने) जर असाधारण अधिकार दिलेले असतील तर, आणीबाणी असाधारण आहे म्हणून ते दिलेले असतात.' राजबंदी किंवा न्यायालये यांना शासनाने अटकेची कारणे दिली पाहिजेत असे नाही, असे रे म्हणाले. 'प्रतिबंधक स्थानबद्धतेचे हुकूम ज्या माहितीवर, सामग्रीवर आधारलेले असतात ते कागदपत्र उघड केल्याने, सार्वजनिक सेवा व शासनव्यवस्था यांना धक्का बसेल अशा कागदपत्रांच्या वर्गात समाविष्ट होतात. एखाद्या स्थानबद्धताविषयक हुकुमांच्या फाईलमध्ये ज्यांची गुप्तता योग्य अशा शंकेपलीकडील आहे, अशा गुप्त वृत्तान्तांचा समावेश असणारच.'

सहमत व्यक्त करताना न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड म्हणाले की, हातचे काही मनात राखून आणीबाणीकडे पाहणे न्यायालयांना शक्य नाही. 'एखाद्या विशिष्ट राजकीय परिस्थितीबद्दल न्यायाधीश व ज्यूरी यांना आपले वैयक्तिक मत बनविता येईल, परंतु आणीबाणी घोषित करावी की नाही, हा उच्च शासकीय धोरणाचा भाग आहे आणि धोरणविषयक प्रश्नांचे न्यायालयात परीक्षण करणे अशक्य आहे.'

आपल्या सहमतात न्यायमूर्ती एम. एच. बेग यांनी शासन व मातापिता यांची तुलना केली. 'सर्वदूर पसरलेली अव्यवस्था व गोंधळ यांच्या धमक्या समोर असता शासनाचे घटनात्मक कर्तव्य नाकारता येणार नाही. आपण राहत असलेले घर जाळण्याची धमकी देणाऱ्या मुलांविरुद्ध मातापित्यांनासुद्धा प्रतिबंधक उपाययोजना करावी लागते.'

मतभेद व्यक्त करणारे एकुलते एक निकालपत्र न्यायमूर्ती एच. आर. खन्ना यांनी लिहिले होते. प्लेटो, मॅग्नाचार्टा व अमेरिकी स्वातंत्र्याचा जाहीरनामा यांच्या परंपरांचा उल्लेख करून त्यांनी लिहिले, 'कायद्याच्या अधिकारातील लोकशाही राज्यांच्या सर्वांत महत्त्वाच्या लक्षणांपैकी हेबिअस कॉर्पसचा हुकूम देण्याचा न्यायालयांचा अधिकार हे एक आहे. कायद्याच्या संमतीशिवाय कुणाचेही स्वातंत्र्य हरण केले जाणार नाही, हे तत्त्व ही घटनेची देणगी नव्हे. घटना अंमलात येण्यापूर्वी ते तत्त्व अस्तित्वात होते.' न्यायालयाचे संरक्षण नसेल तर, कोणीही लहरी किंवा दुर्बुद्धीचा पोलीस किंवा क्षुद्र अधिकारी कुणाही व्यक्तीला किंवा सबंध कुटुंबाला अटक करू शकेल आणि अनिश्चित काळपर्यंत तुरुंगात ठेवू शकेल, असे खन्नांनी दाखवून दिले. अशा अधिकाऱ्यांना सार्वजनिक अव्यवस्था किंवा राष्ट्रीय संरक्षणाला धोका यांचे भूत का होईना, निर्माण करण्याचीसुद्धा गरज पडणार नाही आणि कुठलाही कायदा किंवा न्यायालय यांना उत्तर देण्याची आवश्यकता त्यांना नसल्यामुळे ते क्रूर हुकुमशाही सत्ता गाजवू शकतील. खन्नांनी लिहिले, 'अशा गोष्टी प्रत्यक्षात येतात की नाही हा प्रश्न आमच्यापुढे नाही. जीवित व व्यक्तिस्वातंत्र्य यांचे अधिकार फक्त (घटनेतच) आहेत आणि राष्ट्रपतींनी (राष्ट्रीय आणीबाणी घोषित करणारा) वटहुकुम काढण्याच्या परिणामी आणीबाणीच्या काळामध्ये जीवित किंवा व्यक्तिस्वातंत्र्य यांचे हरण झाल्याविरुद्ध कुणालाही, कुठल्याही न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही, या भूमिकेचा स्वीकार करण्याचे उपरोक्त गोष्टी हे संभाव्य परिणाम आहेत एवढे सांगणे पुरेसे आहे.'


बहुमताच्या निकालाचा परिणाम मात्र असा होतो की, शासन सद्हेतूने काम करीत आहे असे गृहीत धरावे लागते. (मतभेद व्यक्त करणे ही अर्थातच अविचारी कृती होय. कारण अटक होण्याच्या भयाच्या छायेतच सर्व न्यायाधीश जगतात व काम करतात. मतभेद व्यक्त करणारे लोकसभा

सदस्य अटक झालेल्यांमध्ये प्रथम होते. या वस्तुस्थितीची त्यांना जाणीव आहेच.) परंतु शासनाचा हात पोचू शकणार नाही अशा ठिकाणी असणाऱ्या टीकाकारांना शासनाच्या सद्हेतूने काम करण्यावर विश्वास ठेवण्याचे कारण दिसत नाहीं. बर्मिंगहॅम येथे १० ऑगस्ट १९७५ रोजीं–राष्ट्रीय आणीबाणीच्या घोषणेनंतर सहा आठवड्यांनी आणि सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नाचा निकाल देण्याच्या साडेआठ महिने अगोदर– मेरी टायलर नावाच्या स्त्रीनें 'इंडियन वर्कर्स असोसिएशन'पुढे–ब्रिटनमध्ये राहणाऱ्या भारतीयांची ही संघटना आहे– 'भारतातील राजबंदी' या विषयावर भाषण दिले. ती ब्रिटिश नागरिक असून भारतात राहिलेली आहे आणि १९६७ मध्ये बंगालमध्ये निर्माण झालेल्या नक्षलवाद या माओवादी शेतकरी चळवळीचा सभासद असल्याचा आरोपावरून पकडण्यात आलेल्या एका भारतीयाशी तिचे लग्न झालेले आहे. तिच्या विवाहामुळे ती नक्षलवादी असल्याचा संशय घेण्यात आला आणि १९७० ते ७५ ही पाच वर्षे राजबंदी म्हणून भारतीय तुरुंगात– मुख्यतः बिहारमधील हजारीबाग सेंट्रल जेलमध्ये– तिला काढावी लागली. तिचे शब्द नंतर 'न्यू इंडिया बुलेटिन' या पत्रिकेत (ही पत्रिका उत्तर अमेरिकेतील इंडियन पीपल्स असोसिएशनचे कॅनडातील मार्क्सवादी प्रकाशन) प्रकाशित झाले. टायलर म्हणते की, प्रत्येकजण सतत विचारीत असतो की, 'भारतात राजबंदी किती आहेत?' आपल्याला याची जराही कल्पना नाही, आणि संख्येला तसे महत्त्व खरोखरी नाही, असे टायलर म्हणते. पण ती हजारीबाग तुरुंगात असताना तेथे शासनाने 'नक्षलवादी' असा शिक्का मारलेले तिच्यासारखे दोनशे ते तीनशे कैदी होते. त्यांतील अनेकजण खरोखरीच नक्षलवादी असल्याचे सर्वांना माहीत होते. परंतु काही त्या चळवळीचे सभासद असल्याचा नुसता संशय होता. शिवाय, इतर प्रकारचे राजबंदी येतच होते. कधी ते निदर्शक विद्यार्थी, वकील, बुद्धिजीवी असत. परंतु बहुतेक वेळा ते संपावरील रेल्वे कर्मचारी, संपावरील शिक्षक, किंवा संपावरील रुग्णालय कामगार असत. निदर्शन मोडून काढले गेले किंवा संप फोडला गेला की, लगेच अशा राजबंद्यांची मुक्तता होई. परंतु तिचा अंदाज असा आहे की, एका वेळी १९७४ मध्ये जयप्रकाश नारायण यांच्या राजकीय चळवळीच्या उच्चांकाचे वेळी– जेव्हा कामगार, दुकानदार, विद्यार्थी आणि स्थानिक शासकीय कर्मचारी शासनातील भ्रष्टाचार व व्यवस्थापनातील गोंधळ ह्याविरुद्ध संपावर गेले होते– हजारीबाग सेंट्रल जेलमध्ये सहा हजार राजबंदी होते. नक्षलवाद्यांना कधीही सोडायचे नाही, असा जवळजवळ नियमच होता, आणि तुरुंगातील सर्वांत वाईट वागणुकीसाठी त्यांनाच वेगळे काढले जाई. बहुतेकांना छोट्या, अंधाऱ्या कोठड्यात कोंबण्यात आले होते. काही वेळा एका कोठडीत पाच-पाचजण असत. कोठडीत पंखा नसेच. प्रकाश असे तो एका शेड नसलेल्या बल्बचा. रात्रभर तो जळतच असे. दाराच्या गजांमधून येईल तेवढाच वारा. सभ्य स्वच्छता सोयी, योग्य अन्न, योग्य कपडा आणि पिण्याचे पाणी, या गोष्टी नक्षलवाद्यांना नाकारण्यात आल्या होत्या. आणि काही वेळा त्यांना थोडासुद्धा व्यायाम करता येत नसे. (टायलरचा साक्षीपुरावा विशेष विश्वसनीय वाटतो याचे कारण असे की, इतरांच्या यातनाभोगाबद्दल तिने पुष्कळ सांगितले असले तरी स्वतःबद्दल ती जवळ जवळ काहीच सांगत नाही. आपण परदेशी नागरिक असल्यामुळे सुटलो एवढेच ती जाता जाता नोंदवते.) काही नक्षलवाद्यांना पुस्तके किंवा वृत्तपत्रे न देता एकांतवासात ठेवण्यात आले होते. राजकीय बंद्यांपैकी फार थोड्यांना बाहेरच्यांना भेटू दिले जाई. बाहेरच्या जगाशी त्यांचा संबंध येई तो फक्त सेन्सॉर केलेल्या व लिहिली गेल्यानंतर अनेक दिवसांनी पोचवण्यात येणाऱ्या पत्रांद्वारा! नक्षलवाद्यांना दंडाबेडी– लोखंडी सळ्या व कडी यांनी बनविलेले साधन– घातलेली असे. तिचे वजन सुमारे नऊ पौंड होते आणि त्याच्यामुळे कैद्यांना चालणे, बसणे, शौचास बसणे, झोपणे किंवा सामान्य तऱ्हेने मुत्री वापरणे जवळजवळ अशक्य होई. तुरुंगात प्रवेश करताक्षणी नक्षलवाद्यांवर दंडाबेडी चढविण्यात येई आणि नंतर ती त्यांच्या अंगावर दिवस असो की रात्र, हवा गरम असो की थंड, सतत असे. (वर्षाचा बहुतेक भाग बिहार उष्ण असतो.) दंडाबेडीमुळे कैद्यांची सालपटे सोलली जात आणि अनेक कैदी त्यामुळे लुळे-पांगळे किंवा वक्र शरीराचे होत. टायलर म्हणते, 'कोणत्याही एका वेळी किती कैदी दंडाबेडीत आहेत, हे मला वेगळेपणाने सांगता येणार नाही. बऱ्याचवेळा अन्नसत्याग्रह व इतर प्रकारे विरोध करून कैदी दंडाबेडी काढायला लावीत. पण कोणत्याही एका वेळी १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस दंडाबेडीशिवाय जात नसत. अत्यंत तकलुपी कारणानेही तुरुंगाधिकारी ती परत ठोकीत. माशांचा व डासांचा सुकाळ होता. अनेक कैद्यांना हिवताप, फिलेरिऑसिस, विषमज्वर, देवी यांची लागण होई. काहींना मारपीट केली जाई, त्यांचा छळ केला जाई. आणि क्वचित एखाद्याला गोळीही घातली जाई. तुरुंगाधिकाऱ्यांच्या लहरी शिक्षेविरुद्ध त्यांना काहीही संरक्षण नव्हते आणि जामीन किंवा दया किंवा वैद्यकीय इत्यादी कुठल्याच आधारावर सुटका होण्याची संधी नसे.

अर्थात त्या काळात आरोप ठेवणे व वॉरंट काढणे शासनाला कायद्याच्या दृष्टीने आवश्यक असे. राजबंद्याला हेबियस कॉर्पसचा अर्ज करण्याचा व न्यायालयात खटला चालविण्याची मागणी करण्याचा अधिकार होता. त्याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येई आणि क्वचित सुटकाही करून घेता येई. सुटकेनंतर जरी लगेच पुन्हा पकडण्यात आले– राजबंद्यांना बहुतेक वेळा लगेच अटक होईच– तरी निदान आपल्या कोठडीत त्याला आशेवर जगता येई.

भारतीय (तुरुंगातील) क्रौर्याच्या घटनांची एक यादी 'इंटरनॅशनल लीग फॉर ह्यूमन राइटस'ने गेल्या जूनमध्ये यूनोला त्यासंबंधी कृती करण्यासाठी सादर केली. त्या यादीत आज ताज्या आणीबाणीत पकडलेल्यांच्या चक्षुर्वैसत्यं वृत्तान्तावर आधारित प्रकारांची– कैद्यांना लोखंडी कांबी व रायफल दस्त्याने मारहाण करणे, मेणबत्तीने त्यांची कातडी जाळणे, मानेला कांब बांधून त्यांचा पाठीचा मणका ताणणे, उलटे टांगणे, शरीरातील छेदात विजेच्या जिवंत तारा खुपसणे, इ.– भर पडली आहे. अशा क्रूर घटना कितीही धक्कादायक असल्या तरी त्या भारतापुरत्या किंवा आपल्या काळापुरत्या मर्यादित आहेत, असे मुळीच नव्हे. परंतु अशा घटना भारतात यापूर्वी इंदिरा गांधींच्या पित्याच्या– किंवा नेहरूंच्या आध्यात्मिक पित्याच्या– महात्मा गांधींच्या– काळात घडलेल्या नव्हत्या. ○

## बारामती निवडणूक पुरवणी



# गाडगीळांना ' चले जाव ' म्हणणारा मतदारसंघ

रतनलाल भंडारी

बारामती लोकसभा मतदारसंघ हा काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने नेहमीच एक सुरक्षित मतदारसंघ मानण्यात आला आहे. त्यामुळेच हा मतदारसंघ या मतदारसंघाबाहेरील मान्यवर काँग्रेसपक्षीय मंडळींची सोय करण्याचा राखीव मतदारसंघ समजला जातो. आजवर या मतदारसंघात श्री. तुळशीदास जाधव, श्री. रघुनाथराव खाडीलकर, गुलाबराव जेधे, कै. केशवराव जेधे यांची सोय काँग्रेस पक्षाने केल्याचा इतिहास सर्वांना ज्ञात आहे.

मतदारसंघाची मोडतोड हाही या मतदारसंघाचा परंपरागत वारसा होऊन बसला आहे. १९७१ च्या निवडणुकीत या मतदारसंघाला सोलापूर जिल्ह्यातील करमाळा व माळशिरस या दोन तालुक्यांचे ठिगळ जोडून राज्यकर्त्या पक्षाने आपले यश निवडणुकीच्या आधीच सुरक्षित केलेले होते. काँग्रेसच्या एका मंत्र्याच्या भाषेतील हे ' भरण्यांचे ' दोन तालुके यावेळेस या मतदारसंघातून काढून टाकल्यामुळेही सीमारेषेवरील निर्णयाचे पारडे जनतेच्या बाजूने झुकण्यास मोलाची मदत होणार आहे.

श्री. विठ्ठलराव गाडगीळ यांची एक सर्वांत महत्त्वाची जमेची बाजू अशी की, इंदापूर, बारामती या दोन विधानसभा मतदारसंघातील आमदार आज मंत्रिमंडळात महत्त्वाच्या जागेवर ठाण मांडून बसले आहेत. वैयक्तिकरीत्या त्यांची आजवर असलेली या दोन तालुक्यांवरील पकड अद्यापही ढिली झालेली नाही. विशेषतः शासकीय योजनांच्या राबवणुकीमुळे या दोन्ही तालुक्यात शेतकऱ्यांची (आणि लाचारांची) एक फौज सदैव नांदत असते. 'कासा' संस्थेच्या गव्हातून तर या मंडळींनी लाचारांचे भरघोस पीक उभे केलेले आहे. ग्रामपंचायतीपासून ते थेट साखर कारखाने, मार्केट कमिट्यांमध्ये कोणती सोंगटी बसवली असता निवडणुकीत आपली बाजू बळकट राहील याचा विचार करून अनेक सोंगट्या पटावर मांडण्यात आल्या आहेत. विविध स्तरावरील भ्रष्टाचारांच्या कथाही त्यामुळे सर्वसामान्य माणसांच्या शिळोप्याच्या गप्पा झाल्या आहेत. हा भ्रष्टाचार इतका माजलेला आहे की, या मतदारसंघातील एका सर्वश्रेष्ठ (की सर्वेसर्वा) व्यक्तीची घरंदाज मंडळींकडून त्यांच्याकडे नोकरीसाठी, कामासाठी येणाऱ्या माणसांना 'हात हलवीत येत जाऊ नका' 'मोकळ्या हाताने कशाला आलात' अशी विचारणा केली गेल्याचे अनेकांचे अनुभवही सर्वसामान्यांच्या गाठीला आहेत.

या मतदारसंघाच्या आजच्या रचनेचा विचार केला तर शिरूर, हवेली, पुरंदर, बारामती, दौंड व इंदापूर या विधानसभा मतदारसंघांचा सामावेश यात होतो.

बॅ. विठ्ठलराव गाडगीळांच्या दृष्टीने सर्वांत अवघड भाग म्हणजे पुरंधरचा. याठिकाणी असलेले विरोधी पक्षाचे आमदार श्री. जाधवराव यांचे सामर्थ्य ७२ च्या निवडणुकीपेक्षा आज तरी जवळजवळ दुपटीने वाढलेले आहे. त्यातच विठ्ठलरावांच्या सांप्रतच्या प्रचारकांची जनमानसातील प्रतिमा डागाळलेली आहे. त्यांचे खाजगी आणि राजकीय चारित्र्यही फारसे स्पृहणीय नाही. त्यातच विठ्ठलरावांचे हे प्रचारक नेहमीच स्थानिक राजकारणात 'सरडयांचा' वारसा चालविणारे असल्यामुळे या मंडळींनी केलेला विठ्ठलरावांचा प्रचार हासुद्धा त्यांच्या या तालुक्यातील मतदानास उतरती कळा लावण्यास कारणीभूत ठरणार आहे. याउलट श्री. जाधवराव यांचे राजकीय व खाजगी चारित्र्य त्यांच्या पक्षाने गर्व करावा एवढ्या तोलामोलाचे आहे. आपल्या कार्यकर्त्यांचा प्रचंड विश्वास ही दादांच्या (जाधवरावांच्या) धवल चारित्र्याला उजळून टाकणारी प्रभा आहे. कोणत्याही आंदोलनात निव्वळ पुढाऱ्यांची भूमिका बजावून 'तुम लढो, हम है' असली भूमिका दादांनी कधी घेतली नाही. त्यांच्याबरोबर प्रचारासाठी फिरत असताना जाधवराव आले तर कोणत्याही गावात (अगदी विरोधकांच्याही) आपला 'दादा आला' हीच

आपुलकीची भावना दिसून येते. परवाच १,००० युवकांची जनता पक्षाचे उमेदवार संभाजीराव काकडे यांच्या प्रचारासाठी सायकल फेरी सासवडपासून मतदारसंघात काढावयाची ठरली तर, 'दादा' स्वत: सायकलस्वारांचे नेतृत्व करावयास सज्ज. पुढारी शब्दांचा पुढार त्यांनी कधी सोडलेला नाही. चळवळीतून तावून सुलाखून निघालेल्या आपल्या सहकाऱ्यांचा प्रचंड संच हेही दादांचे सामर्थ्य आहे. संभाजीरावांच्याविषयी या मतदारसंघातील अनेक गावातून 'नेहमीच मिळणारा आधार' म्हणून असलेली सर्वव्यापी भावनाही या तालुक्यात गाडगीळांना मारक ठरणार आहे. या लोकसभा मतदारसंघात सर्वांत अधिक मते जनता पक्षाच्या पेटीत टाकणारा हा मतदारसंघ ठरला तर मला आश्चर्य वाटणार नाही. या मतदारसंघात संभाजीरावांचा विजय झाला तर, मानाचा शिरपेच पुरंदरच्या मुकुटातच खोचला जाईल याबद्दल मला तीळमात्र शंका नाही. काही गावातून तर, हुकुमशाहीच्या मनसबदारांना येथे मतांचा खुराक मिळणार नाही अशा तऱ्हेचे फलक लावलेले दिसतात. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची आठवण करून देणारे हे फलक 'जनता लाटेचे' निदर्शक असले तरी, दादांच्यावरच्या श्रद्धेचीही ती पावती आहे. याच मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे प्रचारक '१६ वर्षांचा म्हातारा नि ८० वर्षांचा वर' 'मी विरोधकांना 'चले जाव' म्हणून सांगतो' असली संदर्भहीन विधाने करताना दिसतात. जाधवरावांनी मागेच त्यांना 'चले जाव' करायला लावले आहे हे ते का विसरतात कोण जाणे?

या मतदारसंघातील दुसरा महत्त्वाचा पण सर्वांत कमी मतदार असलेला संभाजीराव काकड्यांचा बालेकिल्ला म्हणजे शिरूर. या मतदारसंघातील अनेक गावांमधून संभाजीरावांच्या वैयक्तिक संबंधाचे जाळे खोलवर रुजलेले आहे. पाबळ, धामारी, मांडवगण, तळेगाव ढमढेरे, वडगाव, रासाई यांसारखी खात्रीने ८० टक्के मतदान करणारी गावे दोन डझनांच्या आसपास आहेत. त्यातच या तालुक्यात उघडपणे संभाजीरावांसाठी प्रचार करणारा व्यापाऱ्यांचा तांडाही मोठा आहे. घोडनदीला, युवकांनी संभाजीरावांचा विधान परिषदेच्या विश्वासघात करणाऱ्या मंडळींचा 'कोचा' करण्याचा विडाच उचलला आहे. समाजवादी पक्षाचे आणि जनसंघाचे या तालुक्यातील बळ पूर्वीही दुर्लक्ष करण्यासारखे नव्हते. बाबूराव दौंडकर आणि दत्तोबा ढमढेरे यांच्यासारखे खंदे प्रचारक संभाजीरावांना त्यामुळेच उपलब्ध झाले आहेत. या विभागातून दौरा करीत असताना मुलांना आय. टी. आय. ला प्रवेश मिळवून देण्यासाठी एका उच्चपदस्थ जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांनी २०० रु. पासून ५०० रुपयांपर्यंत पैसे घेतल्याच्या, मागितल्याच्या कथा गावोगाव माणसे निर्भयपणे सांगताना दिसतात. या तालुक्यातील प्रत्येक गावाने संभाजीरावांना जाहीरपणे पैसे दिले आहेत. धामारीच्या एका सभेत आमची मते मागणारी भाषणे झाल्यावर एका सद्गृहस्थाने 'तुम्ही फक्त मते का मागता?' असा सवाल करून एस्. एम्. नी नोटही मागितल्याची जाणीव करून दिली. एक गरीब म्हातारबुवा तर सभेला येताना ५ रु. च्या नोटेची पूजा करून घेऊन आले होते.

या तालुक्यातल्या सोसायट्या आणि ग्रामपंचायतीमध्ये भांडयांच्या उतरंडी रचलेल्या दिसतात, एका गावातल्या सरपंचाला मी सवाल केला. 'काय हो, लग्नबिग्न आहे म्हणून एवढी भांडी गोळा केली आहेत का?'

'न्हाय जी, गावाची इज्जत लुटून आणली हाय. जप्तीची भांडी.'

हे जप्ती प्रकरण या तालुक्यातच नव्हे तर, सर्वत्र शेतकऱ्यांच्या काळजाला जाऊन भिडले आहे. १६ टक्क्यांच्या, २८ टक्क्यांच्या चक्रवाढ व्याजाने वाढलेला कर्जाचा बोजा उतरता न आल्यामुळे आणीबाणीच्या नावाखाली रास्त सवलतीही न देता कर्जवसुलीसाठी माणसाच्या अब्रूचे धिडवडे काढणाऱ्या या जिवंत खुणा आज गावोगाव दिसतात. या सर्व जाहीर अब्रू-लिलावात लावलेल्या आणीबाणीच्या चिकटपट्ट्या आता उलगडू लागल्या आहेत. लोकसभेच्या उमेदवारांनी सतत केलेला आश्वासनभंगही येथल्या मतदाराने चांगलाच लक्षात ठेवला आहे. बेटांतल्या एका सभेत तर एक मतदार विचारीत होता, 'तुळशीराम जाधव कुठंय?'

'कशाला?' वक्ता.

'न्हाय. मार्गं आला व्हता तवा म्हणाला, 'तुमची पडकी घरं बगून रडू येतं.' धा वर्स शोधतोय त्येला. घराचं भिताड आणखी



श्री. संभाजीराव काकडे

खपलंय. अजून तर रडू येतं का बघतो.'

हवेली तालुक्यांतील सर्वांत जास्त मतदारांचा भरणा या लोकसभा निर्वाचन क्षेत्रात आहे. पुण्याच्या जवळचा मतदार असल्यामुळे जनतालाटेच्या स्पर्शाने सगळी माणसे स्वयंस्फूर्तीने कामाला लागलेली दिसतात. विशेषत: या विभातल्या शेतकऱ्यांना उपसा जलसिंचन योजनाच्या कर्जाचा जबरदस्त फटका बसला आहे. या योजना पूर्ण झालेल्या नाहीत. प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी पैसा बघितला नसताना त्या पैशांच्या कर्जापायी त्यांची घरदार लिलावाला निघाली आहेत. पूर्वी मी समाजवादी पक्षाचा जिल्हा चिटणीस असताना या योजनांद्वारे कॉंग्रेस पक्षाच्या आश्रित ठेकेदारांनी आपली तुंबडी कशी भरली, यांची आंकडेवारीनिशी माहिती दिली होती. तेव्हा आम्ही शासनानें या योजना शासकीय पैशाने करून शेतकऱ्यांकडून पाणीपट्टी घ्यावी, असे आग्रहाने प्रतिपादिले होते. त्यावेळी आम्ही दाखवलेले धोके आता आक्राळविक्राळ स्वरूपात मतदारांच्या वित्ताशी खेळताना दिसतात. आमच्या योजनेमुळे शेतकरी कर्जबाजारी होणार नव्हता आणि तांत्रिकदृष्टया अयोग्य योजनाची कार्यवाही थांबणार होती.

या तालुक्यातील मतदारांमध्ये कामगार वर्गाचाही भरणा नजरेत भरण्यासारखा मोठा आहे. बोनसच्या प्रश्नामुळे कामगारवर्ग शासनावर नाराज आहे. सी. डी. एस. च्या रूपाने पगारातून कापल्या जाणाऱ्या रकमेला तो 'इंदिरा टॅक्स' असे म्हणत असतो. थेऊरच्या साखर कारखान्याने जाहीर केलेला २० टक्क्यांचा बोनस आश्वासन देऊनही कामगारांना नाकारण्यात आला आहे.

दहशतीचे आणि आणीबाणीचे चटके येथल्या अनेक जणांनी स्वत: अनुभवले आहेत. त्यातलाच हा एक उरुळीकांचन हा आजवरचा कॉंग्रेस पक्षाचा अढळ गड. श्री. मणिभाई देसाईंच्या सर्वोदयी प्रकृतीला पचेल एवढेच येथे विरोधकांना स्थान. अगदी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही सभांना प्रतिबंध. पण यावेळेस अनेक अडथळ्यांना ओलांडून 'बाजार सभा' झाली. हजारभर माणसे जमली होती.

या गावात मधुकर महादेव फुलवरे हे छायाचित्रणाचा व्यवसाय करतात. त्यांनी १६-१०-७६ रोजी एका निर्वासित व्यापाऱ्याच्या सांगण्यावरून एका केबिनवजा दुकानाचे फोटो घेतले. नंतर फ्रोटो का काढले म्हणून गावातल्या कॉंग्रेसी ठेकेदारांनी त्यांना शिवीगाळ केली. पोलिसांकरवी फोटो घेण्याच्या कृत्याबद्दल बेडया ठोकून

**बारामती लोकसभा मतदार संघ.**
**मतदार–विभागणी**

| | |
|---|---|
| हवेली | १, १८, १३९ |
| शिरूर | ८६, ०४४ |
| दौंड | १, ०९, ३९४ |
| इंदापूर | १, ०७, ६७७ |
| बारामती | ९९, ८२२ |
| पुरंधर | १, ०७, ९८५ |
| एकूण | ६, २९, ०६१ |

त्यांची धिंड काढली. आणीबाणी! कॉंग्रेसवाल्यांची मर्जी.

पिंपरी-चिंचवडच्या नगरपालिकेतील भ्रष्टाचारांच्या जाहीर कथांनीही संभाजीरावांचे या तालुक्यातील पारडे जड केले आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे माणसे निर्भयपणे, मुक्तपणे आपल्या विचारांना मोकळी वाट करून देत आहेत.

बारामती तालुक्यातील काकडे-पवार वाद हा आता नेहमीचा झाला आहे. परंतु संभाजीरावांची जन्मभूमी म्हणून ते येथेही आघाडीवरच राहाणार आहेत. आणीबाणीच्या पूर्वी झालेल्या सोमेश्वर साखर कारखान्याच्या निवडणुकीत आमदार शरद पवारांच्या गटाला भुईसपाट केल्यामुळेही त्यांची या तालुक्यातली प्रतिष्ठा उजळ आहे. इतर काकडे मंडळींपेक्षा संभाजीरावांबद्दल–पोराच्या कर्तृत्वाबद्दल–या तालुक्याला भारी कौतुक आहे. सणसर कारखान्याच्या निवडणुकीतही विरोधी गटाला भागमभाग करावी लागल्यामुळे पवार गटाला संभाजीरावांच्या कर्तृत्वाचा इंगा माहीत आहे. बागाईतदार मतदार हा नेहमीच आर्थिक स्वास्थ्यामुळे बांधिलकीची बंधने फारशी मानणारा नाही.

जिराईत भाग हे आमदार शरद पवारांचे राखीव कुरण होते. त्या भागातील अनेक विरोधी पक्षीय कार्यकर्त्यांची अडवणूक करून कॉंग्रेसच्या गोठयात त्यांना बांधण्यात शरद पवारांना मर्दुमकीचे लक्षण वाटत आले आहे. लोणीभापकरच्या बाबासाहेब भापकरांनाही अशाच अडवणुकीने युवक कॉंग्रेसच्या 'तीन दिनका सुलतान' कारभारात गोवण्यात आले आहे. अनेक पाझर तलाव कासाच्या मदतीने उभारले असल्यामुळे नामदारांची प्रतिमा उज्ज्वल असली तरी आश्वासनभंगाच्या प्रयोगामुळे व दडपणामुळे त्यांच्या तावयात नसलेली मंडळी आज त्यांचे स्थान दाखवून देण्याची संधी साधण्यासाठी आतुर आहेत. त्यातच काकडयांची नातेवाईक मंडळीही आपल्या पोरासाठी कंबर कसून तयार आहेत. जप्त्या आणि कुटुंबनियोजनाची सक्ती या शेतकऱ्यांच्या वेदना आहेत.

या तालुक्यात तरडोली गावी ऐकलेली ही वास्तवता. या गावाच्या सीमेवर एक प्रचंड पाझर तलाव बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण फायदा लोणीभापकर या गावाला मिळतो. तलाव बांधण्यापूर्वी ज्यांच्या जमिनी या पाझर तलावात गेल्या त्यांना काही एकर जमिनी तलावाखाली देऊ असे आश्वासन देवीच्या देवळात उभे राहून जिल्हा परिषदेच्या बारवकरांनी दिले होते. पाझर तलाव झाला नि कॉंग्रेसवाल्या मंडळींनी आपल्या यादीतून तरडोलीखाली लाल रेघ ओढली. येथील केशव सोपान गाडे यांची अठरा एकर जमीन पाण्याखाली गेली. ना पैसा देण्यात आला ना पर्यायी जमीन. आज बिचारे आपल्या कर्माला दोष देत आमदार-सदस्य यांच्या नावाने बोटे मोडीत आहेत.

संभाजीरावांना आवडो ना आवडो जातीचे वजनही त्यांच्या पारडयात मतदार टाकणार आहेत. नाही तरी जातीने या देशाची भूमीच मुळी विखारासारखी पोसलेली आहे. त्यातच हा सामना शरद पवार विरुद्ध संभाजीराव असा नसल्यामुळे आपला प्रतिनिधी लोकसभेत पाठविण्याची जिद्द तालुक्यातील लहान-थोरांनी धरलेली दिसते. परंपरेने कॉंग्रेसच्या विरोधात राहाणारा जिराईत भाग आता पुनश्च इतिहास घडवली.

दौंड तालुक्यात दौंड शहर सोडले तर कोठेही काँग्रेसचे वर्चस्व नाही. भीमेच्या दोन्ही तीरांवरून जर हवेलीतून प्रवासाला सुरुवात केली तर संभाजीरावांचे पात्र दुथडी भरलेले आहे. कदाचित मंत्रिमहाशयांची अनामत रक्कमही जप्त होईल, असा भ्रम व्हावा एवढी ही गावे अट्टीने कामाला लागली आहेत.

या तालुक्याच्या आमदाराबद्दल कमालीचा असंतोष आहे. त्यांचा निवडून आल्यानंतर जनतेशी फारसा संपर्कही राहिलेला नाही. परवा दौऱ्यात असताना कुरेगाव-पडवीला 'अजून तुमची निवडणूक लांब आहे. मध्येच कशाला आलात?' असा सवाल मतदारांनी त्यांना विचारला. या जिराईत भागातील मतदारांचा प्रतिनिधी साखर कारखान्याचा प्रमोटर-डायरेक्टर म्हणून न घेतल्याबद्दलही ऊसधारक शेतकरी नाराज आहे.

शेतीमालाच्या विक्रीनंतर आकारण्यात येणाऱ्या विविध पट्ट्या, अल्पबचत सक्ती याही गोष्टींमुळे शेतकरी चिडला आहे. अल्पबचतीत ६ टक्क्यांनी रक्कम गुंतवायची आणि सोसायटीच्या १६ टक्के व्याजकर्ज यापायी जप्त्यांना सामोरे जावयाचे असा विचित्र प्रकार सुरू आहे. दौंडच्या पूर्वभागात मात्र विठ्ठलरावांची नाजूक तब्बेत थोडीशी हुशारी वाटावी इतपत बरी आहे. पण जनता हवा वेगाने पसरते आहे. त्यासाठी दिवेकर, राजारामबुवा ताकवणे, धनसिंग परदेशी इत्यादी मंडळी सातत्याने फिरत आहेत.

इंदापूरच्या बाबतीत संभाजीरावांचे वैयक्तिक संबंध एवढाच आधार नाही. उलट श्री. शंकरराव पाटलांचे पारंपरिक विरोधक दरवेळेस ४० टक्के मत मिळवितात, हीही या तालुक्याची परंपरा आहे. आवटेसारखा हाडाचा कार्यकर्ता भाकरी बांधून भाकरी आणि स्वातंत्र्याचा अखंड घोष करतो आहे. तुरुंगवासाच्या छळाच्या कथा सोज्वळ भाषेत सांगत हिंडतो आहे. आमदारांवर नाराज असलेला घरातला गटही लोकसभेच्या निवडणुकीशी आपला काय संबंध? म्हणून सुस्तावला आहे. या तालुक्यातील जनसंघाचे कार्य मोठ्या गावापुरते मर्यादित असले तरी बांधीव आहे. वालचंदनगरला दुर्गाबाई भागवत यांची झालेली १५,००० लोकांची सभा तापलेल्या वातावरणाचे निदर्शक का मानू नये?

वरील विवेचनावरून सांप्रतच्या महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांबद्दल समाज उदासीन आहे, असा अर्थ नव्हे. उलट या प्रश्नांबद्दल त्याची मते आता ठाम आहेत. १९७१ च्या खाडिलकरांच्या निवडणुकीच्या वेळेस आढळणारा ठामपणा आता 'जनतेच्या' बाजूने उभा आहे. आज संपूर्ण मतदारसंघात एकही गाव १०० टक्के काँग्रेसच्या पाठीमागे असल्याचे दृश्य जवळजवळ नाहीच. विठ्ठलराव गाडगीळांना सुरक्षित मतदारसंघ दिल्याचा भ्रम वितळत चालला असून, माझ्या दृष्टीने (एका प्रचारकांच्याच) संभाजीराव काकडे हे विठ्ठलरावांना १९६७ प्रमाणे पुनश्च राज्यसभेचा आधार घ्यावयास लावतील, याची खात्री वाटते. पण......

पण फार मोठा आहे. पैशाची बरसात नुकतीच सुरू झाली आहे. प्रत्येक तालुक्यात सहा सहा जीप्स आणि चार चार ट्रक्स् देण्यात आल्या आहेत. प्रत्येक तालुका काँग्रेस कमिटीस (म्हणजे मुखंडांना) आजवर देण्यात आलेले पन्नास हजार रुपये संपून गेले आहेत. आता विठ्ठलरावांसाठी वेगाने मदत येते आहे. दिल्लीलाही त्याची जाणीव झाली आहे. त्यामुळे नेहमीप्रमाणे 'चमत्कार' घडणार नाही, याची शाश्वती वाटत नाही. पण ......

इथेही पण आहेच. हा सारा मतदारसंघच जिराईत मतदारसंघ आहे. या मातीत नेहमीच विरोधकांचे बीज रुजत नाही. आज ते रुजले आहे, पोसले आहे, आणि जिराईत पिके जेव्हा बहरून येतात तेव्हा ती माती प्रचंड प्रसवा होते. काँग्रेसचे गारुड ग्रामीण भागातील मतदाराला आता फसवू शकत नाही. त्याला फक्त आता झुगारावयाच्या आहेत लाचारीच्या, हांजीहांजीच्या साखळ्या. □

# दि. ५ फेब्रुवारी ते ५ मार्च

## निवडणूक दैनंदिनी । चंद्रकांत दीक्षित

कुस्तीचा हंगामा भरावा अन् त्यात हलगी कडकड वाजत राहावी; ती ऐकताच पैलवान उगाचच आपले अंग फुगवितात तर नसणाऱ्या पैलवानांच्या अंगातही वेगळंच वारं संचारतं. तोही उगाचच आपणही कुणालाही पाडतो, अशा आवेशात हंगाम्याचे फडाकडे बघतो. अशी अवस्था पंतप्रधानांनी लोकसभा निवडणुका जाहीर करताच माझी झाली.

माझी अवस्था अशी का झाली, याची कारणेही आहेत. एक तर मी स्वतःच एका राजकीय पक्षाचा सक्रीय कार्यकर्ता म्हणून वावरतो व दुसरे असे की, पत्रकार म्हणून मी जरी परिचित असलो तरी विरोधी पक्षीयांचा पत्रकार असा माझ्यावर शिक्का बसलेला. तशात या निवडणुका जाहीर झाल्या. त्या झाल्या झाल्याच पहिला अहेर मिळाला तो घरचा. 'आता काय महिनाभर काँग्रेसच्या नावाने शिमगा ना?' मी सुखावलो. खरं तर घरच्यांनी असे बोलू नये. आम्ही पती-पत्नी एकमेकांचे, राजकीय विरोधक असलो-म्हणजे होतो-म्हणून काय झाले? परंतु वर निवडणुकांचा हंगाम व त्याचा अनुभव पदरी उभयतांच्या होता. म्हणूनच पत्नीने एक अहेर दिला. म्हणून जरा समजावले की, आता आपण एक जसे संसारात तसेच राजकारणातही. आणि मग पुढचा मार्ग म्हणजेच प्रचारकार्याच्या भ्रमंतीचा मार्ग मोकळा झाला. कभी भी जाना और कभी भी घरमे आना.

अर्थात घरच्या अहेरानंतर पत्रकारांचा अहेर जबरदस्त होता. 'कायरे भडव्या, आता कुणाची चमचेगिरी करणार?' त्यांना माहीत होतं की, मी जनसंघ-संघटना काँग्रेसच्या विरोधात काहे म्हणून

कुत्सित हेतूने ही विचारणा. परंतु आम्ही मनावर न घेता सांगितले, 'आदेश येईल त्याचे प्रचारार्थ जाणार.' आणि पत्रकारबंधू फक्कन हसले. कारण आदेश माझ्या पक्षात कधीच नव्हता. (तो कुणाच्या होता हे लक्षात यावे) म्हणजे 'तू जनता पक्षातील खरकटी उचलणार तर' या प्रश्नाला होय असे सांगून 'आदेशासाठी' काकाकुवा मॅन्शन गाठले, ते माझी सोय कोठे या विचारणेसाठी.

काकाकुवा मॅन्शनचा परिसर गजबजलेला होता. अनेक दिवसांनी मुक्तपणे कार्यकर्ते बाचचीत करीत होते. काही तर तब्बल दीड वर्षाने भेटत होते. हालहवाल विचारणा झाली. काहीशा गप्पा झाल्या, तोच काकाकुवाचे सूत्रधार लालजी कुलकर्णींनी हाक मारली आणि म्हटले, 'तुमचे डेरे शहरात नकोत.' का हा प्रश्न नव्हता. एक तर आमची जीभ गावरान ठेव्याची. दुसरे सदाशिवपेठेत ती चालली नसती; म्हणून दिला ग्रामीण भाग व तोही बारामती मतदारसंघ.

बारामती मतदारसंघ दिला खरा, पण आपला उमेदवार कोण याचा पत्ता नव्हता. बराच वेळ डोके खाजविले. उमेदवार मनातच शोधले. लक्षात येईना म्हणून स्वतःच उभे राहावे असा प्रश्नही मनास केला. स्वतःशीच हसलो. तेवढ्यात पुरंधरचे आमदार काकाकुवात घुसले आणि म्हणाले, 'बरं झालं भेट झाली, तुम्ही भेटलात. आपल्या भागात 'लाला' ची उमेदवारी जाहीर होतेय.' मी मस्तपैकी उडालोच. लाला [ संभाजीराव काकडे यांचे खाजगीतील नाव ] अन् बारामतीसाठी. 'जय बजरंग बली–तोड दुष्मनकी नली !–म्हटलं, दादा, (आमदार सुरसिंहराव जोत्याजीराव जाधवराव ऊर्फ दादा-साहेब जाधवराव) द्या टाळी. जमलं तुमचं आमचं.'

मतदारसंघाची टेहळणी सुरू झाली. पुरंधर, दौंड, बारामती, शिरूर, इंदापूर व हवेलीचा भाग या मतदारसंघात होता. म्हटलं, चला, एकेक गडावर गडकरी भक्कम आहेत. चहापान झालं अन् आता फड गार्जवायचा अशा थाटात जिने उतरलो. रस्त्यावर आलो तो एल्. आय्. बीने सॅल्युट ठोकला. काय बातमी ? म्हटले, चला, इलेक्शन सुरू झाली.

## दि. ५ फेब्रुवारी

लालांचा निरोप आला होता की, शिरूरकडे जायचंय. कशाला हा प्रश्नच नव्हता. निघालो. दुपारचे दोन वाजता तळेगाव (ढमढेरे) या गावात पोहोचलो. प्रथमच उमेदवार म्हणून जाहीर झाल्यावर संभाजीराव काकडे या भागात शिरले होते. पहिलीच बैठक. जुने सहकारी रायकुमार गुजर यांचेकडे (आता कॉंग्रेसप्रविष्ट) चहापान झाले. रायाभाऊंनी तालुक्यातील परिस्थिती सांगितली. बरेच जण जमा झाले होते. अशा याच गावात विविध गटांतील चार बैठका झाल्या. प्रत्येक ठिकाणी चहापान व २५–३० माणसे (कार्यकर्ते) हजर. सर्वांनीच–लाला, तुम्ही उभे राहिलात याचाच आनंद जास्त, असे सांगून तुमच्यामुळे कामास हुरूप येईल, असे सांगितले. बरे वाटले. घड्याळ पाहिले. सायंकाळचे सात वाजले होते. घोडनदीला जायचे होते. तेथे लालांचे हस्ते बाबूराव दौंडकरांचा सत्कार होता.

बाबूराव दौंडकर पूर्वी जनसंघाचे खंदे कार्यकर्ते. भले मोठे केशरी पागोटे, नेहरू शर्ट, करवती काठाचे धोतर नेसणारा कार्यकर्ता तब्बल अठरा महिन्यांचे कारावासानंतर बाहेर आलेला. त्यांच्या सत्कारानिमित्ताने सभा होणार होती. (खरं तर लालांच्या प्रचारसभेचा नारळ पुरंधराला फुटणार होता, पण इथेच फुटला.) आम्ही घोडनदीला पोहोचलो. एका मित्राकडे बसलो. लाईट गेला होता. (तसा तो मधूनमधून जातोच.) कंदिलाच्या प्रकाशात बाबूराव व त्यांचे सहकारी उपस्थित होतेच. लाला आले, लाला आले, असा पुकारा झाला आणि एकदम मोहोळ उठावे व मधमाशा गूं–गूं करत उडाव्यात अशा पद्धतीने शे-दोनशे तरुण जमले. अचानक त्यांनी घोषणा केली, "जनता पक्ष झिंदाबाद." क्षणभर शहारलो.

सभा होती पाचकंदिल चौकात. खुर्च्या टाकलेल्या. थंडी हुडहुडी भरण्याइतपत. आम्ही बसलो होतो त्या घरापासून सभास्थानापर्यंत मिरवणूक निघाली. लाईटस् आल्याने एकदम चकचकाट झाला, तसतशी गर्दी दिसू लागली. घोषणांचा गदारोळ वाढला. कुणी कुणाचं ऐकेना. बोलात बोल राहिना. कुणी म्हणावं, जनता पक्ष, तर साद यावी झिंदाबादऐवजी विजयी होवो. कुणी म्हणावे, संभाजीराव काकडे यांना ... तर साद यावी झिंदाबाद. मुक्त स्वातंत्र्याचा तो हुंकार ऐकून मन गलबलले. कोण कुणाचे ऐकेना. केवळ आम्ही मुक्त झालो हीच ऊर्मी सगळ्यात दाटलेली. मी त्यात मागे नको म्हणून सगळ्याच गगनभेदी आवाजात आपलाही आवाज उठवीत होतो. खळाळता प्रवाह कसा आटोपावा समजेना. मिरवणुकीत चक्क नाच झाला. सारी बंधने जणू दूर झाली. आम्ही आमचे–संभाजीराव आमचे असा एक घोष झाला व हाच घोष घोषणा ठरली.

सभास्थानी आलो. बसा–बसून घ्याचा नेहमीचा पुकारा झाला. गर्दी मस्त जमली होती. केशरी फेट्यांचे पथक गर्दीच्या बरोबर मध्ये बसले होते तर पडसावलीला स्त्रिया होत्या. दोन हजारांची गर्दी असावी. हलगी म्हणजे सूर्यकांत चोथडा गरजला, 'शिरूरच्या बंधु–भगिनींनो' आणि त्याने चक्क भाषण ठोकले. लालांचे हस्ते बाबूराव दौंडकर यांचा श्रीफल व पुष्पहार घालून सत्कार केला. त्यावेळी जी टाळी झाली तिचे स्मरण जन्मात विसरणार नाही. सर्वांच्या भावना हेलावल्या होत्या. तशा वातावरणात बाबूरावांनी सांगितलं, 'प्रथम तुम्ही बोला.'

खरं तर बोलण्याऐवजी बाबूरावांचे ऐकायला मी आलो होतो. (आम्ही कधीच एकमेकांविषयी प्रेम केलं नव्हतं, पण आज आम्ही एकत्र झालो होतो.) पण तुम्ही प्रथम बोला हा आग्रह मोडवेना. उभा राहिलो. फार दिवसांनी सभेत उभा राहिलो होतो. आणीबाणी जाहीर झाली आणि पुण्यातील बुधवारचौकाच्या पल्याडल्या भागात कसबा, भवानी, नाना पेठेत ज्या सभा घेतल्या त्यानंतर प्रथमच म्हणजे तब्बल १८ महिन्यांचे मौन मोडत होते. सभा दाटली होती. गारवा जाणवण्याइतपत होताच. सुरुवात केली, "परमप्रिय बंधू बाबूरावजी"– पुढचे वाक्य उच्चारण्यास दोन मिनिटे गेली. नुसता टाळ्यांचा कडकडाट चालला होता. एक तर बाबूरावजींना बंधू म्हटले होते, कारण जनसंघातर्फे विधानसभेला ते ७२ साली उभे होते तेव्हा पडावेत म्हणून भाषणे ठोकली होती. आता बाबूराव एक हिरो झाले होते आणि आम्ही एकाच ध्वजाखाली आलो होतो. सुरुवात जरी बिचकत झाली तरी भाषण संपल्यावर घड्याळ पाहिले तेव्हा तासभर बोलल्याची जाणीव झाली. मीच आश्चर्यात पडलो होतो की, मी एवढा वेळ बोलू शकतो तर !



गावं म्हणत होती....
संभाजीराव,
द्या उडवून दणका...

सभा तर झालीच, पण ती आम्ही जिंकली होती. बाबूरावांनी मस्त गावरान किश्श्यात सरकारचे ढोंग, अन्याय वेशीला टांगले होते. मस्तपैकी हकीकती सांगितल्या आणि आवाहन केले की, "तुरुंगातील आमच्या बांधवांना आम्ही विसरलो नाही. त्यांची मुक्तता आम्ही सत्तेवर येताच करू. म्हणून सत्तेवर येण्यासाठी 'जाऊनी सांगा घरोघरी – नांगरधारी शेतकरी'" अशा कडाडून टाळ्या पडल्या म्हणता– जणू ताशे, हलग्या, ढोलक्या एकदम कडाडल्या.

आम्ही पुण्याकडे परतत होतो. विचार होता, फक्त बारामती मतदारसंघातील ही इलेक्शन कोणत्याही परिस्थितीत जिंकू कशी याचा. त्यासाठी यंत्रणा उभारावयाची होती. कार्यकर्ते कामाला लावावयाचे होते.

### दि. ६ ते ९ फेब्रुवारी

रविवार व सोमवार लालांच्या भेटीसाठी अनेक थरांतील मंडळी आली, त्यांचे अभिनंदन झाले व 'आम्ही आपणासाठी काय करू?' अशी अनेकांनी विचारणा केली.

त्यांचे पत्ते घेतले. कामाच्या बैठकीसाठी श्री. मोहन धारिया, एस्. एम्. जोशी यांचेकडे जाणे-येणे झाले. काही कामांच्या रूपरेषा ठरविल्या गेल्या. त्यांची टाचणे तयार झाली.

मंगळवार–बुधवार पुरंधर तालुक्यात घुसलो. दादा जाधवरावांनी वेशीतच म्हणजे घाटातच स्वागत केले. तेथे घाटाच्या दगडादगडांवर रंगरंगोटी झाली होती. 'जनता पक्ष आपला पक्ष. आपली मते जनता पक्षाला. संभाजीराव काकडे यांनाच निवडून द्या. खूण नांगरधारी शेतकरी.' मनात म्हटले ' वाऽऽ दादा आपने तो बहोत कमाल किया.

दादा पेट्रोलपंपावर (सासवडच्या) भेटले. त्यांच्यासमवेत गोपाळराव गायकवाड व बबनराव मांढरे, (दोघेही १८ महिन्यांनी मुक्त झालेले आणि दोघांच्याही डोक्यावर तांबड्या टोप्या) रावसाहेब पवार, अरविंद देशमुख, बाळासाहेब जगताप आदी प्रमुख कार्यकर्ते होते. गप्पांसाठी बसलो. चर्चा सुरू झाली. दादांनी प्रथमच हिशेब दिला. 'लालासाहेब (हे एकमेकांचे सोईरपण. दादा ऐतिहासिक पिलाजीराव जाधवराव घराण्याचे वारस तर, संभाजीराव हेही ऐतिहासिक घराण्यातील वारस. त्यांचा किताब राजे दिनकरराव) आपल्याला अनुकूल परिस्थिती आहे. आमच्या तालुक्यापुरते बोलतो. देऊ उडवून दणका. काही चिंता नाही.' कार्यकर्त्यांना वाटले सभाच सुरू. त्यांनी 'देऊ उडवून दणका.' म्हणताच सटदिशी टाळ्या झाणल्या.

आमचे दादा आमदार आहेत. दादांनी १९७२ च्या विधानसभेसाठी कॉंग्रेसचा सत्पाल १३ हजार मतांनी धुतला होता, याचा पुरेपूर अभिमान कार्यकर्त्यांत जाणवत होता. तेवढ्यात आपण एखादा गड पादाक्रांत करीत आहोत अशा थाटात बाळासाहेब मुळिक आले. (त्यांनी कोल्हापूर परिसर गाठला होता. त्यांना मुरळी पाठवून बोलावून घेतले होते. मुरळी जाताच आहे त्या कपड्यात मुळीक आले होते.) रामराम झाला. गप्पात रंग भरला. दौऱ्याची प्राथमिक आखणी झाली. तालुका कार्यकर्त्यांचा मेळावा ठरला. गावात गेलो. भेटीगाठी झाल्या. अगदी समाचाराला जाऊन आलो.

आम्ही परतत होतो तेव्हा संभाजीराव आणि दादांच्या झिंदाबादने सासवड दणाणले होते. हॉटेलातली माणसे खाता–खाता बाहेर येऊन आमचा हंगामा पाहत होती अन् हाताने रामराम करीत होती. आम्ही तुमच्या पाठीशी आहोतचा दिलासा देत होती. आम्ही खूष होतो. दादांची नजर थोडी मस्तीने रंगली होती. काहीसा अभिमान होता. काहीशी नम्रता होती. ती नजर म्हणत होती, 'राजे संभाजी' तुम्हीच सांगा, एवढे आशीर्वाद पाठीशी आहेत. चिंता कसली?'

### दि. १०, ११

गुरुवार-शुक्रवारी लालाकडे माणसांचा गदा झाला. लालाचा स्वभाव खरं तर आम्हाला जीवघेणा ठरतो. कामाची वाटणी म्हणून मतदारसंघ कार्यालयाची जबाबदारी श्री. प्रभाकर गुप्ते यांचेकडे सोपविलेली. परंतु सगळ्यांनाच संभाजीरावांशी बोलायचे. बोला. आम्ही बघत राहतो. संभाजीराव या खोलीतून त्या खोलीत गेले तर भेटेच्छू त्यांचे मागे. धड कुणाचेच म्हणणे समजत नाही. नुसता बाजार. वैतागलो होतो.

अशा वैतागातच एका तालुक्यातील दोघे आले. गप्पा अर्थातच इलेक्शनच्या होत्या. म्हटलं, तुमच्याकडे कसं काय? तर त्यांनी ठणकावून सांगितले, अगदी पॅक. चिंताच नको.

म्हणजे किती मते पडतील?

अहो, मते काय घेऊन बसलात. तडक ७० हजारांचा लीड कॉंग्रेसला देऊ.

त्यांच्या सद्भावना समजल्या तरीही त्यांची चीड आली. म्हणून विचारले, तालुक्यात गावे किती? मतदार किती?

प्रश्नाची उत्तरे असतील आणि असावीत अशी आली म्हणून तडकलो. विचारले, 'तुम्हाला ही प्राथमिक माहिती नाही अन् खुशाल गप्पा लीडच्या.'

मनोमनी तेही खजील झाले. कारण त्यांचा तालुक्याशी संबंध नव्हता. विशिष्ट क्षेत्रांतच त्यांचे कार्य होते. तेव्हा गप्पा करतानाच कामासाठी त्यांच्याशी बोललो. त्यांचेही समाधान झाले. मलाही बरे वाटले.

निवडणूक जिंकणे एवढी का सोपी बाब आहे? संघटित कार्यकर्त्यांचा संच नसेल, त्यात एकजिनसीपणा नसेल व प्रामुख्याने समाजात कार्यकर्त्यांचा जम नसेल तर, कसली निवडणूक लढविता? प्रतिस्पर्धी एक मातब्बर मंत्री आहे. त्यांचेजवळ साधनें आहेत, पैसा आहे. शिवाय माणूसबळ आहे. तेव्हा या पार्श्वभूमीवर आपल्याला निवडणूक लढविणे म्हणजे सोपे नाही याची जाणीव सर्वांनीच ठेवली पाहिजे, याबाबतचा उपदेश झाला.

## दिनांक १२

आज पुणे शहरातील जनता पक्ष उमेदवार श्री. मोहन धारिया यांनी बारामती मतदारसंघात तुफानी धावता दौरा केला. या दौऱ्यात यवत–वळवण–दौंड, वालचंदनगर, बारामती, इंदापूर या ठिकाणी जाहीर सभा घेतल्या व जनता पक्षाची भूमिका जाहीरपणे समजावून दिली.

या सभेस फार मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. धारिया गर्दी पाहून खुलले होते. झकास वाक्प्रवाह सुरू झाला होता. हुकूमशाही की लोकशाही, संजयवाद–सरंजामशाही आदी मुद्दे अत्यंत प्रवाहीपणाने ते ठासून मांडत होते, तर खुद्द उमेदवार काकडे यांनी जीवनावश्यक वस्तूंतील झालेली भाववाढ, शेतकऱ्यांची जप्ती प्रकरणे, जिल्ह्यातील लिफ्ट्स प्रकरणे सफाईने हाताळली. बारामतीला तर गर्दीचा उच्चांक झाला. सुमारे पंधरा हजारांवर स्त्री-पुरुष नागरिक उपस्थित असावेत. रात्रीचा (खरं तर उत्तररात्रीचा वेळ) समय. धारिया बोलायलाच ११ वा उभे राहिले. आणीबाणी, कॉंग्रेसचे प्रवाह, अंतर्भेद, तुरुंगवास, जनता पक्ष आदी मुद्द्यांवर सव्वा दोनतास धारिया बोलले. सभा सव्वा वाजता संपली. परंतु हूं कां चूं नाही. पब्लिक मोठ्या उमेदीने बसले होते.

भिगवण या गावची कथा. पंधरा मिनिटांत कार्यक्रम उरकायचा होता. परंतु धारिया–काकडे आले समजताच जनसमुदायाला उधाण आले. या छोट्याशा गावात तीन-चार हजार नागरिक भर उन्हात गप्पगारपणे सभा ऐकत होते. मग धारियांना जनतेचे मन मोडवेना. तासभर व्याख्यान झाले. लोकांनी उत्स्फूर्त घोषणा दिल्या—'गली गलीमे शोर है-कॉंग्रेसवाले चोर है–' 'बच्चा बच्चा बोलता है–संभाजी काकडे सच्चा है'

अशा सभा, अशा वातावरणाने निवडणूक चढू लागली होती. सोबत दादा जाधवरावांची पुरंधर तोफ होतीच. एका दिवसाचा दौरा दोन दिवसांचा झाला. वेळापत्रक आगेमागे सरकावले गेले.

## दि. १४

आज लो. टिळकांचे पुतळ्यास वंदन करून धारिया–काकडे–मुकुंदराव पाटील यांनी उमेदवारीचे अर्ज भरले.

## दि. १५

आज माझ्या व्यवसायालाच बंदी आली. सामूहिक कल्याणासाठी केलेला प्रयत्न माझ्यावर घेकला होता. मला माझ्या वृत्तपत्रातून कमी केले होते. तब्बल दहा महिने चाललेला लढा माझ्यापुरता संपुष्टात आला. अर्थात अपेक्षित तेच घडल्याने वाईट मात्र वाटले नाही. वकीलमित्राकडे गेलो. त्यांना कागदपत्रे दिली. सरळ गाडीत बसलो. आणि गाडीने कूच केले. आम्ही आता शिरूरला पोहोचलो होतो. तालुका मेळावा पार पडला. अस्थायी समिती स्थापन झाली. साऱ्या जुन्या कार्यकर्त्यांनी तरुणांचे हातांत सूत्रे दिली होती. स्वत: प्रचारार्थ मोकळे झाले होते.

मेळावा संपली आणि काही खेड्यांना भेटी दिल्या. भरदुपारी आमळे, उरळी, न्हावरे गांवी ५० पासून १५० पर्यंत मतदारांच्या सभा झाल्या. उरळी गावचा प्रसंग तर हृदयस्पर्शी होता. या गावातील श्री. मुबारकभाई गेली २५ वर्षे समाजवादी पक्षात निष्ठेने काम करतात. घरी पुतणीचा साखरपुडा म्हणून दुपारच्या कार्यकर्ता–मेळाव्याला येऊ न शकलेला. परंतु आमची गाडी गेली. झटकन त्यांनी माणसे जमविली. एवढेसे खेडे पण मोजले तर समजले १४२ माणसे हजर. एका वाड्यात सावलीने सभा झाली. मुबारकभाईने प्रास्ताविक केले. प्रास्ताविक करतानाच तो हमसाहमसी रडला कारण त्याने म्हटले होते की, आपल्या तालुक्यातून बाबूराव दौंडकर तेवढे एकटेच १८ महिने जेलमध्ये गेले. आम्ही बाहेरच राहिलो. याची आम्हाला लाज वाटते. त्याला समजावता समजावता पुरेवाट झाली. आणि ती छोटी मतदारांची सभा जिंकली गेली.

मुबारकने ग्वाही दिली. आम्ही आणि बाबूराव आतापर्यंत विरोधात होतो. आता हातात हात घातल्याने सहस्र हत्तीचे बळ आले आहे. मतभेद मिटले. वाद संपला. एकच ध्येय, कॉंग्रेसचा पाडाव करून सामान्य शेतकरी–कामगारांचे राज्य आणणे.

ही भेट जणू जिवाशिवाची होती.

समस्त गावकऱ्यांनी आम्हाला निरोप दिला व काळजीचे कारण नाही संभाजीरावांना, असा दिलासा दिला.

आमची गाडी बाबूरावांनी मांडवगणकडे वळवली. तिथे म्हणे ८–१० गावचे लोक एकत्र आले होते. आम्ही गेलो तो समजले; जत्रेतील हंगामा आज होता. अरेरे, कुस्तीचा फड बंद ठेवून का काकडे यांचा प्रचार करावयाचा! फुकट वेळ गेला.

रात्री सरपंच किसनराव फराटे यांचेकडे गावातील प्रमुख मंडळींची बैठक झाली व स्पेशल सभा इथे आणण्याचा बेत पक्का झाला.

## दि. १६

महाशिवरात्र. आज शिरूर मतदारसंघात मोहन धारिया यांच्या प्रचारसभा ठेवल्या होत्या. त्यांचे स्वागत शिरूरच्या सीमेवरील कोरेगाव (भीमा) या गावी बरोबर ५ वाजता करणार होतो. तत्पूर्वी काही कामे उरकून घेण्याचा बेत होता.

सकाळी गर्दीच्या कोंडाळ्यातून संभाजीरावांना बाहेर काढले. पोस्टर्स, परिचयपत्रिकांचे गठ्ठे, कापडी फलक व झेंडे गाडीत टाकले आणि पुढे निघालो. आज मित्राने दिलेली (जी रोज वापरत होतो) गाडी नव्हती म्हणून टॅक्सी केली. मोठ्या थाटात शिक्रापूरपर्यंत आलो आणि ड्रायव्हरने कच्चकन गाडी उभी केली. बॉनेट उघडले तो पुलीचा पंखा तुटला होता.

आता तो पंखा बसविल्याखेरीज इलाज नव्हता म्हणून शिक्रापूरच्या पेट्रोलपंपावर झाडाखाली पथारी टाकली.

टॅक्सी-चालकाला पुण्याला पाठविले होते. तेवढ्यात पेट्रोल भरण्या,

साठी दोन मोटारसायकली आल्या. एकात दोन सीटस् होत्या तर एकीत एकच. म्हटले त्यांना विनंती करावी.

'भाईसाहेब, टॅक्सी खराब हो गई है. आप पूनातक हमारे ड्रायव्हरको ले जावगे?'

'आप कोन है!'

'हम जनता पार्टी के है।'

'तो हम–तुम एक है. जरूर ले जाएंगे. अभी बीस मिनटमे पहूंचा दूंगा.'

'शुक्रिया. लेकिन आप?'

'भाई, हम है पंजाबके. वहा भी जनता पार्टीने धूम मचाई है ना! और हम उनके समर्थक है!'

चला, दुधात साखर पडावी, असे झाले. आमचे ड्रायव्हर पुण्याला गेले. इकडे झाडाखाली १५–२० शेतकऱ्यांशी लालांच्या गप्पा चालल्या होत्या.

आमच्या गावाला उभ्या उभ्या येऊन जा बरं का, म्हंजी बरं. एकडाव समद्यांनी पगितलां उमेदवार म्हंजी बरं अस्तंय.

येऊ ना. लालांनी आश्वासन दिल्यावर तो पागोटेवाला उठला.

दत्तोबा ढमढेऱ्यांनी लगेच एका जवानाकडे बोट दाखविले व काकडेंना म्हटले, 'आता बघा याला सरकारने पाच एकर जमीन दिली. पण अशी जमीन दिली तिथे ओवासुद्धा पिकणार नाही.'

'म्हाईतर काय हो. त्यापरीस रोजगार रोज दिला तरी भागले अस्तं.' फकीरभाई.

(म्हणजे सभेत मांडण्यासाठी हाही मुद्दा मिळाला.)

एकाने संभाजीरावजवळ सरकून म्हटले – 'साहेब (हेही टोपणनाव) आता काही काळजी नाही. आपून तर काँग्रेसचे पण तुम्ही आपलेच ना?' (म्हणजे गाडगीळ ब्राह्मण?)

मला खुदकन हसू आले. म्हटले फोड करून घ्यावी म्हणून म्हणालो, 'असे कसे जातीवर जाता हो.' तर उत्तर आले, 'आमच्या टकुऱ्यावर खाडिलकर, जाधव, काकासाहेब गाडगीळ अन् आताबी परत गाडगीळच. तेव्हा आपला उमेदवार धरावा.'

गप्पागोष्टींवरून बरीच माहिती गोळा होत होती. शेवटी दोन वाजले. एका मित्राची गाडी रस्त्यावरून चालली होती. त्याने आम्हाला पाहिले. गाडी वळविली आणि तीच गाडी संभाजीराव खेडचापाडचांतून फिरवू लागले. लवकरच पुण्याहून सामान आले आणि आमची गाडीही वेगाने काही गावे घेऊ लागली. आम्ही सेक्रेट आपले वडू (बु॥) घेतले व शार्प ५ ला कोरेगाव गाठले तर संभाजीरावांची गावकऱ्यांनी मिरवणूक काढली होती. ढोल–लेझिमच्या पथकाने मोठा गदारोळ उठविला होता. गुलालाने वातावरण भरले होते. मिरवणूक संपता संपता मोहन धारिया आले. सभा चालू झाली. संभाजीराव व जाधवराव आधी बोलले. त्यांना घेऊन मी पुढे तळेगाव (ढमढेरे) येथे गेलो. तेथे सभा सुरू करावयाची होती. प्रचंड मिरवणूक गावात निघाली. ५०० तरुण हसत होते–नाचत होते. मिरवणूक संपण्यास बराच वेळ गेला. तेवढ्यात धारियाही आले.

हु. विष्णू पिंगळे चौकात प्रचंड सभा सुरू झाली. सोयीसाठी काकडे–जाधवराव प्रथम बोलले.

काकडे बोलावयास उभे राहिले. भाषणाचे ओघात म्हणाले, महागाई वाढली. सभेतून आवाज आला, वाढू द्या. बेकारी वाढली. परत आवाज–वाढू द्या.

इच्यायला! लक्षात येईना, काय प्रकार तो म्हणून समोर मॉबमध्ये नजर टाकली. एक कडक खादीधारी काकडे यांना अडवीत होता. त्याचे म्हणणे प्रथम हु. पिंगळ्यांचे स्मरण करा व मग सभा सुरू करा. (स्थानिक कार्यकर्त्यांनी प्रास्ताविकात स्थानमाहात्म्य सांगणे आवश्यक का ते पटले.) काकडे यांनी सावरले व लगेच म्हटले की, 'देशाचे स्वातंत्र्यासाठी पिंगळेसारख्या अनेकांनी बलिदान केले. त्यांचे स्मरण ठेवून आपण......' बस्स! तोच खादीधारी ताडकन् उठला, जाकिटात हात घातला आणि काकडे–धारिया झिंदाबाद करीत, १० रु. ची नोट नाचवीत स्टेजपाशी आला अन् काकडे, तुम्हाला देणगी, म्हणून नोट टाकून निघूनही गेला.

चला. जनता पक्षाला निधी तर मिळाला.

सभा रंगत होती. काकडे–जाधवराव यांना घेऊन आम्ही शिरूर गाठले. शिरूर तर साडेसातपासूनच सज्ज होते. पाचकंदिल चौकात गर्दी. आम्हाला ९ वाजले होते. जाधवराव तडक माईककडे गेले आणि कडकड लाह्या फुटाव्यात असे वक्तव्य सुरू झाले.

मी हळूच गाडी घेऊन आजोळी देवदैठणाला (ता. श्रीगोंदा) गेलो. आईच्या स्मृतीस वंदन केले. श्रीसंत निंबराज महाराजांना वंदन केले. मामा–मामी यांचे आशीर्वाद घेतले. आग्रह खूप झाला परंतु केवळ १५ मिनिटांत आजोळ सोडले. शिवरात्रीच्या कीर्तनाला प्रारंभ झाला होता. स्मृतीला अडवीत शिरूर १० वा. गाठले. तोपर्यंत धारिया आले होते.

तुफानी सभा. आक्रमक वक्तव्याने सारेच थक्क झाले. सभेस नाही म्हटले तरी ८–१० हजार लोक असावेत. अगदी शेजारच्या जिल्ह्यातील म्हणजे नगरकडील पारनेर व श्रीगोंदा तालुक्यातून लोक आलेले. तालुक्यातलेही लोक होतेच.

घटना दुरुस्ती, खुर्चीचे राजकारण सारे–सारे धारियांनी अशा पद्धतीने मांडले की म्हणत राहावे यंव रे यंव!

लोकांनी या सभेस भरघोस निधी दिला. तसेच मतांचे आश्वासन. बरे वाटले. रात्री ११॥ वा. घोडनदीचे दैवत रामलिंग मंदिरात जावे लागते. कुणाच्याच भावना दुखविता येत नाहीत.

मंदिरात आमच्या दत्तोबांचे दोन मित्र भेटले. दोघेही प्रमुख असाम्या. दत्तोबांनी त्यांना हटकले. प्रारंभी दोघेही काहीही बोलेनात. शेवटी ते म्हणाले, देवळाचे दारात बोललो तर शपथ होईल–बाहेर बोलू. बाहेर आलो तर त्यातील एकाने काकडे यांना सांगितले, आमचा निर्णय तुमच्या बाजूने ठरला आहे. उगाच बभ्रा करू नका.

नंतर समजले, तो पंचायत समितीचा सदस्य होता व मनापासून काकडे यांच्या बाजूने उभा राहिला होता.

म्हणजे वातावरण तयार होत होते.

**भाई, हम है पंजाबके, वहां भी जनता पार्टीने धूम मचाई है.......**

## दि. १७–१८

दोन दिवस पुरंधर तालुक्यातील जेवढी म्हणून गावे घेता येतील, तेवढी घेण्यासाठी वेळ दिला होता. त्याप्रमाणे दादांनी मोर्चेबंदी केली होती.

गावोगावी उत्स्फूर्त स्वागत, मिरवणुका, सभा, गप्पाबैठकी चालल्या. वनपुरी, सिंगापूर, वाघापूर, राजेवाडी, आमळे, टेकवडी, माळशिरस, पिसर्वे, मावडी सुपे, वाळुंज अशी पुरंधरच्या पूर्वभागातली गावे घेतली.

वक्त्यांची फौजच फौज आमच्याकडे. खुद्द दादाच तासभर हाणीत म्हणून आम्ही आलटूनपालटून बोलत असू. रावसाहेब पवार तर पंतप्रधानांना चक्क अरे–तुरे करे. त्याची चीड एक गाव एक पाणवठा या बाबा आढावांच्या मोहिमेचा विचका शासकीय पातळीवरून झाल्यामुळे होती. तो बेधडक म्हणे...ही इंदिरा गांधी आणि तिचा मुलगा संजय......

'आमळे' गाव गुरुवर्य बाबूराव जगताप यांचे. गावागावात दादासाहेब जाधवराव यांनाच मते द्या, अशा ७२ साली रंगविलेल्या भिंती दिसत होत्या. जाधवरावांचे चुलते दादांना म्हणाले, अरे कशाला आपल्या भागात श्रम घेता? आपली मते का काँग्रेसला जाणार आहेत?

म्हातारा मोठा जिद्दीचा, ताठ. संभाजीरावांना आशीर्वाद देताना म्हणाला, 'मर्दासारखी लढाई मार, आम्ही आहोत मोर्चे बांधायला.'

हे चुलते सरदार घराण्यातील आहेत. गावात त्यांचे शब्दाला विलक्षण मान आहे. त्यांचा शब्द उभा गाव आपला मानतो.

माळशिरसला तर मांडव टाकला होता. प्रथम वाटले, लग्नबिग्न आहे काय? परंतु आमची वरात वाजतगाजत त्या मांडवात गेली तेव्हा कळले की, आमच्या सभेची ही तयारी होती. ठोकली भाषणे. गाव मोठे बेरकी म्हणून सांगितले होते. म्हणून भीत-भीतच हल्ला चढविला. पण श्रोते ढिम्म. मग झकास चुटका सांगितला. आणि मंडळींनी आपल्या आढ्या सोडल्या आणि मग काय, हशा–टाळ्याच.

आमची भाषणे आवरली. दादांकडे माईक दिला आणि आमची पहिली तुकडी एका वस्तीवर जेवणासाठी गेली. १५–२० मंडळी आम्ही, पण अक्कांनी आम्हाला पिठले–भाकरी घालून तृप्त केले.

अक्का एक दादांची उत्कृष्ट कार्यकर्ती. सर्व स्त्रीवर्गाला मतदानाला आणणार आणि अचूक मतदान करून घेणार. दादांविषयी आणि समाजवादी पक्षाविषयी भलताच जिव्हाळा. पुण्यात आल्या तर आवर्जून एखादी राजकीय सभा असली तर ऐकणार.

हिवरे, चांबळी, बोरगाव आदी आटोपले. पहाटे ३॥ वा. पुण्यात.

## दि. १९

खुद्द संभाजीराव काकडे यांचे गाव पांगारे. सारं गाव शृंगारले होते. एकही भिंत, एकही कोपरा मोकळा नव्हता. गावकरी वेशीवर ११ पासून वाट पाहात होते. आम्ही ३ वाजता पोहोचलो. भर उन्हात बैलगाडीच्या रथातून मिरवणूक झाली आणि गावच्या पटांगणात सभा. सर्वात जास्त स्त्रिया या सभेला उपस्थित होत्या. घरचाच माणूस उभा. सगळ्याच संभाजीरावांचा अलाबला घेत होत्या. कुणी मुलगा म्हणून, कुणी धाकटा दीर, तर कुणी थोरला, कुणी सासर म्हणत तर पोर–पोरी चक्क त्यांच्या पाया पडत होत्या. मोठे विलक्षण दृश्य होते ते. विश्वास असावा तर असा, प्रेम असावे तर असे.

आमच्या रेकॉर्डर्स वाजल्या. आभारासाठी गावचे महिपतराव काकडे उठले. त्यांनी जे भाषण केले, ते अस्सल भाषणाचा नमुना होता. त्यांनी सांगितले, महात्मा गांधींनी रामराज्य करावयाचे ठरविले तर इंदिरा गांधींनी ग्रामराज्य केले. ( मनात मी हबकलो, कारण ग्रामराज्याला महिपतराव विरोधी काय? ) ग्रामराज्य कसे तर बाजारात ५ रु. घेऊन जा, गोडेतेल येते किती? ५०० ग्रॅम. २ रु. न्या, साखर येती किती? ३०० ग्रॅम. रुपया मोडा, ज्वारी येते किती तर ७५० ग्रॅम. असे हे ग्रॅमराज्य–ग्रामराज्य. आम्हीच सणाणून टाळ्या हाणल्या, खळाळून हसलो. महिपतरावांनी आणखी आम्हाला धोबीपिछाड केले. ते म्हणाले, "हे राज्य कसे–नाही गरिबाची अब्रू जागेवर राहिली, नाही कामगार ताठ राहिला. इथं कुणी कुणाला आई म्हणेना. सगळीकडेच बाई, बाई. अशी लाचारी. तेव्हा गांवकऱ्यांनो, ही शेवटचीच संधी इलेक्शनची. नाहीतर विलक्षण होईल," टाळ्यांचा सडा पडला. मनमुराद हसलो.

महिपतरावांनी भरसभेत सांगितले, 'आपल्या घरातले लेकरू उभे आहे. गावातले वाद गावापुरते. आपले १३०० मतदान आहे. १०० इकडेतिकडे चुकतील. पण १२०० मते लालाला पडतील' आणि स्वतःच टाळ्या वाजवीत खाली बसले.

सभेतच बादलीभर लिंबाचे सरबत आले होते. खुशाल तांब्याभरून प्या. पण मोह आवरला. पण बादलीभर चहाही आला होता, ( आता घ्या! )

दणादणा गावे घेतली गेली.

या दौऱ्यात खास जाणवत होते ते दादा जाधवरावांचे संघटन. किती कार्यकर्ते, किती आपुलकी. कोणत्याही खेड्यात जा. दादा फारा दिसांनी आलात! प्रकृती उतरली बरं का! असे उद्गार अगदी भगिनीवर्ग सुद्धा काढताना आढळला.

दादा व त्यांचे कार्यकर्ते पुढचे गाव येईपर्यंत त्या गावची माहिती देत. कोण प्रमुख आहेत, कुणाकडे किती मतांचे गठ्ठे आहेत, पक्षाचे कार्य किती आहे, याची अगदी बित्तंबातमी पुरवीत. त्याचा फायदा साहजिकच होत असे.

परिंचे गाव मोठे. इथे तर पूर्वी समाजवाद्यांचा बालेकिल्ला. येथूनच (सरदार) बाळासाहेब मुळिक जिल्हा परिषदेवर निवडून गेलेले. आजही पंचायत ताब्यात आहे. सायंकाळी पोहोचलो. बाळासाहेबांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने–चल रे गणा, अरे शिद्ध, मंडळी जमव, ए पांडू, घरी चहा ठेवायला सांग बरे! असे म्हणत म्हणत केवळ दहा मिनिटांत दोन–अडीचशे मंडळी जमा केली. स्वतःही प्रेक्षकात बसले. चक्क बिडी फुंकत. जणू आपण त्या गावचेच नाही असे. पण गावकरी मोठे खट. त्यांनी म्हटलेच, "बाळासाहेब, तुम्ही वाईच बोलाच." बाळासाहेब त्यातून खट. त्यांनी म्हटले, आता नको. मी रोज तुम्हाला पिळतोच की? आज पाव्हण्यांचे होऊ द्या. ( म्हणजे आमची भाषणे रटाळ तर होत नव्हती! )

गावकऱ्यांनी संभाजीराव गावात आले म्हणून आनंद प्रदर्शित केला व परत एक टोलेजंग सभा ठोकण्याची विनंती केली. (गावाला सभा

ऐकायचा नादच असावा) मतांची येथे चिंताच नाही. गाव मुळातच काँग्रेसविरोधी ना!

परिंचे मागे पडले. वाल्हेही गेले. वाल्ह्याचे बाबूराव पाटील पवार हे माजी आमदार. जुने शेतकऱ्यांचे कार्यकर्ते. त्यांनी जनता पक्षाला पाठिंबा दिलेला होताच. जेजुरीला कार्यालयाचे उद्घाटन होते. रात्री पोहोचलो तर संबळ-ताशा हजरच. रीतसर सभा व दादांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन. पुढे मोरगावची सभा हुकल्यातच जमा होती कारण साडेसातला होळी. म्हणून दोन तुकड्या करून एक तुकडी पुढे गेली तरी नऊ वाजलेच.

पार पांगापांग झाली होती. आसपासच्या वाड्यावरून मंडळी आली होती. वाट पाहून निघून गेली होती. वाईट वाटले. प्रवासात टायमिंग पाळता येत नाही त्यामुळे असे होते, परंतु जी ५-१० मंडळी भेटली, त्यांनी म्हटले, देवदर्शन घ्या, आम्ही सभेचे बघतो.

अष्टविनायकातला हा गणपती. प्रसन्न वातावरण बाहेर पिंपळाची सळसळ, आत घंटेचा नादमधूर आवाज, मूर्तिपूजक नसलो तरी मन प्रसन्न झाले. तीर्थ घेतले, देवाचे दारात घटकाभर बसलो. देवळातून बाहेर आलो तो ५-५० मंडळी पटांगणात बसलेली आढळली. म्हणजे सभा जमलीय म्हणा की. या गावात ब्राह्मण समाज इतर गावापेक्षा मोठा तर व्यापारी वर्गही मोठा. तितक्यात जनता पक्ष झिंदाबादने गाव जागे झाले. आम्ही चाट. आमच्या गाडीतील दादांच्या कार्यकर्त्यांची ट्रिक होती. त्यांनीच मिरवणूक काढून काकडे झिंदाबादच्या घोषणा लावल्या होत्या. मग मात्र भराभर माणसे जमली. असेल तीनशेचा मॉब. स्त्रियाही ४०-५० आलेल्या. दादा व संभाजीराव जेजुरीहून येईपर्यंत वेळ काढावयाचा होता. म्हणून उभा राहिलो. प्रथमच सांगितले आपल्या गावात तिसऱ्या वेळी येताना आनंद वाटतो. एकदा पाहुणा म्हणून, एकदा आपल्या गावात जी दुर्दैवी घटना झाली (गेल्या वर्षी लग्नाच्या वऱ्हाडाचा ट्रक रेल्वेने उडविला होता, त्यात ६० वऱ्हाडी मृत्यू पावले होते ते बव्हंशी इथले) त्या वेळी पत्रकार या नात्याने आणि आता धर्माचे दारात अधर्म होत आहे, त्याची जाणीव बांधवांना द्यावी म्हणून. आणि मंडळी प्रास्ताविकात बोलली, मग आजचा संग्राम, त्यात आमचे काम खारीचे, अशा गप्पा टाकत टाकत सभा रंगतच गेली. काकडे यांची मोटर आली म्हणून घड्याळ पाहिले सव्वातास बोलत होतो हे समजले. अरे बापरे, फार झाले. आमची सभा संपली त्यावेळी एक वाजला होता. म्हणजे तब्बल सव्वातीन तास सभा चालली होती म्हणाना.

सभेनंतर दोन स्त्रियांनी एका बाजूला बोलावले व म्हटले, 'तुम्ही अमुक गावचे जहागिरदार काय?" म्हणजे या स्त्रिया सोयऱ्यांच्या होत्या हे उघडच होते. आगत्य अधिक वाढले. त्यांनी हळूच सांगितले या गावात काकडे बारा आणे तरी मते घेतील आणि सलगीने म्हणाल्या, तुमचे भाषण फारच छान झाले हो (कसचं कसचं करीत त्यांना नमस्कार करून चक्क मॉबात पळालो)

**दि. २०**

आज अचानक रतनलाल भंडारी आला. तो काकडे यांच्या प्रचारासाठी रजा घेऊन आला होता. रतनलाल म्हणजे तब्बल २० वर्षांपूर्वी पुण्यात बोल्शेविक पार्टीचे काम करणारा, कुठल्याही अन्यायावर तडक तुटून पडणारा, पुढे समाजवादी पक्षात आला. जिल्हा 'सेक्रेटरी' झाला. झेड. पी.ला उभा राहीला. त्याला आमच्याच लोकांनी पाडले होते. पुढे मास्तर झाला. आतातर सुपे सोडून तडक दाभोळ येथील एका प्रशालेवर मुख्याध्यापक आहे.

आजचा दिवस खेड मतदारसंघात होता. खेड-मंचर, घोडेगाव येथे मुकुंदराव पाटील यांच्या प्रचारार्थ सभा झाल्या.

खेडला गंमतच झाली. स्टेजसमोर २०-२५ माणसे. सभा चालू. उन्हाचा ताप टाळण्यासाठी हॉटेलच्या सावलीत मात्र तुफानी गर्दी. काकडे काँग्रेसने वचनपूर्तीचे राजकारण मोडले असे म्हणताच, काँग्रेसचे त्यांचे प्रतिस्पर्धी बॅ. विठ्ठलराव गाडगीळ नेमके त्याचवेळी आले. काँग्रेसच्या कार्यालयाचे उद्घाटन होते. बॅरिस्टर पटांगणातून कार्यालयाकडे जात असताना संभाजीरावांनी त्यांना व्यासपीठावरून नमस्कार केला. परंतु तो घेण्याच्या मनःस्थितीत काँग्रेसवाले नव्हते. ते तडक पुढे गेले. त्यांचे बरोबर ५-२५ मंडळी काँग्रेस झिंदाबाद करीत निघाली. आणि हजारोंनी जनता जनता पक्षाची सभा ऐकत राहिली. सभेत वचनपूर्तीचे राजकारण मोडले म्हणावयास आणि गाडगीळ यावयास एकच गाठ पडल्याने प्रचंड उपहासार्थ हशा पिकला (हा अनुभव क्वचितच येतो.) लोक आज बदलत आहेत त्यांना बदल हवा आहे, असे दिसते.

सायंकाळी सासवडला काकडे प्रचाराची मोहन धारिया यांची सभा होती. म्हणून दुपारी ४ वा. खेडकडून निघालो. वाटेत कासारवाडी येथे धिःकार दिना निमित्ताने उपोषण चालले होते म्हणून थांबलो. साडेपाचच्या सुमारास काकडे स्वतः उपोषण सोडावयास आले म्हणून कार्यकर्त्यांना कोण हर्ष! घोषणा-झिंदाबादने ४००-५०० माणसे गोळा झाली. येथील धावडे मास्तर अद्याप तुरुंगात होते (नुकतेच सुटले) म्हणून सरकारविषयीची चीड ओतप्रोत होती. आकाशपाताळ एक करू पण काँग्रेसला पराभूत करू अशी भावना सर्वत्र होती.

ही सभा होईस्तोवर मी चुलतभावाकडे चहाला जाऊन आलो. सहज भावजईला विचारले मताचे काय? तर तिने सांगितले आमच्या वाड्यातली १०० टक्के मत काकडेंना पडतील. मीच प्रचारक म्हणून बरे वाटण्यासाठी बोलली की काय म्हणून शंका आली. तेव्हा भांडी घासणाऱ्या बाई घरात आल्याचे पाहून त्यांना सहज म्हटले. तेव्हा त्या बाईनी रोखठोक सांगितले धावडे मास्तर आमची कामे करी, परंतु पोलिसांनी त्यांना गुंड म्हणून नेले. आणि वीस महिने झाले सोडले नाही. अशा पोलिसांचे तळपट होवो.

म्हणजे हातच्या काकणाला आरशाची जरूरीच नव्हती.

आम्हाला सासवड गाठावयाचे होते म्हणून तडक निघालो. सात वाजले होते. म. गांधी, चौक पटांगणात ही गर्दी उसळली होती.

**आकाशपाताळ एक करू पण काँग्रेसला पाडू ही भावना सर्वत्र होती.**

सभेत कलापथक चालले होते. आम्ही भरगर्दीतून व्यासपीठाकडे घालत होतो. काकडेंना पाहताच घोषणांना सुरवात झाली–संभाजीराव काकडे झिंदाबाद–मोहन धारिया झिंदाबाद, हमसे जो टकराएगा–मिट्टीमे मिल जाएगा, आमचा पक्ष जनता पक्ष आमची मते जनता पक्षाला.

या घोषणातच काकडेंनी व्यासपीठ गाठले. व्यासपीठावर गिरीश बापट व अप्पासाहेब पुरंदरे हे दोघे पॅरोलवर आलेले कार्यकर्ते बसले होते. मागे भगवे कपडे व माळा घातलेले एक साधूही दिसले. ( हेच सुप्रसिद्ध नेते अ‍ॅड. दादासाहेब गोळे ) धारिया, दादा, माधवराव व बरीच वकील मंडळी होती. समोर तर माणूस माईना. कलापथक संपताच दादा जाधवराव उठले. त्यांनी केवळ दहा मिनिटातच आटोपले. व परत एकदा सभा घेण्याचे व सविस्तर बोलण्याचे आश्वासन दिले. ( म्हणजे आणखी एकदा एक बौद्धिक ) संभाजीराव काकडे यांनी महागाई, सुशिक्षितांची बेकारी, अपुऱ्या लिफ्ट्स आदी लोकल प्रश्नांवर तुफानी हल्ला केला. गोडेतेलाचे भाव का वाढले यावर बोलताना ते सहज बोलून गेले की, आमची तुरुंगातली मंडळी काय तेल पीत होती का म्हणून तुटवडा आला' आणि सभा खो–खो हसली आणि ठेक्यात टाळ्याही दिल्या.

मोहन धारिया यांनी सव्वा तास व्यासंगपूर्ण व्याख्यान दिले. सभा मंत्रमुग्ध झाली होती. व्यासपीठावरील दोघे स्थानबद्ध होते. त्यांचेकडे हात करून त्यांनी सभेला प्रश्न केला. 'यांचा काय गुन्हा आहे म्हणून आजही ही माणसे विनाचौकशी तुरुंगात आहेत ? अशी राजवट-हुकूमशाही–तुम्हाला मंजूर आहे ?'

सभेने एकमुखाने घोषणा दिली 'तानाशाहीचा धिक्कार असो. लोकशाहीसाठी जनता पक्ष.' ८–१० हजार नागरिक, त्यात दोन हजार स्त्रिया असाव्यात. सभा म्हणजे सभा झाली. पुरंधर तालुक्यातल्या बऱ्याच खेड्यातून माणसे आली होती.

पुण्याकडे येताना धारियांची मुलाखत 'करंट'च्या प्रतिनिधीने घेतली.

पुण्यात आल्यावर पुढल्या दिवसाचा दौरा प्रभाकर गुप्तेनी हातात दिला.

## दि. २१

शिरूर तालुक्यातली १५ गावे घेतली गेली. रात्री मांडवगण (कराटा) येथे मोठी सभा ठेवली होती. आसपासच्या म्हणजे दौंडकडील गावची व श्रीगोंद्यांकडील (नगर) गावची अशी ८–१० गावची मंडळी सभेला होती. सजविलेल्या बैलगाडीतून मिरवणूक आली. सभा सुरू झाली. रतनलाल भंडारीने चांगलेच ठोकले. हे न्यायाचे राज्य गेले अन् बाईचे मर्जीचे राज्य आले या वाक्यावर त्याने पहिली टाळी घेतली. आणि तो टाळ्या घेत घेत चक्क इंदिराजी व संजय वर घसरला. तो म्हणाला 'आपल्या देशात ही दोनच माणसे शहाणी नाहीत तर इतरही खूप आहेत. तेव्हा प्रश्न आहे तो हा, की याच दोन शहाण्यांनी राज्य करावयाचे की इतरांनी ? ' आणि फक्ककन पब्लिक हसले.

बाबूराव दौंडकर, दत्तू अण्णा ढमढरे, थोरात गुरुजी (आर. पी. आय्). आणि काही गावची मंडळी बोलली. अन् एकदम लाइट गेला. चांदणे चांगले होते. लाईट येईपर्यंत प्रल्हादसिंग परदेशींना बोलण्यास सांगितले. (कारण लाईट ५–१० मिनिटात येईल असे सांगितले गेले होते.) परदेशी बोलत होते. लाइट आलाही त्यामुळे स्पिकर सुरू झाला होता. आता परदेशी पटेल होते. स्पिकर ओढला आणि त्यांनी भाषण सुरू केले. अर्धातास झाला शेवटी बाबुराव दौंडकरांनी त्यांचे हातात पेन्सिल दिली (तो इशारा होता की आवरते घ्या) पण परदेशींनी पेन्सिल चक्क पायजम्याचे खिशात ठेवली. आम्ही आमचे हसत होतो. बाबूरावांनी आणखी एक शक्कल लढविली. त्यांनी कंपास पट्टी त्यांचे पायाला लावली तर परदेशींनी त्यावर चक्क पाय दिला. आमच्यात प्रचंड हंशा. आम्ही हसतो म्हणून पब्लिकच्या टाळ्या. शेवटी परदेशी स्वतःच थांबले, पोटभर बोलले. नंतर काकडे. सभा दोन तास.

सरपंच किसनराव फराटे जुने समाजवादी. उंचपुरा पैलवानी गडी. सभा संपल्याचे जाहीर केले. त्यांचेकडे जेवण होते. आम्ही निदान ७० माणसे होतो. (प्रचाराचा ट्रक आणि आम्ही अशी) पण केवळ पाऊण तासांत ७० माणसे जेऊन उठली. धन्य किसनरावांची जेवणोत्तर रात्री केवळ बैठकी व भेटीगाठीसाठी तीन गावे, रात्री अडीचपर्यंत झाली.

## दि. २२, २३

दोन दिवसांत अनेक गावांना भेटी झाल्या. शिरूरच्या बेट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात गेलो. नगरच्या सरहद्दीवरची गावे झाली. तर या दिवसांत विठ्ठलवाडीसारख्या तीन तालुक्यातील सरहद्दीवरच्या गावी प्रचंड सभा झाली. हे गाव हवेली-शिरूर व दौंड तालुक्याचे सरहद्दीचे आहे.

विठ्ठलवाडी आहे अवघे ७१८ घेचे खेडे, परंतु सभा मात्र दीड हजाराची. आसपासच्या खेड्यातून नदी ओलांडून लोक आलेले. वेगवेगळ्या गावच्या तरुणांनी आपली वाद्ये आणली होती. काही झांजानिशी, तर काही शिमग्यातल्या मोठ्या टमक्यानिशी कडकड आवाज करीत. ढोल मात्र कॉमन होते. लोकांना मिरवणुकीचा उत्साह दांडगा. मिरवणूक झालीच पाहिजे. सभास्थान खचाखच भरले होते. टेबल, दोन खुर्च्या. त्यातली एक मोडकी व खुर्च्यांमागे दोन कॉटस् गाद्या घालून ठेवलेल्या.

रीतसर सूचक-अनुमोदनाने अध्यक्ष निवडले. सभा चांगलीच रंगणार असे वाटले. प्रशस्त मांडव, गावचा स्थानिक तरुण बोलला. ना आगा ना पिछा, गावचे खरकटे ( सरपंच काँग्रेसमध्ये गेला होता. ) त्याने काढले. अगदी पोटास तड लागेल असा बोलला. मग बोलला रतन भंडारी. नेहमीच्या स्टाइलने बोलला. हुकुमी टाळ्या घेतल्या. पण एकाएकी पब्लिक उठले. थांबा बसा, असे सांगणारेही उठले. भाषणाचा सूर बिघडलाच. पण एक बरे झाले. उठलेले लोक संभाजी काकड्यांचा विजय असो घोषणा देत पळत होते. मग समजले की, संभाजीराव हवेली संपवून इकडे शिरले होते व ते आले होते. अर्धवट सभा ठेवून त्यांची. परत मिरवणूक झाली. भंडारी अपसेट झाला होता म्हणून तो काकडे सभास्थानी येताच एका मिनिटात बसला.

तर असा उत्साह.

कोरोळी गावी मात्र चक्क ना हंशा ना टाळ्या, माणसं आपली

मस्त. हूं की चू नाही. मी त्या ग्रुपमध्ये चक्क ओशाळतो. गावात आम्ही ५-५॥ वा. गेलो असू. कॉंग्रेसपक्षीय उमेदवारांची घराघराला पोस्टर्स. सारं गाव बॅ. गाडगीळांच्या नावानं चितारलेले. पारापाशी १५-२० मंडळी बसलेली. आम्ही गाडीतून उतरलो, अन् रामराम घातला. म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. तरीही बळेच हसून मेगॅफोन सुरू करून त्यांचेपुढे उभा राहिलो व आपल्या गावकऱ्यांना काकडे भेटण्यास आल्याचे सांगितले. मोटार गावात शिरलेली. तशात मेगॅफोनच्या आवाजाने ते खेडं जागं झालं जणू. आणखी १५-२० नागरिक आले. कुतूहलांची २०-२५ पोरही आली. एका कोपऱ्याला ७-८ स्त्रियाही उभ्या राहिलेल्या दिसल्या. मॉब तर बरा जमला म्हणून काकडे यांचा परिचय करून दिला व भाषण केले. जनता पक्ष, भाकरीबरोबरच स्वातंत्र्य यावर वीसएक मिनिटे बोललो. शेवटी श्रोत्यांकडून कसलाच प्रतिसाद नाही म्हणून मनोमनी ओशाळलो व खाली बसलो."

निदान बसल्याबद्दल तरी टाळ्या पडाव्यात; तेही नाही. दौऱ्यातला हा अनुभव विलक्षण होता. चलावे पुढच्या गावी म्हणून गाडीकडे आम्ही निघालो. खरेतर आम्ही सगळेच– अगदी ड्रायव्हरसकट– खजील झालो होतो. कारण आम्ही सभा जमविली की, ड्रायव्हर सुधाकर, पोस्टर्स, झेंडे, हँडबिल्स वाटायचा, अगदी उत्साहाने, पण येथे मामलाच थंड होता. म्हणून निघालो, तो एक फेटेवाले गृहस्थ आले त्यांनी म्हटले, 'चहा घेऊन जा.'

हा चहा म्हणजे आम्हाला आधार होता. त्यांचा वाडा बघून गेलो. अंगणात बसलो. चहा आला. नंतर त्या गृहस्थाने सुपारी कातरताना म्हटले, पाव्हणे तुम्ही काळजी करू नका या गावची. आमच्या घराघराला जरी कॉंग्रेसी पोस्टर्स असली तरी या गावात १० आणे काकड्यांना मते पडणार आहेत. आम्ही, निदान मी तरी टण्णकन् उडालो. त्या माणसाने सांगितले की, "तुमच्या भाषणाला अढीगत माणसं बसली ती, त्यांच्यासमोर भिताडाला चिकटून बसलेला शरद पवार पाव्हणा होता म्हणून. न्हायतर तुमच्या भाषणाला टाळ्यांची पावतीच होती बघा. लई चिडलो आम्ही. घरातली निम्मी भांडी लिलावात गेली हो. बँक म्हणून नका, उधारी म्हणून नका, तगाई म्हणू नका; सगळीच वसुली. पार खलास झालं गाव, तव्हा गावच फिरलय. पन् पवाराचा पाव्हणा गावात होता म्हणून सारेच गप्पगार. पण आतनं कॉंग्रेसवर जळतात तेव्हा निःशंक जावा. आम्ही काय करायच ते करतो."

: आयला म्हणजे मघाचा बोजवारा सारा खोटा म्हणां की.

: अगदी खोटे. मुखुटे धारण करावे लागतात. रामराम जरा ठासूनच झाला आणि आम्ही निघालो. बेटावरच्या जांबूत गावी. तर सभा ही चक्क गप्पागोष्टीची झाली. काकडे यांनी एखाद्या मुद्यावर सांगण्यास सुरुवात केली की, प्रेक्षकातील एक फेटेवाला त्यांना अडवायचा, व तडक त्या विषयावरचे आपले भाषण २-३ मिनिटे करावयाचा, अशी जुगलबंदी पाऊणतास चालली. शेवटी त्यांना मी म्हटले तुम्हीच उभे राहून बोला तात्या. त्यांनी लगेच जबाब दिला आम्हाला ते येत असतं तर का अशी दैना होती ?

या जुगलबंदीचा नमुना पेश केल्यावाचून राहावत नाही. काकडे म्हणाले, मागच्या निवडणुकीत पंतप्रधानांनी गरिबी हटाव नारा दिला.

: अवो काय घेऊन बसलात ते. म्हनं गरिबी हटाव, खरं तर गरीब हटाव. ( हशा )

: त्या वेळी खाडीलकर निवडून दिले...

: काय राव बोलता. खाडिलकर आम्हीं पाहिलासुद्धा नाही.

: या वेळी गाडगीळ उभे आहेत कॉंग्रेसतर्फे.

: "काय बोलू नका हेही पुढच्या विलक्षणपर्यंत येणार न्हाईत.'

: ( मग तुम्ही काही विचार करावा. )

: काय विचार करता माती ? इथ दीसभर गुरावानी राबतोय. तरी दोन येळेला तुकडा मिळना. कुठे भाकर है तर चटनी नाय. कुठे चटनी हाय तर ज्वारी नाई काय इचार करणार ? अहो एकदम मागं तुळशीराम ( दास ) जाधव मतासाठीं आला तव्हा त्यांनी आमची घरं पाहिली तव्हा त्याच्या डोळ्यात पानी आलं. आम्हाला वाटलं काही त्यात सुधार व्हईल. पन अद्याप त्याचा पत्ता नाय.

काकडेंनी मुद्दा उचलला. सरळ म्हणाले तुळशीदासांनीच आम्हाला तुमच्यासाठी निरोप दिला आहे की, परत जांबूतला गेलो तर अश्रू आवरणे कठीण जाईल. म्हणून मी येणार नाही. अगदी कडाडून टाळी पडली अन् तो फेटेवाला सुधारला. तरीही त्याने म्हटलेच, 'काय नाय हो आमच्या अडाणीपणाचा फायदा हे ढवळ्या टोपीवाले घेतात. सांगतात हाकरं बैलजोडीला हाकरं गायवासरूला.

पठ्ठ्या तसं आमच्या बाजूनं बोलत होता. आमची सभा हशा टाळ्यात चाललेली. डोक्यावर मस्त चांदणे पण जुगलबंदी कुठंय् ? परत काकडे म्हणाले, 'नसबंदीसाठी जे अत्याचार घडले'... वाक्य पुरं झालं नाही. मघाच्याच फेटेवाल्याने म्हटले, 'अवो काय कर्मकथा सांगू ! औतावर निघालो तर ती गाडी आली. दोन पोलीस संगं. रस्त्यातच मला पकडला अन् टाकलं गाडीत. म्हटलं आता मेलो पन शिताफीनें उडी मारली चालत्या गाडीतून. तकाट पळालो. गावात आलोच नाही चार दिस !

त्याच्यावर बेतलेला प्रसंग घृणास्पद गंभीर होता पण सभा खो-खो हसत होती. एकाच वेळी अश्रू आणि त्याच वेळी हसू असा प्रकार होता.

काय करायचाय या ठिकाणी जाहीरनामा ? कशाला तत्त्वज्ञान ? खरं तर त्या ग्यानबानेच जे सांगितलं तेच तत्त्वज्ञान होतं. तो मांडू शकत नव्हता पण मधूनमधून बोलत होता. गावकरीही त्याला साथ देत होते. गाव कुणाकडे झुकणार ते सांगायला ज्योतिषी हवा होता काय ?

रात्री गाव सोडले तेव्हा तो बळीराम हात जोडत म्हणत होता, 'भाऊसाहेब मी सभेत येडावाकडा बोललो त्याचा राग नका मानू. पन तुम्ही ऐकून घेतलं, लै उपकार झाले. आम्ही गरीब साधीभोळी माणसं काही दिऊ शकत नाही. पण मत मात्र जरूर दिऊ. माझंच नाही तर, चार दिवसांची सवड काढतो. ४-१० गावात पायी जातो.

## गाव कुणाकडे झुकणार ते सांगायला ज्योतिषी हवा होता काय ?

देतो पुकारा यावेळी नांगरधारी शेतकरी बघारं.'

बस्स ह्याच निष्ठा, हेच आशीर्वाद काकडे यांना मिळाले हे लाख मोलाचे.

## दि. २४-२५

गारदोंडाची माणसं आली होती. 'साहेब (संभाजीराव) असा दौरा ठेवला आहे. आम्ही आहोतच. ठिकठिकाणी तुम्ही यावं'

तितक्यात गडसासवडहून निरोप आला. 'अर्थशास्त्रज्ञ वि. म. दांडेकर बारामतीकडे गेले आहेत त्यांची भाषणे होणार आहेत. शिरूरचा निरोप आला आपले झेंडे विरोधकांनी फाडले. आम्ही पोलिसांत तक्रार केली आहे. केंदूर, पाबळ, तळेगाव (ढमढेरे) आदी ठिकाणाहून अशाच तक्रारी आल्या होत्या. वातावरण पेटते होते. अद्याप शांतता होती. तिला तडा जात होता. पिंपरी-चिंचवडची कार्यकर्ती मंडळी आली होती. त्यांनाही दिवस द्यावयाचा होता. सगळ्यावर विचार झाला.

दौऱ्यावर जाण्यापूर्वी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांच्या कानी झालेले प्रकार घातले आणि दौंड तालुक्यातील गावे धरली. या तालुक्याची जबाबदारी राजाराम ताकवणे, शांताराम दिवेकर (माजी महापौर) सर्जेराव गुंड (माजी अध्यक्ष लोकल बोर्ड) आदींवर होती.

उशीर झालेला. ठरविलेला कार्यक्रम विस्कळीत झाला होता. आनंद एवढाच की, बारामती-पुरंदरकडे दोन दिवस वि. म. दांडेकर होते. त्यांचा उपयोग काकडेंसाठी होता.

दुपारी २ वा. पडवी गावी गेलो. अगदी सुमसाम. पण गावात 'आमचा पक्ष-जनता पक्षा'च्या जाहीराती लागलेल्या दिसल्या. दोन-तीन माणसं भेटली. जयसिंगराव शितोळे यांची चौकशी केली. ते पुण्याला गेल्याचे समजले; म्हणून परत निघालो तो शितोळे यांचा मुलगा सायकलवरून आला. त्याने घरी नेले, सरबत दिले आणि केवळ दहा मिनिटांत २०-२५ माणसे गोळा केली. चर्चा झाली. तेव्हा समजले की, एम्. कॉम झालेला एक तरुण गेले दोन वर्षे बेकार आहे तर एक बी. ए. झालेला तरुण मुकादम म्हणून नुकताच कामावर तीन रुपयावर काम करतो आहे.

उपस्थितांनी सांगितले रात्रीच गावचा निर्णय झालाय की, काकडे यांनाच गावची मते द्यायची. तसं गाव एकमुखी आणि कॉंग्रेसच्या विरोधातले म्हणून विश्वास वाटला. अरुण शितोळेला गाडीत टाकला व दोन मैलांवरच कुसेगाव गाठले.

ग्रामपंचायत उघडली. सतरंजा अंथरल्या. कशी आणि कुठून ४०-५० माणसं जमली. गप्पा सुरू झाल्या. जप्ती-नसबंदीने हे गाव हैराण झाले होते. उपस्थितांतील एक वृद्ध म्हणाला, आमचा गाव काकड्यांच्या बाजूने उभा आहे, पण उभ्या उभ्या का होईना संभाजीरावांना गावात यायला सांगा.

म्हणजे गावकरी काकडे यांचे नाव ऐकून होते, पण त्यांनी त्यांना पाहिले नव्हते. मग झटकन म्हटले 'हे काय संभाजीराव बरोबर आलेत' संभाजीरावांनी सर्वांना रामराम घातला. माणसे खूष. लगेच चहा आला. म्हाताऱ्यांनी समाधान व्यक्त करताना म्हटले, निदान गावात संभाजीरावांनी यावं असे मत होते आता काळजी न्हाय.

माळवाडी-रोटी मधेच हवेलीतील लोणीकंद, पेरणे, डोंगरगाव, राहू; न्हावी सांगवी; सांसवी सांडस झाले आणि परत सुपा (बारामती) करून रात्री घरी.

## दि. २६

ज्येष्ठ नेते एस. एम. जोशी यांनी काकडे यांच्यासाठी वेळ दिला होता. अण्णांना दुपारी आणण्याची जबाबदारी आमची होती. दुपारपर्यंत अनेक कामाचे ढीग साफ करण्यातच वेळ गेला. दुपार झाली आणि स्वातंत्र्य वीर सावरकर कुणब्याचे सन्निध राहण्यास गेलेल्या अण्णासाठी गाडी नेली. अण्णा तसे तयारच होते. तेवढ्यात ताराबाईंनी हालहवाल विचारलीच. अण्णा आमच्या या सभानंतर सोलापूरला जाणार होते.

गाड्या निघाल्या. बरोबर तीनच्या ठोक्याला भर उन्हात सभा सुरू झाली. अण्णा जनता पक्षाचा 'जाहीरनामा' प्रचंड श्रोतृसमुदायाला समजावून देत होते. परंतु कॉंग्रेसच्या काही मंडळींनी सभेत व्यत्यय आणलाच. त्यांनी प्रचाराची गाडी सभास्थानापासून नेली. नका विसरूचा घोष केला. एवढ्यावर थांबले नाहीत तर वीस कलमीच्या रेकॉर्डस् लावल्या व कर्णे सभेकडे वळविले. परंतु कुणीतरी त्यांना चापले असावे. काही वेळाने सगळेच सुमसाम.

अण्णांना माझे मते वक्तृत्व नाही, परंतु ते ज्या पोटतिडीकेने बोलतात त्याची आंच जनमानसात भिनते. म्हणूनच त्यांचे भाषण प्रभावी होते. श्रोते तन्मयतेने ऐकतात आणि एस्. एम्.ना मानतात.

आज काही पत्रकार कॉंग्रेसच्या प्रचारयंत्रणेबरोबर आले होते. त्यांची सुप्यालाच भेट झाली. गप्पागोष्टी झाल्या. सभेनंतर त्यांचा व संभाजीरावांचा परिचय करून दिल्यावर ते हबकले. त्यांची कल्पना ऐसपैस खादीचा डगला, परीटघडी धोतर, झकास टोपी व तसाच देह व पन्नाशीचा असणार. पण इथं संभाजीराव चक्क मॅनिला पॅंटवर. गर्दीत हरवलेला केवळ ३९ वर्षांचा तरुण.

पत्रकारांनी विचारले, निवडणुकीचा अंदाज काय ?

'तुम्हाला काय वाटते ?'

'आम्ही प्रमुख लढतीपैकी एक मानतो.'

म्हणजे आम्ही निदान रिंगणात आहोत तर. कारण गावगन्ना कॉंग्रेसवाले म्हणतात ही लढत एकतर्फी होईल आणि आमचं डिपॉझिट जाईल म्हणून म्हणतो.

छे छे पत्रकारांचा जबाब.

मग बघा आम्ही ५० हजाराचे मताधिक्याने विजयी होऊ. आत्मविश्वासाने संभाजीराव म्हणाले आणि पत्रकारांना माझे स्वाधीन करून अण्णांना घेऊन गावात चहापानासाठी गेले.

पत्रकारांनी आमच्या प्रचारकार्याची माहिती घेतली. वास्तवात राहून दिली तरी पारडे संभाजीरावांचे बाजूने झुकले होते. त्यांच्यातील एक अत्यंत उदास झाला. (होवो बिचारा.) ते परत कॉंग्रेसच्या प्रचारयंत्रणेत पाहणी दौऱ्यावर गेले. आम्ही एस्. एम्.ना घेतले व वरवंड गाठले.

वरवंडची सभा ५॥ ची होती. आम्ही वेळेपूर्वीच आलो होतो. या गावात पुण्याचे चळवळे महापौर म्हणून गाजलेले शांताराम दिवेकर यांनी ठाण मांडले आहे. शाळेच्या पटांगणात सभा सुरू झाली.

रतन भंडारी मी असा क्रम झाला. माझे भाषण संपतानाच पावसाची सर आली व गर्दीची पांगापांग झाली. पाऊस थांबल्यावर परत गर्दी जमली. पण टिपका चालूच होता. शांतारामबापू कसा काय तापला कोण जाणे. पण दौंड तालुक्यातील पाझर तलाव, अन्यायाच्या अशा ढंगात पाढा वाचला की यंवरे यंव. मग एस्. एम्. ने सूर साधला. श्रोते असतील हजार पण एस्. एम्. तासभर आणीबाणी कशी आली, जनता पक्ष, काय काय करणार! अन्यायाविरुद्ध कसे उभे राहावे यावर सोप्या भाषेत परंतु आघात करत बोलले. भाषण संपले आणि परत पाऊस आला.

या सभेतच निरोप आला. एस्. एम्.नी पाटस येथे थांबलेच पाहिजे, आम्ही रस्त्यावर बसून आहोत. आम्ही त्यांची गाडी तशी जाऊ देणार नाही.

खरं तर पाटसची सभा कार्यक्रमात नव्हती. दौंडला मोठी सभा होणार होती. म्हणून दौंडला कशाही परिस्थितीत रात्री ८ पर्यंत जाणे होते. तशात एस्. एम्.शी हा विषय कसा काढायचा? आणि कुणी काढायचा? पण एस्. एम्. भिडस्त आहेतच. चहापानाचे वेळी गप्पा मारताना विषय काढला. 'अण्णा ग्रामीण भाग ढवळून निघालाय. सगळीकडे वातावरण चांगले आहे. आमचंच बघाना. भंडारी, मी कोणत्याही गावात शिरलो की, ५-५० माणसे गोळा होतात आणि आमची सभा होते.

'खरंय तुझे म्हणणे. वातावरणच बदलले आहे. लोक स्वतःहून पुढे येत आहेत' अण्णा.

'आता बघाना दौंड गाठायची आपली घाई तर पाटसचा रस्ता ग्रामस्थांनी बंद केला. तुम्ही १० मिनिटे तरी बोलले पाहिजे हा आग्रह.'

'असे म्हणतोस, त्यांना नाराज का करायचे? स्वतःहून लोक येतात. त्यांचा मान राखलाच पाहिजे.'

आणि पाटसची सभा तासभर गाजली. रात्री दौंड. प्रचंड गर्दी, भाषणे व रात्री एस्. एम्. सोलापूरकडे रवाना.

## दि. २७

विरोधकांची या गावात सभाच होत नव्हती. आज झाली हे कशाचे लक्षण? या प्रश्नावर प्रश्नकर्त्यानेच उत्तर दिले जनता लाट.

उरुळी कांचनची ही कथा. पूज्य मणिभाई देसाईंच्या छत्राखाली गाव म्हणे विकास करत आहे. येथील कार्यकर्त्यांनी जिथे सभा ठेवली होती ती जागा खाजगी मालकीची होती व त्या मालकाने सभेसाठी नाकारली. तुम्ही विरोधक म्हणून सभा व्हायची नाही असा दंडक म्हणून एका बाजूला सभा.

भर उन्हात ४००-५०० माणसे बसलेली. जुने कार्यकर्ते भाई के. डी. चौधरी उन्हात समाजवाद-साम्यवादाची सांगड घालत होते. ३० वर्षाच्या महागाईचा हिशेब देत होते. प्रत्येक साल हे स्मरणाने सांगत व महागाईचा तक्ता देत. अगदी नांगर, फाळ, याच्या किमती कशा वाढल्या तेसुद्धा. (आम्ही जाम वैतागलेलो. पण संभाजीराव आमचेकडे पाहून हसत होते कधी जिरली म्हणून) तरीही सभेला गर्दी वाढत होती. संभाजीरावांनीही भर उन्हात पिळलेच. आमचे डोक्यावर सावली होती पण श्रोत्यांचे काय? ते तळत होते. काकडे बसले. वाटले सभा संपली पण श्रोत्यातून पुकारा झाला दादा-दादा. मग दादा बोरकरही उभे राहिले. त्यांनी तर आमचे भाषेत काँग्रेसचा कचरा केला. चक्क नावे घेत दादा म्हणाले-- कोण- भन्साळी? (हे सरपंच आहेत) या दादागिरीविरुद्ध मी याच भागाला २५ वर्षे लढतो आहे. अजून २५ वर्षे लढेन. (म्हणजे दादा अद्यापही २५ वर्षे नेतृत्व देऊ इच्छितात.) पण विजयी होऊ. आणखी बरेच काही.

सभेनंतर प्रचंड मिरवणूक झाली. आम्ही मग थेऊरच्या कारखान्याला वळसा घालून कोलवडे करून वाडेबोल्हाई गाठले.

वाडेबोल्हाईला हवेली तालुक्यातील कार्यकर्त्यांचा मेळावा होता. विठ्ठल तुपे, मारुतराव काळे यांनी आयोजित केलेला. भले ४००-५०० कार्यकर्ती मंडळी. त्यात कुणी सरपंच, कुणी सोसायटी चेअरमन, तर कुणी २०/२० वर्ष विरोधात काम करणारी; तर काही युवक काँग्रेसला रामराम ठोकण्यासाठी आलेली.

मेळाव्यात काही कार्यकर्त्यांची मोठी नमुनेदार भाषणं झाली. एकाने काकडे यांना पाठिंबा देताना म्हटले बॅ. गाडगीळ कोण? तर ब्राह्मण. आपण मर्द मराठे. ब्राह्मणाला मत देणार? (ओळखीच्यांच्या नजरा माझ्याकडे आत्ता बोला. या अर्थाने) (अर्थात त्या कार्यकर्त्याला मारुतराव काळचांनी तेथेच चापले व स्पष्ट केले की, निवडणूक जातीय नसते राजकीय विचाराची असते.)

एकाने सांगितले काकडे आपले सोयरे म्हणून त्यांना निवडले पाहिजे. (आता माझी नजर काकडयांवर-की, आता बोला.) तर असा हा हुंशा टाळयांचा मेळावा काही उपरोक्त बदसूर सोडला तर, झकास. कामाचे दृष्टीसे उपयुक्त असा.

नानेगांवला जायचे होते. म्हणून घाई केली. कारण नानेगांवच्या गुंड पाटलांचा निरोप होता, नातीचे लग्न आहे, ८-१० हजार लोक येतील, संधी सोडू नका.

खरं तर निवडणुकीत कसलीच संधी सोडली जात नाही. ही तर पर्वणी. परत थेऊरच्याच मार्गानी जायच होतं. केसनंद जवळ एक लग्न होतं. टाळीला आम्ही पोहचलो. लग्न घटकाभर बाजूला राहिले. 'काकडे आमच्या लग्नाला आवर्जून आले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत' असा लाऊडस्पीकरवरून पुकारा झाला. त्याचबरोबर काकडे यांच्या स्वागताला उभय वऱ्हाडकरी व मानकरी आले. एकाने हार घातला. एकाने श्रीफल दिले.

जेवणाचा आग्रह झाला, पण ते खरं नव्हतं. वधू-वरांना आशीर्वाद दिल्यावर आम्ही निघालो, तेव्हा लाऊडस्पीकरवरून मोठमोठ्याने 'संभाजीराव काकडे यांना मत म्हणजे लोकशाहीला मत' असा पुकारा होत होता.

कोलवडे गेले. फॅक्टरी गेली आणि रात्री ८॥ चे दरम्यान नानगांव गाठले. बरीच मंडळी भेटली. प्रथम लग्नमंडपात गेलो. वधूचे आजोबा म्हणत होते लग्न- बराच वेळ थांबवून धरले, पण तुम्ही

## स्वतःहून लोक येतात. त्यांचा मान राखलाच पाहिजे.

आला नाहीत. शेवटी घेतले लावून. चहापान झाले आणि आमची जाहीर सभा माजी लोकलबोर्ड अध्यक्ष श्री. सर्जेराव गुंड यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली. रतन भंडारी येथे मनसोक्त बोलला. मीही बोललो. ११ वा. संभाजीराव उठले. बराच वेळ गेला आणि एकाएकी औटगोळे फुटले. बँड वाजत भुईनळे पेटले. सभा काहीशी विचलित झाली. कारण वधू-वरांची वरात निघाली होती म्हणून लवकर आटोपले. रात्री २ पर्यंत गावात तीन ठिकाणी बैठकी झाल्या. एकमेकांतील गटबाजी तात्पुरती दूर केली गेली आणि भरघोस समाधानाने पुण्यात ४ वाजता आलो.

## दि. २८

दिवसभरात २० गावे झाली. एके गावी जुन्यापद्धतीची पगडी, बाराबंदी घातलेला म्हातारा जनता पक्षाच्या स्वयंसेवकाचा बिल्ला लावून बसलेला दिसला.

सभा सुरू व्हायची होती. सहज चौकशी केली तेव्हा समजले, त्यांचे वय १०१ वर्षांचे आहे. (मला धाप लागली.) बाबुराव दौंडकरांना कानाशी लागून म्हटले, "बघा तात्या या वयातही सभेला पोरासारखा धावून आलाय" बाबुरावांनी हसतच पण कानात सांगितले "या वयातही शेतात दावे धरण्याचे काम करतो" (आम्ही कोसळलोच)

म्हाताऱ्या तात्याशी सभा सोडून गप्पा मारीत बसलो. वाटले, आपल्या बोलण्याने सभेत व्यत्यय येईल, पण म्हातारा कानानही पक्का. (आता मी संपलोच होतो.) खाजगी हळू आवाजात गप्पा झाल्या. हे तात्या, टिळक गांधींच्या गोष्टी बोलत होते. टिळकांच्या वेळी असे भोंगे नसत याची त्यांनी आठवण दिली. तर आमच्या वेळी मोठी कुस्ती केवळ एका बगीवर. (रुपया दोन रुपयांचे पागोटे) होई असेही सांगितले.

सुखद आणि रम्य काळात तात्यांनी नेले होते. जुन्या आठवणी, ती स्वस्ताई, ती भाषणे, तसे हंगामे आणि त्यावेळची माणुसकी—आम्हाला सगळेच अद्‌भूतरम्य होते. सभा संपली. लगबगीनें संभाजीरावांना त्या तात्याच्या पायावर घातले. म्हाताऱ्याने आशीर्वाद देताना म्हटले आम्हीबी अजून चळवळीत आहोत. एकच हंशा पिकला.

खरं तर आजचा दिवस बराच काळ स्मरणात राहील.

## दि. १ मार्च

आमचे युद्ध केवळ १९ दिवसावर येवून ठेपले होते. काकडेंनी खुशाल इतर मतदारसंघात प्रचाराला जावे याबद्दल काळजी वाटते.

अर्थात त्यांना जावेच लागले. खेड मतदारसंघाला अनेक संस्थांचे अध्यक्ष असलेले व १९५२ पासून (५७ चा अपवाद) आमदार असलेले आण्णासाहेब मगर जनता पक्षाचे उमेदवार मुकुंदराव पाटील भुजबळ यांचेविषयी जहरी प्रचार करीत असल्याच्या बातम्या आल्या होत्या.

बातमीनुसार मगर जाहीर सभांतून म्हणत होते की, मी मराठा आहे. भुजबळ माळी. तेव्हा मराठ्यांनी मराठ्याला व माळ्यांनी माळ्याला मते द्यावीत.

असा खरोखरीच प्रचार झाला असेल तर, घातकच नव्हे, नि:संशय घृणास्पद. केवळ मराठा मतदार जास्त म्हणून नव्हे तर, जातीचे राजकारण किती दिवस चालणार ही भीती. एवढे कशाला, खुद्द बॅ. विठ्ठलराव गाडगीळच मगरांचे प्रचार सभेत म्हणाले होते की, भुजबळ काय तर एक भाजीविक्या दलाल. अशा दलालांना मत देणार काय?" (भुजबळ दलाल भाजीविक्या तर पुणे शहरातून काँग्रेसचे उमेदवार म्हणून उभे राहिलेले वसंत थोरात कोण? हा प्रश्न चर्चिला गेलाच.)

प्रचाराची धूळवड कोणते स्वरूप घेते याचा एक नमुना. खुद्द स्वर्गीय काकासाहेब गाडगीळ यांचे वाड्यातील बैठकीत (म्हणजेच बॅ. गाडगीळ यांचे वाड्यात त्यांचे उपस्थितीत) शहर काँ. अध्यक्ष नामदेवराव मते म्हणाले, बहुजनसमाजाने एकत्र यावे म्हणजे वसंत थोरात विजयी झालेच म्हणून समजा. या प्रचाराला गाडगीळांनी पाठिंबा दिला व मल्लीनाथी केली की, तिकडची (सदाशिव, शनिवार, नारायण) मते आपल्याला मिळणारच नाहीत. म्हणून मते यांचे म्हणणे योग्य आहे.

एकवेळ मते यांची त्यांनी घेतलेल्या पावित्र्यबद्दल कीव करू. मगरांचीही करू; पण बॅरिस्टर गाडगीळ यांनीही असा प्रचार करावा यातच काँग्रेसचे पतन दिसत होते. पायाखालची वाळू सरकली हे स्पष्ट होते.

आम्हीच काही गावे घेतली. बैठकी, सभा घेतल्या. काही गांवात साहित्य पोहचविले.

## दि. २

संभाजीरावांनी गावे घेत घेत जावे व रस्त्यात कुठेतरी आम्ही त्यांना मिळावे असे ठरवून संभाजीरावांना वेगळे प्रचारार्थ पाठविले. त्यांचेबरोबर रामभाऊ तुपे, मारुतराव काळे, तर आम्ही राम काकडे (७१ चे उमेदवार खाडीलकरांविरुद्ध उभे होते. संभाजीरावांचे धाकटे बंधू) रतन भंडारी असे वेगळे. याचा परिणाम चांगला झाला. १५–२० गावांऐवजी ३५–४० गावे झाली. संभाजी नाही, तर निदान त्यांची माणसे गावात आली यावर जनता खूष होती. अर्थात शक्य झाले तर, संभाजीराव त्या–त्या गांवी जाणारच होते.

आम्ही एका वस्तीवर गेलो. २०/२५ मंडळी होती. गप्पा निघाल्यासरशी एकाने सरळ म्हटले आम्ही साहेबांनाच मतदान करणार, कारण ते आमचे पाव्हणे आहेत. (इथे पाव्हण्यांचा फार जोर) तर गावाचे नांव मुद्दाम घेत नाही. त्या गावात फक्त तिघा जणांना भेटलो. एकाचे हातात दोन हजार मतांपैकी १५०० होती. तर इतर दोघांकडे दोन–तीनशे. सभा नाही, बैठक नाही, फक्त खाजगीत चर्चा. तर बड्याने सांगितले आम्ही एकाकी पडलो आहोत. म्हणून पोरगं युवक काँग्रेसमध्ये घातले. (जणू शाळेत घातला,) पण तुम्ही बळ देतच आहात—तर आमचे बळ तुमच्या मागे राहील. युवक काँग्रेसमध्ये गेलेला तरुण आला तो दुधाचे कप घेऊन. त्याने तर वडिलांवर कडी केली. त्याने म्हटले, कसली काँग्रेस अन् कसले काय? पोलिसांचा ससेमिरा चुकवायचा अन् आपले विरोधी राजकारण चालवायचे म्हणून आणीबाणीत निदान बाहेर तरी राहीलो. पण आता बघा धुतो एकेकाला.

असे चिरेबंदी वाडे निखळत असल्याचे अनुभव येत आहेत. ह्या पठ्ठ्या किमान तीन व जास्तीत जास्त सहा गावची हमी घेतोय. जवळपास ६–७ हजार मतदान होणाऱ्या मतदनातील ८०/– टक्के काकडेंसाठी

उद्या पंतप्रधान पुण्यास येणार आहेत.

**दि. ३ मार्च**

सकाळीच पिंपरी–चिंचवड भागात जोरकस पदयात्रा झाली. सगळ्यांचाच उत्साह तुडुंब होता. स्वतः मोहन धारिया होतेच. ओवाळणे आदी सोपस्कार झाले. काकडे तसेच पुढे प्रचारार्थ गेले. आम्ही गावात आलो.

दुपारी अगदी वेळेवर जेवण मिळाले. नाहीतर सकाळी ८ ला घरी खायचे, दिवसभर १०–२० कप चहा, २–४ कप सरबत, २–४ सिगारेट्स पाकिटे ह्याच आहार. रात्री २ चे पुढे केव्हाही आलो की जेवण. अशीच प्रचार यात्रेतली स्थिती म्हणूनच वेळेवर जेवल्याचा आनंद. जेवल्यावर आलेली मासिके चाळण्यास घेतली तो झोप लागली. उठायला ४॥ वाजले. घाईघाईने सारसबाग पटांगणावर गेलो.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांना यावयास काहीसा उशीर झाला होता. त्या आल्या आणि ५–२० वा. गेल्याही. पंतप्रधानांच्या अनेकवार सभा बघितल्या आहेत. परंतु आजची सभा फारच पुअर होती. तशात त्यांच्या भाषणात आक्रमकता नव्हती. वा नाही पडल्या टाळ्या. काहीच नाही. माझे मलाच वाईट वाटले, पंतप्रधानांच्या सभेला नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर जावयास हवे होते. त्यांचे विचार पटत नसले तरी ऐकावयास हवे होते. कितीही केले तरी त्या पंतप्रधान आहेत. स्त्री पंतप्रधान आहेत. त्यांना पुणेकरांनी एकाकी पाडावयास नको होते. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात धारियांची काहीशी भलावणच केली. म्हणजे कॉंग्रेस उमेदवाराला फायदा झालाच नाही.

सायंकाळी कार्यालयात आलो तो पंतप्रधानांच्या सभेनंतर युक्रांदच्या रत्नाकर महाजनने १५–२० सहकाऱ्यांसह जयप्रकाश झिंदाबादचा नारा दिला म्हणून त्याला कॉंग्रेसच्या एका गटाने त्रास दिल्याचे वृत्त आले. वृत्ताचे मागोमाग कॉंग्रेसच्या ३००–४०० लोकांनी काकडे यांच्या घरापुढे 'थोरात झिंदाबाद–धारिया मुर्दाबाद'चे नाच केले. वातावरण तंग झाले होते, परंतु अनुचित प्रकार न होता हा मोर्चा मार्गस्थ झाला.

रात्री गप्पा मारत असताना वार्ता आली की कॅंपात ईद–ए–मिलाद मिरवणुकीत धारियांना धक्काबुक्की झाली. त्यांचा शर्ट फाडला गेला. म्हणजे वातावरणाने पलटी खाल्ली की काय? शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला असे वाटले तोच बातमी आली. शिरूर, सुपा व आणखी एक–दोन ठिकाणी जनता पक्षाचे बोर्ड व झेंडे विरोधकांनी काढले. वातावरण तंग आहे. शिरूरला तर जनता पक्षाच्या दोघांना पोलिसांनी धरून नेले म्हणून मोठी मिरवणूक निघाली, पोलीस ठाण्यावर नेली. चोरांना सोडावे लागले. पण गाव तंग कारण जनता पक्षीय मंडळी आता गप्प बसू शकत नव्हती. रात्रभर कॉंग्रेस मुर्दाबाद, जनता पक्ष झिंदाबादचे नारे चालले होते.

पणदरे–भाळेगाव आदी भागातून नामदार यशवंतराव मोहिते बारामतीकडे जाणार म्हणून जनता पक्षाचे रस्त्यावर लावलेले फलक पोलिसांनी प्रेमाने (?) उतरविले होते. म्हणजे निवडणुकीचे शेवटचे पर्व सुरू झाले होते.

**दि. ४ मार्च**

संभाजीराव ठरल्याप्रमाणे दौऱ्यावर गेले. आम्ही आमच्या पद्धतीने गेलो. सासवड–जेजूरी वाल्हे घेतले. वाल्ह्यात गेलो. तेथे केवळ आ. जाधवरावांचा निरोप द्यावयाचा होता तर मंडळी जमली त्यांनी पुण्याहून फोन आल्याची बातमी देताना म्हटले की, प्रा. ग. प्र. प्रधान मास्तर येणार नाहीत असा निरोप आहे म्हणून आज जाहीर केलेली सभा रद्द केली आहे.

रामतात्यांनी कार्यकर्त्यांना समजावले व भंडारी व मी बोलेन असे सांगितले. सभा झालीच पाहिजे. असे सांगितल्यावर चौकात जाहीर सभा रद्दचा बोर्ड परत उलटा केला आणि आमची नावं कंसात घातली गेली. दादा जाधवराव ७।८ गावे करून रात्री दिव्याला जाणार होते ते तासभर येतो म्हणाले होतेच.

वाल्हे गाव राजकीय दृष्ट्या अतिशय जागृत गाव. कोणत्याही गावात नसतील एवढ्या या गावात पार्ट्या. अगदी संघटना कॉंग्रेसचा सुद्धा गड्डा. समाजवादी–कम्युनिस्ट तर कॉमन आहेत. १९५७ साली शेकापचे तिकिटावर व सं. म. समितीच्या झेंड्याखाली येथील श्री. बाबूराव पाटील पवार आमदार म्हणून निवडून गेले होते. आता बाबुरावांची मुले कम्युनिस्ट पक्षाची कार्यकर्ती आहेत. एक वकील आहे, तर दुसरा कॉलेजात. मोठे कडवे कार्यकर्ते याच गावा पाहावयास मिळतात.

गावचे वैशिष्टच म्हणजे संभाजीरावांची उमेदवारी जाहीर होताच स्वतःचे खर्चाने भव्य कापडी फलक प्रथम टांगला तो याच गावात. अगदी भाकरी व लोकशाहीसाठी जनता पक्ष या जाहीर नाम्यासकट–तर या वाल्ह्यात संध्याकाळची सभा लागली. आम्ही पार वडगांवपर्यंत हिंडून वाल्ह्याला ७ वा. आलो. एस. टी. च्या स्टॅंडवरच ४००।५०० चा मॉब. पोरांपासून थोरांपर्यंत मिरवणुकीने गावात गेलो. (कोणाला असे अनाहूत भाग्य मिळते!) सभा ठेच भरली होती. तशात एकाने साप्ताहिक विशाल पुरंधरचा अंक दिला. वाचल्यावर समजले की, पुणे जिल्ह्याचे कॉंग्रेस अध्यक्ष (ॲक्टिंग) ज्ञानेश्वर खैरे व झेड. पी. चे दहा वर्षे अध्यक्ष होते ते शंकरराव उरसळ ही दुक्कल कालच येथून सभा घेऊन गेली. उरसळ म्हणाले होते जनता पक्षाच्या नेत्यांची लाकडे स्मशानात गेली आहेत. एका सभेत म्हणाले होते, जनता पक्षाची आता तिरडी बांधली आहे, तर आणखी एके ठिकाणी म्हणाले होते, ८० वर्षांच्या म्हाताऱ्याला १६ वर्षाची मुलगी कशाला हवी? कशाचा कशाला मेळ नाही.

**....त्यांना पुणेकरांनी असे एकाकी पाडावयास नको होते.**

नाही तरी शिमग्याचे दिवस, म्हटले घ्यावे आता धुवून. आमचे ठरले होते की, उरसळ प्रकरण मी हाताळायचं, तर इतर विषय भंडारीने. सभा सुरू होतानाच आ. दादासाहेब जाग्रवराव, बाळासाहेब मुळीक आले. त्यांना दिव्याला सभा होती. म्हणून त्यांनी सुरुवातीला भाषणे करावयाची असे ठरले. (एका परीने ते बरेही होते. गावचा सूर कळतो.) दादांनी अगदी डफावर टिपरू टाकावं असे भाषण ठोकले (परत सविस्तर बोलेन असं आश्वासन) तर बाळासाहेबांनी लोकसभेचा रांजण नांगरधारी शेतकरी नांगराच्या रुपण्याने फोडील तेव्हा कॉंग्रेसची उतरंड पडेल, असे सांगताच सभा खदखदा हसली. मुळिक यांनी आपला हाकामारीचा किस्सा पेश केला व कॉंग्रेसची हाकामारी निवडणुकीचे आदले रात्री गावात येईल तेव्हा ती शिवेवरून परत पाठवा म्हणताच समस्त स्त्री वर्ग तोंडाला पदर लावून खिदळत होता. अशा वातावरणाच्या लाटात आम्ही बोललो. पार तिरडी–लाकडे यांचा समाचार घेतला. मस्त सभा तीन तास झाली.

२० कलमाची भलावण करणारी कविता ‘तलाठी मित्र’ या मासिकात होती ती वाचून अध्यक्ष बाबूराव पाटील म्हणाले, हे मासिक आपण-चक्क चोरून आणले आहे, किती बंडला सरकारी नोकर मारतात ते दाखविण्यासाठी. म्हातारे तरी ताठ बाबूराव चांगले अर्धातास बोलले आणि जनता पक्षाचे पाठीशी राहाण्याचा त्यांनी समस्तांना उपदेश केला.

## दि. ५ मार्च

आज हुताशनी. थंडी अधिकृतपणे संपणार. तशी ती केव्हाच पळाली होती म्हणा.

सणाचा दिवस तरी विश्रांती कोठली? तात्या गाडी घेऊन दारात सकाळीच. घोट–घोट चहा घेतला. गाडीत बसलो. रस्त्यावरील खोपटातल्या हॉटेलात मिसळ चापली. पाणी प्यालो आणि शेजवार गांवे धरली. बऱ्हाणपूर नावाचे खेडेगाव. अगदी लखलखित. कुणाचेही पोस्टर नाही, कुणाचेही फलक नाहीत वा एकही भिंत रंगलेली नाही. फक्त एके ठिकाणी दुकानचे फळीवर खडूने लिहिले होते ‘जनता पक्षाचे उमेदवार संभाजीराव काकडे यांना मते द्या’ बस्स या. व्यतिरिक्त गावात काहीच नव्हते.

गाडी गावात आली तशी माणसे गोळा झाली, तक्रारी सुरू झाल्या. आम्हाला झेंडे नाहीत, पोस्टर्स नाहीत, दोन दोनदा हेलपाटे बारामतीस घडले पण सगळे संपले असे सांगितले. तेव्हा तात्या तुम्ही तरी झेंडे द्या हो!

द्यावेच लागणार आहेत. गावकऱ्यांचा निर्धार आहे कॉंग्रेसची गाडी गावात शिरू द्यावयाची नाही. (पण तेही योग्य नव्हे) गावच्या वेशीवर कमान करावयाची आहे. त्यावर झेंडे बांधावयाचे आणि ढोल–लेझमीच्या नादात संभाजीरावांची मिरवणूक काढावयाची आहे. सगळी तयार पण वेळ मिळणार काय येवढा? तेही खरंच आहे. पण संभाजीरावांना ५ मिनिटे का होईना, गावात आणा असा सांगावा.

होय होय करता निरोप घेतला. संभाजीरावांची या भागात ओळख कमीच. खुद्द बारामतीत ओळख कमी. पण रामाचे काम लक्ष्मण करतो. रामतात्या बारामतीत वकिली करत होता. तशात ७१ ची लोकसभा निवडणूक कोणाचा (घरचासुद्धा) आधार नसता लढवून कॉंग्रेसच्या त्या प्रचंड लाटेत अर्ध्या लाखावर मते मिळविलेला, त्याचे गावोगावी अशिल व ओळखी. सारं पणाला लावलेय.

आम्ही गावे हिंडलो. सुपा आले. गाडी पक्षाच्या कार्यालयापुढे उभी केली. १५-२० कार्यकर्ते आले. काय हालहवाल विचारता म्हणाले, नामदारांची कालच सभा झाली. (नामदार म्हणजे कृषिमंत्री शरद पवार) ४००-५०० लोक होते. पवारसाहेब म्हणाले की, आम्ही विरोधकांची दुरटुर २० तारखेपर्यंत खपवून घेऊ. येरवडा नाहीतरी आम्ही मोकळा केला आहे. तो परत विरोधकांना डांबून भरून काढू.

मामला गंभीर होता. ही प्रच्छन्न धमकी होती. कोणा लुंग्या सुंग्याने दिली असती तर एकवेळ समजता येईल, पण जबाबदार कॉंग्रेस कार्यकर्ते म्हणून व शासनाचा एक भाग असलेले पवार असे कसे बोलू शकतात? सारेच विचित्र. कदाचित असे ते म्हणाले नसतील असे वाटते. परंतु गावात चौकशी केली. पवार तसेच म्हटल्याचे ठामपणे सांगितले गेले. पुण्यातही गंजपेठेत त्यांचे असे वक्तव्य झाल्याचे कानावर होते. म्हणजे भीती घालून प्रचार चालला होता तर.

बरे बॅरिस्टरसाहेब काय बोलले?

ते म्हणाले प्रंतप्रधान स्त्री आहेत म्हणून सर्व स्त्रियांनी कॉंग्रेसला मते द्यावीत.

बॅरिस्टर पुढे म्हणाले की, जनतावाले म्हणतात आमचा जन्म तुरुंगात झाला. परंतु चार आयांना एक मूल होईल काय? (न ऐकलेला हवा) विरोधकांनी केले काय तर, आज पाच घेराव घातले, चार संप केले, इथं मोर्चा काढला. काय विधायक आहे त्यांचेजवळ? मुरारजी ८०, एसेम ७४, चरणसिंग असेच आणि जगजीवनराम तसेच.

बस्स.

बस्स. एवढीच सभा. ५ ॲम्बॅसिडर्स, ६ जीप्स् व एक टेंपो एवढा परिवार आला होता.

आम्ही कार्यकर्त्यांना दिलासा देऊन पुण्याकडे निघालो. हडपसरला मोहन धारिया भेटले. मांजरीला सभेला चालले होते. त्यांच्या कानावर पवारांची धमकी घातली आणि पुणे जवळ केले..

तब्बल महिनाभर बारामती मतदारसंघात प्रचारक म्हणून हिंडल्यानंतर त्याचा हिशेब करावयास हरकत नाही.

संभाजीराव काकडे खेड मतदारसंघात उभे राहणार होते व त्यांनी तिकडेच उभे रहावे असा खुद्द बॅ. गाडगीळ यांचा आग्रह होता. परंतु बारामती मतदारसंघात काकडे उभे राहिले याचा जबरदस्त परिणाम कॉंग्रेस कार्यकर्त्यांवर झाला.

काकडे यांचे राजकीय कार्य मर्यादित असले तरी, सामाजिक कार्य विलक्षण भारावून टाकणारे आहे. जिल्हाभर गावन्गाव माहीत. ओळखी जबरदस्त. तशात सहकारक्षेत्रात अग्रगण्य असलेल्या ह्या कार्यकर्त्याने सोमेश्वर व भवानीनगर या सहकारी साखर कारखान्यात कृषिमंत्री शरद पवार यांचा जबरदस्त पराभव केलेला व माळेगावचा कारखाना अर्धा हातात आणलेला. गावोगावी सोयरे-

धायरे हाही महत्त्वाचा भाग आहे.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरंदर, शिरूर, पिंपरी–चिंचवड, हवेली या भागात समाजवादी पक्षाचे प्राबल्य. त्याच्या जोडीला जनसंघाचे कार्य. आता ही मंडळी एकत्र आल्याने जो फोर्स निर्माण झाला आहे त्याला तोड नाही. पुरंदरचे जाधवराव व त्यांची यंत्रणा पाहिली की वाटते, हजारात एखादा असा कार्यकर्ता तयार झाला तरी पुरे. शिरूरला परत संच जमलाय, तर इंदापूरला सहकारमंत्री शंकरराव पाटील यांचे ५२ पासून विरोधात असलेले गणपतराव आवटे आजही विरोधातच आहेत. ५२ पासून अगदी ७२ पर्यंत त्यांना पडणाऱ्या मतांची वाढ आता पाच पटीवर आली आहे, तर रेल्वे नोकर संप, गावोगावी झालेल्या कामाने दौंड तालुका विलक्षण एकजीव झाला आहे.

चासकमान धरण योजना (शिरूर) अर्धवट लिफ्ट (हवेली) गटाचे नंबर (पुरंदर) बोनस व कारखाने बंद (पिंपरी-चिंचवड) उजनीचे पुनर्वसन (इंदापूर) तर कासा योजनेत अपहार (बारामती) असे स्थानिक वाद जनता पक्षाला फार उपयोगी आहेत. एवढेच कमी म्हणून वसुलीच्या जप्त्या, लिलाव व नसबंदीतील अत्याचार यामुळे जनता फार चिडलेली आहे. त्यांचा राग काँग्रेसवर आहे हे निश्चित. तशात बारामती मतदारसंघात काँग्रेसने सदैव पुण्याहून माणूस दिला याची चीड आहे. एकदा निवडून गेल्यावर परत कुणी फिरकतच नाही हा अनुभव व त्याची चीड. गाडगीळपेक्षा काकडे बरे असा वेगळाच प्रवाह वाहत आहे.

या सर्वांचा एकत्र उपयोग जनता पक्षाने केला आहे. काँग्रेसचा जातीवादी प्रचार त्यांच्यावरच अंगलट येणार आहे. काकडे एके ठिकाणी म्हणाले, 'मी मराठा व गाडगीळ ब्राह्मण म्हणून मतदान मला करू नका. त्यांनाच अपप्रचार करू द्या. आपण जातीपेक्षा विचारांची जात मानू.' गावोगाव त्याचा परिणाम एवढा झाला की, बघा मते मिळवावीत ती अशी. काँग्रेसच्या अंतर्गत गटाचा फायदाही जनता पक्षाला मिळत आहे. याशिवाय काँग्रेसचा भपका लोकांना खुपतो ते वेगळेच.

जनता पक्षाच्या वतीने या महिन्यात ३८० गावे प्रत्यक्षात घेतली. म्हणजे उमेदवार या गावी गेला. छोटचा-मोठ्या १०० सभा झाल्या. मोहन धारिया, एस. एम. जोशी, दुर्गाबाई भागवत, व्ही. एम. दांडेकर यांच्या सभांची उपस्थिती पाहिल्यावर जनमनाची कल्पना येते. अशा सभा, बैठकी चर्चेद्वारा सुमारे साडेतीन लक्ष मतदारांशी काकडे यांनी संपर्क साधला आहे. (अर्थात अद्याप १७ पर्यंत वेळ आहे, आणखी भेटीगाठी होतीलच) याचाच अर्थ ६ लक्ष २९ हजार मतदारांपैकी निम्म्यापेक्षा जास्त मतदारांनी प्रत्यक्षात काकडे यांना पाहिले आहे.

महत्त्वाचे म्हणजे या निवडणुकीतील वारेच काही वेगळे वाहते आहे व ते म्हणजे जनता वारे. ही लाट एवढी प्रचंड आहे की, त्यात गाडगीळ कसे तग धरणार हा प्रश्न आहे. गाडगीळ यांच्यासाठी यशवंतराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, शरद पवार, शंकरराव पाटील हे मंत्री प्रचारार्थ आहेत. परंतु चव्हाण-मोहिते सोडल्यास प्रवाही वक्ते कुणी नाहीत. काँग्रेसचे अंतर्गत गट, मागच्या खासदारांच्या मतदारसंघात परत न भेटण्याचे धोरण गाडगीळांना जड जात आहे. नसबंदी अत्याचारात गाडगीळांचा दोष नसेल, I. T. I.ला प्रवेश देण्यासाठी गाडगीळ यांनी प्रत्यक्षात पैसे घेतले नाहीत पण त्यांच्या छोटचा-मोठ्या चेल्यांची पापे गाडगीळ यांना फेडावी लागत आहेत, तर काँग्रेस कार्यकर्त्यांच्या वाह्यात बोलण्याने काँग्रेस मते घालवीत आहे. म्हणून निश्चित म्हणता येईल की, गाडगीळ, बारामती, इंदापूर व काहीसे दौंड या भागात निम्मे निम्मे मते घेऊ शकतील. परंतु पुरंधर, शिरूर, हवेली, पिंपरी, चिंचवड या भागात ते आज तरी सर्वस्वी पिछे आहेत. एकटा पुरंधर विभाग २५ हजाराचे मताधिक्य काकडयांच्या बाजूने उभे करील, तर शिरूर ८-१० हजार, हवेली ५-६ हजार, पिंपरी-चिंचवड १५ हजार मताधिक्य काकडे यांच्या बाजूने देतील असा अंदाज आहे. शिवाय बारामती, दौंड, इंद्रापूर येथे काकडे किमान ५०-५० टक्के मते घेतील. याचाच अर्थ बारामती लोकसभा मतदारसंघ काँग्रेसने ४० ते ५० हजार मतांनी आज तरी गमावला आहे. याचाच अर्थ असा होतो की, संभाजीराव काकडे ४०-५० हजार अधिक मते पडून विजयी होतील. □

---

# खुर्चीला खालूनच आग लागलेली आहे

पुरंदरे चंद्रशेखर

---

निर्बुद्ध, सत्तालोलुप आणि कातडीबचावू कुंपणप्रेमी यांच्या मेळाव्यात लाचार बुद्धिवंतांच्या डोमकावळ्यांना अवाजवी महत्त्व प्राप्त होईल यात नवल नाही. काळाचा महिमा असतो. Every dog has his day. बाईंच्या राजवटीत तर हे फारच प्रकर्षाने जाणवलेलं आहे. एकेकाळच्या 'किचन कॅबिनेट'मधल्या दिनेशसिंगला काम संपताच राजकारणाच्या पटावरून अदृश्य करण्यात आले. स्वर्णसिंग 'खास विश्वासातले.' त्यांना अस्तित्वशून्य बनवण्यात आले. आणि असेच अनेक. सध्या कायदामंत्री असलेले हरिभाऊ गोखले आणि बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ त्याच दिशेने झपाट्याने वाटचाल करीत आहेत.

पण गाडगीळांना वरून दणका बसण्याऐवजी मतदारच हिसका दाखवतील असं त्यांच्या मतदारसंघात हिंडल्यावर लक्षात येतं. तो मोक्षाचा क्षण गाडगीळांची वाट पाहत आहे.

एकतर ते 'बाहेरचे' आहेत. पुण्यातून उभं राहण्याची त्यांची ताकद नाही, हे सूर्यप्रकाशाइतकं लख्ख सत्य त्यांच्या पोरकट विनोदाच्या आणि बालिश शाब्दिक

फोटयांच्या लक्तरातून उठून दिसतं आहे. आणि त्यांच्या दृष्टीनं वाईट गोष्ट म्हणजे; हा त्यांचा भेकडपणा आणि त्यावर पांघरूण ओढायची केविलवाणी धडपड त्यांच्या मतदार संघातल्या खालच्यात खालच्या माणसाला कळलेली आहे, हे त्यांना कळलेलं नाही.

सर्वप्रथम गाडगीळांच्या विरुद्धात जाणारी राष्ट्रीय पातळीवरील कारणे पाहू. मग स्थानिक पातळीवरील कारणांचा परामर्श घेऊ.

भारतीय पातळीवरचा ( राष्ट्रीय नव्हे ) विवाद्य मुद्दा म्हणजे ज्याच्याबद्दल सच्च्या कॉंग्रेसजनांकडे खणखणीत खुलासा नाही, तो म्हणजे प्रिन्स ऑफ वेल्स संजय गांधी.

आईच्या हाताला धरून झपाटयाने वर आणलेला संजय जरा बाधकच ठरणार आहे. कोण संजय ?– हा लोकांचा पेटंट प्रश्न आहे. मारुती मोटारीचं शेपूट मोटारीसकट संजयला गुरफटेल एवढं लांबलेलं आहे. या चिरंजीवांना महाराष्ट्रात आणण्यासाठी गाडगीळसाहेबांनी केलेलं लांगूलचालन सर्वश्रुतच आहे. युवक मेळाव्यात, बलसाडला घडलेले अप्रशस्त प्रकार कॉंग्रेसला बाधणार आहेत. लाचारांच्या फौजेचे सेनापती शंकरराव चव्हाण यांची संजयची मर्जी राखता राखता उडालेली त्रेधातिरपिट, संजयने त्यांचे जाकीट ओढताच भाषणातील वाक्य अर्धे सोडून खाली बसणे, मागोमाग बॅग घेऊन अगतिकतेने धावत जाणे, त्यांच्या मागच्या मोटारीत बसणे ( मुख्यमंत्री आणि राज्यात आलेला पाहुणा हे नेहमी एकाच मोटारीत बसतात. पण संजय बोले दळ हाले – ; " संजय गांधी युवकांचेच नव्हे तर ) आमचेही नेते आहेत, त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करावे " हे 'आत्मा वीक उचल किंमत' उद्गार कॉंग्रेसला चांगलेच भोगण्याची शक्यता आहे. गोळया घालण्याची भाषा तर फारच महागात जाणार आहे.

आमच्या पोरांना दोन वेळ खायला नाही. गेली चार वर्षे ना नोकरी ना धंदा आणि गरिबी हटवणाऱ्या पंतप्रधानांचा बेटा धूमकेतूसारखा आला कोठून ? हा स्टँडर्ड प्रश्न सामान्यातला सामान्य शेतकरी–ना भारतीय जनता-विचारीत आहे.

वाकलेल्या कण्याची पाठ चुकीच्या दिशेने फिरवली किंवा वाऱ्याच्या दिशेचा अंदाज चुकला की आणखी वेगळे काय होणार ?

कुटुंबनियोजनान्तर्गत नसबंदी हा प्रकार बराच खळबळ माजवणारा ठरला. यामुळे कॉंग्रेसचीच नसबंदी होण्याची वेळ आलेली आहे. ठरलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी येनकेन प्रकारेण माणसे जमवण्यात आली. लग्नाचे वऱ्हाड ट्रकमधून चालले असले तरी, अडवून दाखला आहे का विचारून, नसल्यास सरळ ऑपरेशनकडे नेण्यात आल्याची उदाहरणे दुर्मिळ नाहीत. आणि हे अत्याचार ताजे आहेत. मागे बी. डी. ओ. आणि त्याचे साथीदार धावत आहेत आणि पुढे गावकरी जीव घेऊन पळत आहेत, घेतात; उसाच्या फडात दडत आहेत हे मनोरम दृश्य अनेकांच्या मनःपटलावर अजून ताजे आहे. माणसांना मेंढरासारखं वागवलं गेलं. माणूस म्हणून किंमत कमी करण्यात आली. ठरलेला आकडा पूर्ण करायचा म्हणजे वय पाहिलं नाही की संमती घेतली नाही. दिसला की कोंब जीपमध्ये असे प्रकार सर्रास चालू होते. या साऱ्यांची जबर किंमत कॉंग्रेसला मोजावी लागणार आहे. विचारणारा कोणी नसल्याने आणि उद्या याचे पांग फेडावे लागतील एवढी दूरदृष्टी मूलतःच अभावाने असल्याने कॉंग्रेसचा एवढया क्वालिफिकेशनवर १९ महिन्यांत मनचाहे कारभार पंतप्रधानांपासून गल्लीतल्या दादापर्यंत सगळयांनी करून घेतलेला आहे. आपल्या या दीन परिस्थितीला, अपमानित जिण्याला जबाबदार कोण याची लोकांना पूर्ण खात्री आहे. 'गाडगीळ' यांच्याकडे व्यक्ती म्हणून न पाहता ( अर्थात व्यक्ती म्हणूनही त्यांना फारशी किंमत नाहीच ) ते ज्या जुलमी राजवटीचे प्रतिनिधी म्हणून निर्लज्जपणे समर्थन करत आहेत, त्या राजवटीबद्दल, पक्षाबद्दल मत वाईट होत आहे. उलट गोष्ट काकडेंची आहे. एकतर अनेक वर्षे साखर कारखान्यात मुरल्यामुळे त्यांचे नाव शेवटपर्यंत पोचलेलं आहे. ५० झोपडया असणाऱ्या वस्त्यांपर्यंतसुद्धा 'काकडे' हे नाव पोचलेलं आहे. ३० वर्षे यांना कुरणं चरायला मोकळं सोडलं. बैलगाडीला एका बैलाच्या खांद्यावर फार भार पडायला लागला, तर तो बैलसुद्धा आपण बदलतो मग पक्ष बदलायला कोणती हरकत ?

आणीबाणी २० कलमी किंवा २५ कलमी (ती ५ कलमे इथे फारशी पोचलेली नाहीतच, पण सरपंचानाही '२० कलमं कोणती ते माहीत नाही) यापैकी कशानंही फायदा झालेला नाही. जर काही निर्माणच केलं असेल, तर ती फक्त दहशत. लोक अजूनसुद्धा मोकळेपणानं बोलत नाहीत. अगदी ग्रामीण भागातले बोलतात, पण सोमेश्वर सारख्या ठिकाणी फार जपून, शब्द तोलूनमापून वापरतात. ही परिस्थिती ज्यांनी निर्माण केली त्यांनाच परत निवडून दिल्यास ते काय करतील याबद्दल सगळयांनाच भीती आहे. काकडेंचा फ्लॅश-पॉइंट म्हणजे त्यांना हा दुहेरी फायदा आहे. गाडगीळांच्या मागे (म्हणजे तसं कोणत्याही कॉंग्रेसच्या उमेदवाराच्या मागे) फक्त बाईंचं पोस्टर आहे. कॉंग्रेस नको म्हणून आणि काकडे हवेत म्हणून या दोन कारणांनी खालचा माणूसही 'जनतेला' अनुकूल आहे.

ग्रामीण भागातली गठ्ठा मतं, गावच्या गावं कॉंग्रेसला, हा प्रकार विसरला पाहिजे. पोटाची आग सगळा शहाणपणा शिकवते. तिथं ग्रामीण आणि शहरी हा भेद करण्यात अर्थ नाही. जागृती वगैरे शब्द त्यांना माहीत नसतील, पण ते जागे आहेत. अपुऱ्या साधनांनिशीही त्यांनी परिस्थितीची दिशा ओळखली आहे. पृथ्वीवर साक्षात स्वर्ग निर्माण झाल्याची रेडिओ कितीही ग्वाही देत असला, तरी प्रत्यक्षात हातात काय मिळतंय् यावर त्यांनी मतं बनवलेली आहेत. अर्थात त्याला पर्यायच नाही. या सरकारनं जर काही आणीबाणीत किंवा उच्च पदस्थांनी ह्यापूर्वी केलं असेल तर विश्वासार्हता गमावली. माझा देश माझं सरकार ही भावनाच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. आपल्या सरकारच्या प्रामाणिकपणाबद्दल साशंक असणं यासारखी वाईट गोष्ट दुसरी नाही. मग स्वातंत्र्याने आम्ही मिळवलं काय ? जर हे सरकार मी माझं म्हणू शकत नसेन; त्याच्यावर पूर्णतः विश्वास टाकू शकत नसेन आणि आज तशी परिस्थिती आलेली आहे– तर यांनी ३० वर्षांत केलं काय ? हा जनतेच्या मनातला संदिग्ध प्रश्न आणि या साऱ्याबद्दलची असाहाय्य चीड मतपेटीद्वारे व्यक्त होईल अशी परिस्थिती आहे.

गाडगीळांचा प्रमुख भ्रम म्हणजे गावोगावच्या सरपंचावर भिस्त टाकून हे गृहस्थ

थातुरमातुर विनोद करत प्रमुख ठिकाणी बसलेले आहेत. आणि अगदी आतल्या सोडाच पण बऱ्यापैकी दूर असणाऱ्या खेड्यात येण्याचे श्रम त्यांनी घेतलेले नाहीत. याचा परिणाम उघड आहे. एक तर जनता 'हवा' आतपर्यंत पोचलेली आहे आणि दुसरं म्हणजे सांगवी सांडस या हवेली तालुक्याच्या शेवटच्या गावी आमच्या सभेचा अध्यक्षच सरपंच होता. तर राहू या मोठ्या गावात (२५०० मते) काकड्यांच्या प्रचाराचं पहिलं भाषण तिथल्या युवक कॉंग्रेसच्या अध्यक्षानं– मुकुंद कुल -याने केलं. तेव्हा खुर्चीला खालनंच आग लागलेली आहे.

या प्रत्येक ठिकाणी माजी आमदार रामभाऊ तुपे आणि आजी आमदार जाधवराव कळकळीनं प्रचार करत आहेत. जाधवरावांचं अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण मी वाल्ह्याला ऐकलं. आणीबाणीनंतर किमती १२ पटीने वाढल्या. २०० रु. टन मिळणार खत २००० रु. टन झालं. किर्लोस्कर इंजिन २२०० रु.चे ४५०० वर गेलं. बेकार ५१–५२ लाखांचे ९९ लाखांपर्यंत पोचले (हे केवळ नोंदलेले). सरकारला शेतकऱ्यांकडून येणे ७१ ला जे १ कोटी ६२ लाख होते, ते गरिबी हटवण्याच्या दैदिप्यमान कार्यक्रमानंतर ७६ ला फक्त ४०,००० करून ८ कोटी झालं. आणि शेतकऱ्यांकडून विकत घेतला जाणारा माल– त्याची किंमत मात्र तीच राहिली. ज्वारी जर तेव्हा सरकार रुपयाला खरेदी करत असेल तर आज रुपयालाच. याचा अर्थ क्रयशक्ती कमी झाली. आणि हा प्रकार हे दोन आमदार व्यवस्थितरीत्या लोकांच्या कानावर घालत आहेत. या घसरगुंडीला जबाबदार कोण? निवडणुका आता का घेतल्या? त्या काही लोकशाहीवर मोठं प्रेम आहे म्हणून नव्हे तर परिस्थिती अधिक गंभीर झाली असती म्हणून. हे सारे शहरी लोकांनाच कळेल. गावाकडची 'जन्ता' 'नका विसरू गायवासरू!' तर तसं नाही. फुलगावमध्ये 'आता विसरू गायवासरू' अशी घोषणा मी वाचली.

फुलगावमधली एक घटना फारच मनोरम आहे. आम्ही तिथे पोचलो तेव्हा त्यावेळेलाच तिथल्या देवळांमध्ये श्री. खांदवे (सभापती) काही जणांना जमवून कॉंग्रेसची ध्येयधोरणे सांगत होते. काकडेंनी 'त्यांचं होऊ द्या, मग आपण बोलू.' असं म्हटलं आणि आम्ही देवळाच्या बाहेरच बसलो. मी आतमधली माणसं मोजली. ती एकूण ३० होती. काकडे आल्याचं कळताच त्यातील २७ जण उठून बाहेर आले आणि गावातून भराभर लोक जमा झाले आणि काकडेंची प्रचारसभा सुरू झाली. आतमध्ये श्री. खांदवे आणि दोघेजण निमूटपणे ऐकत बसलेले होते. करणार काय? याच फुलगावात पाटोळे या हरिजनावर इथल्या युवक कॉंग्रेसच्या पराक्रमी अध्यक्षाने काही दिवसांपूर्वी फटफटी घातली. त्या पाटोळेचा अपराध तो हरिजन असणे एवढाच होता.

कर्जवसुलीची जप्ती हा एक प्रकार भयानक आहे. आताच सांगितल्याप्रमाणे कर्जे वाढत गेलेलीच आहेत. ४७–४८ ला ज्या गावात ४।५ जण कर्जबाजारी होते, त्या ठिकाणी आज ४।५ जणच (गावाची लोकसंख्या वाढूनही) कर्जात न अडकलेले दिसतील. लिफ्ट या प्रकाराने या लोकांना अस्मानच दाखवलंय. या कर्जवसुलीची जप्तीही निर्दयपणे होते. ४।५ वर्षांपूर्वी जप्ती करणारा आल्यास गावातील प्रतिष्ठित माणसे त्याला सांगू शकत होती की, 'गरीब माणूस आहे. कर्ज आज ना उद्या फेडेल. परिस्थितीनं नाडला आहे. जप्ती करून संसार उद्ध्वस्त होईल.' आणि सावकार परत जात होता. आज तशी प्रतिष्ठाच कोणाला राहिलेली नाही. एकतर सगळेचजण त्याच बुडणाऱ्या बोटीत बसलेत आणि दुसरं म्हणजे 'असं काय? चल मिसाखाली!' असं उत्तर येतं. मग कोण फुकट गावाची उठाठेव करेल? त्यामुळे घरामागून घरे भिकेला लागली. आणि गावामागून गावे देशोधडीला लागली. कुणी हाकावी, कुणी फुकावी अशी परिस्थिती होऊनसुद्धा परत आमच्याच देशात आमच्याच सरकारच्या कृपेने तोंड उघडायची ताकद नव्हती. त्यामुळे हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार लोकांनी १९ महिने सहन केला. पण एकेक करून जमवलेलं भांड आणि थोडंथोडं करून बसवलेलं घर जेव्हा ताशाभराच्या अवधीत होत्याचं नव्हतं होतं, गावातील प्रतिष्ठा जाते, अक्षरशः अंगावरच्या कपड्यांशिवाय काहीही शिल्लक राहू नये अशी परिस्थिती येते (आणि अशी परिस्थिती आलेली आहे.), तेव्हा माणूस आक्रमक बनतो.

'केज' गावचा एक किस्सा आमदार जाधवरावांनी सांगितला. फौजदारसाहेबांना २०० रु. लाच हवी होती. घर धुऊन गेलेलंच होतं. बायकोनं मंगळसूत्र विकून १२६/– मिळवले तरी फौजदारांनी काही तिच्या नवऱ्याला सोडलं नाही. २०० टाक हा त्यांचा धोशा. शेवटी प्रकरण चिघळलं. तेव्हा फौजदाराची बदली केली पुण्याला. फौजदारसाहेबांचे हात वरपर्यंत पोचलेले. बदली रद्द झाली आणि परत आमदार जाधवरावांनी सांगितल्यावरून मुख्यमंत्र्यांनी फौजदाराला हलवला. पण प्रत्येक खालच्या माणसामागं कोण पुढारी उभा रहाणार? जाधवराव एक विरोधी पक्षाचे म्हणून उभे राहिले. बाकी कोणाची काय गॅरंटी?

नंतर बेघर आणि भूमिहीनांसाठी घर बांधण्याचा फार्स मध्यंतरी माननीय इंदिरा गांधी यांच्या गरिबांच्या कळवळ्यामुळे जोरात पार पडला. सरकारने प्रत्येक झोपडीसाठी २०० रु. मंजूर केले. आधीच कडक आदेशांनी गांजलेल्या सरकारी नोकरांनी– गवंड्यांनी किंवा मजुरांनी नव्हे–ह्या झोपड्या २ महिन्यांच्या आत बांधून झाल्याचा रिपोर्ट तारेने करायचा. तेव्हा कारकुनांनी घमेली वाहिली. ज्यांच्यासाठी हे चाललं होतं, त्यांचं सहकार्य या बाबतीत शून्य मिळालं. आता ज्याला मटेरिअल मिळाल्यावर घर बांधता येतंय तो सरकारी कारकून कशाला झाला असता? तो इंजिनीअरच झाला असता. पण भारताचा आत्माच असणाऱ्या इंदिराजींच्या आदेशाने कारकुनांनाच काय थोटयांनासुद्धा इमारती चढवता येतील. या झोपड्या एवढ्या भक्कम की, १५ दिवसांच्या आत भुईसपाट. यापायी किती खर्च झाला? आणि रिटर्न काय मिळाला? हा पैसा आमचाच आणि परत बेघर आहोतच. 'श्रीरामपूरला मुख्यमंत्र्यांनी उद्घाटन केलं आणि जाणाऱ्या

## अशी परिस्थिती येते तेव्हा माणूस आक्रमक बनतो....

जीपच्याच वाऱ्यानं झोपड्या जमीनदोस्त. तेव्हा सरकारची अदूरदृष्टी, अनियोजकता, मोठ्या कौशल्याने चांगल्या आणि होत आलेल्या कामांचा विचका करण्याची बिनतोड पद्धती, अद्वितीय दिरंगाई या गोष्टी गाडगीळसाहेबांना अनुकूल असतील असं त्यांनासुद्धा वाटत नसेल.

तोच प्रकार सीलिंगचा. माणसी ५४ एकर पेक्षा जास्त जमीन ठेवता येत नाही. उरलेली सरकारला द्यायची. ती कोणती द्यायची यावर बंधन नाही. तेव्हा हुशार लोकांनी डोंगर आणि माळरानं सरकारला बहाल केली आणि गरिबांना वर आणायला टपलेल्या सरकारने ती भूमिहीनांना वाटून दिली. यामुळे प्रश्न खरोखर सुटला का? यामुळे कुठलं तरी एक कलम पूर्ण झालं का? हे सारे प्रश्न जनतेच्या मनात आहेत. मग हा स्टंट कशासाठी?

ज्यांनी आयुष्यभर काँग्रेसला मत दिलं, विरोधी पक्ष म्हटल्यावर ज्यांनी उपेक्षेचं हसू फेकलं असे ७०-७० वर्षांचे लोकही जेव्हा आपलं मत बदलायची भाषा करतात, तेव्हा त्यात उथळ बुद्धीचे लोक म्हणतात त्यापेक्षा काही अर्थ असला पाहिजे. शिंदे मळा या डोंगरगाव नावाच्या छोट्या वस्तीनंतरच्या आणखी छोट्या वस्तीतल्या १०० वर्षांच्या म्हाताऱ्या स्त्रीनं जेव्हा काकड्यांना आशीर्वाद दिला, तेव्हा गाडगीळांचा विजय मृगजळाच्या आसपासचा आहे, असं म्हणायला हरकत नाही.

केळवडं म्हणून गावातल्या घटनेवरून काकडेंची कामं करण्याची पद्धत पाहता येईल. हे गाव पहिलवानांचं. घरटी एक पहिलवान आणि गावात दोन जबर विरुद्ध पार्टीज्. जरा काही कुरबूर झाली की, लोक हमरीतुमरीवर येतात आणि लगेच मारामारीला बिनाविलंब सुरुवात होते. त्यामुळे कोर्टात या गावाचे एकूण ६५ खटले दाखल होते. त्यातले ३५ दिवाणी, ३० फौजदारी. हे सगळे खटले देवळात सगळ्या लोकांना एकत्र जमवून शपथेवर काढून घ्यायला लावले. परत आपली भांडणे आपसातच मिटवणार असे आश्वासन घेऊनच काकडे परतले.

संपूर्ण दौऱ्यातल्या भाषणात कोठेही अनुचित, असभ्य शब्द उच्चारलेले मी ऐकले नाही. वातावरण किती बदललंय याचं उदाहरण वाघोली गावात मिळालं. हे विठ्ठलराव सातवांचं गाव. इथं मागच्या निवडणुकीपर्यंत विरोधी पक्षाचं पोस्टरसुद्धा लागलेलं नसे, आज तिथं काँग्रेसचा झेंडा नाही.

जिथे जिथे आम्ही फिरलो, तिथे तिथे युवकांचा खरोखर लक्षात येईल, एवढा सहभाग जाणवला. कोणत्याही गावात सभेच्या व्यवस्थेसाठी एकही पैसा स्थानिक कार्यकर्त्यांना खर्च करावा लागलेला नव्हता; लाऊडस्पीकर्सची व्यवस्था मोफत करण्यात आलेली होती. डोंगरगावासारख्या ठिकाणी लोकांनी रस्त्यावर येऊन आत ओढून नेल्याने कार्यक्रमात मूळ नसलेल्या, पण वाटेवर असलेल्या अनेक गावांमध्ये भाषणं द्यावी लागली. 'पाचच मिनिटे, चारच शब्द' असं करता करता ३-३ तास, मग ६-६ तास, आणि अखेर तर, १२-१२ तास उशीर होत गेला. पण प्रत्येक ठिकाणी लोक तिष्ठत थांबलेले होते. आल्या आल्या अनेक ठिकाणी सुवासिनींनी ओवाळणे, लोकांच्या घोषणा, ढोल-लेझिमची मिरवणूक, गुलाल उधळणे, अशा रीतीने समारंभपूर्वक सभास्थानी नेण्यात आले. गावाच्या लोकसंख्येच्या मानाने सभेला गर्दी पुरेशी असे. 'दीड माणसाची हुकूमशाही', 'मत प्राण्याला का माणसाला' ह्या आवाहनांना कडाडून टाळी मिळे.

सांगवी सांडस या गावी आदल्या दिवशीच खांदवेसाहेब येऊन गेले होते. त्यांना एक माणूस भेटला. त्यांच्याशी ते बोलले आणि सांगवी सांडस गाडगीळांना बहाल करून गेले. दुसऱ्या दिवशीच्या आमच्या सभेचे अध्यक्ष सांगवी सांडसचे सरपंच होते. हे हवेली तालुक्यातले शेवटचे गाव. लगेच भीमेचे कोरडे पात्र ओलांडले की, शिरूर तालुका सुरू होतो; तिथल्या विठ्ठलवाडीत तर फारच दणदणीत सभा झाली. जनता पक्षाच्या निवडणूक निधीला २०१ रुपयांपर्यंत देणग्या जाहीर झाल्या. बऱ्याचशा अनामिक. न्हावी सांडसला अरुण शितोळेचे सुंदर भाषण झालं. अनंतराव पाटील या खासदारसाहेबांचं निवडणुकीच्या आधीसुद्धा दर्शन झालेलं नाही, मग नंतर कशाला फिरकतील? गाडगीळांची तीच परिस्थिती. खालच्यांत खालचा माणूस- मतदार हा राजा आहे, त्याच्या जोरावर आपल्या कोलांट्या चालल्या आहेत आणि त्याला विचारायला आपण निवडणूक तोंडाशी आल्यावरसुद्धा जाऊ नये, या मगरूरीची मला कमाल वाटली. किमान मतांची भिक्षा मागायला जायला जे तयार नाहीत, त्यांनी एकदा डोळसपणे सुद्धा आपल्या जमेचा हिशेब करणे आवश्यक आहे.

फुलगावलाही यांनी एजंट पाठवले होते. 'मी स्वत: उमेदवार तुमच्याकडे आलो आहे; एजंटांवर सोपवलेले नाही,' असं जेव्हा काकड्यांनी तिथं सांगितलं तेव्हा लोकांनी टोमण्याला बरोबर दाद दिली. हा जनतेचा खरोखर अपमान आहे. दुसरा अपमान म्हणजे खेड्यातले लोक निद्रिस्त आहेत, हे जाहीर करणे. वस्तुस्थिती तशी नाही. पुस्तकी विद्येतच जर शहाणपण येत असतं तर जगाचा इतिहास बदलला असता. शेतकऱ्याला बुद्धी नाही असं धरून चालणं आणि तो डोळे झाकून गायवासरावर शिक्का मारणार हे गृहीत धरणं धोक्याचं ठरणार आहे. जे लोक १२-१२ तास आपल्या उमेदवारासाठी तिष्ठत बसतात ते काय उगीच? तुमच्या सत्तेचा आता जनतेला वीट आलेला आहे; त्यात तुमचे पट्टीचे वक्ते वातावरण बिघडवून ठेवत आहेत.

वाल्ह्याला आपल्या विशुद्ध चारित्र्याबद्दल प्रसिद्ध असणाऱ्या शंकरराव उरसळांचं भाषण झालं. आणि होती नव्हती ती मत मिळण्याची धास्ती निर्माण झाली. 'उरसळ आले आणि मटण खाऊन गेले,' अशी त्यांच्या आगमनाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली. त्या प्रोग्रॅममध्ये तो वाडी म्हणून जवळच्या गावी असल्याने, उरसळांना तिकडे जाण्यात जास्त इंटरेस्ट होता! गाडगीळांनी अर्थातच येण्याची तसदी घेतलेली नव्हतीच.

याच मतदारसंघात पिंपरी-चिंचवड हा औद्योगिक भाग येतो. संजयबाळानं बोनसचं लोणी पळवलं, त्यामुळे कामगार अस्वस्थ आहे. या भागातला हिंगे म्हणून कार्यकर्ता. तो गेले ६ महिने एक साप्ताहिक सुरू करण्याच्या प्रयत्नात आहे. तर राजकारणाचाच एक भाग आणि याची मत विरुद्ध म्हणून 'साप्ताहिकाचं नाव अमान्य' या कारणाखाली त्याला तंगवत ठेवलेलं आहे. माझी मतं इतरांना माहीत असल्यानं काँग्रेसचे लोक जे मित्र आहेत- ते सुद्धा लपूनछपून येतात. उघडपणे किंवा रस्त्यात ओळख दाखवत

नाहीत. आणीबाणीनंतरची कडक शिस्त ही अशी आहे. परत यांच्या जागेच्या, आरोग्याच्या अडचणी आहेतच, त्यांच्यावर काहीही उपाययोजना झालेली नाही. त्यामुळे यानंच १०-२० जणांना हाताशी धरून काकडयांच्या प्रचारासाठी कॉर्नर मीटिंग्ज सुरू केल्या आहेत.

एकूण हा भागही गाडगीळांना त्रासदायक ठरणार आहे. मुळात कार्य काही नाही. त्यात राहायला एकीकडे, उभे एकीकडे. त्यात निवडणूक लढवायची म्हटली की, गावोगाव जाणं आवश्यक, तर तेही नाही. अशा परिस्थितीत आणीबाणीचे १०० फायदे असतील, पण निवडणूक हरण्याचा जबरदस्त एकच तोटा होण्याची पाळी आली आहे.

स्थानिक कारणे अधिक कर्तृत्ववान संजय गांधी, सक्तीची नसबंदी, फसलेला आर्थिक कार्यक्रम यामुळे देशातच जी हवा निर्माण झालेली आहे, ती महाराष्ट्रातल्या या खेडोपाड्यातही पोचलेली आहे.

तेव्हा आहे ही परिस्थिती अशी आहे.

समाजाला सगळ्यात जास्त धोका या लाचार बुद्धिवंतांचा असतो. एखाद्या सत्तेच्या तुकड्यासाठी बुद्धी विकणारे बेशरमपणे कोणत्याही धर्माचा उदोउदो करत असतात. बाटग्यांना नव्या धर्माचा पुळका त्या धर्मात पिढ्यान् पिढ्या असलेल्यांपेक्षा जास्त असतो. कोणती झूल आपल्याला शोभेल याचा विचार न करता जेव्हा माणूस अकलेचे तारे तोडू लागतो, तेव्हा त्याला फार काळजीपूर्वक दूर करावे लागते. अगदी अन्तर्मनातील सदसद्विवेकबुद्धीची जाणीव एकदा उखडून टाकली म्हणजे पिसाट अभिनिवेशाने मान लववायची एवढेच यांचं कर्तव्य असतं. गाडगीळ हे काम आजतागायतो करत आलेले आहेत, इमानेइतबारे करत आलेले आहेत. आणि मंत्रिपदाचं आमिष समोर लोंबत असताना त्यांना जीवाच्या करारानं 'इंदिरावाक्यं प्रमाणम्' या उद्घोष करण्याखेरीज गत्यंतर नाही.

आजच्या युगातला सर्वांत मोठा प्रश्न कोणता असेल, तर सत आणि असत यांच्या व्याख्या अस्पष्ट झाल्या आहेत. सरळ सत विरुद्ध सरळ असत कोठेही ठाकलेले नाही. तसं असल्यास काम सोपं असतं. पण जेव्हा दोन्हीच्या कमीजास्त मिश्रणाच्या दोन नमुन्यांमध्येच choice असतो, तेव्हा 'बुद्धिः परपीडनाय' ज्यांनी वापरली आणि लव्हाळ्यासारखं दीर्घायुष्य लांगूलचालनाच्या जोरावर ज्यांनी मिळवलं, त्या गोखले—गाडगीळांपेक्षा जेठमलानी—काकडे शतपटीनं चांगले ठरतात.

एक इतिहास सोडला तर आज आमच्याकडे काही नाही. आणि इतिहास जेवायला घालत नाही. बंगाल, पंजाब, महाराष्ट्र यांनी एकेकाळी हिन्दुस्थान हलवला. आज आमच्या पिढीला महाराष्ट्रात आपण राहातो याची लाज वाटायला लागली आहे. असेच थुंकी झेलणारे गुलाम जर ४०-४० च्या संख्येने दर पाच वर्षांनी आम्ही पाठवणार असू, तर हुकूमशाहीविरुद्ध ओरडण्याचा आम्हाला काहीएक अधिकार नाही.

जी-हुजूरांचं सैन्य बाईच्या आसपास खूप आहे. आपण यातला एखादा शिलेदार घरी बसवला तरी बिघडत नाही. □

# हवा हवेलीतली !

सतीश कामत

असा एक अनुभव आहे की, इतर कोणत्याही प्रकारच्या बदलापेक्षा हवेतला बदल माणसाला फार लवकर जाणवतो. अर्थात या हवेचेही प्रकार अनेक असतात. राजकारणातली हवा हाही एक अनुभवावा असा प्रकार. नुकतेच दोन दिवस मी बारामती मतदारसंघातल्या अठरा—वीस लहान लहान गावांचा धावता दौरा केला —केवळ याच उद्देशाने—काकडे—गाडगीळ द्वंद्वाचा जरा कानोसा घ्यावा. खरोखरच एक अनपेक्षित असा सुखद धक्का बसला. याचं पहिलं कारण म्हणजे ज्या ग्रामस्थांना आम्ही खेडवळ म्हणून हिणवतो, अडाणी समजतो ती मंडळी आमच्यापेक्षा बरीच शहाणी असल्याचं माझ्या लक्षात आलं. स्वतःचं हित—अहित तर त्यांना कळायला लागलंच आहे, पण त्याचबरोबर चांगला—वाईट पक्ष किंवा माणूसही त्यांना कळतो. दुसऱ्याच्या सांगण्यावरून तसं वागायला ही मंडळी आता फारशी राजी नाहीत; त्यांच्याच भाषेत सांगायचं तर—'आता आमी बगा, बाप दाखीव न्हाई तर श्राद्ध कर असाच पवित्रा घेतलाय्.'

लोणीकंद हे हवेली तालुक्यातलं एक गाव. सकाळी दहाचा सुमार. संभाजीराव काकड्यांची प्रचारसभा त्या ठिकाणी होती. सभेला गर्दी चांगलीच होती. माजी आमदार रामभाऊ तुपे यांनी प्रास्ताविक भाषण केलं. नंतर संभाजीराव बोलले. जनता पक्षाची या निवडणुकीमागची भूमिका त्यांनी विषद केली. 'हा झगडा जनता पक्ष अणि काँग्रेस किंवा संभाजीराव काकडे आणि विठ्ठलराव गाडगीळ यांच्यात नसून दोन तत्त्वांमध्ये आहे, दोन मूल्यांमध्ये आहे: एक लोकशाही आणि दुसरं हुकूमशाही. मित्रांनो, आपल्याला याचाच निवाडा करायचा आहे.' गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर उत्स्फूर्त प्रतिसाद दिसत होता. सभा संपली. संभाजीराव फुलगावला जायला निघाले. इतक्यात पांढरी फियाट थांबली. सगळ्यांचं लक्ष तिकडे गेलं. गाडीतून पु. ल. देशपांडे उतरले. पांढरा लेंगा, पांढरा झब्बा. औरंगाबादच्या प्रचारसभेत भाषण करून ते पुण्याकडे परतत होते. वाटेत जनता पक्षाच्या झेंड्याखाली जमलेली माणसं पाहून त्यांनी गाडी थांबवली. थोडीशी पांगलेली मंडळी पुन्हा जमली. पु. लं. नी भाषण सुरू केलं. 'आज माझ्या ग्रामीण जनतेच्या दर्शनाचा असा अचानक योग आल्याचं पाहून मला पुंडलिका भेटी परब्रह्म आल्याचाच साक्षात्कार होत आहे.' प्रवासाचा किंचित शिणवटा चेहऱ्यावर दिसत होता. पण समोरचा जनसमुदाय ऐकायला

आतुर होता. पु. लं. नी सुमारे पंधरा मिनिटं उत्कृष्ट भाषण केलं. सर्व श्रोते-मंडळी आनंदित झाली. जनता पक्षालाच मतं देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झालं.

खरं म्हणजे आजच्या कार्यक्रमात डोंगरगावला थांबायचा विचार नव्हता. पण गावचे माजी सरपंच दिनकर बाळाजी गायकवाड आपल्या गावकऱ्यांसमवेत रस्त्यावरच सामोरे आले. संभाजीरावांना त्यांनी लवून नमस्कार केला आणि गावात चलण्याची विनंती केली. 'मतदार हाच लोकशाहीतला एकमेव राजा असतो,' असं मानणाऱ्या संभाजीरावांना ही विनंती झिडकारणं शक्यच नव्हतं. सभा झाली. साऱ्या गावाने एकमुखाने जनता पार्टीला पाठिंबा दिला. या सभेचं वैशिष्ट्य म्हणजे इथे स्त्रियाही फार मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बुरके गावात थोडा वेळ कार्यकर्त्यांशी बातचीत झाली. तिथे एक धक्कादायक बातमी समजली. गावातल्या ३ वॉर्डसपैकी एका वॉर्डमधल्या मतदारांची नावनोंदणीच निर्वाचन समितीच्या प्रसिद्धिपत्रकात झालेली नव्हती. यामध्ये ग्रामस्थांचाही थोडासा हलगर्जीपणा असला तरी सरकारी अधिकाऱ्यांच्याही हे लक्षात कसं आलं नाही, याबद्दल अनेकांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. गेल्या निवडणुकीतील 'शाई' चीही आठवण यावेळी झाल्याशिवाय राहिली नाही. एकंदरीत राजकारण रंगू लागलं होतं – कधी काळ्याचं पांढरं, कधी पांढऱ्यावर काळं !

यानंतर पिंपरी सांडस, न्हावी सांडस, सांगवी सांडस या हवेली तालुक्यातल्या अतिपूर्वेकडील गावांमध्ये सभा झाल्या. ( त्या तिन्ही नावांच्या शेवटी आलेला 'सांडस' हा शब्द 'सांडत' या शब्दाचा अपभ्रंश आहे. आणि त्याचा अर्थ मुद्दाम न वसवलेली, अगदी सहजपणे, माळेतल्या मोत्याप्रमाणे किंवा पावसाच्या थेंबाप्रमाणे सांडत गेलेली गावं असा आहे. ) प्रत्येक ठिकाणी जोरदार स्वागत होत होतं. ढोल-लेझिमच्या तालात मिरवणूक काढली जात होती. गावकरी गुलाल उधळत, बेभानपणे नाचत होते. स्त्रिया पंचारती ओवाळत होत्या. उत्साहाचं एक नवं उधाण सर्वत्र आलं होतं. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर झालेल्या १९५७ च्या निवडणुकीच्या वाऱ्यापेक्षाही 'हे वारं काही निराळंच आहे,' हे त्या चळवळीत सक्रीय भाग घेतलेले आणि नंतरच्या निवडणुकीतही आमदार म्हणून निवडून आलेले अनुभवी असे रामभाऊ तुपेही कबूल करत होते. 'ज्यांचं कधी तोंडही पाहिलं नाही, अशा कांग्रेसवाल्यांना आम्ही आजपर्यंत मतं देत आलो. पण आता मात्र मी असं सार्वजनिकरीत्या जाहीर करतो की, 'आमचा हा सर्व भाग जनता पक्ष-व्याप्त प्रदेश' म्हणूनच ओळखला जाईल.' छत्रपती शिवाजी तरुण मंडळाचे व्यवस्थापक श्री. अरुण शितोळे यांनी टाळ्यांच्या कडकडाटात जाहीर केलं. लोकसभेला उभा राहिलेला उमेदवार पाहायला मिळण्याचा हा पहिलाच योग आहे, असंही त्यांनी सांगितलं.

शिरूर तालुक्यातील विठ्ठलवाडीलाही एक जोरदार सभा झाली. श्री. बाबूराव दौंडकर हे या भागातले अत्यंत तडफदार नेते. संभाजीरावांकडून एकही पैसा न घेता त्यांना दिल्लीच्या तख्तावर नेऊन बसवण्याचा निर्धार त्यांनी सर्व गावकऱ्यांच्या तर्फे व्यक्त केला. एवढंच नाही तर सभा संपेपर्यंत जनता पक्षाच्या निवडणूक निधीला मदत म्हणून ५०१ रु. संभाजीरावांच्या हातात ठेवले सुद्धा ! साऱ्या गावाचंच संभाजीरावांवर अलोट प्रेम. प्रत्येक जण हातात हात मिळवायला धडपड करत होता. संभाजीरावही सुहास्य वदनाने प्रतिसाद देत होते.

रात्री टाकळी आणि वडगाव-बांडेला सभा झाल्या. 'आमी सगळे संभाजीलाच मत देणार !' गावच्या वयोवृद्ध पाटलांनी गर्जना केली. रात्री १२–१ चा सुमार. पण तरीही गर्दी कमी नाही. गावात वीज नाही म्हणून गॅसबत्तीच्या उजेडात मिरवणूक निघाली. संभाजीराव प्रेमळपणे 'नको, नको' म्हणत असतानाही गावच्या मारुतीच्या देवळापर्यंत वाजतगाजत, घोषणा देत निरोप देण्याचा हट्ट गावकऱ्यांनी सोडला नाही.

एव्हाना रात्रीचे दोन वाजले होते. गाडी केसनंद आणि वाघोलीच्या दिशेने धावू लागली. केसनंदला पोचल्यावर मला आश्चर्याचा धक्काच बसला. इतक्या रात्रीसुद्धा २५–३० तरुण मंडळी आमची वाट पाहत गावच्या वेशीवर थांबली होती. अर्थात मुळची वेळ टळून गेल्यामुळे आणि बराच उशीर झाल्याने जमलेल्या समुदायापैकी बरेच जण निघून गेले होते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी परत येण्याचं आश्वासन देऊन वाघोलीला आलो. तिथेही अशीच २५–३० लोक वाट पाहात, ताटकळत बसलेली. त्याही ठिकाणी दुसरा दिवस आणि वेळ ठरवली आणि गावकऱ्यांनी अत्यंत प्रेमाने दिलेल्या अल्पोपाहाराचा आस्वाद घेऊन पहाटे चारच्या सुमारास पुण्याकडे निघालो.

## दौंडमधली घोडदौड

दौंड तालुक्यातील प्रचारसभांचा प्रारंभ डाळिंब या गावापासून झाला. गावाकडे जात असतानाच नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेमध्ये काम केलेले श्री. सुदाम म्हस्के यांची गाठ पडली. आदल्या दिवशी 'येतो' असं सांगूनही न गेल्यामुळे सुदामराव अंमळ रागावले होते. पण रामभाऊ तुप्यांनी त्यांची समजूत काढली. अर्थात सुदाम म्हस्के ही एक पाहण्यासारखी व्यक्ती. अत्यंत निष्ठावंत आणि स्पष्टवक्ते. कांग्रेसने आजपर्यंत आपणा सर्वांना कसं फसवलं आहे, हे त्यांनी सर्व गावकऱ्यांना अत्यंत सोप्या भाषेत आणि उत्कृष्टपणे सांगितलं. त्यांच्यावर गावकऱ्यांचीही मोठी भक्ती. एकाने मला सांगितलं– 'सुदामराव सांगत्याल तसं आमी करनार. त्यांनी आमाला सांगितलंय्, शेतकऱ्यावर शिक्का मारा म्हनून. आमी मारनार.' असं सबंध गावचं प्रेम किंवा निष्ठा फारच थोड्याजणांच्या वाट्याला येत असेल. इथल्या ग्रामस्थांबद्दल मला कौतुक वाटलं ते आणखी एका कारणासाठी. आमदार रामभाऊ तुप्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात जनता पक्षाच्या आर्थिक दुरावस्थेची कल्पना दिली होती. ती ऐकल्याबरोबर लगेच सभा संपेपर्यंत या सर्व गावकऱ्यांनी आपल्या नेत्याकरवी–सुदाम म्हस्के–दोनशेएक रु. रोख संभाजीरावांच्या स्वाधीन केले. जनता पक्ष खेडोपाडीही किती प्रभावीपणे काम करत आहे, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. त्याचबरोबर कसंही करून यावेळी कांग्रेसला खाली खेचलंच पाहिजे, ही त्यांची ईर्षाही यातून व्यक्त होते.

डाळिंबनंतर बोरिऐंदी, यवत, भांडगाव या ठिकाणी दौरा झाला. बोरिऐंदीला दुपारच्या वेळी एका पारावर बसून सरबताचे घोट घेता घेता तिथल्या कार्यकर्त्यांशी बातचीत झाली, तर यवतला कांग्रेस पक्षातर्फे ना. शरद पवारांची सभा ज्या ठिकाणी होणार होती त्या ठिकाणासमोरच तात्पुरती टेबल-खुर्ची टाकून संभाजीरावांचा सत्कार करण्यात आला. अर्थात रामभाऊ तुप्यांनी यावेळी थोडा हस्तक्षेप करून, 'आपण निवडणुकीची आचारसंहिता पाळणारी लोकं असल्यामुळे आज इथे कांग्रेस पक्षाची सभा असताना आपण तिच्यासमोरच आपली सभा घेणं योग्य नव्हे.' अशी तिथल्या उत्साही, तरुण कार्यकर्त्यांची समजूत घातली. अर्थात इथेही एक गोष्ट जाणवल्याशिवाय राहिली नाही आणि ती म्हणजे इतर सर्व गावांप्रमाणेच इथेही संभाजीरावांचे जोरदार स्वागत, मिरवणूक आणि सत्कार झाला. तसंच इतर ठिकाणांप्रमाणेच इथेही कांग्रेसच्या बूथमध्ये गाण्यांच्या रेकॉर्डस् लावत बसलेल्या माणसांव्यतिरिक्त दुसरा माणूस नव्हता. सगळेजण संभाजीरावांच्या मिरवणुकीत सामील झाले होते.

काल फारच उशीर झाल्यामुळे केसनंदची सभा आजवर ढकलली होती. त्यामुळे यवतनंतर भांडगावला अशीच एक जोरदार सभा करून केसनंदला आलो. इथे तरुणांचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. संभाजीरावांची सबंध गावातून मिरवणूक काढण्यात आली. स्त्रियांनी वाटेत घागरी-घागरी पाणी ओतले व कुंकुमतिलक लावून पंचारतीही ओवाळल्या. नंतर मारुतराव काळे, आमदार रामभाऊ तुपे, डॉ. आबड, तळेगाव-ढमढेऱ्याचे श्री. अरुण शितोळे आणि शेवटी संभाजीरावांचं भाषण झालं. ही सभा फारच रंगली. इथे श्रोतावर्गही फार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता. त्यामध्ये स्त्रियाही सामील झाल्या होत्या.

केसनंदसारखीच दुसरी एक सभा चऱ्होली या गावी झाली. आतापर्यंत झालेल्या सर्व सभांपेक्षा इथला जनसमुदाय मोठा होता. संभाजीरावांनीही कांग्रेस पक्षाच्या अगदी मर्मावरच आघात करीत इथल्या श्रोत्यांची मनं जिंकली. चऱ्होलीनंतर कळसला जायचं, असं कार्यक्रमपत्रिकेत ठरलं होतं. पण मोशीचे काही तरुण उत्साही कार्यकर्ते या चऱ्होलीच्या सभेला आले होते. त्यांनी संभाजीरावांना खूपच आग्रह करून गाडी मोशी गावाकडे वळवायला लावली. कारण त्या ठिकाणी फार मोठा जनसमुदाय रात्री आठ वाजल्यापासून संभाजीरावांची वाट पाहात ताटकळत बसला होता. त्यामुळे मोशीमध्येही प्रचंड जनसमुदायासमोर आपली वैयक्तिक व पक्षाचीही लोकशाहीविषयक भूमिका संभाजीरावांनी मोठ्या प्रभावीपणे मांडली. यानंतर रात्री एक वाजता कळस या गावी त्या दिवसातील शेवटची सभा झाली. पण इतक्या अवेळीसुद्धा (आपल्यासारख्यांच्या दृष्टीने) दोन-तीनशे लोकांचा जमाव तेथे होताच. शिवाय संभाजीरावांना इथे यायला उशीर होणार याची जाणीव झाल्याबरोबर त्यांचे सदासज्ज वक्ते आ. रामभाऊ तुपे व मा. मारुतराव काळे पुढे गेलेले होतेच.

अशा तऱ्हेनें हा दौंड तालुक्यातील काही भागाचा धावता दौरा करून घरी येईपर्यंत पहाटेचे अडीच वाजले. अर्थात आज जरा लवकर आलो होतो. कारण काल, हवेली तालुक्याचा दौरा करून येईपर्यंत पहाटेचे पाच वाजले होते. संभाजीरावांनी थोडेफार काही तरी खाल्ले आणि ते विश्रांतीसाठी गेले

## लिफ्ट प्रकरण अंगाशी आलं !

हवेली तालुक्यातून हिंडत असताना कांग्रेसविरोधी वातावरण होण्याची दोन कारणं कळली. एक म्हणजे कुटुंब-नियोजनाचा खेडोपाडी झालेला बळजबरी प्रचार आणि दुसरं म्हणजे लिफ्ट बसवण्याची योजना.

ही लिफ्ट योजना फार मनोरंजक आहे. काही वर्षांपूर्वी या हवेली भागातल्या कांग्रेस पुढाऱ्यांनी इथल्या शेतकऱ्यांसमोर अशी एक योजना मांडली की, आपण या भीमा नदीवर जागोजागी लिफ्टस् बसवून घेऊ. त्यामुळे तुमच्या जमिनीच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. अर्थात ही योजना तशी खर्चिक, म्हणून या कांग्रेसच्या पुढाऱ्यांनी आणखी एक योजना मांडली. आपण यासाठी स्वतः थोडा पैसा उभा करू आणि नंतर त्याच्या आधारे सरकारकडून अधिक कर्ज घेऊ. आता गरीब शेतकऱ्यांकडे हा तरी पैसा कोठून असणार ? पण या पुढाऱ्यांकडे त्यावरही तोडगा होताच. त्यांनी या भोळ्या शेतकऱ्यांना सांगितलं, तुम्ही तुमच्या जमिनी तारणावर लिहून द्या. म्हणजे त्यातून पैसा उभा करता येईल. एकदा लिफ्टस् बसवली म्हणजे तुमच्या शेतात जे उत्पन्न येईल त्यातून हे कर्ज सहज फिटू शकेल. बिचाऱ्या शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने जमिनी लिहून दिल्या. कांग्रेसच्या पुढाऱ्यांनी त्यातून पैसा उभा केला. पण नंतर त्यांच्या असं लक्षात आलं की, या योजनेसाठी लागणारे सीमेंट पाईप्स विकत घेणं परवडणार नाही, तेव्हा आपण स्वतःच एक या पाईप्सचा कारखाना काढावा. पण त्यांची ही योजना पूर्णपणे फसली आणि त्यामुळे साहजिकच पैसाही गेला. यातून शेतकऱ्यांना जबर फटका बसला. कारण आता कर्ज काढूनही काम काहीच दिसत नसल्याने सरकारकडून त्यांच्या जमिनीवर जप्तीच्या नोटिसा आल्या आहेत. बरं, या पुढाऱ्यांना कोर्टात खेचायचं म्हटलं तरी, आधीच गरीब असलेल्या शेतकऱ्यांजवळ आता अंगावरच्या वस्त्रापलीकडे काहीच राहिलेलं नाही. एक शेतकरी तर सांगत होता—' या सरकारकडून येणाऱ्या जप्तीच्या नोटिसांनी माझ्या घरातली पत्रं लावायची एक तार गच्च भरलीया. आता दुसऱ्या नव्या तारेला या नोटिसा लावणं सुरू केलंय्.'

असं हे लिफ्ट प्रकरण. कांग्रेस पुढाऱ्यांच्या एकाहून एक कल्पक योजनांमुळे गरीब शेतकऱ्यांच्या घरांवरही गाढवाचा नांगर फिरवणार. म्हणूनच फुलगावसारख्या ठिकाणी एका बंद दुकानाच्या फळकुटावर मला असंही लिहिलेलं आढळलं—' लिफ्टच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनीचा लिलाव काढणाऱ्या कांग्रेसला मतं देऊ नका.'

◻

कारण पुन्हा सात वाजता पुढला टप्पा सुरू करायचा होताच.

सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे या दोन धावत्या दौऱ्यांमधून एक महत्त्वाची गोष्ट जर काही अनुभवाला आली असेल तर ती म्हणजे, ग्रामीण भागातही होत चाललेली राजकीय जागरूकता. अर्थात यातूनच काँग्रेस-विरोधी फार मोठं वातावरण या भागात तयार झालेलं आहे. काही ठिकाणी तर सबंध गावानेच काँग्रेस पक्षावर बहिष्कार टाकून त्यांच्या प्रचारकांना गावात पाऊलं टाकणंही मुष्किल केलं आहे. त्यामुळे 'माझा स्वतःचा या परिसराशी फारसा परिचय नसला तरी केवळ काँग्रेस पक्षाच्या नावावर मी सहज विजयी होईन,' या बॅ. विठ्ठलराव गाडगीळांच्या विधानाविषयी शंका येऊ लागलेली आहे. जनता पक्षावरील आपला विश्वास हे ग्रामस्थ बांधव केवळ शब्दातूनच व्यक्त करीत नाहीत तर तो त्यांच्या कृतीतूनही अनुभवाला येतो. अन्यथा अशा नवख्या पक्षाला खेडेगावांमधल्या पहिल्या-वहिल्या प्रचारसभेत पाचशे आणि हजार रुपये कुठून मिळायला ? याच दृष्टिकोणातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या ग्रामीण भागातून जनता पक्षाचं कार्य करणारी सर्व मंडळी तरुण आहेत, त्यामुळे त्यांच्यात काही निराळाच उत्साह आणि शक्ती आहे. लहान लहान पोरंसुद्धा केवळ गाडीवर लावलेला जनता पक्षाचा झेंडा पाहून 'संभाजीराव काकडे झिंदाबाद' अशा घोषणा देऊ लागत होती. या सगळ्यातून प्रतीत होतं ते एकच, की जनता पक्षाच्या या रोपट्याने शहरातही धरलं नसेल इतके जोरकस मूळ ग्रामीण भागातून धरलं आहे. वाटेल तेवढा उशीर होऊनही सभांना झालेली गर्दी हटत नव्हती, हे कशाचं द्योतक आहे ?

या सगळ्यांबरोबरच 'मतदार हा राजा आहे, तेव्हा उमेदवाराने त्याला सामोरं गेलंच पाहिजे,' असा संभाजीरावांचा दृढ विश्वास आणि त्याप्रमाणे त्यांची कृती, त्यामुळे आम्ही भेट दिलेल्या या वीस-बावीस गावांपैकी एकाही गावाने यापूर्वी आपला उमेदवार प्रत्यक्ष डोळ्यांनी कधीच पाहिला नव्हता. याहीवेळी विठ्ठलराव गाडगीळांनी यांपैकी एकाही गावाला अद्याप भेट दिलेली नाही. (आणि पुढेही कधी देण्याची शक्यता नाही. कारण अशा लहान-लहान गावांकरता त्यांनी आपले एजंटस् नेमले आहेत.) या सगळ्या पार्श्वभूमीवर संभाजीरावांची ही कृती फारच मोठा परिणाम साधते. कारण सर्वच गावकऱ्यांना आपला लोकसभेचा उमेदवार साक्षात पाहावयास मिळणे हेही अहोभाग्यच वाटले. अनेकांनी तसं बोलूनही दाखवलं.

तेव्हा विठ्ठलरावांना एकच इशारा द्यावासा वाटतो की, त्यांनी जरा सावध असलेले बरं. काळ बदललाय, हवा बदललीय् आणि-आणि आता ही ग्रामस्थमंडळीही बदलली आहेत. हा 'जनविराट' ज्वालामुखीसारखा जागा झाला आहे. ○

# बदमाष काळ

पाश्चात्य लेखकांच्या प्रभावळीतील एक तेजःपुंज लेखिका म्हणजे लिलियन हेलमन, 'द लिटल फॉक्सेस', 'वॉच ऑन द ऱ्हाईन', 'द चिल्ड्रेन्स अवर', 'ऑटम गार्डन', 'टॉईज इन द अॅटिक' आदी तिच्या नाटकांनी साहित्यक्षेत्रात तिला अनन्यसाधारण स्थान मिळवून दिलं. 'अॅन अनफिनिश्ड वुमन' या तिच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकाला राष्ट्रीय पारितोषिक मिळालं. 'पेटिमेन्टो' हे तिचं दुसरं आत्मचरित्रात्मक पुस्तकही अतिशय गाजलं. परंतु एवढ्यासाठीच लिलियन् हेलमन प्रसिद्ध नाही. तिच्या मनाचा कणा भुसभुशीत नाही. तो पोलादी कांबीसारखा कणखर आहे, हे तिनं मॅकार्थीच्या काळच्या युगात दाखवून दिलं. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेतील अनेक विचारवंतांनी रशियाला पाठिंबा दिला होता. परंतु शीतयुद्ध सुरू झालं आणि कम्युनिस्टधार्जिण्यांविरुद्ध प्रचंड मोहोमच निघाली. या वावटळीत हेलमन सापडली. 'हाऊस कमिटी ऑन अॅन-अमेरिकन अॅक्टिव्हिटिज' ने हेलमनवर समन्स बजावलं. कम्युनिस्टांच्या एका बैठकीला हजर राहिली एवढाच काय तो तिचा दोष होता. हेलमन डगमगली नाही. ती संकटाला धीरोदात्तपणे सामोरी गेली. एक रोखठोक पत्र तिनं या कमिटीला पाठवलं. इतरांची नावे सांगायला तिने स्पष्ट नकार दिला. कमिटी तिला शिक्षा करू शकली नाही. परंतु नंतरची वर्षे तिला फार हालात काढावी लागलीं. सर्व जग तिला पाठमोरं झालं. पण तरीही 'दुर्गा' वतार असलेली ही मनस्वी लेखिका ताठ मानेनं राहिली. हेलमननं त्या काळातील कटू आठवणी सांगणारं 'स्काऊन्ड्रल टाइम' हे पुस्तक गतवर्षी लिहिलं. विचारस्वातंत्र्याच्या सध्याच्या झगड्याला या पुस्तकाचं महत्त्व अमोल आहे. अमेरिकेत सर्वोत्कृष्ट ठरलेल्या या पुस्तकाचा अशोक जैनकृत परिचय वास्तविक या अंकात द्यायचा विचार होता. पण मूळ पुस्तक व आवश्यक ते संदर्भ वेळेवर हाती आले नाहीत. जमल्यास एकदम पुस्तकरूपाने नाहीतर 'माणूस' मधून एक-दोन हप्त्यांत हा परिचय लवकरच देण्यात येईल. परवानगी कोणत्या स्वरूपात मिळते त्यावर हे अवलंबून आहे. लेखनस्वातंत्र्याची लढाई ही काही निवडणुकीपुरतीच मर्यादित नसल्याने या पुस्तक-परिचयाचे महत्त्व प्रसिद्धीस थोडा उशीर झाला तरी मुळीच कमी होणारे नाही. तरी पण योजल्याप्रमाणे या अंकात परिचय जाऊ शकला असता तर चांगले झाले असते. पण इलाज नव्हता-क्षमस्व.

—संपादक

( या अंकातील डॉ. श्रीराम लागू व जयवंत दळवी यांच्या मलाखतीचे शब्दांकन : अशोक जैन ).

# उत्पादनाचा नवा उच्चांक

**१ जुलै १९७५ रोजी, आर्थिक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर, राष्ट्राने निर्धाराने आगेकूच केली आहे. आणि या निर्धाराचे फळ म्हणजे :**

- ११८ दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन करून, एक नवा उच्चांक गाठण्यात आला आहे आणि आज १८ दशलक्ष टन धान्याचा साठा आपणाजवळ आहे.
- १९७६–७७ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत औद्योगिक उत्पादनात, गेल्या वर्षीच्या याच काळातील ३ टक्के वाढीच्या प्रमाणात १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.
- १९७६ च्या पहिल्या सात महिन्यांत, निर्यातीत ३३·९ टक्के वाढ करून नवा उच्चांक गाठण्यात आला आहे.

DAVP/76/871

# इथे मिसाचिये नगरी

पृष्ठ ६ वरून

घरात बंद होतील. इंदिरा गांधींची राजकीय अब्रू तशा परिस्थितीतही धोक्यात आणणाऱ्या दुर्गा भागवत पुनः मिसाखाली बंदिवान होतील.

'वृत्तपत्रांनी निर्माण केलेल्या या 'लाटेचा आमच्यावर काहीही परिणाम होणार नाही' असा जाहीर दिलासा शंकररावांनी आम्हाला दिला. यामुळेच केवळ, जनता लाटेखाली गुदमरता गुदमरता आम्हाला जगावेसे वाटते आहे.

'विचारस्वातंत्र्य गेले, की माणसाचा पशू होतो,' असे पद्मश्री पु. ल. देशपांडे म्हणतात. चांगले, विनोदी लिहितात–बोलतात. म्हणून त्यांना इंदिरा सरकारने पद्मश्री दिली. तर त्याचे त्यांना काही नाही. खुशाल ५०–५० हजार माणसे जमवून इंदिरा गांधींवर, यशवंतरावांवर, चि. संजयावर विनोद करून लोकांना हसवतात. आम्ही पु. लं. ना बजावतो–'राज्य करणे म्हणजे विनोद करणे नाही!' वाक्य आम्ही लिहिले, पण बोलतील यशवंतराव! असं म्हणणाऱ्याला 'पद्मश्री' देण्याची चूक कशी काय झाली कळत नाही. होऊ दे हो पु. ल. आमचा पशू! संजय गांधींचे मार्गदर्शन लाभलेला आमचा 'पशुपाल' सत्तेवर राहणार आहे ना? गायवासरांचे हे 'गोपाल' हेच खरेखुरे 'पशुपाल' आहेत. अनृताची; गोपाला-मृत्यू आला-यश ना पशुपाला! हे साफ साफ खोटे वृत्त आहे. हे गोपाल तसे एका लाटेत मरणार नाहीत.

विचारांची नसबंदी हे पाप आहे म्हणे! अनुभव तर उलट आहे. अंगाखाली सत्तेची गादी असावी. विचारांची नसबंदी करून घ्यावी, मग सुखाला काय तोटा? गादीवर नुसते पडून राहायचे. 'स्थिर'पणी अजब सुख! शंकरराव, तुमचा अनुभव असाच आहे ना हो?

अम्हा तो शंकर सुखकर हो ॥
आणीबाणी, बिकट काननी
तपकरी, शुभकरी, प्रियदर्शिनी
तिजवरी भुलत 'कॉंग्रेस' जगी...
तो शंकर सुखकर हो ॥

□

## □ 'स्वामी' तिन्ही जगाचा 'बाई' विना भिकारी

दि. ७-३-७७. सायंकाळी ६ वाजायचा सुमार. शनवारवाड्याच्या दिशेने माणसांचा महापूर लोटलेला. शनवारवाड्याला मानवसमुद्राचा गराडा. अभूतपूर्व गर्दी. जाणकार सांगत होते–'अशी सभा आजतागायत आम्ही पाहिलेली नाही.' जवळजवळ दीड–दोन लाख माणसे कशाकरता जमली होती? त्यांना 'स्वामी' पाहायचा होता. सुप्रसिद्ध देशद्रोही सुब्रह्मण्यम स्वामी! ज्याने परदेशात पळून जाऊन इंदिराजींच्या आणीबाणीचा बुरखा फाडला, ज्याने इंग्लंडमध्ये दे. भ. हितुभाई देसाई यांची छी:थू केली, ज्याने अमेरिकेत दे. भ. जनाब अब्दुल रहमान अंतुले यांची टर उडवली, ज्याने बी. बी. सी. वरून भारतात तुरुंगात पडलेल्या श्रेष्ठींची नावे जगाला ओरडून सांगितली, तोच हा स्वामी.

या स्वामीची खासगी मालमत्ता सरकारने जप्त केली आहे. कारण याने राज्यसभेत घुसून भारताच्या पंतप्रधानांची अब्रू की हो जप्त करून नेली. अक्षरक्षः परदेशात नेली! ओम मेहतांच्या सगळ्या पोलीस खात्याला गुंगारा देऊन हा स्वामी पुनः भारताबाहेर निसटला, तो आणीबाणी सैल होताच जनता पक्षाचा उमेदवार म्हणून मुंबईत पुनः अवतरला. शिवाजी–सावरकर–सुभाष आणि स्वामी! इंग्रजी 'एस्' या अक्षराने सुरू होणारे हे चार अग्रणी–भारताच्या इतिहासात आपल्या पळपुटेपणाने अजरामर होणारे आहेत. हा स्वामी देशद्रोही आहे. जयंतराव टिळकांना विचारा, ते सांगतील. शंकरराव चव्हाणांना विचारा, ते सांगतील. देवकांत बरुआंना विचारा, ते सांगतील–'स्वामी देशद्रोही आहे.' जयप्रकाशांच्या आज्ञेनुसार हा आपण परदेशात निसटल्याचे सांगतो म्हणजे पर्यायाने जयप्रकाशदेखील देशद्रोहीच.

खासगी संभाषणात पुण्याचे गल्लोगल्लीचे कॉंग्रेस नेते–स्वामीला शनवारवाड्यासमोर फाशी देण्याच्या वल्गना करीत होते. आम्हाला वाटले, तोच कार्यक्रम आज आहे म्हणून देशभक्तांची ही गर्दी देशद्रोह्याला पाहाण्यासाठी जमली आहे.

परंतु तोबा! तोबा! ही गर्दी स्वामीचा जयजयकार करीत होती. ही जनता स्वामीने जे केले त्याबद्दल कृतज्ञ होती. ही जनता स्वामीवर इंदिरा सरकारने जे आरोप केले त्याचा जाब मागणारी होती. स्वामीच्या कुटुंबियांचा सरकारने जो छळ केला, त्याचे वर्णन स्वामीच्या तोंडून ऐकताना ही माणसे इंदिरा सरकारला जळजळीत शाप देत होती. शेम–शेम ओरडा करीत होती.

हा स्वामी इथे जे जे बोलला, त्याला अथांग जनसागराने आपले म्हटले. बंदी घातलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला या स्वामीने गौरविले. 'लखलखीत देशभक्तीची प्रेरणा असलेली ही राष्ट्रभक्तांची संघटना आहे.' असा जाहीर पुकारा या स्वामीने लाखो लोकांसमोर केला आणि त्याला लाखो हातांनी प्रतिसाद दिला.

हा स्वामी म्हणे अर्थतज्ज्ञ आहे! परंतु तो देशद्रोही आहे, हे आम्हाला महत्त्वाचे वाटते. इंग्लंड, अमेरिका आणि भारतातील कोट्यवधी जनतेने जरी त्याच्या कामगिरीचा गौरव केला असला तरी इंदिराबाईंच्या प्रमाणपत्राखेरीज आम्ही याला देशद्रोहीच समजणार. एका कॉंग्रेसवासी कवीने म्हटलेलेच आहे :

'स्वामी' तिन्ही जगाचा
'बाई' विना भिकारी ॥

□

# माझी अशी श्रद्धा आहे—

खरे म्हणजे लोकशाही म्हणजे केवळ एक प्रिय प्रजासत्ताक राज्य नव्हे. पण शासन-व्यवस्थेच्या इतर कोणत्याही प्रचलित पद्धतीपेक्षा हिच्यामध्ये तिरस्काराला कमी वाव असतो आणि असं असल्यामुळे आपण तिला पाठिंबा द्यायला हवा. प्रत्येक व्यक्तीचं महत्त्व गृहीत धरूनच लोकशाही अस्तित्वात येते; शिवाय सुसंस्कृत समाजाच्या उभारणी-साठी निरनिराळ्या स्तरांचंही महत्त्व ही पद्धती मानते. केवळ कार्यक्षमतेला महत्त्व देणाऱ्या राजपद्धतीप्रमाणे ही पद्धती नागरिकांचे ‘ हुजूर ’ आणि ‘ हुजऱ्या ’ असे विभाजन करीत नाही. काही तरी नवीन निर्माण करण्याची, काही तरी नवा शोध लावण्याची धडपड करणाऱ्या जीवनाकडे, शक्तीच्या किंवा सत्तेच्या दृष्टिकोनातून न पाहणाऱ्या अशा संवेदनाक्षम लोकांचं मला अत्यंत कौतुक वाटतं आणि अशा लोकांना इतर कोणत्याही शासनपद्धतीपेक्षा लोकशाहीतच अधिक वाव मिळतो. ते लहान किंवा मोठ्या धर्माचा पाया घालतात, किंवा कला आणि साहित्याची निर्मिती करतात किंवा निरपेक्ष शास्त्रीय संशोधन करतात, अथवा कदाचित स्वतःच्या खाजगी जीवनात, स्वतःच्या कुटुंबाची काळजीपूर्वक आणि व्यवस्थितपणे वाढ करणे किंवा शेजाऱ्यांना मदत करणे अशा प्रकारची विधायक आणि निर्मितिक्षम काम करणारी ती सामान्य माणसं असतात. ह्या सर्व लोकांनी स्वःतचे विचार व्यक्त केले पाहिजेत. परंतु समाजाने तशी परवानगी दिल्याशिवाय ते हे करू शकणार नाहीत आणि या जनसामान्यांना जास्तीत जास्त आविष्कारस्वातंत्र्य देणारी समाजव्यवस्था म्हणजेच लोकशाही ! !

( E. M. Forster च्या ‘ What I believe ’ या पत्रकामधून. )